Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57
वर्ष ७९, अंक ३५, ५ रुपये, शहर आवृत्ती, पृष्ठे १२ + सहदैनिक ★

मुंबई, बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

मुंबई, पुणे, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!

अग्रलेख

**वैद्यकीचेही गलगोटियाकरण**

वैद्यकीय क्षेत्रात गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ हवे, तर फक्त प्रवेश प्रक्रियेतील बदल पुरेसे नाहीत. व्यवस्थेचा फेरविचार करताना खासगी संस्थांचे शुल्क नियमन करावेच लागेल...




क्रीडा

**इंग्लंड उपांत्य फेरीत**


एन.इ.सी.सी. Vencobb

| | |
|---|---|
| ब्रॉयलर विकत्या दर (पोल्ट्रीफार्मवर) | १०७ रु. प्रति किलो |
| चिकन विक्रीचा दर जिवंत कोंबडी | १३५ रु. प्रति किलो |
| ड्रेस्ड कोंबडी (चिकनसह) दर | १६७ रु. प्रति किलो |
| अंडी किरकोळ विक्री दर | ७१ रु. प्रति १२ अंडी |


**तापमान**

कमाल ३४° से | किमान २१° से

हवामानाचा अंदाज
आकाश निरभ्र राहील.

**काय चाललंय काय!**

प्रशांत कुलकर्णी




तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण या असल्या बोगस विद्यापीठातून बोगस पदवी घेतलेल्या बोगस विद्यार्थ्यांनी अनेक बोगस उद्योग उभे केले आणि त्यासाठी बँकांकडून खरोखरची कर्जे घेतली!!

# अनिश्चिततेमुळे अस्थिरता

## अमेरिकेच्या आयातशुल्काबाबतच्या संभ्रमाने शेअर बाजारात घसरण




वृत्तसंस्था, वॉशिंग्टन

**अमेरिकेचे अध्यक्ष** डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी घोषणा केल्याप्रमाणे मंगळवारपासून १० टक्के आयातशुल्क लागू झाले असल्याचे सीमाशुल्क आणि सीमा संरक्षण (सीबीपी) विभागाने जाहीर केले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी, त्यांनी १५ टक्के आयातशुल्क आकारण्याची घोषणा केली. त्यात बदल होणार नसल्याचे व्हाइट हाऊसने स्पष्ट केले.

धोरणातील अनिश्चिततेने जागतिक बाजारात उमटलेल्या नकारात्मक प्रतिक्रियेने देशांतर्गत बाजारात, सेन्सेक्स-निफ्टी निर्देशांकांना सव्वा टक्क्याचे मोठे नुकसान झाले. आयात कराबाबत चित्र स्पष्ट *(पान १० वर)*

### ट्रम्प यांच्याविरोधात वाढती नाराजी

डोनाल्ड ट्रम्प हे वयोमानानुसार अधिक लहरी होत आहेत, असे अमेरिकेतील बहुसंख्य जनतेला वाटत असल्याचे 'रॉयटर्स' आणि 'इप्सॉस'ने केलेल्या जनमत चाचणीतून समोर आले आहे. ट्रम्प ७९ वर्षांचे असून जगातील वयाने सर्वात ज्येष्ठ राष्ट्रप्रमुखांपैकी एक आहेत. ट्रम्प काँग्रेसमध्ये वार्षिक भाषण करण्याच्या एक दिवस आधी, सोमवारी या चाचणीचे निकाल जाहीर करण्यात आले. त्यानुसार, ६१ टक्के अमेरिकी व्यक्तींनी ट्रम्प यांच्यावर टीका केली आहे, चाचणीत सहभागी झालेल्यांमध्ये ३० टक्के लोक रिपब्लिकन पक्षाचे समर्थक आहेत.

अमेरिकेत आयातशुल्काबाबत चित्र अधिक स्पष्ट होईल तेव्हाच भारत सरकार कराराबाबत चर्चा सुरू करेल.
**– पीयूष गोयल,** केंद्रीय वाणिज्यमंत्री

### 'करार रद्द करण्याचे धाडस दाखवा'



**भोपाळ :** भारताने दबावाखाली अमेरिकेशी करार केला आहे. तो रद्द करण्याचे धाडस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवावे, असे आव्हान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दिले. किसान महाचौपाल सभेत त्यांनी हा करार शेतकऱ्यांच्या मुळावर येणारा असल्याची टीका केली. नरेंद्र मोदी यांनी देशहिताशी तडजोड केली. हा करार नसून शेतकऱ्यांच्या हृदयात घुसलेला बाण आहे, अशा शब्दांत त्याची संभावना केली.

# निधीची 'मात्रा' मिळूनही अनास्था

## पालिकेकडून आरोग्यावरील तरतुदींपैकी ३५ टक्केच खर्च

प्रसाद रावकर, लोकसत्ता

**मुंबई :** मुंबई महापालिकेची मुख्य आणि उपनगरीय रुग्णालये, प्रसूतिगृहे, आरोग्य केंद्रे, दवाखान्यांमधील अस्वच्छता, औषधांचा तुटवडा, डॉक्टरांसह अन्य कर्मचाऱ्यांचे अपुरे संख्याबळ अशा कारणांमुळे आरोग्य सेवेवर परिणाम होत आहे. एकीकडे पालिका प्रशासनाने चालू आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात आरोग्य विभागासाठी २१७२.७३ कोटी रुपयांची तरतूद केली, मात्र त्यापैकी केवळ ३५.४९ टक्के म्हणजेच ७७१.१७ कोटी रुपये आरोग्य सेवेवर खर्च झाले. महायुतीच्या राजवटीतील पहिला अर्थसंकल्प बुधवारी मांडला जाणार आहे.

पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत तीन मोठी रुग्णालये, १६ संलग्न उपनगरीय रुग्णालये, प्रसूतिगृहे, क्षयरोग रुग्णालय, कान-नाक-घसा रुग्णालय, नेत्र रुग्णालय, दवाखाने, आरोग्य केंद्रे यांच्या माध्यमातून मुंबईकरांना आरोग्य सेवा देण्यात येते. रुग्णांना घराजवळ आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी म्हणून अनेक ठिकाणी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करण्यात आला.

रुग्णांवर चांगले उपचार करता यावेत, यासाठी पालिकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात आरोग्य विभागासाठी २,१७१.७३ कोटी रुपये निधी प्रस्तावित केला. आरोग्य सेवेसाठी चालू आर्थिक वर्षात १,२९७.३८ कोटी रुपये खर्च होतील, अशी प्रशासनाला अपेक्षा होती. मात्र ३१ जानेवारी २०२६ पर्यंत प्रत्यक्षात ३५.४९ टक्के म्हणजे ७७१.१७ *(पान ९ वर)*

### ८० हजार कोटींचे आकारमान



चालू आर्थिक वर्षात प्रशासनाने ७४,४२७ कोटींचा अर्थसंकल्प सादर केला होता. आधीच्या वर्षी ६५,१८० कोटींचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता. त्यामुळे चालू अर्थसंकल्पात १४.१९ टक्के वाढ झाली होती. यंदाही अर्थसंकल्पाचे आकारमान वाढणार असल्याची चर्चा आहे. पालिकेने हजारो कोटींचे मोठे प्रकल्प हाती घेतले असून अडीच लाख कोटींपेक्षा अधिकचे दायित्व आहे. मागीलवेळी इतकी वाढ झाली नाही तरी अर्थसंकल्पाचे आकारमान वाढणार, हे निश्चित.

# भुमरेंच्या वाहनचालकाला जन्मापूर्वीच तीन एकर जमीन बक्षीस

## 'समृद्धी'मधील मोबदला उचलण्यासाठीचा डाव?

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** समृद्धी महामार्गातील १,१५० कोटी रुपयांच्या मूल्यांकनातील रक्कम मिळावी, यासाठी खासदार संदीपान भुमरे यांचे वाहनचालक जावेद रसूल शेख यांच्या नावे १९७१ मध्ये तीन एकराचा हिबानामा (बक्षीस पत्र) करण्यात आला. वस्तुतः जावेद रसूल यांचा जन्म १९८५ मधील असल्याने हा हिबानामा कसा झाला, यात कोणाचे हितसंबंध दडले आहेत, याची गुन्हे अन्वेषण विभागाकडून चौकशी करावी, अशी मागणी शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे व महसूल प्रशासनाकडे केली आहे.

या जमिनीचे सध्याचे बाजारमूल्य १५० कोटी रुपये आहे. हिबानामा ज्या जावेद रसूल शेख यांच्या नावे आहे ते सत्ताधारी खासदार भुमरे यांच्या वाहनाचे *(पान ९ वर)*

### हिबानामा म्हणजे काय?

हिबानामा म्हणजे बक्षीस पत्र. मुस्लीम समाजात वारस नसणाऱ्यास बक्षीसपत्र लिहून दिले जात असे. असा हिबानामा यापूर्वी जावेद रसूल शेख यांच्या नावे करण्यात आला. शेख यांचा जन्म १९८५ मधील आहे. मग १९७१ चा हिबानामा कसा, असा प्रश्नही दानवे यांनी उपस्थित केला. महसूल सहआयुक्तांनी जमीन हडप करण्यासाठी बऱ्याच खटपटी केल्याचे त्यांच्या पत्रातही नमूद केले आहे.

जावेद शेख हा माझा वाहनचालक आहे हे अंबादास दानवे यांनी सिद्ध करावे. दुसरे असे की, एकसारखी नावे असणारे अनेकजण असतील. या व्यक्तीचा आणि माझा काही संबंध नाही. नुसते आरोप करून कसे चालेल? ते सिद्धही करावे लागतील.
**– संदीपान भुमरे,** खासदार, छत्रपती संभाजीनगर

तक्रार आल्यानंतर उपविभागीय अधिकाऱ्यांना अहवाल देण्यास सांगितले होते. शिवाय या प्रकरणात पोलीस अधिकाऱ्यांमार्फत गोपनीय चौकशी सुरू आहे. या अनुषंगाने मूळ हिबानामाच्या प्रती आणि जमिनीची कागदपत्रे पाहून चौकशी करण्यास सांगितले आहे. **– दिलीप स्वामी,** जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर

# सागरी मार्गासाठी १८४ झाडांवर कुऱ्हाड!

## उद्यानाचे अस्तित्व धोक्यात; वर्सोवा परिसरातील नागरिक आक्रमक

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** वर्सोवा ते मढ प्रस्तावित सागरी किनारा मार्गासाठी सातबंगला (वर्सोवा) येथील २० वर्षे जुन्या नाना-नानी पार्क उद्यानातील १८४ झाडे कापली जाणार आहेत. त्यामुळे उद्यानाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. यातून स्थानिकांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे.



अंधेरी पश्चिमेतील जुहू वर्सोवा लिंक मार्गावर वर्सोवाकडे जाताना नाना-नानी पार्क हे उद्यान स्थानिकांनी जतन केले आहे. चालण्यासाठी स्वतंत्र पट्टा, इतर सुविधा तेथे आहे. पालिकेच्या रस्ते व बांधणी विभागाने अचानक या उद्यानातील प्रत्येक झाडांवर नोटीस चिकटवून सुमारे १८४ झाडे कापली जाणार असल्याचे स्पष्ट केले. या बदल्यात १६४ झाडांचे पुनर्रोपण करण्यात येणार असल्याचे या नोटिसीत नमूद आहे.

स्थानिकांनी जपलेल्या हिरवळीवर आता सागरी मार्गासाठी कुऱ्हाड चालणार *(पान १० वर)*

### 'नाना-नानी पार्क'ला धोका नाही - साटम

नाना-नानी पार्कवर गदा येणार नाही. सागरी मार्गासाठी आवश्यक खांब या पार्कमध्ये उभारले जातील, असे स्थानिक आमदार व मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम यांनी सांगितले. 'विकास प्रस्तावात हे उद्यान आरक्षित नाही. हा पालिकेचा रस्ता होता. या रस्त्यावर उद्यान बनविण्याची परवानगी दिली, तेव्हा रस्त्यासाठी हा भूखंड पुन्हा ताब्यात घेतला जाईल, अशी अट घालण्यात आली होती. परंतु, तरीही नाना-नानी पार्क तेथेच पुन्हा उभे राहील असे आपल्याला सांगण्यात आले आहे. एकावेळी या उद्यानाच्या अर्ध्या भागात काम सुरु राहील,' असे साटम म्हणाले.

### विमान अपघातप्रकरणी 'व्हीएसआर'वर कारवाई

**नवी दिल्ली :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर विमान वाहतूक नियामक असलेल्या नागरी हवाई वाहतूक संचालनालयाने (डीजीसीए) व्हीएसआर व्हेंचर्स कंपनीच्या चार विमानांवर (लिअरजेट ४०/४५) उड्डाणबंदीचे निर्देश दिले. देखभालीतील त्रुटी लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आल्याचे डीजीसीएने म्हटले आहे. अपघातानंतर कंपनीचे विशेष लेखापरीक्षण करण्याचे आदेश देण्यात आले होते. २८ जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला होता. पान ८

### दुधाच्या किमतीत दोन रुपयांची वाढ

**मुंबई :** दूध खरेदी दरात वाढ झाल्यामुळे राज्यातील प्रमुख दूध संघांनी गायी आणि म्हशीच्या दूध विक्री दरात दोन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ग्राहकांसाठी १ मार्चपासून ही दरवाढ लागू होणार आहे. पुण्यातील कात्रज डेअरी येथे झालेल्या दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. पान ९

### गर्भाशयाचा कर्करोग रोखण्यासाठी लसीकरण

**नवी दिल्ली :** गर्भाशयाचा कर्करोग रोखण्यासाठी केंद्र सरकारने देशातील १४ वर्षे आणि त्यापुढच्या वयोगटातील मुलींसाठी 'एचपीव्ही' म्हणजेच ह्युमन पॅपिलोमाव्हायरस लसीकरण मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी गार्डासिल ही लस वापरली जाईल. वयाची १४ वर्षे पूर्ण केलेल्या १ कोटी १५ लाख मुली यासाठी पात्र असतील. पान ८

# विकासकाला ५० कोटींची भरपाई देण्याचे झोपडीवासीयांना आदेश

## भांडुपमधील प्रकल्पाबाबत लवादाचा निर्णय

निशांत सरवणकर, लोकसत्ता

**मुंबई :** भांडुपमधील झोपु योजनेत असहकार्य करणाऱ्या झोपडीवासीयांमुळे झालेल्या आर्थिक नुकसानीच्या भरपाईसाठी विकासकाने लवादाकडे धाव घेतली. लवादानेही विकासकाची बाजू मान्य करीत झोपडीवासीयांना ५० कोटी रुपये भरपाईपोटी विकासकाला देण्याचे आदेश दिल्यामुळे झोपडीवासीय हादरले आहेत. झोपडीवासीयांनी विकासकाला भरपाई देण्याचे हे पहिलेच प्रकरण ठरणार आहे.

भांडुप येथील साईनगर झोपडपट्टी पुनर्विकास सहकारी गृहनिर्माण संस्था आणि विकासक मे. चौरंगी डेव्हलपर्स *(पान ९ वर)*

आतापर्यंत कुठल्याही विकासकाने हा मार्ग अवलंबिला नसला तरी विनाकारण असहकार्य करणाऱ्या झोपडीवासीयांमुळे आपल्याला मोठे आर्थिक नुकसान झाले. त्याविरोधात लवादाकडे दाद मागण्याचा आपल्याला अधिकार आहे
**– अतुल शिरोडकर,** विकासक.

आमची काहीही चूक नाही. आम्ही झोपडी रिक्त करून दिली. आम्हाला वेळेत घर हवे आहे. असहकार्य करणाऱ्या झोपडीवासीयांमुळे विलंब झाला. त्यांच्याविरुद्ध विकासकाने कारवाई करावी. आम्हाला त्यात गोवले जाऊ नये. आम्ही इतके पैसे कुठून देणार?
**– प्रल्हाद पाटील,** मुख्य प्रवर्तक, साईनगर झोपु सहकारी गृहनिर्माण संस्था



### एशियाटिक सोसायटीची निवडणूक १४ मार्चला

**मुंबई :** एशियाटिक सोसायटीची बहुचर्चित निवडणूक अखेर १४ मार्च रोजी होणार आहे. काँग्रेसचे माजी खासदार कुमार केतकर आणि भाजपचे माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्यात अध्यक्षपदाची थेट लढत होत आहे. मतदारांच्या पात्र-अपात्रेवरून नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या निवडणुकीस मुंबई उच्च न्यायालयाने स्थगित दिली होती. एशियाटिक निवडणूक प्रथमच पक्षीय पातळीवर गेली आहे. काँग्रेस, भाजपचे पदाधिकारी यात उतरले आहेत. एशियाटिकचे जुने सदस्यही रिंगणात आहेत. त्यामुळे ही निवडणूक तिरंगी होत आहे. पान ३

# मराठी भाषेचा अभिजात दर्जा कागदावरच!

विकास महाडिक, लोकसत्ता

**मुंबई :** केंद्र सरकारने १५ महिन्यांपूर्वी मराठी भाषेला दिलेला 'अभिजात दर्जा' केवळ कागदावर आहे. स्वतंत्र 'उत्कृष्ट अध्ययन केंद्र' (एक्सलेंन्स सेंटर) स्थापन न झाल्याने केंद्राकडून राज्याला मराठी भाषा संवर्धन आणि संरक्षणासाठी आतापर्यंत एक छदामही मिळालेला नाही.



अभिजात दर्जा देण्यात आलेल्या देशातील भाषांसाठी केंद्राने २० वर्षांपूर्वी धोरण तयार केले. त्यात सुधारणा करण्याच्या सबबीखाली राज्य सरकारने पाठवलेला उत्कृष्टता केंद्र प्रस्ताव केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडे पडून आहे. सुधारणा होत नाही तोपर्यंत निधी नाही. त्यामुळे हा निधी कधी मिळेल, हे गुलदस्त्यात आहे.

प्राचीन परंपरा, संस्कृती आणि साहित्यनिर्मिती असलेल्या मराठी भाषेला राज्य सरकारच्या अनेक वर्षांच्या प्रयत्नानंतर ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्राने अभिजात दर्जा जाहीर केला. केंद्र सरकारने यापूर्वी तमिळ, संस्कृत, कन्नड, तेलुगू, मल्याळम, ओडिया *(पान ९ वर)*

**सुधारणा करण्याच्या सबबीखाली राज्य सरकारने पाठवलेला उत्कृष्टता केंद्र प्रस्ताव केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडे पडून आहे.**

### अधिकाऱ्यांची दिल्लीवारी

मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर राज्य सरकारने पहिल्यांदा मुंबईत स्वतंत्र असे उत्कृष्टता अध्ययन केंद्र स्थापन करण्याची परवानगी मागणारा प्रस्ताव केंद्राकडे सादर केला. हा निधी मिळावा, यासाठी राज्य सरकारच्या भाषा विभागातील उच्च अधिकाऱ्यांनी दोन वेळा दिल्लीवारी केली.

मराठी भाषा संवर्धनासाठी राज्यात, देशात आणि परदेशात (इग्लंड) अध्ययन उत्कृष्टता केंद्र उभारली जाणार आहेत. केंद्र सरकारकडे पाठविण्यात आलेला अध्ययन केंद्र उभारण्याचा प्रस्ताव परत आला. त्यात सुधारणा करून पाठविला जाणार आहे. केंद्राकडून अभिजात दर्जासाठी मिळणारा निधी मिळावा, यासाठी पुन्हा पाठविला जाणार आहे.
**– उदय सामंत,** मंत्री, मराठी भाषा




गुंतवणुकींना जीवनातील ध्येयांशी जोडल्याने तुमची ध्येये साध्य होण्यास मदत होऊ शकते.

म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक केल्याने तुमच्या संपत्ती निर्मितीच्या प्रवासात आर्थिक शिस्त येण्यास मदत होते.

आजच सुरुवात करा, तुमचा उद्या घडवा.

अधिक माहितीसाठी आपल्या आर्थिक सल्लागाराशी संपर्क साधा

म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांना "नो युअर कस्टमर (KYC)" प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे, जी पूर्ण KYC फॉर्म आणि आवश्यक कागदपत्रे कोणत्याही AMC च्या शाखा कार्यालयात किंवा अधिकृत स्वीकार केंद्रात सादर करून करता येते. KYC दस्तऐवजीकरणाच्या आवश्यकता, पत्ता, फोन नंबर, बँक तपशील इत्यादी बदलाची प्रक्रिया जाणून घेण्यासाठी कृपया भेट द्या: https://www.licmf.com/kyc-redressal. गुंतवणूकदारांनी फक्त SEBI नोंदणीकृत म्युच्युअल फंडांमध्येच गुंतवणूक करावी, ज्याचे तपशील SEBI च्या संकेतस्थळावरील 'Intermediaries/Market Infrastructure Institutions' (https://www.sebi.gov.in/intermediaries.html) अंतर्गत पडताळले जाऊ शकतात. कोणत्याही तक्रारी आणि तक्रार निवारणासाठी गुंतवणूकदार संबंधित AMC च्या गुंतवणूकदार संबंध अधिकारीशी संपर्क साधू शकतात, आणि AMC द्वारे दिलेल्या उपायाने समाधान न झाल्यास, ते SEBI च्या SCORES पोर्टलवर (https://scores.sebi.gov.in/) तक्रार नोंदवू शकतात आणि/किंवा ऑनलाइन वाद निवारण पोर्टलद्वारे (https://smartodr.in/login) तक्रार वाढवू शकतात.

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक बाजारातील जोखमींना अधीन आहे, सर्व योजना संबंधित कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा.
MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.




# शुल्क थकल्याने विद्यार्थ्याला शाळेतून काढणे बेकायदा

## न्यायालयाचे शाळा व्यवस्थापनावर ताशेरे

**तुषार धारकर, लोकसत्ता**

**नागपूर :** प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत, म्हणजेच ६ ते १४ वयोगटातील कोणत्याही मुलाला, केवळ शुल्क थकबाकीच्या कारणावरून शाळेतून काढता येत नाही. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना शाळेतून काढणे मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क कायदा, २००९ (आरटीई) च्या तरतुदींचे उल्लंघन ठरते, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने भंडारा जिल्ह्यातील सातवीतील विद्यार्थिनीला दिलासा दिला.

न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठासमोर याप्रकरणी सुनावणी झाली. भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथील फादर ॲग्नेल शाळेच्या व्यवस्थापनाने या विद्यार्थिनीचे २४ हजार रुपये शुल्क थकीत असल्याचे कारण देत मार्च २०२५ मध्ये 'ट्रान्सफर सर्टिफिकेट' देत तिला शाळेतून काढले. विद्यार्थिनीने याविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सुनावणीदरम्यान, ही शाळा विनाअनुदानित अल्पसंख्याक संस्थेची असून आरटीई कायदा आपल्यावर लागू होत नाही, असा दावा शाळा व्यवस्थापनाने केला.

मात्र, हा युक्तिवाद फेटाळताना न्यायालयाने नमूद केले की, राज्य सरकारच्या ना-हरकत प्रमाणपत्रावर तसेच जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांनी दिलेल्या मान्यतेच्या आधारे शाळा चालवली जात असताना, आरटीई कायदा लागू होत नाही असा दावा करणे मनमानी आहे.

यावेळी विद्यार्थिनीला शाळेतून काढण्याचा निर्णय व तिचे 'ट्रान्सफर सर्टिफिकेट' रद्द करत न्यायालयाने दोन आठवड्यांत थकीत शुल्क भरण्याचे निर्देश पालकांना दिले.

# कॉपीमुक्त अभियान प्रभावी!

## उपायांमुळेच परीक्षांतील गैरप्रकार उघड झाल्याचा शिक्षण मंडळाचा दावा

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** राज्यात दहावी, बारावीच्या परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी गेल्या काही वर्षांपासून कॉपीमुक्त अभियान सातत्याने राबवण्यात येत आहे. या अभियानामुळेच यंदा काही ठिकाणी सामूहिक कॉपी, गैरप्रकार उघडकीस आल्याचा दावा राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने केला आहे. यानंतर फौजदारी कारवाई, निलंबनामुळे अशा प्रकारांवर भविष्यात वचक बसण्यास मदत होणार असून हे गैरप्रकार थांबण्यासाठी मानसिकता बदलणे गरजेचे असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात आले आहे. राज्य मंडळातर्फे दहावी, बारावीच्या परीक्षा पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी कॉपीमुक्त अभियान राबवण्यात येत आहे. त्या अंतर्गत राज्य मंडळाकडून २७१ भरारी पथकांची नेमणूक, परीक्षा केंद्रांना आकस्मिक भेटी, विभागीय मंडळांतर्गतही विशेष भरारी पथकांची नियुक्ती, परीक्षा केंद्रांवर बैठी पथके, सीसीटीव्ही-ड्रोनद्वारे देखरेख, पोलीस बंदोबस्त अशा उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मात्र, आतापर्यंत राज्यभरात २००हून अधिक गैरप्रकारांची नोंद झाली आहे. त्यामुळे कॉपीमुक्त अभियान खरोखरच यशस्वी ठरले आहे का, असा प्रश्नदेखील उपस्थित होत आहे.

मंडळाचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे म्हणाले, 'यंदा प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात गैरप्रकार अधिक आढळून आले आहेत. कॉपीमुक्त अभियानामुळे गैरप्रकार उघडकीस येत आहेत. तसेच कारवाईमुळे धाक निर्माण होत आहे, हे अभियानाचे यश आहे. त्यातूनच गैरप्रकार टप्प्याटप्प्याने कमी होतील.'

> कॉपीमुक्त अभियान यशस्वी झाले आहे. त्याचे परिणाम दिसून येत आहेत. काही केंद्रांवर सामूहिक कॉपीची प्रकरणे उघडकीला आली. परीक्षांतील गैरप्रकार थांबण्यासाठी 'ओपन बुक'सारख्या पद्धतींचा वापर करणे शक्य आहे. मात्र, विद्यार्थिसंख्या जास्त असणे, त्यासाठीच्या प्रश्नपत्रिका तयार करणे ही आव्हाने आहेत.
> **- डॉ. अ. ल. देशमुख,** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

> दहावी, बारावीच्या परीक्षांदरम्यान उघडकीला आलेल्या गैरप्रकारांमुळे कॉपीमुक्तीसाठीचे प्रयत्न दिसून येतात. त्याशिवाय संबंधित प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे, निलंबन अशा कारवाईमुळे गैरप्रकारांना पाठबळ देणाऱ्यांना वचक बसेल. भविष्यात असे प्रकार कमी होतील, मानसिकता बदलेल, अशी अपेक्षा आहे.
> **- डॉ. अशोक भोसले,** माजी सचिव, राज्य मंडळ




# राज्यसेवेच्या जागांमध्ये घट झाल्याने नाराजी

## आदिवासी विकास विभागातील ११ पदे रद्द

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ होऊन तीन महिने झाले तरी अद्याप निकाल जाहीर झाला नाही. एकीकडे या निकालाची प्रतीक्षा असताना आयोगाने अचानक काही जागा रद्द केल्याने परीक्षार्थींमध्ये नाराजीचे वातावरण आहे. मुळात जागा वाढीसाठी मागणी होत असताना जागा कमी झाल्याने उमेदवारांची चिंता वाढली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ च्या जाहिरातीमध्ये सुरुवातीला विविध विभागांतर्गत ३८५ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यानुसार राज्यातील ३७ जिल्हा केंद्रांवर परीक्षा झाली. एकूण रिक्त जागांमध्ये सामान्य प्रशासन विभाग (राज्य सेवा) १२७, महसूल व वन विभाग (महाराष्ट्र वनसेवा) १४४, सार्वजनिक बांधकाम विभाग (महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा) ११४ अशा पदांचा समावेश होता.

पूर्व परीक्षा झाल्यानंतर आयोगाने काही मागणीपत्रांच्या आधारे पदांची संख्या ३८५ वरून ६०१ केली होती. यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला होता. मात्र, या जागांमध्ये आता घट करण्याचे परिपत्रक आयोगाने काढले आहे. त्यात आदिवासी विकास विभागाच्या विनंतीनुसार महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ मधील राज्य सेवा परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गापैकी उपसंचालक, प्रकल्प अधिकारी (एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प) संवर्गाची ११ पदे वगळण्यात आल्याचे आयोगाने जाहीर केले. जागांमध्ये घट झाल्याने उमेदवारांमध्ये नाराजीचा सूर आहे.

# वैद्यकीय 'सुपर स्पेशालिटी'च्या ५४० अतिरिक्त जागांना मंजुरी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** शैक्षणिक वर्ष २०२५ङ्ग२६ साठी नवीन आणि वाढीव पदव्युत्तर अतिविशेष (सुपर स्पेशालिटी) अभ्यासक्रमांसाठीच्या वाढत्या अर्जांचा विचार करून देशातील ८९ वैद्यकीय महाविद्यालयांत अतिरिक्त ५४० जागांना राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने (एनएमसी) मान्यता दिली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ९ महाविद्यालयांतील ३३ जागांचा समावेश आहे.

मान्यता मिळालेल्या या जागांमध्ये कार्डिओलॉजीमध्ये सर्वाधिक ६४ जागांना मंजुरी मिळाली आहे. त्याखालोखाल युरोलॉजी ४८, सर्जिकल ऑन्कोलॉजी ४० आणि प्लास्टिक अँड रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जरी ३९ अशा जागा आहेत. तसेच नेफ्रोलॉजीला ३९, क्रिटिकल केअर मेडिसिन ३४, न्यूरोसर्जरी ३१, न्यूरोलॉजी २५, पेडियाट्रिक सर्जरी २५, निओनॅटोलॉजी २४, मेडिकल गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी २०, सर्जिकल गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी १८, क्लिनिकल इम्युनोलॉजी अँड रुमॅटोलॉजी १६, कार्डियाक ॲनेस्थेशिया व मेडिकल ऑन्कोलॉजीला प्रत्येकी १४ जागा मिळाल्या आहेत.

### जागा कुठे वाढल्या?

आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, दिल्ली, गोवा, गुजरात, हरियाणा, जम्मू-काश्मीर, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, ओडिशा, पंजाब, राजस्थान, तामिळनाडू, तेलंगणा, उत्तर प्रदेश व उत्तराखंडमधील जागांमध्ये वाढ झाली असून त्यात मुंबईच्या लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालय (शीव रुग्णालय), सेठ जीएस वैद्यकीय महाविद्यालय (केईएम), टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय (नायर) आणि औरंगाबाद शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील जागांचा समावेश आहे.

## दिनदर्शिका

**बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६**

भारतीय सौर ०६ फाल्गुन शके १९४७
मिती फाल्गुन शुक्लपक्ष नवमी
उत्तर रात्री ०२ : ४१ पर्यंत.
नक्षत्र : रोहिणी १३ : ३९ पर्यंत.
चंद्र : वृषभ २४ : ५५
सूर्योदय : ०७ : ०२, सूर्यास्त : १८ : ४२

- **मेष** : स्थावरचा प्रश्न सुटेल.
- **वृषभ** : मार्ग मिळेल.
- **मिथुन** : नियमांचे पालन करा.
- **कर्क** : शुभ वार्ता कळेल.
- **सिंह** : वरिष्ठांचे सहकार्य मिळेल.
- **कन्या** : प्रगती होईल.
- **तूळ** : संवाद जपून करा.
- **वृश्चिक** : मेहनतीचे फळ मिळेल.
- **धनू** : धाडसी निर्णय टाळा.
- **मकर** : अंमलबजावणी कराल.
- **कुंभ** : चर्चा सफल होईल.
- **मीन** : धार्मिक गोष्टींत सहभाग.

**शुभ राशी : कन्या, वृश्चिक**







# एस.एस.सी. मार्गदर्शन - बोर्ड परीक्षा सराव कृतिपत्रिका

## बोर्ड परीक्षा सराव कृतिपत्रिका (३)

**विषय : भूगोल**

**वेळ : २ तास** **गुण - ४०**

### सूचना

१. सर्व प्रश्न कृती सोडविणे आवश्यक आहे
२. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात
३. प्रश्न क्रमांक ४ (अ) साठी पुरवण्यात आलेल्या नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेत जोडावा
४. प्रश्न क्रमांक ६ (अ) साठी पुरवण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेत जोडावा
५. नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे
६. प्रश्नांची उत्तरे देताना आवश्यक तेथे आकृत्या आलेख काढावेत
७. प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनाने लिहावीत
८. शिस पेन्सिल वापरण्यास हरकत नाही. रंगीत पेन्सिलचा उपयोग आकृत्या आकृत्या आराखडे नकाशा कार्य इत्यादीसाठी करावा.
९. पेन्सिलने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

**प्र. १. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य ते पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत लिहा.** ४

१. भारत व ब्राझील या दोन्ही देशातील राजवट ______ प्रकारची आहे.
(अ) लष्करी (ब) साम्यवादी (क) प्रजासत्ताक (ड) अध्यक्षीय
२. ब्राझीलमधील वनांमध्ये ______ हा महत्त्वाचा वृक्ष आढळतो.
(अ) साल (ब) फर (क) पाऊ ब्रासील (ड) पाईन
३. भारतातील ______ या राज्यात सर्वाधिक नागरीकरण झालेले आढळते.
(अ) गोवा (ब) केरळ (क) बिहार (ड) पश्चिम बंगाल
४. ब्राझील हा देश ______ च्या निर्यातीत अग्रेसर आहे.
(अ) चहा (ब) कॉफी (क) तांदूळ (ड) मका

**प्र. २. वेगळा घटक ओळखा.** ४

१. ब्राझीलमधील नद्या
i. ॲमेझॉन ii. उरुग्वे iii. पुरूस iv. यमुना
२. भारतातील सागरी मासेमारी -
i. शेवंडे ii. रोहू iii. सुरमई iv. वशी
३. भारतातील पक्षी -
i. कोंडोर ii. मोर iii. खंड्या iv. तितर
४. ब्राझीलमधील रेल्वे स्थानके -
i. साऊ लुईस ii. ज्युआझोरिओ
iii. पोर्तो अलगर iv. वास्को - द - गामा

**प्र. ४. थोडक्यात टिपा लिहा. (कोणतेही दोन)** ४

१. क्षेत्र भेटीसाठी आवश्यक साहित्य
२. भारतीय द्वीपकल्प
३. ब्राझीलमधील शेती

**प्र. ४ अ) तुम्हास पुरविलेल्या भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा तसेच त्यांची नावे द्या व चिन्हांची सूची द्या. (कोणतीही चार)** ४

१. मारजॉ बेट
२. ॲमेझॉन नदी
३. रोराईमा राज्य
४. पंपास
५. अवर्षण चतुष्कोन
६. ब्राझीलमधील सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य

**(आ) नकाशा वाचन करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतीही चार)** ४




१. वरील नकाशा काय दर्शवितो?
२. भारतीय प्रमाणवेळेचे रेखावृत्त कोणते?
३. भारताच्या मुख्य भूमीचे दक्षिणेकडील टोक कोणते?
४. भारताचे उत्तर ङ्ग दक्षिण अंतर किती आहे?
५. कोणत्या देशांच्या तीन भूसीमा भारताच्या सीमेशी संलग्न आहेत?

**प्र. ५ भौगोलिक कारणे लिहा. (कोणतीही दोन)** ६

१. ब्राझीलमध्ये पश्चिमवाहिनी नद्या आढळत नाहीत.
२. ईशान्य मान्सून वाऱ्यांमुळेही भारतात पाऊस पडतो.
३. ब्राझीलमध्ये लोकवस्तीचे केंद्रीकरण पूर्व किनाऱ्यालगत आढळते.
४. आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी सागरी मार्गांवर अवलंबून राहावे लागते.

**प्र.६ (अ) दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे स्तंभालेख काढा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** ६

**भारताची ब्राझील सोबत झालेली निर्यात**
**(निर्यात - दशलक्ष यु.एस. डॉलरमध्ये)**

| वर्ष | २००८ | २००९ | २०१० | २०११ | २०१२ |
|---|---|---|---|---|---|
| निर्यात | ३७०० | २२०० | ४२०० | ६१०० | ५००० |

१. २००९ मध्ये भारताची निर्यात किती होती?
२. भारताची सर्वाधिक निर्यात कोणत्या वर्षी होती?
३. २००८ ते २०००१० या कालावधीत भारताच्या निर्यातीत किती दशलक्षाने वाढ झाली?

**किंवा**

**(आ) आलेख वाचन करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.** ६

**भारत - नागरीकरणाचा कल (१९६१ ते २०११)**




१. वरील आलेखाचा प्रकार कोणता?
२. १९९१ साली नागरीकरण किती टक्के झाले होते?
३. या आलेखात क्ष अक्षावर काय दर्शविलेले आहे?
४. कोणत्या दशकात नागरीकरण सर्वाधिक होते?
५. कोणत्या दशकात नागरीकरणाची वाढ अतिशय कमी होती?
६. आलेखाचा कल पाहता भारतातील नागरीकरणाबाबत तुम्ही कोणता निष्कर्ष काढाल?

**प्र. ७. सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतीही दोन)** ८

१. क्षेत्रभेटीदरम्यान कचऱ्याचे व्यवस्थापन कसे कराल?
२. ब्राझील वन्यजीवनाची विविधता स्पष्ट करा.
३. ब्राझील व भारत या देशांची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करा.

### कृतीपत्रिका सोडविताना पुढील गोष्टीही लक्षात ठेवा

- भूगोलाच्या कृतीपत्रिकेमध्ये वस्तुनिष्ठ, लघुत्तरी, दीर्घोत्तरी, कौशल्यांवर आधारित असे विविध प्रश्न प्रकार असतात.
- वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिताना शक्यतो प्रश्नाचे क्रमांक टाकून पूर्ण विधाने लिहिल्यास चांगले दिसेल.
- लघुत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहिताना ती मुद्देसूद लिहावीत. मुद्द्यांना योग्य क्रमांक द्यावा.
- दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहिताना मुद्दे उपमुद्दे योग्य पद्धतीने मांडावेत. मुद्द्यांना योग्य क्रमांक द्यावे. शक्य झाल्यास आकृती नकाशे यांचा वापर करावा. भूगोलामध्ये स्टेनसिलचा वापर करण्यास परवानगी असते. त्यामुळे ब्राझील आणि भारत यांचे स्टेन्सिल सोबत घेऊन जाऊ शकता.
- नकाशा वाचन करताना नीट काळजीपूर्वक निरीक्षण करून नंतरच त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा. उत्तरे लिहिताना शक्यतो पूर्ण वाक्यात दिल्यास छान वाटेल.
- नकाशा भरताना सूची तयार करणे अतिशय महत्त्वाचे आहे. नकाशाच्या खाली दिलेल्या ठिकाणी सूची तयार करावी. नकाशा शक्यतो पेन्सिलच्या साह्याने भरावा. योग्य घटक योग्य ठिकाणी दाखवावेत. रंगीत पेन्सिलचा वापर करण्यास हरकत नाही परंतु रंगसंगती योग्य असेल याची काळजी घ्यावी.
- आलेख काढताना शक्यतो ठळक पेन्सिल वापरावी. रेषाले किंवा स्तंभालेख यापैकी नेमका आलेख कोणता काढायचा आहे हे नीट लक्ष ठेवावे आणि त्यानुसार आलेख काढावा. आलेख काढताना आलेखाचे शीर्षक, प्रमाण, य अक्षावरील आणि क्ष अक्षावरील घटक याची अचूक मांडणी असावी.
- महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवा की भूगोलातील नकाशा भरा आणि आलेख काढून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा. हे प्रश्न स्वतंत्र नकाशा आणि आलेख पुरवणीवरच लिहिणे अपेक्षित आहे.

**राहुल बळवंत प्रभू** (सहाय्यक शिक्षक)
प्राचार्य जनार्दन लक्ष्मण शिर्सेकर शिक्षण संस्थेचे महात्मा गांधी विद्यामंदिर वांद्रे, पूर्व.

उद्याचा विषय : एस.एस.सी. मार्गदर्शन - आठवणीतले परीक्षेचे दिवस

समन्वयक - सी. डी. वडके

# मानसिक आरोग्य उपचारासाठी ऑनलाइन शोधांमध्ये वाढ

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** भारतात मानसिक आरोग्य सहाय्य सेवा घेण्यासाठी ऑनलाइन शोध घेण्याच्या प्रकारात वाढ होत आहे. यामध्ये कोलकात्यात समुपदेशन व थेरपी केंद्रांसाठीच्या शोधात १०२ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे या सेवांबाबत असलेली रुची दुप्पटीपेक्षा अधिक होत असल्याचे 'जस्ट डायल लिमिटेड'च्या ताज्या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

फेब्रुवारी २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीतील वर्षानुवर्षेच्या आकडेवारीची मागील वर्षाशी तुलना केली असता, महानगरांबरोबरच शहरी केंद्रांमध्येही समुपदेशन, थेरपी आणि मानसोपचार सेवांबाबतची रुची वाढल्याचे दिसून आले. ताज्या अहवालानुसार, राष्ट्रीय पातळीवर 'समुपदेशन सेवा' शोधण्यात सर्वाधिक १४ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. त्यानंतर 'मानसोपचार सेवा' शोधण्यात ८ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. 'समुपदेशन आणि थेरपी केंद्रां'साठीच्या शोधांमध्येही ५ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे.

मानसिक आरोग्य सहाय्य घेण्याच्या पर्यायांचा शोधांमध्ये लक्षणीय वाढ होत असल्याचे स्पष्ट होत असल्याचे जस्ट डायल लिमिटेडच्या या अहवालातून स्पष्ट होत आहे.







वरळीस्थित एसटीपीसाठीच्या जागेवरील संक्रमण इमारत प्रकरण

# 'आरक्षित जागा कमी करण्याचा निर्णय कशाच्या आधारे?'

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** वरळी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या (एसटीपी) विस्तारासाठी राखीव असलेल्या जमिनीचा मोठ्या प्रमाणातील भाग वगळण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावर उच्च न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला. तसेच हा मुद्दा आवश्यक नागरी पायाभूत सुविधांशी जोडलेला सार्वत्रिक सार्वजनिक हिताचा असल्याने सरकारच्या या निर्णयाची कायदेशीरता तपासण्याचे स्पष्ट केले. सरकारच्या १२ जून २०२४ रोजीच्या आदेशानुसार, सार्वजनिक सुविधांसाठी विकास योजनेअंतर्गत आरक्षित असलेली २७,७०० चौरस मीटर जमीन १७,७५० चौरस मीटरपर्यंत कमी करण्याचा निर्णय कशाच्या आधारे घेतला? याचे स्पष्टीकरण देण्याचे आदेशही न्यायालयाने यावेळी सरकार आणि महापालिका दिले.

एसटीपीसाठी राखीव असलेल्या जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या संक्रमण शिबिरांच्या इमारती ९० दिवसांच्या आत पाडण्यात येतील, अशी हमी विकासकातर्फे देण्यात आल्यानंतरही न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठाने उपरोक्त आदेश दिले. हा भूखंड एसटीपी प्रकल्पाच्या विस्तारासाठी आणि घनकचरा व्यवस्थापन सुविधेसाठी राखीव ठेवण्यात आला होता. त्यामुळे विकासकाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या विनंतीनुसार मोठ्या क्षेत्राच्या आरक्षणाची व्याप्ती कशी काय कमी केली गेली? असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला.

सुमारे १७,७५६ चौरस मीटर क्षेत्रफळावरील संक्रमण शिबिरांचे बांधकाम ९० दिवसांच्या आत पाडण्यात येईल आणि या जागेवर कोणतेही बांधकाम केले जाणार नाही, असे आश्वासन याचिकाकर्त्या विकासकाने न्यायालयाला दिले. त्यावर, केवळ झोपडपट्टीवासीयांनी महानगरपालिकेच्या जमिनीवर अतिक्रमण केले यापुरता हा मुद्दा मर्यादित नाही, तर तो आवश्यक नागरी पायाभूत सुविधांशी संबंधित आहे. त्यामुळे, आरक्षित जमिनीचा एवढ्या मोठ्या प्रमाणातील भाग आरक्षणातून वगळता येईल का? हे तपासण्याची आवश्यकता न्यायालयाने व्यक्त केली. तसेच, या प्रकरणी कायदेशीर सहकार्यासाठी न्यायमित्राची नियुक्ती केली.

# एशियाटिक सोसायटीची निवडणूक १४ मार्चला

## केतकर, सहस्रबुद्धे यांच्यात अध्यक्षपदाची लढत

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**मुंबई :** मुंबईच्या एशियाटिक सोसायटीची बहुचर्चित निवडणूक अखेर १४ मार्च रोजी होणार आहे. काँग्रेसचे माजी खासदार कुमार केतकर आणि भाजपचे माजी खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्यामध्ये अध्यक्षपदाची थेट लढत होत आहे. मतदारांच्या पात्र-अपात्रेवरून नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या निवडणुकीस मुंबई उच्च न्यायालयाने स्थगित दिली होती.

एशियाटिक निवडणूक प्रथमच पक्षीय पातळीवर गेली आहे. काँग्रेस आणि भाजपचे पदाधिकारी या निवडणुकीत उतरले आहेत. एशियाटिकचे जुने सदस्य निवडणुकीत उतरले आहेत. त्यामुळे ही निवडणूक तिरंगी होत आहे. १९ रिक्त जागांसाठी ४५ उमेदवार रिंगणात आहेत. नोव्हेंबरमध्ये निवडणुकीची अर्धी प्रक्रिया झाली होती, ती आता पुढे राबवली जाणार आहे. त्यामुळे नव्याने उमेदवारी दाखल करता येणार नाही.

२७ फेब्रुवारी रोजी सभासदांची म्हणजे मतदारांची यादी जाहीर केली जाणार आहे. साडेतीन हजारांच्या आसपास संस्थेचे मतदार आहेत. संस्थेच्या निवडणुकीत आजपर्यंत अत्यल्प मतदान नोंदलेले आहे. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना व वंचित या राजकीय पक्षांनी आपल्या कार्यकर्त्यांना सभासद केले आहे. या वेळी निवडणुकीस पक्षीय रंग आल्याने ही अटीतटीची निवडणूक होईल. विद्यमान कार्यकारिणीने स्थगित झालेल्या निवडणुकीत पात्र ठरलेल्या उमेदवारांना नुकताच ईमेल पाठवला असून १४ मार्च रोजी निवडणूक निश्चित केल्याचे कळवले आहे.

# सरकारी कर्मचाऱ्यांच्या घरभाड्यात वाढ

## निवासस्थान सेवाशुल्कात दुपटीने वाढ; २०२३ पासूनची वाढ वसूल करण्याचा निर्णय

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनात झालेली वाढ तसेच निवासस्थानांच्या सुविधा पुरविण्यासाठी लागणाऱ्या खर्चात झालेली वाढ लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने सरकारी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थान सेवाशुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार ही वाढ दुपटीने करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी आणि घराच्या क्षेत्रफळानुसार ही वाढ करण्यात आली असून १ फेब्रुवारी २०२३ पासून ही वाढ वसूल केली जाणार आहे.

### अतिरिक्त सुविधांसाठी अतिरिक्त दर

अतिमहत्त्वाच्या व्यक्ती/ अधिकारी वर्गाकरिता देण्यात येत असलेल्या अतिरिक्त सुविधांसाठी अतिरिक्त दर आकारण्यात येणार आहे. पोलीस, लिफ्ट, लिफ्टमन, सुरक्षा रक्षक, स्वच्छता कामगार इत्यादी सुविधांचा यामध्ये समावेश असून हे अतिरिक्त शुल्क आकरण्याचे अधिकारी कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आले आहेत. यापुढे दरवर्षी सेवाशुल्कात वाढ करण्यात येणार असून याविषयीचे आदेश दरवर्षी काढण्यात येणार आहेत.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना निवासस्थाने पुरविण्यासाठी जास्त खर्च येत असला तरी सेवाशुल्काची आकारणी मर्यादित ठेवण्यात आली होती. मात्र दैनंदिन उपयोगाच्या वास्तूच्या किमती व देखभाल खर्च, वीज दर, जल दर, नगरपालिका कर/महापालिका कर व कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये सातव्या वेतन आयोगानुसार झालेली लक्षणीय वाढ विचारात घेऊन सेवाशुल्काच्या दरात वाढ करण्याचा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काढण्यात आला आहे. यानुसार सध्या असलेल्या निवासस्थान शुल्कात दुपटीने वाढ करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासकीय निवासस्थान क्षेत्रफळापेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या निवासस्थानात वास्तव्य करीत असल्यास अतिरिक्त सेवाशुल्कही आकारण्यात येणार आहे.

# ठाणे-बोरिवली भुयारी मार्गातील माती वाहतूक डम्परद्वारेच

## ९० टक्के रहिवाशांची सहमती असल्याचा प्रकल्पबाधित समिती सदस्यांचा दावा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**ठाणे :** ठाणे-बोरिवली भुयारी मार्गाच्या खोदाईदरम्यान निघणारी माती वाहतूक कन्वेयर बेल्टऐवजी डम्परनेच करण्यात यावी, यासाठी ९० टक्के रहिवाशांची सहमती आहे, तर केवळ दहा टक्के रहिवाशांचा विरोध आहे. मात्र या रहिवाशांचीही आम्ही समजूत काढून याबाबत अंतिम निर्णय घेऊ, असे प्रकल्पबाधित रहिवाशांच्या समिती सदस्यांनी मंगळवारी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले.

राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गाच्या खोदाईदरम्यान निघाऱ्या मातीच्या वाहतुकीसाठी कन्वेयर बेल्टचा प्रस्ताव रद्द करून त्याऐवजी डम्परने माती वाहतूक करण्याचा निर्णय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घेतला. या निर्णयानुसार, दररोज ३५० डम्पर माती वाहतूक करणार असल्याने परिसरात हवा प्रदूषणात वाढ होण्याची भीती व्यक्त करत त्यास रहिवाशांनी विरोध दर्शविला. यामुळे ठाणे ते बोरिवली भुयारी मार्ग प्रकल्पाचे काम पुन्हा वादात सापडले असून यासंबंधीचे वृत्त प्रसारित होताच प्रकल्पबाधित रहिवाशांच्या समिती सदस्य राकेश मोदी, आशुतोष शिरोलकर यांनी मंगळवारी पत्रकार परिषद घेऊन याबाबत भूमिका स्पष्ट केली. कन्वेयर बेल्टऐवजी डम्परनेच वाहतूक करण्यात यावी, यासाठी ९० टक्के रहिवाशांची सहमती आहे, तर केवळ दहा टक्के रहिवाशांचा विरोध आहे, असे मोदी म्हणाले.









## धर्मादाय रुग्णालयांना आरोग्य योजना बंधनकारक

● मुंबई : राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांना एकत्रित आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना राबविणे अनिवार्य असून त्यांनी या योजना लागू केल्याच पाहिजेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

● या रुग्णालयांकडून राखीव निधीचा पारदर्शक विनियोग केला जात आहे की नाही हे पाहण्यासाठी याच अधिवेशनात कायद्यात सुधारणा करण्याची घोषणाही त्यांनी मंगळवारी विधानसभेत केली.

## प्रज्ञा सातव यांच्यावर राजीनाम्यासाठी कोणाचा दबाव?

प्रज्ञा सातव यांनी भाजपमध्ये प्रवेश करीत विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिला. राजीनामा मंजूर केल्याचे विधान परिषद सभापती राम शिंदे यांनी जाहीर केले. प्रज्ञा सातव या काँग्रेसमधून बिनविरोध निवडून गेल्याने विरोधकांनी सभागृहात आक्रमक पवित्रा घेतला. सातव यांच्यावर राजीनाम्यासाठी कोणाचा दबाव होता, असा सवाल करताना विधान परिषदेत विरोधी पक्षनेता होऊ नये यासाठी राजीनामा घेतल्याचा आरोप विरोधकांनी केला.

# सरकारची आर्थिक शिस्त कोलमडली

## वर्षभरात दीड लाख कोटींच्या पुरवणी मागण्या

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** राज्याच्या तिजोरीवरील आर्थिक ताण कमी करण्यासाठी तसेच आर्थिक शिस्त पाळण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात कठोर पाऊल उचलण्याचे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असले तरी गेल्या वर्षभरात राज्याची आर्थिक शिस्त कोलमडून पडल्याची गंभीर बाब समोर आली आहे. मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळात ११ हजार ९९५ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. त्यामुळे महायुती सरकारने गेल्या वर्षभरात मांडलेल्या पुरवणी मागण्याची आकारमान हे १ लाख ४४ हजार ७९० कोटींच्या घरात गेली असून ती मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत अधिक आहे.

मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी ११ हजार ९९५ कोटींच्या पुरवणी मागण्या मांडल्या. यात ९ हजार ९०७ कोटींच्या मागण्या उद्योग, ऊर्जा विभागाशी संबंधित असून पाणी पुरवठा विभागाच्या १४३१ कोटींच्या मागण्यांचा समावेश आहे. सौर कृषिपंप योजनेसाठी एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इव्हेस्टमेंट बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाची रक्कम महावितरण कंपनीस हस्तांतरित करण्यासाठी ४ हजार ७९२ कोटी, कृषिपंप, यंत्रमाग व वस्त्रोद्योग ग्राहकांना देण्यात येणाऱ्या वीज सवलतीसाठी ३ हजार ११२ कोटी, जलजीवन मिशन योजनेसाठी १४३१ कोटी, उद्योगांना प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी ८०३ कोटी, शिवभोजन योजनेसाठी ५५ कोटी महाज्योती संस्थेसाठी २३ कोटी रुपयांचा निधी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला आहे.

### निवडणूक वर्षामुळे आकड्यांत वाढ

१ अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागण्यांवर नियंत्रण मिळविण्यात सरकारला यश आले असले तरी निवडणूक वर्षामुळे गेल्या वर्षभरात सरकारने मांडलेल्या पुरवणी मागण्यांचा आकडा दीड लाख कोटींच्या आसपास गेला आहे. सरकारने हिवाळी अधिवेशनात नागपूरमध्ये ७५ हजार २८६ कोटींच्या तर जूनमध्ये पावसाळी अधिवेशनात ५७ हजार ५०९ कोटींच्या पुरवणी मागण्या मांडल्या होत्या.

२ यात आज आणखी ११ हजार ९९५ कोटींच्या मागण्यांची भर पडली असून आर्थिक वर्ष २०२५-२६मध्ये १ लाख ४४ हजार ७९० कोटींच्या पुरवणी मागण्या मांडल्या. तर २०२४-२५ च्या आर्थिक वर्षात हा आकडा १ लाख ३५ हजार ११३ कोटींच्या घरात गेला होता.

### निकषांपेक्षा अधिक प्रमाण



यंदाचा अर्थसंकल्प हा सुमारे सात लाख कोटींचा असून, पुरवणी मागण्या हा १ लाख ४४ हजार कोटींच्या झाल्या आहेत. मूळ अर्थसंकल्पाच्या १५ टक्क्यांच्या तुलनेत पुरवणी मागण्या असाव्यात, असे संकेत असतात. पण यंदा पुरवणी मागण्यांचे प्रमाण हे निकषांपेक्षा अधिक झाले आहे.

## ‘अवकाळी’मुळे शेतकरी संकटात

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** राज्यात सोमवारी झालेल्या गारपीट आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले जातील, अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी विधानसभेत दिली.

राज्याच्या अनेक भागात सोमवारी गारपीट आणि वादळी पाऊस झाल्यामुळे आंबा, काजू अशा बागायती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून मराठवाड्यातही अनेक जिल्ह्यांना अवकाळीचा फटका बसला आहे. काँग्रेस विधिमंडळनेते विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून लक्ष वेधताना शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने उपाययोजना कराव्यात. झालेल्या नुकसानीचे पंचनामे करावेत, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. पंचनाम्यांचे केवळ आदेश न देता अंमलबजावणी करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.





### नुकसानीच्या पंचनाम्याचे आदेश-बावनकुळे

धनंजय मुंडे यांनी, मराठवाड्यात अवकाळीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून तातडीने मदत करण्याची मागणी केली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभागृहाच्या भावनांशी सहमती दर्शवित अवकाळीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले जातील. तसेच मदतीबाबतही मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा केली जाईल, अशी माहिती दिली. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनीही वडेट्टीवार यांच्या स्थगनची दखल घेत सरकारला निवेदन करण्याचे आदेश दिले.

### ‘शक्तिपीठ’विरोधात जनभावना तीव्र!

एकीकडे अवकाळी पावसाने शेतकरी उद्ध्वस्त होत असताना दुसरीकडे शक्तिपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या घराघरांवर नोटिसा चिकटवल्या जात आहेत. महामार्गासाठी जमीन मोजणी सुरू आहे. अनेक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी या प्रकल्पाविरोधात एल्गार पुकारला होता. हा प्रकल्प रद्द करावा, अशी जनभावना असल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले.

### आंबा बागायतदारांना नुकसानभरपाई

कोकणातील हापूस आंब्याच्या आलेला मोहोर खराब हवामानामुळे काळा पडल्याने आंबा बागायतदारांचे मोठे नुकसान झाले. या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात येतील. तसेच तत्काळ नुकसानभरपाई जाहीर केली जाईल, असे आश्वासन मंत्री भरत गोगावले यांनी बांगायतदारांच्या प्रश्नावरील लक्षवेधीवर बोलताना दिले.

## परीक्षा काळात ‘बीएलओ’ना सक्ती नाही

शिक्षकांना परीक्षांच्या काळात मतदान नोंदणी कर्मचारी (बीएलओ) म्हणून काम करण्याची सक्ती केली जाणार नाही. त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जाणार नाहीत. शिक्षकांकडील बीएलओचे काम कायमस्वरूपी रद्द करण्यासाठी सर्वपक्षीय बैठक घेण्यात येईल, अशी ग्वाही शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली. विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात विक्रम काळे, अभिजीत वंजारी, ज्ञानेश्वर म्हात्रे, सतीश चव्हाण, किरण सरनाईक, राजेश राठोड आदींनी शिक्षकांवरील अशैक्षणिक कामाचा प्रश्न उपस्थित केला.

## शहापूरमधील अलमुरी रत्नमाला संस्थेची चौकशी

शहापूर तालुक्यातील सापगाव येथील अलमुरी रत्नमाला अभियांत्रिकी, तंत्रज्ञान संस्थेची तीन सदस्यीय उच्चस्तरीय समितीद्वारे चौकशी करण्यात येईल. समितीच्या अहवालानंतर संस्थेवरील कारवाईचा निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत दिली. मनीषा कायंदे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात शहापूरमधील अलमुरी रत्नमाला संस्थेतील गैरव्यवहार, अनियमिततेचा प्रश्न उपस्थित केला होता.

# राज्यातील २५५ मराठी शाळा बंद

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** राज्यात विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळांत घालण्याचा पालकांचा कल वाढत असून कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात २५५ मराठी शाळा बंद झाल्याची कबुली खुद्द शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली. मराठी शाळांचा पट वाढविण्यासाठी सरकारकडून विविध उपाययोजना करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यात दोन हजार मराठी शाळा अडचणीत आल्या असून २५ हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार असल्याबाबतचा तारांकित प्रश्न अमोल मिटकरी, विक्रम काळे यांनी उपस्थित केला. यावर उत्तर देताना दोन हजार मराठी शाळा अडचणीत तसेच २५ हजार शिक्षक अतिरिक्त ठरणार असल्याची बाब मंत्री दादा भुसे यांनी फेटाळली. त्याचप्रमाणे मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला नसल्याचेही स्पष्ट केले.

### शिक्षणमंत्री दादा भुसे यांची कबुली

#### शाळांचा पट वाढविण्यासाठी प्रयत्न



राज्यात कमी पटाच्या मराठी शाळा सुरू असताना शाळांचा पट वाढविणे व मराठी शाळा टिकवणे यासाठी उपाययोजना करीत असल्याचे दादा भुसे यांनी सांगितले. शाळा प्रवेशोत्सव, इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप, प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना, इयत्ता पहिले ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पायमोजे, बूट, निपूण महाराष्ट्र, समग्र शिक्षा अभियान, स्टार्स प्रकल्प, पीएमश्री प्रकल्प, माझी मराठी सुंदर शाळा, नियतकालिक चाचण्या, शिक्षक प्रशिक्षण उपक्रम इ. उपाययोजनांची अंमलबजावणी सरकारकडून करण्यात येत असल्याचे भुसे यांनी सांगितले.

### ‘विद्यार्थी योजनांचे फलक शाळांमध्ये लावा’

मुंबई : राज्य सरकारकडून विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. या योजनांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. यासाठी सर्व शाळांमध्ये प्रमुख पाच ते सहा योजनांची ठळक माहिती देणारे फलक प्रदर्शित केले जावे, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी दिले. विद्यार्थ्यांसाठी असलेल्या योजनांची माहिती बऱ्याच वेळेला विद्यार्थ्यांना व पालकांना नसते. त्यामुळे या योजनांपासून विद्यार्थी वंचित राहू नये म्हणून प्रयत्न केले जावेत, असेही त्यांनी सांगितले.




**अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मंत्रालय दालनातील कर्मचाऱ्यावर लाचखोरीचा आरोप झाल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर विरोधकांनी विधानभवन परिसरात मंगळवारी आंदोलन केले व झिरवाळ यांच्या राजीनाम्याची मागणी केली.**

## अमली पदार्थ तस्करीत सहभागी पोलीस बडतर्फ

● अमली पदार्थ तस्करीत सहभागी १५ पोलिसांना सेवेतून बडतर्फ केले असून १० जणांवर निलंबनाची कारवाई केली आहे. अमली पदार्थाच्या विळख्यापासून तरुण पिढीला वाचवण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

● दिलीप लांडे व अन्य सदस्यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर बोलताना मुंबई पोलिसांनी अमली पदार्थ विरोधात मोहीम राबवून सुमारे १६०० कोटी रुपयांचा साठा जप्त केला असून १४०० व्यक्तींना अटक केली आहे. यामध्ये सर्वाधिक एमडी या ड्रग्जचा समावेश असून त्याची बाजारभावाप्रमाणे ४६८ कोटी रुपये किंमत असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

## धानाला प्रोत्साहन बोनस देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत

**मुंबई:** धान उत्पादकांना प्रोत्साहन बोनस देण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. धान उत्पादकांना बोनस देताना काही चुकीचे घडत आहे. ते थांबवले पाहिजे. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी शेतकऱ्यांचे बँक खाते आधार कार्डशी जोडण्यात येत आहे. धानाला बोनस देण्याचा निर्णय हा मंत्रिमंडळ बैठकीत घेऊ, असे आश्वासन राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत दिले.

धान उत्पादकांना बोनस द्यायचा आहे की नाही अशा शब्दांत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी कदम यांना धारेवर धरले. त्यावर उत्तर देताना शेतकऱ्यांची संख्या कमी आणि बोनस जास्त अशी तफावत सरकारला आढळून आली आहे. या योजनेत दोन कोटी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. त्याची चौकशी पूर्ण झाली आहे, असे कदम यांनी सांगितले.

# नियमभंग करणारे डान्सबार कायमचे बंद

## मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

**लोकसत्ता विषेश प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यात ऑर्केस्ट्राबारच्या नावाखाली पुन्हा एकदा डान्सबारचे पेव फुटले आहे. या विरोधात लवकरच धडक मोहीम हाती घेतली जाईल. तसेच नियमबाह्य चालणाऱ्या बारला कायमचे टाळे ठोकण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत केली.

सुभाष देशमुख, भास्कर जाधव यांच्यासह मनोज जामसुतकर, रणधीर सावरकर, विजय देशमुख, शंकर जगताप, विक्रम पाचपुते, प्रवीण दटके, संजय केळकर, किसन कथोरे आदी सदस्यांनी रात्रभर चालणाऱ्या ऑर्केस्ट्रा आणि डान्सबारवर कारवाई करण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान फडणवीस यांनी ही घोषणा केली. तीनपेक्षा अधिकवेळा नियमभंग करणाऱ्या बारचे परवाने कायमचे रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

### पनवेलमध्ये सर्रास उल्लंघन

● भास्कर जाधव यांनी पनवेल परिसरात ऑर्केस्ट्रा बारच्या नावावर डान्सबार सुरू असल्याचा आरोप करीत कठोर कारवाईची मागणी केली. तर सुभाष देशमुख यांनी सोलापूर भागातील डान्सबारचे पुरावे देऊनही कारवाई होत नसल्याचे सांगितले.

● मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत नियमांचे उल्लंघन करून सुमारे ७५ ऑर्केस्ट्राबार सुरू असतात. या बारमध्ये १४ कर्मचाऱ्यांना काम करण्याची परवानगी असताना ४० ते ४५ महिला काम करीत असल्याचा आरोप सदस्यांनी केला.

## ‘राज्यपालांचे अभिभाषण वास्तवापासून दूर’

**मुंबई** : राज्यात बेरोजगारीची टक्केवारी व शेतकरी आत्महत्यांमध्ये कमालीची वाढ झाली असून मोठे प्रकल्प गुजरातमध्ये जात आहेत.



मात्र राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये राज्याच्या प्रगतीचे चित्र रंगवले आहे. राज्यपाल यांचे अभिभाषण राज्यातील वास्तव दाखवत नसून विकासाचे फसवे चित्र उभे करते, अशी टीका शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांनी केली. मंगळवारी राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदनाच्या प्रस्तावावरील चर्चेस सुरुवात झाली.

यावर जाधव यांनी खोटे पण रेटून बोलण्याची सरकारची सवय असून अभिभाषणाला आपला विरोध असल्याचे नमूद केले.

# वर्षभरात ४८ हजार महिला, अल्पवयीन मुली बेपत्ता

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** राज्यात गेल्या वर्षभरात तब्बल ४८ हजार २७८ महिला व मुली बेपत्ता झाल्याची धक्कादायक बाब समोर आली असून १३ हजार अल्पवयीन मुली आणि महिलांचा अद्याप शोध लागला नसल्याची माहिती राज्य सरकारने मंगळवारी विधानसभेत दिली.

राज्यात विशेषतः मुंबई, नवी मुंबई, रायगड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आदी शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात अल्पवयीन मुली बेपत्ता होत असल्याबाबत मंगेश कुडाळकर, प्रशांत ठाकूर आदी सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात गृहविभागाने ही माहिती दिली. राज्यात २०२५मध्ये हरवलेल्या ४८ हजार २७८ महिलांपैकी ३६ हजार ५८१ महिलांचा शोध लावण्यात आला. तर, अजूनही ११ हजार ६९७ महिलांचा शोध लागलेला नाही. अशाच प्रकारे हरवलेल्या १२ हजार ११३ अल्पवयीन मुलींपैकी १० हजार २९५ जणींचा शोध लागला असून १८१८ मुली अद्याप बेपत्ता आहेत.

### ‘ऑपरेशन मुस्कान’

विशेष म्हणजे २०२४चा विचार करता गेल्या वर्षभरात हरवलेल्या महिला, अल्पवयीन मुलींची संख्या अधिक आहे. मुंबईतून हरवलेल्या ४ हजार ५१५ अल्पवयीन मुले-मुलींपैकी ४ हजार ४५५ जणांचा शोध लागला आहे. बेपत्ता मुलांना पालकांच्या स्वाधीन करण्यासाठी राज्यात २० जानेवारीपासून ‘ऑपरेशन मुस्कान’ सुरू करण्यात आले असून हरविलेल्या मुलांचा शोध घेण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## कर्करोगावर उपचारासाठी त्रिस्तरीय आरोग्य रचना

**मुंबई:** राज्यात कर्करोगाच्या रुग्णांचे प्रमाण वाढले आहे. त्यासाठी १०० पेक्षा जास्त टाटाच्या धर्तीवर रुग्णालये उभी करावी लागतील. या आजारावर मात करण्यासाठी राज्य शासनाने तीन स्तरीय आरोग्य रचना उभी करण्याचे ठरविले आहे, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

आरोग्य विभागाने राबवलेल्या कर्करोग तपासणी मोहिमेत १६७७ रुग्ण आढळून आले आहेत. तपासणीत फुफ्फुसाच्या कर्करोगांचे प्रमाण ५७ टक्के आहे. निदान झालेल्या रुग्णांमध्ये मुख, गर्भाशय, आणि स्तन कर्करोग झालेल्या रुग्णांची संख्या आहे. शासनाने टाटासह खाजगी व शासकीय रुग्णालयांना कर्करोग उपचारासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी लक्षवेधी शिवसेना ठाकरे पक्षाच्या सुनील प्रभू यांनी मांडली होती.

## ‘समृद्धी’च्या ठेकेदारांकडून दंड वसूल करणार- बोर्डीकर

● समृद्धी महामार्गावर काही ठिकाणी सदोष काम झाले आहे. सदोष काम मूळ ठेकेदारांकडूनच दुरुस्त करून घेण्यात येत असून दंड वसूल केला जाणार आहे. चौकशी करून ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय घेतला जाईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिली.

● काही कारणांमुळे रखडलेले फूड कोर्ट महिनाभरात सुरू होतील. फूड कोर्टमध्ये स्वच्छतागृहाची चांगली सोय उपलब्ध असेल, अशी माहिती बोर्डीकर यांनी दिली. पीएम गती शक्ती योजनेतून सर्व शहरांमध्ये रिंगरोड तयार केला जाणार आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

# ‘डिजिटल अरेस्ट’बाबत खबरदारी आवश्यक!

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** आभासी अटक (डिजिटल अरेस्ट) असा कोणताही प्रकार नसून अशी अटक करण्याचा कोणालाही अधिकार नाही. त्यामुळे कोणी फोन अथवा व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून आभासी अटक करण्यात आल्याचे सांगत असेल तर ती फसवणूकच असते. अशावेळी त्वरित सायबर गुन्हे पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी केले.

आभासी अटकेच्या नावाखाली लोकांची ऑनलाइन फसवणूक होत असल्याबाबत समाजवादी पक्षाचे अबू आझमी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावरील चर्चेदरम्यान फडणवीस बोलत होते. आभासी अटकेच्या घोटाळ्यास अनेक सुशिक्षित नागरिकही बळी पडत आहेत. काही दिवसांपूर्वी एक सेवानिवृत्त सनदी अधिकारी तसेच नौदलाच्या उच्चपदस्थ निवृत्त अधिकाऱ्यालाही आभासी अटक दाखवून कोट्यवधी रुपयांना फसविण्यात आले. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन फडणवीस यांनी केले. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अभिजीत पाटील यांनी आभासी अटकेबाबतची आपली कैफियत मांडताना विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अशाचप्रकारे एक कोटी १० लाख रुपये लंपास करण्यात आल्याचे सांगितले.

**आभासी अटकेसारख्या घटना वाढल्या आहेत. अशा सायबर फसवणुकींबाबत त्वरित तक्रार करण्याचे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

### ‘१९३० क्रमांकावर संपर्क साधा’



फोन अथवा व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून कोणी आभासी अटक केल्याचे धमकावून पैसे मागत असेल तर ती सायबर फसवणूक आहे हे लक्षात घ्यावे आणि कोणालाही न घाबरता थेट सायबर पोलिसांकडे त्वरित तक्रार नोंदवावी. त्यासाठी १९३० क्रमांकावर फोन करावा आणि आपली तक्रार नोंदवावी. गोल्डन अवरमध्ये (सुवर्ण तास) तक्रार झाल्यास त्वरित कारवाई करून तक्रारदाराचे पैसे वाचविता येऊ शकतात. त्यामुळे लोकांनी सजग राहून आभासी अटकेबाबत त्वरित तक्रार करावी, असे आवाहन फडणवीस यांनी केले.

# प्रदेश भाजपमध्ये मोठे फेरबदल, नव्या चेहऱ्यांना संधी

## महिला मोर्चा अध्यक्षपदी चित्रा वाघ कायम; केशव उपाध्ये उपाध्यक्ष





**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई** : प्रदेश भाजपमध्ये मोठे फेरबदल करण्यात आले असून नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी प्रदेश पदाधिकाऱ्यांची घोषणा मंगळवारी केली असून सरचिटणीस माधवी नाईक व राजेश पांडे, महिला मोर्चाच्या अध्यक्षा चित्रा वाघ, उपाध्यक्ष अतुल काळसेकर यांना नवीन कार्यकारिणीमध्ये पुन्हा स्थान मिळाले आहे. मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली असून माध्यमप्रमुख नवनाथ बन यांना मुख्य प्रवक्तेपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

गेले काही महिने रखडलेल्या प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मंगळवारी जाहीर केल्या. त्यामध्ये १२ उपाध्यक्ष, ६ सरचिटणीस, १२ चिटणीस, कोषाध्यक्ष, सहकोषाध्यक्ष आदींचा समावेश आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण होऊ नये, यासाठी प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या या निवडणुका पार पडल्यावर करण्यात आल्या आहेत. केंद्रीय नेतृत्व आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनांनुसार पदाधिकाऱ्यांमध्ये मोठे फेरबदल करण्यात आले असून सरचिटणीस विक्रांत पाटील, रणधीर सावरकर, संजय केणेकर, विजय चौधरी यांना नव्या कार्यकारिणीत स्थान नाही.

सरचिटणीस मुरलीधर मोहोळ हे केंद्रीय मंत्रिमंडळात गेल्याने त्यांचा नव्या पदाधिकाऱ्यांमध्ये समावेश नाही, असे चव्हाण यांनी सांगितले.

● **प्रदेश उपाध्यक्ष** : अतुल काळसेकर, भारती पवार, संजय कोडगे, संजय भेंडे, रामदास तडस, केशव उपाध्ये, प्रवीण पोटे, गोपीचंद पडळकर, चैतन्य देशमुख, प्रिया शिंदे, सुजय विखे पाटील, अर्चना पाटील चाकूरकर.

● **प्रदेश सरचिटणीस** : आमदार निरंजन डावखरे, योगेश सागर, संजय कुटे, माधवी नाईक, राजेश पांडे, सुनील राणे.

### मिहिर कोटेचा कोषाध्यक्ष

आमदार मिहिर कोटेचा यांची तिसऱ्यांदा खजिनदार म्हणून नियुक्ती झाली. तर सहकोषाध्यक्ष म्हणून अरुण लखानी यांची पुन्हा नियुक्ती झाली आहे. कृष्णराज महाडिक यांची नियुक्ती युवा मोर्चाचे अध्यक्ष म्हणून तर सह मुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांची मुख्यालय सह प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली.

# विमानतळांना ‘मेट्रो’ची जोडणी

## ‘मेट्रो ८’ मार्गिकेला मान्यता; मंडालेतील २७ हेक्टर जागेवर कारशेड

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वैशिष्ट्ये**

- मुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ
- एकूण लांबी ३४.९ किमी
- ९.८ किमीची मार्गिका भूमिगत, तर २५.०९ किमीची मार्गिका उन्नत
- एकूण स्थानके २०
- १४ स्थानके उन्नत, तर ६ स्थानके भूमिगत
- एकूण खर्च २२ हजार ८६२ कोटी रुपये



**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ- नवी मुंबई विमानतळ मेट्रोने जोडण्यासाठी मेट्रो ८ मार्गिकेची उभारणी केली जाणार आहे. त्यानुसार ३४.९ किमी लांबीच्या आणि २२ हजार ८६२ कोटी रुपये खर्चाच्या या मार्गिकेस राज्य सरकारकडून मान्यता देण्यात आली. यासंबंधीचा शासन निर्णय मंगळवारी प्रसिद्ध करण्यात आला.

नवी मुंबईतील विमानतळ कार्यान्वित झाले असून मुंबई विमानतळावरून नवी मुंबई विमानतळावर पोहोचता यावे यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) आपल्या १४ मेट्रो मार्गिकांच्या प्रस्तावात मेट्रो ८ मार्गिकेचा समावेश केला होता. या मार्गिकेची उभारणी सिडकोच्या क्षेत्रात सिडकोकडून, तर एमएमआर क्षेत्रात एमएमआरडीएकडून केली जाणार होती. त्यानुसार एमएमआरडीएने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते मानखुर्द दरम्यानच्या १०.१ किमी लांबीच्या मेट्रो ८ मार्गिकेतील टप्प्याचा सविस्तर प्रकल्प आराखडा दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून तयार करून घेतला, तर सिडकोकडून आराखड्याची तयारी सुरू होती. असे असताना राज्य सरकारने फेब्रुवारी २०२५ मध्ये ही मार्गिका सार्वजनिक- खासगी सहभागातून उभारण्याचा निर्णय घेत यासंबंधीचा शासन निर्णय जारी केला. तर या मार्गिकेची सर्व जबाबदारी सिडकोकडे दिली. ही जबाबदारी आल्यानंतर सिडकोने या प्रकल्पाचा सविस्तर आराखडा तयार केला. तर आता या मार्गिकेच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्य सरकारने २७ जानेवारीला मंत्रिमंडळाच्या बैठकीत या मार्गिकेस मान्यता दिली, तर आता मंगळवारी यासंबंधीचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. २२ हजार ८६२ कोटी रुपये निधी उभारणी अंतर निधी सहभागाने करण्यासही मान्यता देण्यात आली. त्यानुसार ४० टक्के निधी व्यवहार्यता अंतर निधीअंतर्गत उभ्यारण्यात येणार आहे. यातील २० टक्के निधीचे योगदान केंद्र सरकारचे, तर २० टक्के निधीचे योगदान राज्य सरकारचे असणार आहे. २० टक्के निधी उभारणी राज्य सरकारच्या माध्यमातून करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

मेट्रो मार्गिकेतील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे कारशेड. मेट्रो संचालनासाठी आवश्यक असणारे मेट्रो ८ मार्गिकेतील कारशेड मंडाले, मानखुर्द येथे उभारले जाणार आहे. त्यानुसार मंडाले येथील कारशेडसाठी आवश्यक असणारी २७.२ हेक्टर जागा हस्तांतरित करण्यासही राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यामुळे आता मंडाले येथे २७.२ हेक्टर जागेवर कारशेड बांधण्याचा मार्गही मोकळा झाला आहे.

---

# ‘शिष्यवृत्ती परीक्षा एप्रिलऐवजी जुलैमध्ये घ्या!’

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** प्राथमिक (इयत्ता चौथी) व उच्च प्राथमिक (इयत्ता सातवी) शिष्यवृत्ती परीक्षा २६ एप्रिल रोजी घेण्याचे शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे. मात्र एप्रिलमध्ये इतर वर्गांच्या वार्षिक परीक्षा, निकाल प्रक्रिया आणि प्रशासकीय कामांची लगबग सुरू असते, त्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांवर अतिरिक्त ताण येण्याची शक्यता आहे. तसेच एप्रिलमध्ये उन्हाचा तडाखा वाढत असल्याने अनेक कुटुंब बाहेरगावी जाण्याचे नियोजन करतात. परिणामी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी सलग व नियोजनबद्ध वेळ मिळणे कठीण होते. त्यामुळे यंदा नव्या निर्णयानुसार घेण्यात येणारी इयत्ता चौथी व इयत्ता सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा एप्रिलऐवजी जुलैमध्ये घेण्यात यावी, अशी मागणी पालक व शिक्षकांकडून करण्यात येत आहे.

---

# मानसिक आरोग्याच्या दिशेने कार्य करण्याचे राष्ट्रपतींचे आवाहन

## हिंदुजा हॉस्पिटलच्या अमृत महोत्सवानिमित्त जीवन सुरक्षा उपक्रमाचे लोकार्पण

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**




**मुंबई :** वाढत्या शहरीकरणाबरोबर जीवनशैली तणावपूर्ण झाली असून मानसिक आरोग्यविषयक समस्या गंभीर रूप धारण करीत आहे. मानसिक आजारांचा शारीरिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे. दुर्दैवाने मानसिक आरोग्याबाबत समाजात मोठ्या प्रमाणावर उदासीनता दिसून येते. हे चित्र बदलून मानसिक आरोग्याच्या दिशेने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी केले.

मुंबईतील पी डी हिंदुजा रुग्णालयाने अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सुरू केलेल्या ‘जीवन सुरक्षा व निरामय भारत निर्माण’ (सेव्हिंग लाइव्ज, बिल्डिंग अ हेल्थिअर भारत) या देशव्यापी मोहिमेचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते लोकभवन येथे करण्यात आले. त्या वेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाला राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, हिंदुजा समूहाचे अध्यक्ष अशोक हिंदुजा आदी उपस्थित होते.

तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे रोगनिदान क्षेत्रात क्रांतिकारी बदल होत आहेत. औषध निर्माण क्षेत्रामध्ये भारत आघाडीवर आहे, परंतु रोगनिदान करणारी वैद्यकीय उपकरणे आजही विदेशातून आयात केली जातात, त्यामुळे रोगनिदान व उपचाराचा खर्च वाढतो असे सांगून वैद्यकीय उपकरणे ‘मेक इन इंडिया’ अंतर्गत देशातच तयार व्हावीत अशी अपेक्षा राष्ट्रपतींनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदुजा समूहाचे पालघर, जव्हार येथे कुपोषण मुक्तीसाठी करीत असलेल्या कार्याबद्दल अभिनंदन केले.

---

# पीसीएम, पीसीबी सीईटी नोंदणीसाठी २७ फेब्रुवारीपर्यंत मुदत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी कक्ष) विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सीईटी नोंदणी प्रक्रियेला मंगळवारी मुदतवाढ देण्यात आली. त्यात एमएचटी सीईटी पीसीएम - पीसीबी समूह, बी. डिझाइन, परिचर्या (नर्सिंग), डीपीएन पीएचएन, बी.एड, एमएड, एमपीएड या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी १७ अभ्यासक्रमांच्या सीईटीकरिता आतापर्यंत १२ लाख २८,२१३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यातही दोन वेळा परीक्षा देण्यासाठीच्या नोंदणीमुळे ही संख्या १६ लाख ५८,९७९ वर पोचली आहे. पीसीएम व पीसीबी समूहाच्या सीईटी नोंदणीची अंतिम तारीख २४ फेब्रुवारी होती. विलंब शुल्कासह ती मुदत आता २७ फेब्रुवारीपर्यंत वाढविण्यात आली आहे. बी.एस्सी नर्सिंग व डीपीएन / पीएचएन या अभ्यासक्रमाच्या नोंदणीची मुदत १६ मार्च करण्यात आली आहे. बी. डिझाइन, बी.एड, एमएड व एमपीएडच्या नोंदणीला २७ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज, नोंदणी वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका सीईटी कक्षाच्या www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे. सीईटीमध्ये नोंदणी करताना अपार आयडी व युडीआयडीची नोंद करावी, यावरून विद्यार्थ्यांची पडताळणी केली जाणार आहे.

### पीसीएम सीईटी नोंदणीमध्ये वाढ

यंदा पीसीएम सीईटीसाठीची नोंदणी मागील वर्षापेक्षा जास्त झाली आहे. २०२५ मध्ये या परीक्षेसाठी ४ लाख ६४ हजार २६३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. तीच यंदा ४ लाख ६६ हजार ७७९ एवढी झाली आहे.

---

# संचमान्यतेच्या नियमाविरोधात शिक्षकांचा एल्गार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मराठीसह उर्दू, हिंदी व अन्य माध्यमांच्या अनेक शाळांत इयत्ता नववी व दहावीला विद्यार्थी असूनही संचमान्यतेच्या नियमानुसार तेथे शून्य विद्यार्थी संख्या दाखविण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईतील झोपडपट्टी भागासह कोकणातील दुर्गम भागातील शाळांतील विद्यार्थी शिक्षण प्रवाहाबाहेर फेकले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यातच मोठ्या संख्येने विद्यार्थी शाळाबाह्य होत असल्याने शाळा ओस पडण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे शिक्षक संघटनांनी या नियमाविरोधात आता आक्रमक पवित्रा घेतला आहे.

राज्य सरकारच्या संचमान्यतेच्या नियमानुसार आधार अपडेट नसल्याने अनेक विद्यार्थी संचमान्यतेत दर्शविण्यात आलेले नाहीत. परिणामी, या शाळांतील नववी व दहावीचे अनेक शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत. अशा शिक्षकांची अन्यत्र बदली करण्यात येत आहे. त्याचा सर्वात मोठा फटका झोपडपट्टी आणि कोकणातील दुर्गम भागातील शाळांना बसणार असून या शाळा शिक्षकांविना चालवाव्या लागण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर शिक्षक महासंघाकडून भांडूपमधील बॅरिस्टर नाथ पै विद्यालयच्या सभागृहात नुकतेच एल्गार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संचमान्यतेच्या शासन निर्णयामध्ये दुरुस्ती करावी, अशी मागणी शिक्षक महासंघाचे अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी केली.

### ...अन्यथा आंदोलन

नववी व दहावीला प्रत्येक विषयाला विद्यार्थ्यांची अट न घालता शिक्षक देण्यात यावे, अन्यथा आझाद मैदानामध्ये धरणे आंदोलन तर प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिक्षक महासंघाने दिला.

---

# परिचारिकेचा विवाहासाठी तगादा; डॉक्टरचा आत्महत्येचा प्रयत्न

## ४५ झोपेच्या गोळ्या, १० बाटल्या बिअरचे प्राशन

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेतील एका डॉक्टर पती-पत्नीचे नामांकित रुग्णालय आहे. या रुग्णालयातील डॉक्टरचे एका परिचारिकेशी प्रेमसंबंध होते. या परिचारिकेने डॉक्टरांच्या मागे विवाहासाठी तगादा लावला. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या डॉक्टरने या त्रासातून आपली मुक्तता करण्यासाठी ४५ झोपेच्या गोळ्या आणि १० बिअरच्या बाटल्या पिऊन आपले जीवन संपविण्याचा प्रयत्न केला.

डोंबिवली पश्चिमेतील एक ज्येष्ठ डॉक्टरचे रुग्णालय आहे. त्यांचे रुग्णालयातील एका परिचारिकेबरोबर प्रेमसंबंध जुळले. हे प्रेमसंबंध डॉक्टरांच्या पत्नीला समजल्याने त्यांचे नियमित भांडण होत असे. या नेहमीच्या भांडणाला कंटाळून डॉक्टर पूर्व भागात एका उच्चभ्रू सोसायटीत सदनिका खरेदी करून तिथे राहू लागले होते. दरम्यानच्या काळात प्रेमसंबंधांतील परिचारिकेने डॉक्टरांच्या मागे तगादा लावून आपल्याबरोबर विवाहासाठी गळ घातली. पण ‘आपले अगोदरच लग्न झाले आहे. त्यामुळे मी तुझ्याबरोबर विवाह करू शकत नाही’ अशी भूमिका डॉक्टरांनी घेतली. हे ऐकून परिचारिका अस्वस्थ झाली. डॉक्टर आपल्यावर एकीकडे प्रेम करतात असे दाखवितात आणि दुसरीकडे विवाहासाठी नकार देत असल्याने परिचारिकेने नाराज होऊन डॉक्टरांशी बोलणे सोडून दिले. या मौनामुळे डॉक्टर व्यथित झाले. परिचारिकेसाठी आपण घर सोडले. आपण एकटे राहू लागलो आणि तीच परिचारिका आता आपल्याशी बोलत नाही पाहून डॉक्टरांची चिडचिड वाढली.

या अस्वस्थेमधून डॉक्टरांनी सोमवारी रात्री जीवन संपविण्याचा विचार केला. त्यांनी ४५ झोपेच्या गोळ्या खाल्ल्या आणि १० बाटल्या बिअर प्यायले. दुसऱ्या दिवशी सकाळी नेहमीच्या वेळेत डॉक्टर रुग्णालयात आले नाहीत. म्हणून रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी डॉक्टरांना संपर्क केला. ते मोबाइल संपर्काला प्रतिसाद देत नव्हते. रुग्णालयातील एक कर्मचारी डॉक्टरांच्या घरी गेला असता ते बेशुद्धावस्थेत आढळले. डॉक्टरांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. आता त्यांची प्रकृती स्थिर असून या प्रकरणाचा विष्णुनगर पोलीस तपास करत आहेत.

---


# अनक्लेम मनी: तुमच्या हक्काचा पैसा मिळवा

ADVERTORIAL

सगळ्यात आधी लाइफ इन्शुरन्स

**इन्शुरस अवेअरनेस कमिटी (आयएसी-लाइफ)चे अध्यक्ष कमलेश राव आणि इन्शुरन्स अवेअरनेस कमिटी (आयएसी-लाइफ)चे सदस्य पराग राजा यांचा लेख -**

कल्पना करा की, तुमच्या शेजारी साधे कुटुंब राहत आहे. त्या सामान्य भारतीय कुटुंबामध्ये वयाच्या तिशीमध्ये असलेले पती-पत्नी आणि त्यांची शाळेत जाणारी दोन मुले आहेत. कर्तव्यदक्ष पालक व पती असलेला पुरुष आयुर्विमा पॉलिसी काढतो आणि त्यामध्ये आपल्या पत्नीला व मुलांना वारसदार (नॉमिनी) म्हणून नियुक्त करतो. त्याला खात्री वाटते की, आपल्या अनुपस्थितीत देखील कुटुंबाची स्वप्ने व महत्त्वाकांक्षांमध्ये कोणताच अडथळा येणार नाही. कुटुंबाच्या भविष्याबाबत ही मोठी जबाबदारी पार पाडल्यानंतर तो पत्नीला पॉलिसीबद्दल सांगायचे विसरतो. रोजच्या धावपळीच्या आयुष्यात, 'माझा इतक्यात कुठे मृत्यू होणार आहे, सांगू नंतर' असे स्वतः शीच म्हणत तो पॉलिसीबाबत सांगणे पुढे ढकलतो. एक दिवस, अचानक त्याचे निधन होते. कुटुंब दुःखात बुडून जाते. या धक्क्यातून त्याची पत्नी सावरण्यापूर्वी तिच्यावर घर चालवण्याचे आणि आर्थिक जबाबदाऱ्यांचे संकट ओढावते. दरम्यान, तिच्या पतीने नेमक्या याच दिवसासाठी तजवीज करून ठेवलेल्या पैशांबाबत तिला माहीत नसते, ज्यामुळे त्या पैशांचे क्लेम प्रतीक्षेत राहिले.

दरवर्षी, वर उल्लेख केलेल्या कुटुंबांप्रमाणे भारतातील अनेक कुटुंबांचे हजारो कोटी रुपये आयुर्विमा कंपन्या व सरकारद्वारे सुरक्षित ठेवले जातात, ज्यामुळे ही कुटुंबं अनेक वर्षांनंतर देखील क्लेम करू शकतात. ही तुमची बचत, गुंतवणूक आणि विम्याचे फायदे आहेत, जेथे फक्त योग्य वारसदारांनी त्यावर दावा करण्याची वाट पाहत आहेत. अनेक प्रकरणांमध्ये या रकमेचे क्लेम होत नाही, ज्याचा अर्थ व्यक्तींना त्या पैशांची गरज नाही असे नाही, तर मृत व्यक्तीच्या किंवा आपल्या प्रियजनांच्या नावे अशा पैशांची बचत केलेली आहे, ज्याबाबत कुटुंबाना माहीत नसते. पण, आनंदाची बातमी म्हणजे तुमच्या प्रियजनांसाठी क्लेम न केलेली विमा रक्कम मिळवून देण्यासाठी विविध सोयीस्कर मार्ग उपलब्ध आहेत आणि आर्थिक क्षेत्र यासाठी मदत करण्यास सदैव तत्पर आहे. तसेच, देशातील आर्थिक परिसंस्था या विमा रक्कमेचे संरक्षण करते आणि तो त्याच्या मूळ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करते. 'तुमचा पैसा, तुमचा हक्क' यासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान 'उदगम', 'विमा भरोसा' आणि 'मित्र' (म्युच्युअल फंड इन्व्हेस्टमेंट ट्रेसिंग ॲण्ड रिट्रायव्हल असिस्टण्ट) यांसारख्या पोर्टल्सच्या माध्यमातून जवळपास २,००० कोटी रुपयांची क्लेम न केलेली आर्थिक मालमत्ता परत करण्यात आली आहे.

**'अनक्लेम मनी' म्हणजे काय?**

अनक्लेम मनी म्हणजे असा निधी किंवा रक्कम, जी संबंधित व्यक्तीला देणे बंधनकारक आहे, पण काही कारणांमुळे अद्याप दिली गेलेली नाही. संपर्क होऊन शकणे, तपशिलांमध्ये बदल होणे, खाती चालू नसणे किंवा कायदेशीर मालक किंवा त्यांच्या कुटुंबाला अशा पैशांबद्दल माहिती नसणे, यामुळे हा पैसा क्लेम न करता पडून राहतो. हे निधी पुढीलप्रमाणे असू शकतातः

- बंद आणि निष्क्रिय बँक ठेवी
- विम्याचे हक्क न सांगितलेले परतावे
- देय न दिलेल्या म्युच्युअल फंडाचे किंवा लाभांश
- सरकारी निधीत हस्तांतरित केलेले क्लेम न करण्यात आलेले शेअर्स आणि लाभांश

**क्लेम न केलेले विम्याचे पैसे : २५ वर्षांपर्यंत सुरक्षित**

एकूण १,००,००० कोटी रुपयांहून अधिक क्लेम न केलेल्या मालमत्तेपैकी परतावा न केलेल्या आयुर्विमा लाभांची रक्कम १४,००० कोटी रुपयांहून अधिक आहे. निधी हस्तांतरित झाल्यानंतर देखील पॉलिसीधारक, वारसदार किंवा कायदेशीर वारस हस्तांतरणाच्या तारखेपासून २५ वर्षांपर्यंत त्यांच्या थकबाकीवर दावा करू शकतात. विमा कंपन्यांनी क्लेम न करण्यात आलेली रक्कम आणि गुंतवणूकीवर मिळालेले उत्पन्न परत करणे बंधनकारक आहे. विम्याची देयके १० वर्षांहून अधिक काळ न भरली गेली तर ती भारत सरकारद्वारे देखरेख केल्या जाणाऱ्या सीनियर सिटीझन्स वेल्फेअर फंड (एससीडब्ल्यूएफ)मध्ये हस्तांतरित केली जातात.

नागरिकांना त्यांचा विम्याचा पैसा शोधण्यात आणि तो क्लेम करण्यामध्ये मदत करण्यासाठी समर्पित ऑनलाइन चौकशी लिंक्स, हेल्पलाइन आणि तक्रार निवारण पोर्टल्स जसे आयआरडीएआयचे बिमा भरोसा प्लॅटफॉर्म तयार करण्यात आले आहेत.

**इतक्या क्लेम्सचे क्लेम का होत नाही**

सर्वांत सामान्य कारणे अचंबित करणारी आहेत, जसे :

- पत्ता किंवा फोन नंबर बदललेला असणे आणि तो अपडेट न करणे
- बँक खाती बंद होणे किंवा बदलणे
- वारसदाराचा तपशील नसणे किंवा तो जुना झालेला असणे
- कुटुंबाला पॉलिसी किंवा गुंतवणुकीबद्दल माहिती नसणे
- काळासह कागदपत्रे गहाळ होणे
- अपूर्ण कागदपत्रे

बहुतेक प्रकरणांमध्ये, हा पैसा हरवलेला नसतो, तो फक्त शोधण्यासह क्लेम केले जाण्याच्या प्रतीक्षेत असतो.

**तुम्ही तुमच्या कुटुंबाचे आर्थिक संरक्षण कसे करू शकता**

पॉलिसीधारक म्हणून तुमच्या पैशांचे तुमच्या पश्चात क्लेम न होण्याची शक्यता टाळण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे पुढीलप्रमाणे काही सक्रिय खबरदारी घेतली पाहिजे.

- तुमचा पत्ता, मोबाइल नंबर, पॅन आणि बँक तपशील नेहमी अपडेट करा.
- लाभार्थ्यांना नामांकित करा आणि वारसदार व्यक्तीची माहिती अपडेट करत राहा.
- आर्थिक गुंतवणूक आणि पॉलिसींबद्दल कुटुंबातील सदस्यांना माहिती द्या.
- कागदपत्रांच्या प्रत्यक्ष प्रती व डिजिटल असे दोन्ही रेकॉर्ड ठेवा.
- डिजिलॉकर आणि इतर अधिकृत डिजिटल रिपॉझिटरीचा वापर करा.
- क्लेम न केलेल्या निधीसाठी वेळोवेळी ऑनलाइन पोर्टल तपासा आणि तुमच्या वारसदार व्यक्तींना देखील या प्रक्रियेची माहिती द्या.

नागरिक आणि त्यांच्या हक्काचा निधी यांच्यातील दुवा म्हणजे जागरूकता. सर्व आर्थिक संस्थांमध्ये अशा निधीचे संरक्षण करण्यासाठी संरचित यंत्रणा तयार करण्यात आली आहे, ज्यामधून नागरिक समोर येऊन क्लेम करू शकण्याची खात्री मिळते. वैयक्तिक स्तरावर, विमा कंपन्या विमा पॉलिसी मॅच्युरिटीसाठी येते किंवा निष्क्रिय होते, तेव्हा व्हॉट्सॲप, ईमेल, प्रत्यक्ष पत्रे इत्यादी विविध संवाद माध्यमांद्वारे ग्राहकांच्या शेवटच्या ज्ञात संपर्काशी सक्रियपणे संपर्क साधत आहेत.

आयुर्विमा क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करणारी संस्था इन्शुरन्स अवेअरनेस कौन्सिल (आयएसी) - लाइफ इन्शुरन्स कुटुंबांना त्यांच्या हक्काचा पैसा क्लेम करण्यामध्ये मदत करण्यासाठी मोहीम राबवत आहे. २०१९ मध्ये २४ आयुर्विमा कंपन्यांनी एकत्र येऊन उद्योग संस्थेच्या रूपात 'लाइफ इन्शुरन्स कौन्सिल'ची स्थापना केली. आयएसी या कौन्सिलमधील आंतर-उद्योग मार्केटिंग टीम आहे. क्रिएटिव्ह आणि मीडिया एजन्सींच्या पाठबळासह आयएसी आयुर्विम्याच्या विविध पैलूंबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी, समज वाढवण्यासाठी आणि विचार प्रवृत्त करण्यासाठी देशभरात मोहिमांचे संशोधन, नियोजन, निर्मिती आणि अंमलबजावणी करते.

आयएसीच्या या जनसंपर्क मोहिमेद्वारे भारतातील आयुर्विमा कंपन्या प्रत्येक भारतीय कुटुंबाला आवाहन करतात की, त्यांनी काही वेळ काढत आपले आर्थिक संरक्षण शोधावे, त्याची पडताळणी करावी आणि सुरक्षित करावे, ज्यामुळे तुम्ही विम्याच्या माध्यमातून बचत करणारी रक्कम तुमच्या योग्य वारसदारांना मिळेल. तुमच्या कुटुंबाला तुमच्या आयुर्विमा पॉलिसीबद्दल माहिती द्या, पॉलिसीमधील तपशील नियमितपणे अपडेट करा आणि वर्षातून एकदा 'विमा भरोसा' पोर्टलवर तुमच्या कुटुंबाच्या नावावर असलेल्या, पण क्लेम न केलेल्या विमा रकमेचा शोध घ्या. अशा प्रकारे, तुम्ही विमा रक्कम क्लेम केल्यानंतर तुमच्या योग्य वारसदारापर्यंत पोहोचण्याची खात्री घेऊ शकता.



**अपर मुख्य सचिव तथा विशेष कार्य अधिकारी (अ.व रि.),**

महसूल व वन विभाग, मुख्य इमारत, पहिला मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-400 032

क्र. आरटीएस-3524/3943/प्र.क्र. 269/ज-5अ, प्र.क्र. 638 (12)2024/अवपु

रामा हरी किचमे / कदम (मयत) वारस तर्फे
श्री संजय पांडुरंग कणसे व इतर ....अर्जदार

विरुध्द

राजाराम हरी किचमे (मयत) वारस तर्फे
श्री. जगन्नाथ राजाराम कदम व इतर ....गैरअर्जदार

मौजे पोगरवाडी, ता. सातारा, जि. सातारा येथील गट नं.314 वादमिळकतीबाबतच्या प्रकरणातील अपर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या दि.03/07/2024 रोजीच्या आदेशाविरूध्द प्रस्तुत अर्जदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाकडे दाखल केलेल्या अपिल अर्जावर अपर मुख्य सचिव (अपिल व रिव्हीजन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सुनावणीची कार्यवाही सुरू आहे.

2. सदर फेरतपासणी अर्जाच्या अनुषंगाने दि. 29/01/2026 रोजी आयोजित सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले की, खालील तक्त्यात नमुद गैरअर्जदार यांना पाठविण्यात आलेली दि.05/02/2025. दि.15/04/2025, दि.18/06/202, दि.25/08/2025, दि.15/10/2025, दि.30/12/2025 व दि.29/01/2026 रोजीची सुनावणीची नोटीस सदर इसम तेथे राहत नसल्यामुळे किंवा पत्ता अपूर्ण असल्यामुळे परत आलेली आहे.

| अ. क्र. | गैरअर्जदाराचे नाव | गैरअर्जदाराचा पत्ता | नोटीस परत येण्याचे कारण |
|---|---|---|---|
| 1 | सौ. सुनंदा वाळासाहेब घस | 1. रा. साईनाथ सोसायटी, राणी पिंपळीपाडा, मालाड (पूर्व) मुंबई 2. रा. ओम श्री साई कृपा चाळ, गोकुळनगर रहिवासी संघ गोखीबरे रोड, संतोष भवन, तांडा पाडा सिताराम नगर, नालासोपारा पूर्व ठाणे, 401209 | नमुद पत्त्यावर राहत नाही. |

3. फेरतपासणी अर्जातील उक्त नमुद पक्षकारांना सुनावणीची नोटीस प्रयत्न करूनही प्राप्त झालेली नाही. त्यामुळे, दिवाणी प्रक्रिया संहिता, 1908 मधील आदेश V क्रमांक मधील कलम 20 नुसार रादर पक्षकारांना पर्यायी मार्गाचा अवलंब करून सुनावणीच्या नोटीसीची बजावणी करणे आवश्यक आहे.

4. सदर फेरतपासणी अर्जाची पुढील सुनावणी दि. 16/03/2026 रोजी ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे, उक्त नमुद तक्त्यात नमुद पक्षकार त्या सुनावणीस उपस्थित राहण्याच्या अनुषंगाने, सदर पक्षकार यांना दि.16/03/2026 रोजीच्या सुनावणीचा सोबत जोडलेला समन्स लोकसत्ता या वृत्तपत्राच्या राज्यस्तरीय सर्व आवृत्तीत व ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक वितरित होणाऱ्या स्थानिक मराठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून बजावण्याची कार्यवाही अर्जदार यांनी सदर आदेशाच्या दिनांकापासून 10 दिवसात करावी असा आदेश देण्यात येत आहे.

दिनांक- 29/1/26
ठिकाण- मुंबई

सही/- (संतोष कुमार)
अपर मुख्य सचिव तथा वि.का.अ. (अ.व रि.)



अधिसूचना

**वॉक-इन-इंटरव्ह्यूकरिता**

**जगजीवनराम हॉस्पिटल येथे, ०९.०३.२०२६ रोजी**

स्थळ : ७वा मजला, ऑडिटोरियम, जगजीवनराम हॉस्पिटल, मराठा मंदिर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८

नोंदणीची वेळ : स. ०९.०० ते दु. १२.०० अधिसूचीत तारखे दिवशी

विनिर्दिष्ट वेळेनंतर स्वीकारलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

- विभागनिहाय रिक्त पदे :

| अनु. क्र. | विभाग | रिक्त पद |
|---|---|---|
| ०१ | सीव्हीटीएस मेडिसिन | ०२ |
| ०२ | सीव्हीटीएस सर्जरी | ०३ |
| ०३ | सीव्हीटीएस ॲनेस्थेसिया | ०२ |
| ०४ | जनरल सर्जरी | ०२ (* ३०.०४.२०२६ रोजी प्रमाणे अपेक्षित १ रिक्त पद) |
| ०५ | जी.आय. सर्जरी | ०१ |
| ०६ | ओबीजीवाय | ०१ (* १८.०३.२०२६ रोजी प्रमाणे अपेक्षित रिक्त पद) |
| ०७ | जनरल ॲनेस्थेसिया | ०१ (* २६.०४.२०२६ रोजी प्रमाणे अपेक्षित १ रिक्त पद) |
| | एकूण | १२ |

- वयमर्यादा : अधिसूचनेच्या तारखेनुसार ४५ वर्षे
- पारिश्रमिक : रु. १,३९,७३५/- अदमासे
- आरक्षण

| प्रवर्ग | यूआर | एससी | एसटी | ओबीसी | ईडब्लूएस | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| रिक्तपदे | ०६ | ०२ | ०० | ०३ | ०१ | १२ |

नोंद : वॉक-इन-इंटरव्ह्यूकरिता जर अधिक उमेदवारांची हजेरी लागल्यास, मुलाखत प्रक्रिया पुढील दिवसापर्यंत सुद्धा चालू राहील :

- निवड वॉक-इन-इंटरव्ह्यू प्रक्रियेद्वारा असणार आहे. कागदपत्रांच्या पडताळणीनंतर, केवळ असे उमेदवार, जे सर्व बाबतीत पात्र आढळून आले आहेत, त्यांना वॉक-इन-इंटरव्ह्यूकरिता हजर राहण्यास अनुमती देण्यात येणार आहे.
- सर्व कागदपत्रे न विसरता व्यवस्थीत साक्षांकित प्रतींची व्यवस्थीत मांडणी करून व स्टेपल्ड करून वॉक-इन-इंटरव्ह्यूच्या वेळी मूळ प्रपत्रात सादर करावयाची आहेत. वॉक-इन-इंटरव्ह्यूबाबत अन्य कोणत्याही माहितीकरिता स्वतंत्र सूचना देण्यात येणार नाही.
- एससी/ एसटी व ओबीसी नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र केंद्र सरकार फॉरमॅटमध्ये असले पाहिजे आणि ओबीसी-नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र वर्ष २०२३ पर्यंत अपडेट केले असले पाहिजे.
- वर दर्शविलेल्या रिक्त पदांत भिन्नता असू शकेल आणि त्यात दर्शविलेली पदे प्रशासनाच्या स्वेच्छाधिकारावर न भरता तशीच ठेवण्यात येतील.
- अधिक माहितीकरिता भेट द्यावी : wr.indianrailways.gov.in न्यूज अँड रिक्रुटमेंट सेक्शनअंतर्गत.
- कृपया, दोन अलिकडील पासपोर्ट आकाराच्या फोटोग्राफ्ससह वरील वेबसाइटवरून डाऊनलोड केलेला व भरलेला अर्ज प्रपत्र सोबत आणावा.
- सिनिअर रेसिडंट डॉक्टर्स पदे जगजीवनराम हॉस्पिटल, पश्चिम रेल्वे, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८ डीएमईआर, महाराष्ट्र गव्हर्नमेंट पोस्ट यूजी/ पीजी सर्व्हिस बाँडकरिता अधिस्वीकृत आहेत.

**पश्चिम रेल्वे**
wr.indianrailways.gov.in

1154

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा : x.com/WesternRly



**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई**

https://www.sra.gov.in

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| निविदा संदर्भ क्रमांक | उपमुख्य अभि.-II/झोपुप्रा/६५, दिनांक:-२९/१०/२०२५ |
| खाते | अभियांत्रिकी विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई |
| विषय | प्रस्तावित ''साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था'', न. भू.क्र. ९६ ९८ ते १८०, १८२ ते २२१, २२४ (पै) २६४, २६५ मौजे- घाटकोपर-किरोळ आणि न. भू.क्र. १६७, १६७/१ ते १८, १६८, १६८/१ ते १० १६९, १६९/१ ते १३४, १७०, १७०/१ ते १५, १७१/क(पै), १७१/२ ते १६, १७२(पै), १७२/६५ ते ८९ मौजे किरोळ, चिराग नगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई येथील इमारतीचे बांधकाम व इतर संलग्न कामे. |
| निविदा शुल्क | २५०००/- +(१८% जीएसटी) |
| कामाची अंदाजित रक्कम | २,५६,४७,१५,००९.१० (१८% जीएसटी पकडून) |
| इसारा रक्कम | २,५६,४७,२००/- |
| ई-निविदा विक्री प्रारंभ दिनांक व वेळ | दिनांक : २५/०२/२०२६ वेळ : सकाळी ११.०० वा. |
| ई-निविदा विक्री अंतिम दिनांक व वेळ | दिनांक : २३/०३/२०२६ वेळ : दुपारी १२.०० वा. |
| निविदा लिफाफा अ ब व क तसेच इसारा रक्कम पावती सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक : २३/०३/२०२६ वेळ : दुपारी १६.०० वा. |
| निविदा पूर्व बैठक दिनांक व वेळ व ठिकाण | दिनांक ०९/०३/२०२६ वेळ : दुपारी १२.०० वा. स्थळ: वैतरणा सभागृह, तिसरा मजला, 'बी' विंग, प्रशासकीय इमारत, अनंत कानेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१, महाराष्ट्र. |
| निविदा लिफाफा ''अ'' उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २४/०३/२०२६ वेळ : दुपारी १६.०० वा. |
| निविदा लिफाफा ''ब'' उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २४/०३/२०२६ वेळ : दुपारी १६.१० वा. |
| निविदा लिफाफा ''क'' उघडण्याचा दिनांक व वेळ | नंतर कळविण्यात येईल |
| संपर्क अधिकारी | अजय सोनवणे (दुय्यम अभि.) / अमोल साळुंखे (सहा. अभि.) झो.पु. प्रा. |
| कार्यालय दूरध्वनी व मोबाइल क्रमांक | ०२२-६९१२५८००/९९३०९२६६४५/ ९५९४४९४०४० |
| ई-मेल पत्ता | ee3@sra.gov.in |
| संकेत स्थळ | https://mahatenders.gov.in |
| निविदा उघडण्याचे ठिकाण | प्रशासकीय इमारत, अनंत कानेकर मार्ग, वांद्रे पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, ४०००५१. |

नोंद : या पुढील सर्व शुद्धीपत्रक व जोड पत्रक केवळ झो.पु.प्रा., संकेत स्थळ व महा टेंडर पोर्टल वर प्रसिद्ध करण्यात येईल.

सही/-
कार्यकारी अभियंता (एन/एस/टी विभाग),
झो.पु.प्रा., बृहन्मुंबई

## लोकमानस

loksatta@expressindia.com

### रान मोकळे झालेले नाही...

**'नक्षलनाशानंतर...?' हे** संपादकीय (२४ फेब्रुवारी) वाचले. नक्षलवाद संपवण्याच्या नादात सरकार आणि नक्षलवादी दोघांनीही आदिवासी विरुद्ध हिंसेचा वापर केला आहे. आज महाराष्ट्र, छत्तीसगढ, ओडिसा, झारखंड इत्यादी राज्यांत सुरू झालेली पर्यावरणाची कत्तल विचारात घेतली तर जी काही जंगले, नैसर्गिक साधन संपत्ती अबाधित दिसते त्याचे श्रेय नक्षलींना दिले पाहिजे. जल, जंगल आणि जमीन हा आदिवासी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. आदिवासी भागातील शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी याकडे केवळ नक्षलवाद्यांनी दुर्लक्ष केले नाही तर आतापर्यंतच्या सर्वच सरकारनी ही बाब गंभीरपणे घेतली नाही. विद्यमान सरकारलाही आदिवासी कल्याणाशी काही देणे- घेणे नाही. नागरी जीवनातील सुखसोयींकरिता आदिवासी भागातील नैसर्गिक साधन संपत्तीचे व मनुष्यबळाचे शोषण करणे हाच प्रमुख उद्देश आहे. नक्षली त्यातील प्रमुख अडथळा होते.

आता सारे रान मोकळे झाले आहे असे समजण्याचे कारण नाही. नक्षलवाद हा शोषणाविरुद्धचा विचार असेल तर तो संपणार नाही, तर वेगळ्या स्वरूपात कदाचित भांडवलशाही दहशतवादाप्रमाणे लोकशाही दहशत मार्गाने पुन्हा कार्यरत होईल.व्यवस्थेवरील व्यापक अविश्वासाच्या संक्रमण काळात आदिवासी समुदायाला राष्ट्रीय प्रवाहात सामावून घेण्याची कोणतीही योजना किंवा धोरण सरकारकडे आज तरी नाही. जल, जंगल आणि जमिनीवरील आदिवासी समाजाच्या उपजीविकेचे नैसर्गिक हक्क डावलले जात असताना पर्यायी आदिवासींना सामावून घेणारी पर्यायी व्यवस्था अमलात आणली नाही तर आगीतून फुफाट्यात अशी परिस्थिती निर्माण होईल हे मात्र खरे आहे.

■ **नंदन नांगरे**

### बंदुका काढून घ्या, पण भाकरी द्या....

**'नक्षलनाशानंतर...?' हा** अग्रलेख वाचला. २०२६ च्या मध्यावर देश नक्षलमुक्त करण्याची प्रतिज्ञा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली होती. राज्यघटनेच्या विरोधात पावले उचलणाऱ्या प्रत्येकाला शिक्षा करण्याचा अधिकार सरकारला आहे हे निर्विवाद; किंबहुना सरकारचे ते कर्तव्यच आहे. पण लोकांच्या हातातल्या बंदुकी काढून घेतानाच त्यांना भाकरी मिळेल अशी व्यवस्था करणे हीदेखील सरकारची जबाबदारी आहे याचे स्मरण राहायला हवे.

कायदा-सुव्यवस्थेसाठीचे सुरक्षात्मक उपाय हे परिस्थिती नियंत्रणात आणू शकतात; पण प्रश्न मुळापासून निपटण्याकरिता 'वैचारिक समतोल विकास' गरजेचा आहे. या दृष्टीने आदिवासी भागात विकासकामे, रोजगारनिर्मिती, शिक्षण व पायाभूत सुविधा निर्माण केल्या पाहिजेत. शरणागती पत्करलेल्या नक्षलवादी संघटनेच्या नेतृत्वासोबत संवाद साधताना त्यांचे पुनर्वसन धोरणांवर लक्ष केंद्रित करणेसुद्धा महत्त्वाचे आहे. आदिवासींना रोजगार देताना त्यांची जंगलातील जगण्याची संसाधने शाबूत ठेवावी लागणार आहेत. नक्षलग्रस्त प्रभागातील दंडकारण्यात घनदाट जंगल आणि त्याखाली भरपूर खनिज संपत्ती आहे. केवळ उद्योगांना 'रान मोकळे' करून देण्यासाठी नक्षल्यांची साफसफाई करणे हा हेतू सरकारचा असेल तर नक्षलवाद निर्मूलन मोहीम अल्पकालीन ठरेल.

नक्षलवादी भुसभुशीत भूमी तयार होते, ती केवळ भुकेमुळे. त्यातून व्यवस्थेविषयी विखार आणि जन्माला आलेला हिंसाचार याचे संकट गडद होते. त्यामुळे नक्षलवाद्यांच्या हिंसक कारवायांना आळा घालण्याचा एक मार्ग तसा सुरक्षात्मक आणि कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून योजला पाहिजे.

■ **ज्ञानेश्वर हेडाऊ,** हडपसर, पुणे

### विषमता आणि संघर्ष चिरस्थायी

**'नक्षलनाशानंतर..?' हा** अग्रलेख वाचला. व्यवस्था कमरे-खांद्यावर सर्व दायित्व घेऊन धावत असते. बऱ्याचदा हाकणाऱ्यांचे प्राधान्यक्रम सांभाळताना तिचे संतुलन ढासळते. धोरण नावाच्या अधिकारिक प्रयुक्त्यांद्वारे धनिकांचे दलाल याचे बेमालूम व्यवस्थापन करतात. शोषणच्या विरोधात व्यवस्थेशी भिडणारा चारू मुजुमदार हा एका श्रीमंत जमीनदाराच्या घरात जन्मलेला होता हा काव्यात्मक विरोधाभास आहे. १९६७ मध्ये दार्जिलिंगच्या नक्षलबारी गावात पडलेल्या ठिणगीचा वणवा पाच दशके देशभर पेटत राहिला. या चळवळीची दिशाहिनता, भरकटलेपण, हिंसेचा मार्ग हे नकारात्मक आणि निषेधार्ह मुद्दे नजरेआड करण्यासारखे नाहीत. मात्र शोषण आणि विषमतेचे चक्र अविनाशी आहे. शहरे आणि सामंतवर्गासाठी सुरू असलेल्या विकासपर्वाच्या पार्श्वभूमीवर शासनाला विषमतेचा कडेलोट होऊ न देण्यापर्यंतच वाव उरला आहे. या वर्ग-संघर्षाचे मूळ वाढती विषमता असल्यामुळे दोहोंच्या सह-अस्तित्वाचे वास्तव कटू असले तरी सत्य आहे.

■ **सत्यवान भाऊ पाटील,** नालासोपारा (प.)

### भेदक सांख्यिकीय विश्लेषण

**'विधानसभा प्रश्नोत्तरांची** अलीकडची तऱ्हा...' हा मेधा कुळकर्णी आणि मृणालिनी जोग यांचा अभ्यासपूर्ण लेख (२४ फेब्रुवारी) वाचला. लोकशाहीच्या सर्वोच्च सभागृहात जनतेच्या प्रश्नांची कशी 'ऐशीतैशी' केली जाते, याचे भेदक सांख्यिकीय विश्लेषण या लेखातून समोर आले आहे. लेखात नमूद केल्याप्रमाणे, धुळे आणि जळगाव यांसारख्या जिल्ह्यांतून सर्वात कमी प्रश्न विचारले जाणे हे चिंतेचे लक्षण आहे. सांख्यिकीय दृष्टीने, ज्या भागाचा मानवी विकास निर्देशांक कमी असतो, तिथल्या लोकप्रतिनिधींकडून प्रश्नांचा भडिमार अधिक असायला हवा. दुसरीकडे, एखाद्या जिल्ह्याचा मानवी विकास निर्देशांक वाढला म्हणजे तिथले प्रश्न संपतात असे मुळीच नाही. प्रगत समाजात प्रश्नांचे स्वरूप केवळ 'अस्तित्वाच्या' लढाईकडून 'जगण्याच्या गुणवत्ते'च्या (क्वालिटी ऑफ लाइफ) शोधाकडे वळते. लेखात उल्लेख केलेले 'कॅन्सर डायग्नोस्टिक' किंवा 'वेब सीरिजमधील फसवणूक' यांसारखे विषय हे बदलत्या आणि प्रगत समाजाचेच निदर्शक आहेत. मात्र, सरकारने दिलेली 'विविध उपाययोजना करण्यात येत आहेत'सारखी मोघम उत्तरे ही लोकशाहीची थट्टा करणारी आहेत. विचारलेल्या प्रश्नांचे रूपांतर 'ठोस आकडेवारी' आणि 'कालबद्ध कार्यक्रमा'त होत नाही, तोपर्यंत राज्याचा मानवी विकास निर्देशांक केवळ कागदावरच उंचावत राहील.

■ **भगवान जगदाळे,** कोल्हापूर

### अधिवेशने, तेव्हा आणि आता...

**'विधानसभा प्रश्नोत्तरांची** अलीकडील तऱ्हा' हा लेख (२४ फेब्रुवारी) वाचला. अधिवेशनांत लोकांच्या जगण्यासंबंधी प्रश्न असतात. सरकारकडून चांगले काम करून घ्यायचे असेल तर लोकांनी अधिवेशन काळातील कामकाजाची दररोज माहिती घेऊन त्यांचा सहभाग वाढवला पाहिजे. त्यासाठी अधिवेशनांतील दररोजच्या कामकाजाची माहिती संकेतस्थळावर शासनाने प्रसिद्ध केली पाहिजे. अशी माहिती मिळणे हा लोकांचा हक्क आहे. काँग्रेसच्या काळात सरासरी दररोज शंभरपेक्षा जास्त प्रश्न यायचे. अधिवेशन १०० नाही, पण ८० दिवस चालायचे. प्रशासनावर वचक असायचा. काम करायला लागायचे. आजकाल उत्तरेही दुधात पाणी घातल्यासारखी गोलमाल असतात.

■ **जयप्रकाश नारकर,** ता. राजापूर, रत्नागिरी

### कठोर कारवाई करावयास हवी

**'थेट बँकेत** जमा, तरी घोटाळ्यांची कीड!' हा अन्वयार्थ वाचला. केंद्र व राज्य सरकारे अनेक कल्याणकारी योजना राबवतात; परंतु काही ठिकाणी भ्रष्टाचारामुळे लाभार्थ्यांपर्यंत त्यांचा पूर्ण फायदा पोहोचत नाही. बऱ्याच ठिकाणी निधीवाटप, लाभार्थी निवड आणि कामांची मोजणी यामध्ये स्पष्टता दिसून येत नाही. राजकीय हस्तक्षेप, दलाल व मध्यस्थांची साखळी या बाबींमुळे गैरव्यवहार वाढताना दिसतो. निधी अपहार, बनावट लाभार्थी, कमी दर्जाचे काम करून जास्त बिल दाखवणे, लाचखोरी यांसारख्या बाबींमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. खोटी कागदपत्रे तयार करून सरकारी पैसा लाटण्याचे प्रकार कमी व्हायला हवेत. सरकारने भ्रष्टाचार, अपहार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावयास हवी.

■ **प्रा. रवींद्र पाटील,** कोल्हापूर

### ट्रम्प यांच्या मागे कोण आहे?

**'ट्रम्प हरले,** ट्रम्प जिंकले!' हे संपादकीय (२३ फेब्रुवारी) वाचले. ट्रम्प यांचा कारभार लोकशाहीच्या मार्गाने आहे का, हा प्रश्न पडतो. परंतु ट्रम्प हरले का किंवा ट्रम्प जिंकले का हे म्हणत असताना ट्रम्प यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून आपला फायदा करू पाहणारे अनेक लोक त्यांच्या मागे आहेत का, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. कारण ट्रम्प हे कधी कधी एखाद्या 'वुई आर जस्ट पपेट'च्या बाहुलीसारखे वाटतात. हे भावली हाताळणारे एक दिवस 'विशिष्ट फाईली'च्या प्रसिद्धीसारखे अचानक समोर येतील. त्यामुळे 'ट्रम्प हरवले गेले की ट्रम्प जिंकवले गेले?' याचाही शोध घेणे महत्त्वाचे आहे.

■ **ओ. म. चिंचोलकर,** पुणे

# अणुऊर्जा नको, अक्षयऊर्जाच हवी!

**सत्ताधाऱ्यांनी वा उच्चपदस्थांनी कितीही भलामण केली, तरी अणुऊर्जा खर्चीक, प्रदूषक आणि एकंदरीत घातक असल्याचे जागतिक दाखले नाकारता येत नाहीत. दुसरीकडे, अक्षयऊर्जेच्या सरकारी योजनांना लोकांचा प्रतिसाद वाढतो आहे. यामागचे वास्तव दुर्लक्षित करून खासगी भांडवलास अणुऊर्जा क्षेत्रात वाव देणे धोक्याचे ठरेल...**

**डॉ. संजय मंगला गोपाळ**
अक्षयऊर्जा व ऊर्जानीती तज्ज्ञ; 'जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय'चे राष्ट्रीय समन्वयक
sansahil@gmail.com

''**भारतात अणुऊर्जेचे** योगदान मोलाचे ठरणार आहे. अणुऊर्जा हा अक्षयऊर्जेला पर्याय नाही तर पूरक आहे. अणुऊर्जेच्या पर्यावरणीय फायद्यांना कमी लेखले जाते'', असे मत ॲपेलेट ट्रायब्युनल फॉर इलेक्ट्रिसिटीचे सदस्य अजय तळेगांवकर यांनी 'लोकसत्ता'तील लेखात (२० फेब्रु.) व्यक्त केले असून 'आज सुमारे ८.८ गिगावॅट असलेली अणुऊर्जेची क्षमता २०४७ मध्ये १०० गिगावॅटपर्यंत वाढवण्या'चा संकल्पही सांगितला आहे. अणुऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या टाकाऊ पदार्थांचे प्रमाण हा फारसा गंभीर मुद्दा नाही असे सांगत,

''सुरक्षित दीर्घकालीन व्यवस्थापन हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे'' असे त्यांनी म्हटले असले तरी याबाबत काटेकोर अंमलबजावणी होत नाही, हे सांगितलेले नाही. खासगी व परदेशी उद्योजकांना हे क्षेत्र खुले करण्याने तर यातील बेफिकिरी वाढण्याचाच धोका आहे, हेही त्यांनी नमूद केलेले नाही.

अणुऊर्जेच्या जन्मापासून अणुकचऱ्याचा प्रश्न आहे तसाच आहे - आत्यंतिक खर्चीक, पुढील अनेक पिढ्यांसाठी धोकादायक आणि राजकीयदृष्ट्या अडचणींचा! अणुवीजभट्टीतून बाहेर पडणारा किंवा मागे राहणारा किरणोत्सारी कचरा उच्च आणि कमी उच्च दर्जाचा असतो. उच्च दर्जाचा कचरा हा प्रामुख्याने वापरलेले इंधन या स्वरूपातला असतो आणि हे वापरलेले इंधन मूळ इंधनापेक्षा सुमारे दशलक्ष पटीने घातक असते! त्याची धोकादायकता लक्षावधी वर्षे टिकून राहते. इतका प्रदीर्घ काळ असे धोकादायक साठे सुरक्षितरीत्या साठवून ठेवणारे कोणतेही तंत्रज्ञान आजमितीस जगात उपलब्ध नाही! गेल्या ५० वर्षांत या संदर्भात डझनाने योजना फसल्या आहेत. अमेरिका, फ्रान्स आणि ब्रिटनमधील शास्त्रज्ञांनी अनेकवार इशारा देऊन झाला आहे की, अणुकचऱ्याच्या समस्येकडे सातत्याने दुर्लक्ष करत राहणे म्हणजे जनतेच्या धोक्यात अधिकाधिक वाढ करणे. अशा वेळी, पूर्ण सुरक्षा प्रदान न करणारे खर्चीक उपाय एकीकडे अणुविजेचे दर भरमसाट बनवतील, तर दुसरीकडे, अणुकचऱ्याचे संकट समाजाच्या माथी सतत लटकवत ठेवतील! अणुऊर्जेची साखळी सुरू होते खाणीतून युरेनियम शुद्ध रूपात काढण्यापासून. ही प्रक्रियाच मुळात प्रदूषणकारी आणि युरेनियम खाणींभोवतालच्या भल्या मोठ्या परिसराला उद्ध्वस्त करून टाकणारी आहे. एक दशलक्ष ग्रॅम्स युरेनियम खाण-मातीत अवघे ५०० ग्रॅम्स शुद्ध युरेनियम मिळू शकते! यासाठी प्रचंड प्रमाणात दगडफोड, ते उकरणे, क्रश करणे आणि त्यावर रासायनिक प्रक्रिया करणे आदी सोपस्कार करावे लागतात. यातून मिळालेले अल्प स्वल्प शुद्ध युरेनियम बाजूला काढल्यावर, उरलेल्या घाणीत प्रचंड प्रमाणात किरणोत्सारी पदार्थ शिल्लक असतात. हे साठवून ठेवली जाणारी कुंड (टेलिंग्ज) खाण परिसरात अतिशय निष्काळजीरीत्या सांभाळली जातात, ज्यामुळे या परिसरातील जलस्रोत मोठ्या प्रमाणात बाधित होतात. हे युरेनियम, अणुभट्टीत वापरण्यायोग्य बनविण्यासाठी पुन्हा त्यावर अनेक प्रक्रिया कराव्या लागतात आणि या प्रत्येक टप्प्यावर, वर वर्णन केलेले किरणोत्सारी आणि रासायनिक प्रदूषण त्या-त्या परिसरात मोठ्या प्रमाणात होतच राहते. यामुळे त्या त्या परिसरातील तमाम जनतेला - प्रामुख्याने आदिवासी आणि तत्सम समाज घटकांना- प्रतिदिन विषाचा सामना करावा लागतो.

तंत्रज्ञान कितीही अद्ययावत होत राहिले तरीही अपघात टाळता येणे शक्य नाही. जपानमधील फुकुशिमा येथे २०११ साली डाईची अणुऊर्जा प्रकल्पाच्या झालेल्या अपघातात आसपासच्या कित्येक मैल भागात किरणोत्साराचा परिणाम राहिला होता. त्यापूर्वी १९८६ मध्ये रशियातील चेर्नोबिल अणु प्रकल्पात झालेला अपघात महाभयंकर होता. फुकुशिमा अपघातानंतर एकूणच जगभरात, काही देशांचे अपवाद वगळता अणुऊर्जाधारित वीजनिर्मिती प्रकल्पांबाबत पुनर्विचार सुरू झाला आहे. जसे मोठ्या जलविद्युत प्रकल्पांचे डी - कमिशनिंग करून ते बंद केले जात आहेत, तसेच अणुऊर्जा प्रकल्प यापुढे नव्याने प्रस्तावित न करणे, आहे त्या प्रकल्पांचा भार कमी करणे व यासाठी एकूणच किरणोत्सार व तत्सम बाबतीतील सुरक्षाव्यवस्था मजबूत करणे, आदी बाबी अनेक देशांनी सुरू केल्या आहेत.

अणुवीज केंद्राला वेगवेगळ्या टप्प्यांवर लागणाऱ्या शुद्ध पाणीपुरवठ्याची गरज फार मोठी आहे. त्यामुळेच हे प्रकल्प नदी किंवा समुद्रकिनारी उभारले जातात. एकुणात आपल्या देशातील शुद्ध पाण्याची उपलब्धता अत्यंत मर्यादित असताना या प्रकल्पांमुळे पाण्याच्या मोठ्या संकटाचा सामना करावा लागू शकतो. शिवाय यातल्या बऱ्याचशा पाण्याचा वापर भट्टी व अन्य यंत्रे थंड करण्यासाठी होणार असल्यामुळे हे पाणी वापरून झाल्यावर त्याचे तपमान वाढणार असून हे तप्त पाणी अणुभट्टीच्या परिसरात - विशेषतः समुद्रात- सोडले जाणार असल्याने त्याचा परिसरातील मत्स्यप्रजनन आणि अन्य प्राणीजन्य जीवांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. स्थानीय मच्छीमार समाजासाठी हे फार मोठे आर्थिक आणि सामाजिक संकट आहे. वीजनिर्मिती सुरू असताना वातावरणात सोडल्या जाणाऱ्या सेसीयम, आयोडिन आणि अन्य किरणोत्सारी पदार्थांमुळे हवा, पाणी व जमीन प्रदूषण होऊ शकते.

अणुवीज भट्टीतून निर्माण होणारे टाकाऊ कमी प्रतीचे युरेनियम हे अण्वत्रे बनविण्यासाठी वापरले जात असल्यामुळे अणुवीज भट्ट्या हे अणुआधारित शस्त्रात्र- निर्मितीचा कच्चा माल आयतेच पुरवणारे ठरत आहेत! यामुळे अण्वस्त्रस्पर्धेचा धोका वाढीस लागतो. याशिवाय, अणुवीज प्रकल्पांसाठी लागणारे सुरुवातीचे प्रचंड भांडवल, त्यांना द्याव्या लागणाऱ्या सवलती, दुर्दैवाने घडून येणाऱ्या अपघातात खर्च होणारा अतिरिक्त पैसा आदी मुद्दे आहेतच. थोडक्यात, अणुऊर्जा खर्चीक, महाग, प्रदूषणकारी, धोकादायक, संपत जाणारी व क्षय पावत जाणारी, भारतासारख्या देशांसाठी आयातीवर अवलंबून असणारी आणि राष्ट्रहिताच्या नावाखाली पहाडी, दुर्गम जंगल आणि किनारपट्टीतील प्रामुख्याने आदिवासी आणि मच्छीमार जनसमूहांना अतोनात संकटात लोटणारी आहे.

आपल्या देशात अणुऊर्जेसाठी प्रचंड व सौर, पवन आदी अक्षयऊर्जेसाठी त्यामानाने कमी गुंतवणूक असतानाही अणुऊर्जाधारित वीजनिर्मिती नगण्य स्वरूपात वाढलेली दिसत असून अक्षयऊर्जेचं प्रमाण मात्र झपाट्याने वाढते आहे. यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे स्थानिक जनतेच्या मनात एकीकडे अणुऊर्जाधारित प्रकल्पांच्या दुष्परिणामांविषयी आजवरच्या अनुभवांच्या आधारे असलेला प्रचंड असंतोष आणि दुसरीकडे अक्षयऊर्जाच सुरक्षित असून त्याचे परिसरातील पर्यावरणावर तरी दुष्परिणाम होत नाहीत, याबाबत असलेली खात्री! देशात आजवर उभारलेल्या सर्वच अणुऊर्जा प्रकल्प परिसरात वरील दुष्परिणाम कमीअधिक प्रमाणात तेथील जनतेला भोगावे लागले आहेत.

आजवर आठ ते नऊ गिगावॅट असलेली अणुऊर्जेची क्षमता २०४७ मध्ये १०० गिगावॅटपर्यंत म्हणजे सुमारे १२ पट वाढवण्याचा सरकारचा इरादा पाहता २० वर्षांत वरील दुष्परिमाण १२ पटींनी वाढणार आहेत. इतके करून आजघडीला देशातील एकूण वीजनिर्मितीमध्ये तीन टक्क्यांपेक्षा कमी वाटा असणाऱ्या अणुऊर्जेचे प्रमाण यामुळे केवळ ५ टक्क्यांपर्यंतच वाढणार आहे. केवळ भरपूर पैसे ओतून व जोरजबरदस्तीतून प्रकल्प यशस्वी करता येत नाही तर जनतेचा त्यातील सहभाग कळीचा असतो, ही बाब आता जागतिक पातळीवर मंजूर झालेली असताना, भावी पिढ्यांची सुरक्षा वेठीला धरणारे प्रकल्प सत्ताधाऱ्यांनी रेटणे हे केवळ लोकशाहीच्याच विरोधी नसून अमानवीय आणि अनैतिकही आहे!

या आधीच्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने व आताच्या भारतीय जनता पक्ष सरकारने परदेशी कंपन्यांना देशात अणुउर्जाधारित वीजनिर्मिती प्रकल्प उभारणीसाठी लाल गालिचा अंथरला. भौगोलिकदृष्ट्या अत्यंत संवेदनशील किनारपट्टीवर अपघात झालेच तर नुकसानभरपाईची पुरेशी जबाबदारी वीजनिर्मितीत घुसू पाहणाऱ्या परदेशी वा खासगी कंपन्यांवर न टाकणे, हे अधिकच धक्कादायक आहे. या संदर्भात लोकांचा व तज्ज्ञांचा होणारा तीव्र विरोध दुर्लक्षिणे, मोडून काढणे वा वारेमाप नुकसानभरपाईचे गाजर दाखवून शमवण्याचे शासकीय प्रयत्न वेदनादायक व धिक्काराहही आहेत.

शेवटी भारत सरकारच्या योजना आयोगाने २००६ साली एकीकृत ऊर्जा धोरणात जनतेप्रति व्यक्त केलेल्या हमीकडे लक्ष वेधणे गरजेचे वाटते. 'ऊर्जा धोरणाचे स्थूल उद्दिष्ट हे - समाजातील सर्व घटकांच्या ऊर्जासेवांची आवश्यकता भागविण्यावर भर देण्यात येईल व असे करताना ही ऊर्जा सुरक्षित, स्वच्छ आणि सोयीच्या स्वरूपात देण्यात येईल. हे साधताना, ऊर्जा किमान किमतीला, तंत्रवैज्ञानिकदृष्ट्या कार्यक्षम, आर्थिकदृष्ट्या किफायतशीर आणि पर्यावरणदृष्ट्या चिरंजीवी व अक्षय पद्धतीने पुरविण्यात येईल.' वीस वर्षांपूर्वी घोषित केलेल्या या सुरक्षित ऊर्जा नीतीकडे काणाडोळा करणे योग्य नाही!

## कुतूहल

### गाडीच्या काचा सुरक्षित का?

**आपल्या घरातला** आरसा खाली पडला तर काच फुटते आणि तिचे तुकडे इकडेतिकडे उडतात. हे तुकडे धारदार, टोकदार असल्यामुळे ते गोळा करताना बोटांना इजा होऊ शकते. मात्र गाडीच्या काचा फुटल्यावर असे धारदार, टोकदार तुकडे होताना दिसत नाहीत. असं का होतं?

गाडीच्या काचा या आरशाच्या काचेपेक्षा वेगळ्या पद्धतीनं तयार केल्या जातात. फुटलेल्या काचेमुळे माणसांना इजा होऊ नये म्हणून विशिष्ट रचना आणि तंत्रज्ञान वापरून अशा काचा घडवलेल्या असतात.



आरशासाठी वापरली जाणारी साधी काच आणि गाडीची काच यांच्यातला फरक समजून घेण्यासाठी त्या कशा तयार केल्या जातात ते पाहू या.

साधी काच तयार करण्यासाठी वाळू (सिलिका), सोडा ॲश आणि चुनखडी हे पदार्थ योग्य प्रमाणात एकत्र करून भट्टीत उच्च तापमानाला वितळवले जातात. या वितळलेल्या मिश्रणाला हवा तसा आकार देऊन काच हळूहळू थंड केली जाते. अशी काच तुटली तर ती मोठ्या व धारदार, टोकदार तुकड्यांत फुटते. त्यामुळे ही काच गाड्यांमध्ये वापरली तर अपघाताच्या वेळी गंभीर जखमा होऊ शकतात.

गाड्यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या काचा मुख्यतः दोन प्रकारच्या असतात; लॅमिनेटेड काच आणि टेम्पर्ड काच. लॅमिनेटेड काच प्रामुख्याने गाडीच्या पुढच्या बाजूसाठी (विण्डशील्ड) वापरली जाते. या काचेत सँडविचप्रमाणे दोन काचांच्या थरांमध्ये मजबूत, लवचीक आणि चिकट असा पॉलिव्हिनाइल ब्युटिराल या प्लास्टिकचा थर असतो. सुरुवातीला सर्व थर हलक्या उष्णतेनं जोडले जातात. त्यानंतर एका विशिष्ट भट्टीमध्ये १३० ते १५० अंश सेल्सियस तापमानाला दाब देऊन ते गरम करतात. त्यामुळे प्लास्टिकचा थर काचेला घट्ट चिकटतो. काच फुटली तरी तिचे तुकडे या प्लास्टिकच्या थराला चिकटून राहतात. फुटलेल्या काचेचे तुकडे खाली पडत नाहीत किंवा प्रवाशांवर उडत नाहीत.

गाडीच्या बाजूच्या आणि मागील काचा टेम्पर्ड काचा असतात. या काचा उच्च तापमानाला गरम करून पटकन थंड केल्या जातात. या प्रक्रियेमुळे त्या साध्या काचेपेक्षा चार ते पाचपट अधिक मजबूत होतात. अशा काचा फुटल्यावर मोठे धारदार तुकडे न होता छोटे, बोथट तुकडे तयार होतात. त्यामुळे प्रवाशांना होणारी इजा टाळता येते किंवा जखमांची तीव्रता कमी होते. अशा काचा वापरायला सुरक्षित असल्यानं त्यांना सुरक्षित काचा म्हणतात.

अपघात झाल्यावर फुटलेल्या काचांमुळे गाडीतील माणसांना इजा होण्याची शक्यता असते. म्हणून गाडीत अशा सुरक्षित काचा वापरल्या जातात. त्यामुळे जीवितहानी टाळण्यास मोठ्या प्रमाणात मदत होते.

**- शुभदा चंद्रशेखर वक्टे**
**मराठी विज्ञान परिषद**
**ईमेल :** office@mavipa.org
**संकेतस्थळ :** www.mavipa.org

## उलटा चष्मा

### सत्यवचनी...

**रात्रीचे बारा** वाजलेले. बंगल्यावर सामसूम पसरलेली. शयनकक्षात निशिकांतजी नेहरूंवरचे एक पुस्तक हातात घेऊन यातील कोणत्या विधानांची मोडतोड करता येईल यावर विचार करत बसलेले. प्रवेशद्वारावरचे सुरक्षारक्षक पेंगुळलेल्या अवस्थेत असलेले. तेवढ्यात हातात भरमार बंदुका घेतलेली एक टोळी अचानक समोर येऊन उभी ठाकली तशी एकच पळापळ उडाली. रक्षकांनी आक्रमक पवित्रा घेतला. हे बघून टोळीतील काहींनी 'दुबेजीं की जय' अशा घोषणा देताच वातावरणातला तणाव निवळला. 'आम्ही चंबळच्या खोऱ्यातून आलोय. साहेबांना भेटायचे आहे'. मग निरोपाची देवाणघेवाण झाली. खांद्यावर बंदूक नसली तर आमच्या तोंडून शब्दच फुटत नाही हे दरोडेखोरांनी पटवून दिल्यावर त्यांना शस्त्रासकट आत प्रवेश देण्यात आला. दिवाणखान्यात निशिकांतजींचे आगमन झाल्यावर टोळीचा म्होरक्या अदबशीरपणे म्हणाला, 'जेपी व विनोबाजींचा अपवाद वगळला तर भारतीय राजकारण्यांनी आमच्या समुदायाकडे फार तुच्छतेनेच बघितले. त्या दोघांनंतर आमची कदर करणारे फक्त तुम्हीच (हे ऐकताच दुबे आनंदाने मोहरलेच). चोर आणि दरोडेखोर उभे केले तरी ते आमच्या पक्षाकडून निवडून येतील हे तुमचे वक्तव्य वाचून आम्हाला अत्यानंद झाला. तुमच्या मनात आमच्याविषयीचा आदर बघून मन भरून आले. मग आम्ही एक बैठक घेतली व दिल्लीकडे कूच केली. वाटेत काही भुरटे चोरही आम्हाला येऊन मिळाले (हे ऐकताच मागून काही हात वर झाले). आजवर आमच्या मनात तुम्हा नेत्यांविषयी चांगली प्रतिमा नव्हतीच. पांढऱ्या कपड्यातले दरोडेखोर असेच आम्ही म्हणायचो. आमच्या हाती बंदुका आहेत तर तुमच्या हाती आयुध. मात्र, काम एकच. कारण जनता आम्हाला तुमच्याविषयी तेच सांगायची. आम्हाला पोलिसांपासून दूर पळावे लागते. तर तुम्हाला पोलीस जनतेपासून दूर पळवून नेतात असेही आम्हाला वाटायचे. आमच्या धंद्यात जोखीम आहे तर तुमच्या व्यवसायातील जोखमीला संरक्षण आहे असेही आमचे मत बनलेले. आम्ही दरोडा घातला की शिव्याशाप वाट्याला येतात तर तुमच्या वाट्याला पुष्पवृष्टी अशीही आमची समजूत होती. हे सारे भ्रम तुमच्या एका वक्तव्याने दूर केले (हे ऐकल्यावर निशिकांतजींनी एक लांब सुस्कारा सोडला). आता आमच्यासाठी एक करा. आम्हाला ठिकठिकाणाहून तुमच्या पक्षाची उमेदवारी द्या. आम्ही निवडून आलो की देशाची सेवा करू. थेट लुटीचा मार्ग कायमचा बंद करून टाकू. निवडून आल्यावर आयुष्यभर तुमचे समर्थक म्हणून वावरू. त्या महाराष्ट्रातील काही महिला खासदार कायम तुमच्या मागावर असतात. त्यांना टाळण्यासाठी तुम्हाला वेगवेगळे दरवाजे शोधावे लागतात. आम्ही तुमच्यासोबतच असलो की त्यांची माग काढण्याची वा तुम्हाला अडवण्याची हिंमतच होणार नाही. आजवर आम्ही कडेकपारीत जीवन व्यतीत केले. आता पुढे तुमच्याभोवती कडे करून राहू. देशात काँग्रेसचा जोर असताना दगड उभा केला तरी निवडून येतो असे म्हटले जायचे. तुम्ही त्याहून पुढे जात थेट आमचे नाव घेतले. असे थेट बोलण्यासाठी हिंमत लागते. ती तुम्ही दाखवली. त्यामुळे राजकारणातले खरे 'सत्यवचनी' तुम्हीच आहात. आम्ही झारखंडचे आधुनिक जेपी म्हणून तुमच्याकडे बघू लागलो आहोत. तेव्हा लवकर आमच्या उमेदवारीची व्यवस्था करा.' एवढे बोलून दरोडेखोर निघून गेले. चला, कुणीतरी आपल्याला सत्यवचनी म्हटले. आता नेहरूंवर केलेली टीका लोकांना सत्य वाटू लागेल. सोबतच या टोळीचा विचार करावा लागेल, असे म्हणत निशिकांतजी शयनकक्षाकडे निघाले.

## राजवाडे विचारविश्व

### विशाल जागतिक पटाची हेतुपूर्ण मांडणी

**'प्लेटोचा शिष्य** व शिकंदराचा (अलेक्झांडर द ग्रेट) गुरू आरिस्टॉटल म्हणजे इसवीसनापूर्वी चौथ्या शतकात होऊन गेलेला थोर ग्रीक विचारवंत. त्याच्यासारखी सर्वग्राही बुद्धी ईश्वराने दुसऱ्या कोणासही दिली नाही, असे म्हणतात. तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यनीतिशास्त्र, प्राणिशास्त्र, अध्यात्मविद्या इत्यादींचा मूळ उत्पादक हा आहे. याची विचार करण्याची पद्धत ऐतिहासिक असून व्यापक होती'... या शब्दांमध्ये राजवाड्यांनी आणखी एका ग्रंथकाराची ओळख करून दिली होती. विशेष म्हणजे आपल्याकडे परंपरेने चालत आलेल्या आणि राजाने कसे चालावे, याचे मार्गदर्शन करणाऱ्या 'शुक्रनीति', 'पंचतंत्र', 'हितोपदेश', 'कामंदक' वगैरे संस्कृत ग्रंथांची आरिस्टॉटलच्या राज्यनीतिपर लेखनाशी तुलना करून त्यांनी असे स्पष्ट म्हटले होते की, 'हे सगळे केवळ शिष्टाईवरील ग्रंथ आहेत; परंतु त्यांना शास्त्र ही पदवी शोभत नाही. राज्यनीतीचा (खरा) अभ्यास करू इच्छिणाऱ्यांनी प्लेटोचे 'सुराज्य' ('रिपब्लिक'), आरिस्टॉटलची 'राज्यनीति', मोंटस्क्यूचे 'मानवधर्मसार' इत्यादी ग्रंथ वाचावेत.' या सर्व ग्रंथांचे मराठी भाषांतर आपल्या मासिकातून प्रकाशित करण्याचा इरादासुद्धा राजवाड्यांनी पाठोपाठ व्यक्त केला होता.

जॉन लॉक (१६३२-१७०४) हा आणखी एक असाच ग्रंथकार. 'राजा म्हणजे विष्णूचा अवतार', अशा पारंपरिक प्रतिपादनाविरुद्ध 'राज्यनीति' लिहिणारा ब्रिटिश विचारवंत. तो का महत्त्वाचा, तर 'जुलमाने पीडिलेल्या प्रजेला आपल्यावरील राजसत्ता बदलण्याचा अधिकार आहे', असे त्याने स्पष्टपणे सांगितले होते. 'धर्मस्वातंत्र्य' व 'मानवी बुद्धी' हे त्याचे अन्य ग्रंथही महत्त्वाचे असल्याचे राजवाड्यांनी म्हटले होते.

त्यांच्या पसंतीला उतरलेला एडवर्ड गिबन (१७३७-१७९४) हा इंग्रज ग्रंथकार म्हणजे 'रोमन साम्राज्याच्या ऱ्हासाचा व नाशाचा' इतिहास लिहिणारा स्वभाषाप्रेमी विचारवंत होता. 'ऑक्सफर्ड येथे शिकत असताना त्याने क्याथोलिक पंथाचा स्वीकार केला म्हणून त्याला ते विद्यालय सोडावे लागले होते', हा त्याच्या आयुष्यातला बारकावा नेमका टिपून राजवाड्यांनी तत्कालीन इंग्लंडमध्ये अँग्लिकन चर्चचा कसा एकछत्री प्रभाव अस्तित्वात होता, इकडे लक्ष वेधले होते आणि पाठोपाठ गिबनच्या ग्रंथलेखनाबद्दलची महत्त्वाची माहितीही दिली होती.

'इसवीसनापूर्वी ७५३ व्या वर्षी रोम शहर शम्यूलसाने स्थापन केले. पुढे ५०९ व्या वर्षी ते शहर प्रजासत्ताक झाले. सरासरी ५०० वर्षे तसेच राहून जगप्रसिद्ध सीझरच्या मृत्यूनंतर आक्टोविअस या त्याच्या पुतण्याने ते एकसत्ताक केले. इसवीसनानंतर १८० वर्षेपर्यंत रोमन पादशाहीची ऐन भरभराट होती. त्यापुढे त्याच्या ऱ्हासाला सुरुवात झाली. पुढे लवकरच पादशाहीचे पाश्चिमात्य व पौर्वात्य असे दोन विभाग झाले... अखेरीस १४५३ च्या २९ मे या तारखेस तुर्क लोकांचा सुलतान महंमद याच्या हातून या पादशाहीचा समूळ उच्छेद झाला...'

असा रोमन साम्राज्याचा इतिहास राजवाड्यांनी थोडक्यात सांगितला होता आणि त्याचबरोबर ही माहिती दिली होती की, गिबन एकदा रोमला गेला असताना त्या शहराच्या ऱ्हासाचा व नाशाचा इतिहास लिहावा, असे त्याच्या मनात आले आणि पुढे सुमारे तीस वर्षे अभ्यास केल्यानंतर त्याने तो प्रचंड मोठ्या कालखंडाचा (इ.स. १८०-१४५३) इतिहास सांगणारा उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. शेवटी 'तो ग्रंथ आपल्या सध्याच्या स्थितीत फार उपयोगाचा आहे', हा त्यांनी व्यक्त केलेला अभिप्राय खूप बोलका होता.

याशिवाय 'पुरातन पालस्तेन (पॅलेस्टाइन), अथेन्स (ग्रीस), इराण, कार्थेज इत्यादिकांच्या ऱ्हासाचा इतिहास व अर्वाचीन ग्रीस, इटली, दक्षिण व उत्तर अमेरिका, बेल्जियम, हॉलंड, ऑस्ट्रिया, जर्मनी, बल्गेरिया इत्यादींच्या पुनरुज्जीवनाचाही इतिहास अत्यंत अभ्यसनीय आहे. तोही सामर्थ्यानुरूप देण्याचा आमचा विचार आहे', असा मनोदयही राजवाड्यांनी 'उपोद्घाता'च्या शेवटी व्यक्त केला होता.

केवढा मोठा जागतिक इतिहासाचा पट राजवाडे आपल्या वाचकांसमोर मांडू पाहत होते! त्यामागचा हेतू हाच होता की, कधी काळी वैभवाच्या शिखरावर नांदणारा स्वदेश गुलामगिरीच्या खाईत का व कसा लोटला गेला, हे समाजाला समजावे आणि उत्थानाचा मार्गही गवसावा... त्या हेतूने त्यांच्या त्या मासिकाने कुठवर मजल मारली, हे पुढील लेखांकात.

**- आनंद हर्डीकर**
anand47.hardikar@gmail.com

# वैद्यकीचेही गलगोटियाकरण

## वैद्यकीय क्षेत्रात गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ हवे, तर फक्त प्रवेश प्रक्रियेतील बदल पुरेसे नाहीत. व्यवस्थेचा फेरविचार करताना खासगी संस्थांचे शुल्क नियमन करावेच लागेल...

**वैद्यकीय पदव्युत्तर** अभ्यासक्रम प्रवेशांतील घसरत्या गुणवत्तेची दखल थेट सर्वोच्च न्यायालयाला घ्यावी असे वाटले हे उत्तम झाले. वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रता गुणांमधील घट, त्यावरून सुरू असलेला वाद, सर्वोच्च न्यायालयाने केलेली टिप्पणी या सगळ्यातून आतापर्यंत अनेकदा टाळलेला प्रश्न भारतीय शिक्षण व्यवस्थेला पुन्हा एकदा जाचू लागल्याचे दिसते. तो म्हणजे व्यवहार सांभाळण्यासाठी गुणवत्तेस किती सैल सोडायचे. सर्वच पातळ्यांवरचा हा प्रश्न वैद्यकीय शिक्षणाबाबत अवघड जागचे दुखणे ठरणारा आहे.

वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दोन प्रवेश फेऱ्यांनंतरही जवळपास १८ हजार जागा यंदा रिक्त राहिल्या. महाविद्यालये आहेत, पायाभूत सुविधा आहेत मग जागा फुकट का दवडा असा फक्त व्यावहारिक पातळीवरील विचार करून वैद्यकीय परीक्षा मंडळाने प्रवेश पात्रता गुणांचा निकष शिथिल केला. त्यानुसार ८०० पैकी १०३ गुण खुल्या गटातील विद्यार्थ्यांसाठी, ९० गुण अपंग विद्यार्थ्यांसाठी आणि उणे ४० गुण अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी असे नवे निकष लागू केले. परीक्षा, पात्रता, चाचणी अशा सगळ्याच संकल्पनांना धुळीस मिळवणाऱ्या या नव्या निकषांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले नसते तरच नवल. त्याची दखल घेत सर्वोच्च न्यायालयानेही यामुळे गुणवत्तेवर काय परिणाम होतो हे तपासणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रात फक्त रिक्त जागा भरण्याला प्राधान्य द्यावे की गुणवत्ता सिद्ध करणारे मनुष्यबळ निवडून त्यांना अधिक शिक्षित करावे या प्रश्नाकडे अखेरीस व्यवस्थेला पाहावे लागणार आहे.

वैद्यकीय शिक्षण हे देशातील सर्वाधिक स्पर्धा असलेले आणि अत्यंत खर्चीक. वैद्यकीय पदवी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १० ते १२ टक्केच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अभ्यासक्रमाला प्रवेश मिळतो. प्रवेश परीक्षेसाठी किमान दोन वर्षे तयारी, त्यानंतर लाखो रुपयांचे शुल्क भरून पदवीचे शिक्षण पूर्ण करून डॉक्टर झालेल्यांना पुढील शिक्षणासाठी पात्रता सिद्ध करायची गरज काय असा प्रश्न प्रवेश पात्रता गुण कमी करण्याचे समर्थन करताना शासन विचारते. वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेश परीक्षा म्हणजेच 'नीट-पीजी' ही पात्रता तपासण्यासाठी नाही, तर स्पर्धा अधिक असल्याने इच्छुकांची क्रमवारी ठरवण्यासाठी आहे, असे शासनाचे म्हणणे आहे. मात्र, प्रवेश परीक्षेत विचारण्यात येणारे प्रश्न हे वैद्यकीय अभ्यासक्रमावरीलच असतील तर अशा परीक्षेत उणे गुण किंवा अत्यल्प गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या डॉक्टरकी करण्याच्या क्षमतेवर, त्यांच्या पदवी शिक्षणाबाबतच प्रश्न उपस्थित करणारे ठरत नाही का याचा विचार करण्याची गरज शासनास वाटत नाही. यातील दुसरा मुद्दा हा अधिक रोकडा आणि व्यावहारिक. शासकीय महाविद्यालयांमध्ये खासगी महाविद्यालयांच्या तुलनेत कमी शुल्कात शिक्षण मिळते. खर्च आणि शुल्क यातील फरक हा करदात्यांच्या पैशातूनच चुकता होतो. पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी येणारे डॉक्टर हे त्या रुग्णालयाची प्राथमिक स्तरावरील मनुष्यबळाची गरज भागवतात. मग जागा रिक्त ठेवून आर्थिक नुकसान करून घ्यावे का, असा विचार महाविद्यालय-संचालक धार्जिणी व्यवस्था करते. त्यातूनच पात्रता निकष कमी करण्याचा अ-शैक्षणिक निर्णय घेतला जातो. मात्र छोटीशी चूक/ अकार्यक्षमता ही करदात्याच्या जिवावरच उठणारी असेल तर वैद्यकीय क्षेत्रातील मनुष्यबळाची भरती किंवा निवड ही फक्त जागा भरण्याची किंवा नगाला नग उभा करण्याची प्रक्रिया असू शकत नाही, या मूलभूत गोष्टीचा विसर व्यवस्थेला पडलेला दिसतो. व्यावहारिक किंवा आर्थिक समतोलासाठी गुणवत्तेशी तडजोड समर्थनीय ठरू शकत नाही.

त्याच वेळी जागा का रिक्त राहतात याकडे पाहावे लागेल. बहुतेक जागा या पात्र डॉक्टरांच्या अभावामुळे नाही; तर विशिष्ट अभ्यासक्रम पात्र विद्यार्थी नाकारत असल्यामुळे रिक्त आहेत. बाजारपेठीय आकर्षणे, विद्यार्थ्यांना करावी लागणारी आर्थिक गुंतवणूक हे याचे मूळ. रेडिओलॉजी, डर्मेटॉलॉजी (त्वचारोग), मेडिसिन अशा शाखांना विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद आहे. गेल्या काही वर्षांपासून शल्यचिकित्सा, मेंदुरोग, हृदयरोग, बालरोग अशांसारख्या जटिल, अधिक आव्हानात्मक शाखांपेक्षा विद्यार्थ्यांचा कल भविष्यातील धावपळ तुलनेने कमी असेल अशा शाखांकडे वाढता आहे. यामागील सामाजिक कारणाकडे दुर्लक्ष करून चालणारे नाही. अलीकडे डॉक्टरांवर होणारे हल्ले, विविध कारणांसाठी त्यांना जबाबदार धरण्याचा वाढू लागलेला कल यामुळे अनेक विद्यार्थी जेथे समाजाचा फारसा संबंध येणार नाही आणि आणीबाणीची परिस्थिती निर्माण होणार नाही अशा शाखा निवडतात. त्वचारोग, किरणोत्सारी उपचार, औषधशास्त्र इत्यादी शाखांस अधिक मागणी आहे ती यामुळे. दुसरा मुद्दा प्रवेशासाठी कराव्या लागणाऱ्या आर्थिक तरतुदीचा. हा आणखी एक प्रश्न. वैद्यकीय पदवी असो किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम - गुणवत्ता असूनही, प्रवेश परीक्षेत ती सिद्ध करूनही शुल्क भरण्याची क्षमता नाही म्हणून प्रवेश न घेणारे अनेक विद्यार्थी दिसतात. खासगी महाविद्यालयांतील कोट्यवधी रुपयांचे शुल्क भरता येत नाही म्हणून प्रवेशापासून वंचित राहावे लागणारे आणि गुणवत्ता नाही हे सिद्ध होऊनही ऐपत आहे म्हणून प्रवेश मिळू शकणारे अशी दरी या क्षेत्रात दिसते. त्यासाठी खासगी संस्थांच्या शुल्काचे नियमन करण्याचा विचार होणे गरजेचे आहे.

**...तो निर्णय राजकीयदृष्ट्या कटू, कारण शिक्षणसम्राट प्रत्येक पक्षात आहेत...**

सरकार वैद्यकीय क्षेत्रात काही बरे करू इच्छिते. त्याचे सूतोवाच या महिन्याच्या एक तारखेला मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पात आढळते. वैद्यकीय पर्यटनाला प्रोत्साहन देण्याचा मानस व्यक्त करून त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काळात या क्षेत्रात अधिक सक्षम, तज्ज्ञ मनुष्यबळाची गरज अर्थातच भासणार आहे. किंबहुना आताही देशाची वैद्यकीय मनुष्यबळाची गरज पुरती भागत नाही. मात्र, गरज आहे म्हणून गुणवत्तेकडे काणाडोळा करत केवळ मनुष्यबळ पुरवठ्याचा विचार करणे निदान या क्षेत्रासाठी तरी रास्त ठरणारे नाही. तसे करणे व्यवस्थेच्या विश्वासार्हतेला बाधक आहे, याची जाणीव न झाल्यास येत्या काळात नव्याने वैद्यकीय पर्यटनाचे क्षेत्र काबीज करण्याचे स्वप्न दूर, आहे ती वैद्यकीय व्यवस्थाही जीर्ण होईल.

आणखी विचारात घ्यावी अशी बाब म्हणजे ग्रामीण भागातील रुग्णालये, जिल्हा रुग्णालये येथे विशेषज्ञांच्या अनेक जागा बराच काळ रिक्त आहेत. त्याचा परिणाम रुग्णसेवेवर आणि कार्यरत मनुष्यबळावरही होत आहे. त्या जागांवर मनुष्यबळ मिळावे म्हणून गुणवत्तेचे निकष शिथिल करणे ही एक प्रकारे अमानुषताच. गुणवत्तापूर्ण मनुष्यबळ मिळण्यासाठी फक्त प्रवेश प्रक्रियेतील बदल पुरेसे ठरणारे नाहीत. तर एकूण व्यवस्थेचा सर्वंकष विचार करावा लागेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे खासगी संस्थांचे शुल्क नियमन करण्याचा राजकीय कटू निर्णय घ्यावा लागेल. ही खरी कसोटी. कारण गलेलठ्ठ शुल्क आकारून गलेलठ्ठ झालेले शिक्षणसम्राट तसे होऊ देणार नाहीत. हे शिक्षणसम्राट सर्वच पक्षांत आहेत. त्यातही सत्तेवर असलेल्या पक्षाच्या सावलीत आसरा घेण्यात त्यांचा आर्थिक स्वार्थ असतो आणि सत्ताधीशांचा राजकीय. त्यामुळे हे साटेलोटे नेहमीच परस्परपूरक राहिलेले आहे. ते तोडण्याचे धैर्य सद्यःस्थितीत कोणीच दाखवणार नाही. याखेरीज काही विषय किंवा शाखांच्या प्रवेशासाठी, भौगोलिक परिस्थितीनुसार विशेष योजना किंवा सवलत देणे असा पर्याय तज्ज्ञांकडून सुचवण्यात येत आहे. त्याचाही विचार करावा लागेल. विद्यार्थी मिळत नाहीत म्हणून प्रवेशाचे निकष अधिकाधिक शिथिल करत जाण्याचा गेल्या काही वर्षांचा शिरस्ता मोडीत न काढल्यास गुणवत्ता ही संकल्पना निरर्थक ठरेल. त्यातून वैद्यकीय शिक्षणाचेही गलगोटियाकरण होण्याचा स्पष्ट धोका आहे. त्याकडे दुर्लक्ष केल्यास जिवावर बेतेल.

# 'शक्तिपीठ महामार्गा'चा अट्टहास कुणासाठी?

लेख

**वसंत भोसले**
ज्येष्ठ पत्रकार
bhosalevasant@gmail.com

**शक्तिपीठ महामार्गाच्या** विरोधात राज्यात वातावरण तापू लागले आहे. विधिमंडळ अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर नुकतेच राज्यात ठिकठिकाणच्या शेतकऱ्यांकडून आंदोलन करण्यात आले. त्यातच नागपूर ते गोवा या शक्तिपीठ महामार्गाचे रेखांकन बदलून सातारा जिल्ह्यातील काही तालुके जोडून घेण्याचा उद्योग नव्याने सुरू करण्यात आला असल्यामुळेही शेतकरी नाराज आहेत. कारण यामुळे महामार्गाचे अंतर फारसे कमी झालेले नसले तरी खर्चात मात्र २२ टक्के वाढ होऊन हा प्रकल्प एक लाख पाच हजार कोटी रुपयांपर्यंत फुगविण्यात आला आहे.

शक्तिपीठ महामार्ग हा नागपूर ते गोवा असा असला तरी त्याची सुरुवात वर्धा जवळील पवनारपासून होणार असून तो गोव्यातील पात्रदेवीपर्यंत असेल. हा मार्ग १२ जिल्ह्यांतून ३९ तालुक्यांतील सुमारे ३७० गावांच्या शेतजमिनींवर वरवंटा फिरवत जाणार आहे. या महामार्गाची आखणी करण्यात आली तेव्हा तो सांगली, कोल्हापूर ते सिंधुदुर्ग असा होता. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केल्याने बदल करून उस्मानाबाद जिल्ह्यातून, सोलापूर जिल्ह्याच्या काही भागातून, सातारा जिल्हा आणि सांगलीच्या पश्चिम बाजूने आणि कोल्हापूर शहराच्या पश्चिम बाजूने सिंधुदुर्ग जिल्ह्याला जोडणारे रेखांकन तयार करण्यात आले आहे.

शक्तिपीठ महामार्गाच्या मूळ आखणीनुसार सांगली शहराच्या उत्तर बाजूने हा मार्ग कोल्हापूर जिल्ह्यात जाणार होता आणि कोल्हापूर शहराच्या पूर्वेकडून तो दक्षिणेकडे आखण्यात आला होता. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील या महामार्गाची जमीन ओलिताखाली आहे. या परिसरातून कृष्णा खोऱ्यातील सहा प्रमुख नद्या वाहतात. लहान-मोठ्या नद्यांचेही प्रवाह याच मार्गावर येतो. बदलत्या हवामानामुळे होणाऱ्या प्रचंड पावसाचा फटका कृष्णा खोऱ्यातील सर्वच नद्यांच्या पूर नियंत्रण रेषेत येणाऱ्या गावांना बसतो. पुराचा धोका गेल्या काही वर्षापासून वाढलेला आहे. असे असताना याच भागातून शक्तिपीठ महामार्ग झाल्यास मोठ्या प्रमाणात पाणी अडण्याचा आणि महापुराचा धोका कृष्णा खोऱ्यात निर्माण होणार आहे. पिकाऊ जमीन रस्त्याच्या कामासाठी घेण्यास शेतकऱ्यांचा विरोध आहेच. नागपूर ते रत्नागिरी महामार्ग याच महामार्गाला समांतर आहे. ज्या तीर्थक्षेत्रांना जोडण्याच्या उद्देशाने हा महामार्ग आखण्यात आलेला आहे तिथे जाण्यासाठी उत्तम रस्ते आहेत. त्यासाठी आणखी वेगळ्या महामार्गाची गरज नाही, म्हणून शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यात यावा. असे शेतकऱ्यांची मागणी आहे.

### समांतर महामार्ग

नागपूर ते गोवा महामार्ग राज्यातील ज्या १२ जिल्ह्यांतून जाणार आहे त्यापैकी सिंधुदुर्ग वगळता ११ जिल्ह्यांतून नागपूर ते रत्नागिरी महामार्ग जातोच आहे. विदर्भ आणि मराठवाडा तसेच दक्षिण महाराष्ट्र गोव्याशी जोडण्यासाठी तो उत्तम आहे. कोल्हापुरातून नागपूर ते रत्नागिरी महामार्ग सोडून गोव्याकडे वळण घेण्यासाठी पाच मार्ग आहेत.

**कोणत्याही बाजूने समर्थन करता येऊ शकत नाही, अशा सुमारे २७ हजार शेतजमीन वाया घालवणाऱ्या या शक्तिपीठ महामार्गाचा अट्टहास का केला जात आहे? यात कोणाचे आर्थिक हितसंबंध आहेत? यातून कोणाला आर्थिक लाभ होणार आहे?**

शिवाय बेळगाव मार्गेही थेट दक्षिण गोव्यात जाता येते. यासाठी पुणे- बंगलोर राष्ट्रीय महामार्ग या मार्गाने गोव्याकडे जाणारी सर्व वाहतूक सुरू आहे. कोल्हापूरचे वैशिष्ट्य असे की, पश्चिम घाटातून कोकणात उतरण्यासाठी या जिल्ह्यातून सहा घाट आहेत. याउलट कोकणला लागून असलेल्या उर्वरित महाराष्ट्रासाठी सरासरी दोन किंवा तीन घाट रस्ते आहेत. कोल्हापूरहून रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोवा आणि कर्नाटकाच्या किनारपट्टीकडे जाण्यासाठी आठ मार्ग असताना पुन्हा नवा घाट किंवा महामार्ग करून गोव्याला जोडण्याची गरज नाही. यातून पश्चिम घाटातील पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील आणि संरक्षित क्षेत्रातून मार्ग काढावा लागणार आहे. यासाठी पर्यावरण खात्याची मंजुरी आवश्यक आहे. पश्चिम घाटातील जैवविविधतेला तसेच वन्यजीव प्राण्यांच्या अधिवासाला यामुळे धक्का पोहोचणार आहे.

शक्तिपीठ महामार्गाला केवळ कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतूनच विरोध आहे, या धारणेतून तो टाळण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. शक्तिपीठ महामार्गाच्या समर्थनार्थ काही लोकांना उभे करण्यात आले आहे. काही लोक 'मूळ आराखड्यानुसार शक्तिपीठ करण्यात यावा' अशी मागणी पुढे रेटण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहेत. धार्मिक स्थळांना जोडणारा मार्ग असे धार्मिक वळण त्याला देण्याचाही प्रयत्न सुरू आहे. मात्र ज्या शक्तिपीठांना या महामार्गाने जोडण्यात येणार आहे, त्या सर्व तीर्थक्षेत्रांना जाण्यासाठी उत्तम रस्ते आहेत. नागपूर ते रत्नागिरी या रस्त्याने सर्वच तीर्थक्षेत्रांना जाण्याची अधिक उत्तम सोय आहे.

### वडनेरे समितीचा अहवाल

नागपूर ते रत्नागिरी महामार्गाला सरासरी ५० ते ६० किलोमीटर अंतराने समांतर जाण्याने शक्तिपीठ महामार्गावर वाहतूक फारशी येणार नाही. शक्तीपीठ मार्गावर वाहतूक वाढली तर नागपूर ते रत्नागिरी महामार्गाच्या टोलवसुलीवर मोठा परिणाम होईल. आताही या महामार्गावर ज्या टोल नाक्यांवर दररोज २० लाख रुपये टोल जमा होण्याची अपेक्षा होती तेथे दहा ते बारा लाख रुपये देखील जमा होत नाहीत. रस्ते महामार्ग विभागाचे अधिकारी खासगीत 'शक्तिपीठ महामार्ग करण्यात येऊ नये', असे मत मांडतात. पण त्यांना विचारतो कोण? कारण राजकीय नेत्यांचे या महामार्गात हितसंबंध आहेत, असे सांगितले जात आहे.

शक्तिपीठ महामार्गाचा मूळ आराखडा ८२८ किलोमीटरचा होता आणि त्यासाठी ८६ हजार कोटी रुपये खर्च येणार होता. शेतकऱ्यांनी विरोध सुरू करताच याचे रेखांकन बदलण्यात आले आणि तो सातारा जिल्ह्यातील माण आणि खटाव तसेच सांगली जिल्ह्यातील कडेगाव, पलूस आणि वाळवा तालुक्यांतून आखण्यात आला. कोल्हापूर जिल्ह्यात हा महामार्ग शहराच्या पश्चिम भागातून पुढे जाणार असे सांगण्यात येत आहे. वास्तविक कोल्हापूरच्या पश्चिम भागामध्ये प्रचंड पाऊस होतो. तिथली जमीन दलदलीची आहे. सरासरी एक हेक्टरपेक्षा कमी जमीनधारणा असलेल्या शेतकऱ्यांची संख्या ९५ टक्के आहे. याच परिसरातून पश्चिम घाटातून उगम पावणाऱ्या अनेक छोट्या-मोठ्या नद्या पूर्वेकडे वाहतात. या सर्व नद्यांना पावसाळ्यामध्ये दोन-तीन वेळा पूर येतो. कमी कालावधीमध्ये एक-दोन मोठे पाऊस झाले तर महापूर येतो. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील नद्यांवरून राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर ठिकठिकाणी पूल बांधण्यात आलेले आहेत. शिवाय मोठ्या संख्येने कोल्हापूर पद्धतीचे बंधारे घालण्यात आलेले आहेत. या बंधाऱ्यांमुळे तसेच रस्त्यांच्या भरावामुळे तसेच पुलांच्या भरावामुळे अनेक ठिकाणी पाणी अडले जाते. महापुराच्या कारणांचा शोध घेण्यासाठी नेमण्यात आलेल्या वडनेरे समितीने कृष्णा खोऱ्यातील सर्वच नदी पात्रांच्या बाजूने अतिक्रमणे झालेली आहेत. पूर नियंत्रण रेषेतील शेत जमिनीमध्ये झालेले बदल तसेच झालेले नागरीकरण आदी कारणे दिली आहेत.

महापुराच्या नियंत्रणासाठी कोणत्याही उपाययोजना न करता गेली २० वर्षे हे अहवाल तसेच पडून आहेत. कृष्णा खोऱ्यातील सर्वच नद्यांवर असलेल्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस होतो. तेव्हा धरणातील पाणीसाठ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी सोडावे लागते. गेल्या मान्सूनमध्ये कोयना धरणातून अतिरिक्त ठरलेले ७२ टीएमसी पाणी सोडून देण्यात आले. प्रचंड पाऊस आणि धरणांची साठवण क्षमता लक्षात घेऊन पाण्याचे नियोजन करण्यात येते. या दोन्ही कारणामुळे नद्यांना महापुराचा धोका आता कायमचा झाला आहे.

ज्या १२ जिल्ह्यांतून शक्तिपीठ महामार्गाची आखणी करण्यात आली आहे, त्या सर्व जिल्ह्यांत एक तरी राष्ट्रीय महामार्ग आहे. अनेक राज्य मार्ग आहेत. या सर्व जिल्ह्यांमध्ये वाहतुकीसाठी कोणतीही अडचण नाही. नागपूर ते रत्नागिरी महामार्गाचे सांगली ते रत्नागिरीपर्यंतचे काम व्हायचे आहे. ते झाल्यानंतर वाहतुकीची गरज लक्षात घेऊन नव्या मार्गाची आखणी करावी अशी अपेक्षा होती. असे असताना सुमारे २७ हजार शेतजमीन वाया घालवणारा हा महामार्ग करण्याचा अट्टहास का? यात कोणाचे आर्थिक हितसंबंध आहेत का, या महामार्गातून कोणाला आर्थिक लाभ होणार आहे असे प्रश्न उपस्थित होऊ शकतात. शिवाय हा महामार्ग झाल्यानंतर त्यामध्ये गुंतवण्यात येणाऱ्या एक लाख पाच हजार कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रातील जनतेला सव्याज परत करावी लागणार आहे. पुढील ३० वर्षात जवळपास ३० लाख कोटी रुपये यातून वसूल केले जाऊ शकतात, असा अंदाज आहे. त्यामुळे हा शक्तिपीठ महामार्ग म्हणजे कंत्राटदारांना कायमस्वरूपी पैसे मिळवून देणारा महाशक्तिपीठ महामार्ग ठरू शकतो. कोणत्याही परिस्थितीत हा महामार्ग करण्याचा राज्य सरकारचा अट्टहास आहे. त्यासाठीच पोलीस बळाचा वापर करून शेतकऱ्यांना भीती दाखवण्यात येत आहे.

शक्तिपीठ महामार्गामध्ये येणाऱ्या जवळपास सर्व जिल्ह्यांतून विरोध होतो आहे. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातून होणाऱ्या विरोधाचे महत्त्वाचे कारण म्हणजे हा मार्ग ज्या भागातून जाणार आहे तो सर्व बारमाही पिकांचा भाग आहे. सर्वत्र पाणी योजना झालेल्या आहेत. विविध प्रकारची पिके घेतली जातात. ऊस शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. शिवाय या दोन्ही जिल्ह्यांमधून एक डझन नद्या वाहतात या सर्व नद्यांचा उगम पश्चिम घाटात झालेला आहे. या नद्यांना दरवर्षी पूर येतो. तो कधीही महापुरामध्ये रूपांतरित होऊ शकतो. परिणामी महापूर प्रवण क्षेत्रातील जमिनी मोठ्या प्रमाणात खराब होतात. पिके नष्ट होतात. अनेकांची घरे, जनावरे वाहून जातात.

### महापुराचा फटका

२०१९ मध्ये आलेल्या महापुरात राज्य शासनाला ११ हजार कोटी रुपयांची मदत द्यावी लागली होती. शिवाय मनुष्यबळाची आणि पर्यावरणाची हानी वेगळीच. त्यामुळे शक्तिपीठ महामार्ग म्हणजे शेतकऱ्यांच्या डोक्यावर हातोड्याचे घाव घालण्याचा प्रकार आहे. आणखी एका महामार्गाद्वारे वाहनधारकांना थेट लुटण्याचा आजन्म परवाना आहे. या महामार्गाचा आराखडा बदलला तरी जे मूलभूत प्रश्न उपस्थित होतात, त्यांना उत्तर नाही. याच परिसरामध्ये रेल्वेचे दुपदरीकरण झाले, अनेक राष्ट्रीय आणि राज्य मार्ग झाले, कोकणामध्ये मुंबई -गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण झाले. यापैकी कोणत्याही प्रकल्पाला लोकांनी, विशेषतः शेतकऱ्यांनी विरोध केला नाही. नागपूर ते रत्नागिरी महामार्गालाही कधीही विरोध करण्यात आला नाही. आता तो होतो आहे, कारण त्याच महामार्गावर दुसऱ्या महामार्गाची गरज नाही एवढेच शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

# भारत-अमेरिका कापड व्यापार सुधारण्याची शक्यता किती?

विश्लेषण

**दयानंद लिपारे**
dayanand.lipare@expressindia.com

### भारतीय वस्त्रोद्योगाबाबत अमेरिकेचे धोरण काय?

अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प यांचे शुल्कविषयक निर्णय बेकायदा ठरवल्यामुळे या आठवड्यात पुन्हा ट्रम्प यांनी १५ टक्के हा शुल्कदर जाहीर केला. आधीच्या ५० टक्क्यांपेक्षा हे शुल्क कमी असल्याने 'करारामुळे देशातील वस्त्रोद्योगाची भरभराट होणार' अशी शक्यता व्यक्त केली गेली. प्रत्यक्षात चित्र वेगळे आहे. खुद्द अमेरिकेशी होणारा कापडव्यापार सोडाच, उलट 'अमेरिका-बांगलादेश व्यापार करारा'त अमेरिकी कापडविक्री वाढवण्याच्या आयात-अटी अमेरिकेने लादल्यामुळे, भारतातून बांगलादेशकडे होणाऱ्या कापडनिर्यातीची स्पर्धात्मकता लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. भारतातील कामगारभिमुख क्षेत्रावर त्याचा गंभीर आर्थिक परिणाम जाणवू लागला आहे. भारतातील सुती कपडे, डेनिम कापड सुमारे ३० टक्के महाग झाले. अमेरिकेने भारतावर लावलेल्या चढ्या करांमुळे वस्त्रोद्योगात ऑर्डर थंडावल्या आहेत.

### अमेरिकी कापूस वि. भारतीय कापूस?

अमेरिकेत कापसाचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. लांब धाग्याचा कापूस या उद्योगात अधिक किमतीला खरेदी केला जातो. अमेरिकेत सुमारे ९.८ दशलक्ष एकरांवर दरवर्षी १५-१८ दशलक्ष गाठींचे उत्पादन होते. अमेरिकेच्या कापसाची सातव्या क्रमांकांची मोठी बाजारपेठ असलेल्या भारताने २०२४ मध्ये अंदाजे २०९ दशलक्ष डॉलर्स किमतीचा कापूस आयात केला होता. ताज्या व्यापारी करारानुसार अमेरिकेतील कापूस भारतात आयात होण्याचे प्रमाण आणखी वाढणार, याचे संकेत मिळाल्याने भारतातील कापसाच्या दरात घसरण होताना दिसत आहे. भारतीय कापूस महामंडळाने आठवड्याभरात दोन वेळा कापसाच्या विक्री किमतीत कपातीची घोषणा केली आहे. पंधरवड्यापूर्वी प्रति खंडी (३५६ किलो) ५६ हजार ५०० रुपये असणारा कापूस सुमारे १ हजार रुपयांनी घसरून ५५ हजार ५०० रुपये झाला आहे. आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत बाजारात कापूसदर घसरलेच आहेत म्हणून, विक्री वाढण्यासाठी सीसीआयला आपली किंमत कमी करावी लागली, असे सांगितले जाते.

### सूत दरात चढउतार किती आणि का?

सुताचा वापर कोणत्या श्रेणीतील कापडासाठी होतो त्यानुसार सूत दरातील चढउतार होत आहेत. ३२ काउंटचे (सुताची जाडी मोजण्याचे परिमाण) सूत १३०० रुपये प्रति किलोवरून १२८० रुपये (प्रति किलो चार ते पाच रुपये) घसरले असल्याचे महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोक स्वामी सांगतात. दुसरीकडे, जुनाट पुरवठा साखळी आणि उच्च व्यवस्थापन खर्च हा सूतगिरण्यांना व्हिएतनाम, बांगलादेशसारख्या राष्ट्रांविरुद्ध स्पर्धात्मकतेला अडथळा आणत आहे.

**कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ज्या 'आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे' पडत्या भावात विक्री करावी लागते आहे, ती परिस्थिती प्रामुख्याने अमेरिकी आयात शुल्कांशीच संबंधित आहे...**

### या साऱ्याचा परिणाम काय?

सुताचे दर घसरल्याने पॉपलिन, ग्रे, केंब्रिक आदी प्रकारचे कापड दर प्रति मीटर ५० पैसे इतके उतरले आहेत. आधीच कच्च्या मालाच्या वाढत्या किमती, १५ ते २० टक्के वाढलेला उत्पादन खर्च, २५०० रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या कपड्यांवर वाढवलेला वस्तू आणि सेवा कर यामुळे भारतीय कपड्यांच्या किमती वाढत आहेत. शिवाय, आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकतेवरही अमेरिकेच्या उच्च शुल्काचा परिणाम होत असल्याने भारतीय कापड बांगलादेशसारख्या स्पर्धकांपेक्षा ३० टक्के महाग विकले जाते. कमी होत असलेली मागणी, उच्च चलनवाढ, आर्थिक अनिश्चितता यामुळे वस्त्र उद्योगात अस्थिरतेचे संकेत मिळत असल्याचे निरीक्षण इचलकरंजी पॉवरलूम असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील नोंदवतात.

### ही अनिश्चितता संपेल का?

भारत - अमेरिका कापूस/ कापड व्यवहाराबाबत दीर्घकालीन सकारात्मक दृष्टिकोन बाळगणेच सध्या हाती आहे. सर्वात मोठी निर्यात बाजारपेठ असलेली अमेरिका आणि युरोपियन महासंघाची निर्यात घटल्यामुळे वस्त्रोद्योगातील अनिश्चितता वाढत आहे. ही कोंडी भारताने आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे भान ठेवून पावले उचलल्याखेरीज सुटणार नाही.

अन्वयार्थ

# 'प्रहार'पूर्वीची खबरदारी!

**भारत आणि** पाकिस्तान यांच्यात गेल्या काही वर्षांत तीन वेळा मर्यादित युद्ध (ऑपरेशन सिंदूर), युद्धसदृश परिस्थिती (बालाकोट हल्ले) आणि आंतरसीमा कारवाई (सर्जिकल स्ट्राइक) असे संघर्षाचे प्रसंग उद्भवले, त्या तिन्हींच्या मुळाशी पाकिस्तान पुरस्कृत प्रशिक्षित, प्रेरित दहशतवादी हल्ले होते. उरी तळावर झालेल्या हल्ल्यातून सर्जिकल स्ट्राइकची कारवाई झाली. पुलवामात झालेल्या भीषण हल्ल्यातून बालाकोटची कारवाई झाली आणि पहलगामला गेल्याच वर्षी झालेल्या नृशंस दहशतवादी हल्ल्यातून 'ऑपरेशन सिंदूर' घडले. दहशतवादी हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून आपण सीमेपलीकडील दहशतवादी केंद्रे, तळांवर हल्ला करण्यास कचरणार नाही. वेळ पडल्यास आणि तसे करणे भाग पाडल्यास पाकिस्तानी लष्करी आस्थापनांनाही लक्ष्य केले जाईल हे 'ऑपरेशन सिंदूर'ने दाखवून दिले, ते योग्यच. पण दहशतवादी हल्ले थांबत नाहीत आणि प्रत्युत्तर-प्रतिसाद म्हणून सीमेपलीकडे हल्ले करण्यास काही मर्यादा येतात. अशा हल्ल्यांतून एक दिवस युद्धाचा भडका उडू शकतो. कोणी कितीही युद्धज्वर तापवला तरी युद्धाचे परिणाम विध्वंसक असतात आणि सर्वाधिक नुकसान सीमावर्ती भागात राहणाऱ्या तळागाळातील नागरिकांचेच सर्वाधिक होते. तेव्हा युद्धसज्जता ही आपली जबाबदारी असली, तरी दहशतवादी हल्ल्यांना प्रतिबंध करण्यावरही लक्ष केंद्रित करावेच लागेल. केंद्राच्या 'प्रहार' या पहिल्यावहिल्या दहशतवादविरोधी धोरणाकडे या पार्श्वभूमीवर पाहावे लागेल. या धोरणाची घोषणा गेल्या वर्षी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली होती. दहशतवादी हल्ल्यांना प्रतिसाद देण्यापेक्षाही त्यांस प्रतिबंध करणे हे अधिक योग्य धोरण ठरते. आपल्याकडे प्रतिसादाच्या बाबतीत जशी पुरेशी एकात्मिकता दिसून येत नाही, तीच बाब काही प्रमाणात प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या बाबतीतही अनुभवावयास येते. 'प्रहार' धोरणाअंतर्गत प्राधान्याने एकात्मिकता आणि एकवाक्यता यांचा अंतर्भाव करण्यात येत आहे.

भारत हा अजस्र देश आहे. त्यामुळे धोरणात्मक अंमलबजावणीत काही प्रमाणात विस्कळीतपणा येतोच. कित्येक दहशतवादी हल्ल्यांची पूर्वसूचना मिळूनही समन्वयाअभावी ते थोपवले गेले नव्हते. दहशतवादी हल्ले या देशामध्ये गेली किमान ४० वर्षे होत आहेत. तरीदेखील प्रतिसाद, चौकशी, प्रकटीकरण, दहशतवादविरोधी पथकांची उभारणी आणि प्रशिक्षण या महत्त्वाच्या बाबींना संस्थात्मक अधिष्ठान लाभलेले नाही हे वास्तव. मुंबईत २६/११च्या दहशतवादी हल्ल्यांनंतर एनआयएसारख्या संस्थेची स्थापना झाली. त्याआधीही मुंबई पोलिसांकडे स्वतःचे दहशतवादविरोधी पथक होतेच. पण इस्रायल किंवा अमेरिकेप्रमाणे दहशतवादी हल्ल्यांनंतर उच्चप्रशिक्षित शीघ्र कृतिदलाची उभारणी झालेली नव्हती. अशा हल्ल्याच्या वेळी पुरेशी खबरदारी न घेतल्याचा काय परिणाम होतो याची दुःखद प्रचीती त्यावेळी तीन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मृत्यूतून आली होती. नवीन सहस्रकात पहिल्या दशकात किंवा सरत्या शतकाच्या अखेरच्या दशकात मुंबई आणि देशात इतरत्र लहान-मोठे दहशतवादी हल्ले झाले. गेल्या १५ वर्षांत त्यांची वारंवारिता कमी झाली, पण तीव्रता कमी झालेली नाही हे कटु वास्तव. असे हल्ले थांबवण्यासाठी आणि ते घडलेच, तर हल्लेखोर आणि हस्तकांना योग्य तो धडा शिकवण्यासाठी सात सूत्रांचे 'प्रहार' धोरण आखण्यात आले आहे.

दोन लक्षणीय बाबी म्हणजे या मसुद्यात पाकिस्तानचा थेट उल्लेख नाही. तसेच, दहशतवादाचा संबंध विशिष्ट धर्म, वंश, राष्ट्रीयत्व किंवा संस्कृतीशी आम्ही जोडत नाही, अशी ग्वाही निःसंदिग्ध शब्दांत देण्यात आली आहे. या भूमिकेचे विशेष स्वागत. कारण दहशतवाद किंवा दहशतवाद्यांना विशिष्ट रंगात दाखवण्याची प्रवृत्ती अलीकडे वाढू लागली आहे. दहशतवादी 'त्यांच्यातले'च कसे, असा प्रश्न आजही सर्रास उपस्थित केला जातो. मूलतत्त्ववादाचे आकर्षण तरुणांमध्ये वाढू नये, याविषयी उपाययोजनांची चर्चा या धोरणात आहे. यासाठी नेमस्त धर्मोपदेशकांची मदत घेतली जाईल, असेही नमूद आहे. पण नेमस्तपणा हा सापेक्ष असतो. तो सरकार कसा ठरवणार नि त्यासाठीचे निकष कोणते, हे स्पष्ट नाही. दहशतवादाच्या आधुनिक आणि व्यामिश्र स्वरूपाविषयी सविस्तर ऊहापोह आहे. डिजिटल, आर्थिक, समाजमाध्यमी दहशतवादाची योग्य मीमांसा आहे. जमीन, हवा किंवा पाणी अशा तिन्ही माध्यमांतून दहशतवादी हल्ले होऊ शकतात, याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. त्या दृष्टीने हा धोरण मसुदा सखोल आणि दूरगामी आहे. आता प्रतीक्षा आहे सुयोग्य, सुनियोजित आणि सर्वसमावेशक अंमलबजावणीची. कारण प्रहार करण्याची वेळच येऊ नये, यासाठी खबरदारी घेणे केव्हाही हितकारकच.

# राहुल गांधी यांच्या याचिकेवरील निर्णय राखीव

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** राफेल विमान खरेदी व्यवहारावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी दाखल फौजदारी मानहानीचा गुन्हा रद्द करण्यासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या याचिकेवरील निर्णय उच्च न्यायालयाने मंगळवारी राखून ठेवला.

राहुल गांधी, सरकार आणि मूळ तक्रारकर्ते यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायमूर्ती नितीन बोरकर यांच्या एकलपीठाने प्रकरणाचा निर्णय राखून ठेवला. तसेच, राहुल यांना यापूर्वी दिलेला अंतरिम दिलासाही न्यायालयाने निकाल देईपर्यंत कायम ठेवला.

राजस्थान येथे २०१८ मध्ये एका सभेत राहुल यांनी मोदी यांच्यावर 'चौकीदार चोर है' अशी टीका केली होती. यामुळे पंतप्रधानांची प्रतिमा मलिन झाल्याचा आरोप करून भाजपचे नेते महेश श्री श्रीमल यांनी गिरगाव दंडाधिकारी न्यायालयात मानहानीची फौजदारी तक्रार दाखल केली होती.

# दुधाच्या किमतीत दोन रुपयांनी वाढ

## १ मार्चपासून अंमलबजावणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** दूध खरेदी दरात वाढ झाल्यामुळे गायी आणि म्हशीच्या दूध विक्री दरातही दोन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय दूध संघांनी घेतला आहे. १ मार्चपासून ही दरवाढ लागू होणार आहे. पुण्यातील कात्रज डेअरी येथे झालेल्या दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

उन्हाळ्याची चाहूल लागल्याने दूध उत्पादनात काहीशी घट नोंदवण्यात येत आहे. त्यामुळे दूध खरेदी दरात चार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. त्यापैकी एक रुपया संस्था, तर एक रुपया वितरक आपल्या कमिशनमधून सहन करणार आहेत. ग्राहकांवर दोन रुपयांचा भार पडेल. या पार्श्वभूमीवर १ मार्चपासून पिशवी बंद दुधाच्या विक्री दरात प्रति लिटर दोन रुपयांची वाढ करण्यात आली आहे. दूध खरेदी आणि इतर खर्चाचा विचार करून दरवाढीच्या प्रश्नावर मध्यम मार्ग काढण्यात आला आहे, अशी माहिती दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाचे अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांनी दिली.

### मुंबईच्या तबेल्यांमधील दुधाचा दर ९३ रुपये



मुंबईतील तबेल्यांमधून दररोज वितरित केले जाणारे दुधाचे दर प्रति लिटर दोन रुपयांनी वाढवून ९३ रुपये करण्याचा निर्णय मुंबई दुग्ध उत्पादक संघाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. एक मार्चपासून हा नवा दर लागू होणार असून तो ३१ ऑगस्टपर्यंत स्थिर राहील. पशुखाद्याच्या दरात १५ ते २५ टक्के वाढ झाली आहे असून पेंड आणि चारा टंचाई दाखवून व्यापारी तो चढ्या दराने विक्री करत आहेत. अशा परिस्थितीमध्ये सध्याच्या ९१ रुपये प्रति लिटरने दूध विक्री करणे तबेलेवाल्यांना परवडत नाही. त्यामुळे दोन रुपये दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे मुंबई दुग्ध उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकुमार सिंग यांनी सांगितले.

# निधीची 'मात्रा' मिळूनही अनास्था

*(पान १ वरून)* कोटी रुपये आरोग्य सेवेवर खर्च करण्यात आले.

**रुग्णांना विविध समस्या**

प्रशासनाने आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी पुरेशा निधीची तरतूद केली.या निधीचा वापर करून मुंबईकरांना आणखी चांगली आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे प्रशासनाला सहज शक्य होते. परंतु तसे न झाल्यामुळे आजही पालिका रुग्णालये, दवाखाने, आरोग्य केंद्रांमध्ये उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांना निरनिराळ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

**भाजपच्या राजवटीतील पहिला अर्थसंकल्प**

महापालिकेत गेली २५-३० वर्षे एकसंघ शिवसेना व भाजपची सत्ता होती. या काळात अर्थसंकल्पावर शिवसेनेचाच प्रभाव होता. यंदा महापालिका निवडणुकीत भाजपला बहुमत मिळाल्याने अर्थसंकल्पावर त्यांचीच छाप असेल. अर्थसंकल्पात कोणत्या नवीन घोषणा होणार याबाबत उत्सुकता आहे.

**मुदतठेवींचा अंदाज येणार**

या अर्थसंकल्पातून पालिकेच्या आर्थिक स्थितीचा अंदाज येणार आहे. सध्या पालिकेची आर्थिक स्थिती खालवत आहे. जकात बंद नंतर उत्पन्नाचे स्त्रोत उभारण्यात प्रशासनाला अपयश आले. दुसरीकडे प्रकल्पांसाठी राखीव निधीला हात घातल्यामुळे मुदतठेवीही कमी होत आहेत. ९१ हजार कोटींवर असलेल्या मुदतठेवी चालू अर्थसंकल्पात ८१ हजार कोटींपर्यंत कमी झाल्या होत्या. या मुदतठेवी आणखी कमी होण्याची शक्यता असून त्याबाबतची खरी माहिती अर्थसंकल्पात मिळेल.

# राज्यात वादळी पाऊस!

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मागील काही दिवसांपासून राज्यातील हवामानात झपाट्याने बदल होत आहेत. काही ठिकाणी पावसाची नोंद झाली असून दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागांत मंगळवारी वादळाची नोंद झाली.

राज्यातील कमाल तापमानातही चढ-उतार पाहायला मिळत असून बुधवारी कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात कमाल तापमानात मोठा बदल होणार आहे. त्यानंतर हळूहळू त्यात २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होईल. तसेच कोकण, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात पुढील तीन ते चार दिवसांत २ ते ३ अंश सेल्सिअसने हळूहळू घट होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मुंबईत मंगळवारी हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात २३ अंश सेल्सिअस तर सांताक्रूझ केंद्रात २०.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. बुधवारी शहरातील कमाल तापमान ३४ अंश तर किमान तापमान २१ अंश सेल्सिअस राहील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, समीर ॲपच्या नोंदीनुसार, शहराचा सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक मंगळवारी ९८ म्हणजेच 'समाधानकारक' श्रेणीत नोंदला गेला.

### विदर्भात इशारा

विदर्भातील चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यात बुधवारी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल, तर पुणे आणि परिसरात दुपारी आणि सायंकाळी आकाश अंशतः ढगाळ राहील, असा अंदाज आहे.


## जाहिरात

## समाज विकास विभाग

पनवेल महानगरपालिका क्षेत्रालगतच नव्याने उभारण्यात आलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यात आले आहे. या विमानतळामुळे पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील युवक-युवतींना नोकरीच्या व रोजगाराच्या व्यापक संधी उपलब्ध होणार आहेत. या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील स्थानिक युवक-युवतींना विमानतळाशी संबंधित अद्ययावत व कौशल्यपूर्वक प्रशिक्षण मोफत दिल्यास स्थानिक युवक व युवतींना अधिकाधिक नोकरीच्या व रोजगाराच्या संधी मिळू शकतील. त्या अनुषंगाने सदर (EOI) स्वारस्याची अभिव्यक्ती पनवेल महानगरपालिका panvelcorporation.maharashtra.gov.in या वेबसाईट अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच महा-ई-टेंडरवरती सदरचा EOI दिनांक २५.०२.२०२६ ते ०५.०३.२०२६ पर्यंत उपलब्ध असणार आहे.

सही/-
अतिरिक्त आयुक्त-II
समाज विकास विभाग
पनवेल महानगरपालिका


# भुमरेंच्या वाहनचालकाला जन्मापूर्वीच तीन एकर जमीन बक्षीस

*(पान १ वरून)* चालक असल्याची तक्रार अंबादास दानवे यांनी केली आहे. लेखी पत्रात त्यांनी खासदार भुमरे यांच्या नावाचा उल्लेख केला नसला, तरी पत्रकार बैठकीत त्यांनी त्यांचे नाव घेतले. शहराजवळील जटवाडा-जोगवाडा भागातील जमीन लता सूर्यभान वाघमारे यांचे खापर पणजोबा दिवंगत पावण्या भिका वाघमारे यांच्या नावे व हक्कात २३ एकर ३० गुंठे होती. ते या जमिनीचे प्रतिबंधित मालक होते.

हैदराबाद संस्थानात ती त्यांना बहाल करण्यात आली होती. १९५७ मध्ये प्रमाणपत्राच्या आधारे बहाल केलेली जमीन त्यांच्या मृत्यूनंतर पडीक होती. ही जमीन पुढे महाराष्ट्र विकास मंडळास संपादित करून देण्यात आली होती. त्याचे बाजारमूल्य १,१५० कोटी रुपये आहे. यातील तीन एकर जमीन कूळ कायद्याने जावेद रसूल शेख यास हिबानामा करून दिली. याची किंमत १५० कोटी आहे. या जमिनीच्या किमती, हिबानामाबाबतच्या नोंदीसाठी दानवे यांनी विभागीय आयुक्तालयातील सहआयुक्त शुभांगी आंधळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना लिहिलेले पत्र सादर केले आहे. त्यानुसार हैदराबाद कूळ कायद्यानुसार जमीन हस्तांतरण होण्याची बंदी असताना तत्कालीन जिल्हाधिकारी, तहसील मंडळ व भूसंपादन अधिकारी यांनी मर्जीतील भूमियांची नावे व त्यांच्या हक्कात जमीन दिली. या प्रकाराची चौकशी करावी, समृद्धीमध्ये मोबदला मिळण्याबाबत केलेल्या अर्जदारास उत्तर द्यावे असे कळविले आहे.

या पत्रांच्या आधारे २३ एकर कूळ कायद्याची जमीन हस्तांतरित कशी झाली, शासनाचे कोट्यवधी रुपये खिशात घालण्यासाठी जावेद रसूल शेख यांच्या पाठीशी कोण? याची चौकशी करण्याची विनंती दानवे यांनी केली आहे. या आधी शहरातील काल्डा कॉर्नरच्या जमिनीचा हिबानामा करण्यात आला होता. या प्रकरणात पोलिसांनी चौकशी करूनही कोणतीही कारवाई झाली नाही, याकडे लक्ष वेधत दानवे यांनी घोटाळ्याच्या जुन्या आरोपांचा उल्लेख पत्रात केला आहे.

# कर वसुलीत हलगर्जी; दोन लिपिक निलंबित

**कल्याण :** कल्याण डोंबिवली पालिकेच्या मालमत्ता कर वसुलीच्या उद्दिष्टपूर्तीबाबत पालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी मंगळवारी कल्याण पूर्वेकडील आय प्रभागात आढावा घेतला. त्या वेळी वसुलीच्या कामात लिपिक अरविंद काळण, राजेंद्र पाटील यांच्याकडून हलगर्जी होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर आयुक्तांनी दोघांनाही निलंबित केले. तत्पूर्वी सोमवारी आयुक्तांनी साहाय्यक आयुक्त, मालमत्ता कर अधिकारी यांच्याशी संवाद साधून कर वसुलीत कोणतीही हलगर्जी खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा दिला होता.

# मराठी भाषेचा अभिजात दर्जा कागदावरच!

*(पान १ वरून)* आणि १५ महिन्यापूर्वी मराठी बरोबर पाली, प्राकृत. असामिया आणि बंगला अशा ११ भाषांना अभिजात दर्जा देण्यात आलेला आहे. अभिजात दर्जा मिळालेल्या भाषेच्या संवर्धन, संशोधन आणि संपादनासाठी केंद्राकडून सादर केलेल्या प्रकल्पानुसार निधी दिला जातो. यापूर्वी अभिजात दर्जा मिळालेल्या भाषांसाठी एकच उत्कृष्ट अध्ययन केंद्र म्हैसूरमध्ये केंद्रीय भारतीय भाषा संस्था (सीआयआयएल) नावाने स्थापन करण्यात आले.

मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर राज्य सरकारने पहिल्यांदा मुंबईत स्वतंत्र असे उत्कृष्टता अध्ययन केंद्र स्थापन करण्याची परवानगी मागणारा प्रस्ताव केंद्राकडे सादर केला. हा निधी मिळावा, यासाठी राज्य सरकारच्या भाषा विभागातील उच्च अधिकाऱ्यांनी दोन वेळा दिल्लीवारी केली. शिक्षण मंत्रालयाने उत्कृष्टता केंद्र कसे असावे, याचा अभ्यास करण्यासाठी मराठी भाषा विभागातील अधिकाऱ्यांना म्हैसूरला पाठवले. पाहणीनंतर राज्य सरकारने मागील वर्षी १५ सप्टेंबरला उत्कृष्टता केंद्राचा विस्तृत प्रकल्प आराखडा (डीपीआर) सादर केला. हा आराखडा मंजूर करावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १६ जानेवारी रोजी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पत्र लिहून विनंती केली.

देशातील सहा भाषांना अभिजात दर्जा देताना केंद्राने १ नोव्हेंबर २००४ रोजी एक धोरण तयार केले. या धोरणानुसार या भाषांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकार निधी देते. या धोरणातच आता सुधारणा करायची असल्याने मराठी भाषेच्या संवर्धनासाठी मिळणारा निधी कधी मिळेल हे सांगता येत नाही. मराठी भाषेसाठी आग्रही असलेल्या सरकारने अभिजात दर्जा मिळाल्यानंतर प्रचार आणि प्रसारासाठी एक कोटी रुपये खर्च केले.

# विकासकाला ५० कोटींची भरपाई देण्याचे झोपडीवासीयांना आदेश

*(पान १ वरून)* यांच्यात झालेल्या विकास करारनाम्यातील तरतुदीनुसार रिक्त भूखंडाचा ताबा विशिष्ट मुदतीत देणे बंधनकारक होते. परंतु त्या मुदतीत ताबा न मिळाल्याने मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा करीत विकासकाने लवादाकडे दाद मागितली. माजी न्यायमूर्ती ए. बी. चौधरी यांच्या लवादाने या प्रकरणी संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच या योजनेत असहकार्य केलेल्या ४० झोपडीवासीयांवर ठपका ठेवला आहे. विलंबाबद्दल विकासकाला ५० कोटींची भरपाई देण्याचे आदेश लवादाने दिले आहेत.

या योजनेत ६६० झोपडीवासीय असून या सर्व झोपडीवासीयांना तीन वर्षांचे आगावू भाडे विकासकाने एकरकमी दिले आहे. ही योजना दोन टप्प्यात राबविली जाणार आहे. झोपडीवासीयांसाठी पुनर्वसन इमारती बांधतानाच विक्री करावयाच्या इमारतींचे कामही करण्यास परवानगी मिळते. त्यामुळे पहिल्या टप्प्यातील योजनेचे काम सुरू करण्यासाठी रिक्त भूखंड ठरलेल्या मुदतीत विकासकाच्या ताब्यात आला नाही. त्यामुळे या योजनेला वर्षभराचा विलंब झाला. या योजनेत सुमारे ४० झोपडीवासीय असहकार्य करीत असल्याचे निष्पन्न झाले. मात्र अखेरीस या झोपड्याही रिक्त करून त्या जमीनदोस्त करण्यात आल्या. भूखंडाचा ताबा मिळाल्यानंतर विकासकाने झोपु योजनेचे कामही सुरू केले आहे. मात्र दिलेल्या मुदतीत भूखंडाचा ताबा न मिळाल्याने आपले सुमारे ७७ कोटींचे नुकसान केल्याचा दावा करीत विकासकाने लवादाकडे धाव घेतली. या सर्व झोपडीवासीयांना आपण आगावू भाडे दिले. वेळेत काम सुरू न झाल्याने आपले प्रचंड आर्थिक नुकसान झाले, असा युक्तिवाद विकासकाने लवादापुढे केला. लवादाने विकासकाची बाजू मान्य करीत झोपडीवासीयांनी ५० कोटी ७९ लाख ९० हजार रुपयांची भरपाई विकासकाला द्यावी, असे आदेश दिले. या रकमेवर ३१ ऑगस्ट २०२५ पासून दहा टक्के व्याजही देण्यात यावे, असे आदेश दिले. असहकार्य करणाऱ्या सदस्यांविरुद्ध सहकार न्यायालयात दावा दाखल करून त्यांच्या पुनर्वसनातील सदनिकांवर टाच आणून ही रक्कम वसूल करण्यात यावी, अशा सूचनाही लवादाने दिल्या आहेत.


GOVERNMENT OF INDIA
DEPARTMENT OF SPACE
CMG, SDSC - SHAR SRIHARIKOTA - 524124

Brief E- TENDER NOTICE: CORRIGENDUM-I (SALE EXTENSION)

No: e-Tender Notice No.CMG/C/CON/258726-(I) Dt: 23.02.2026

Refer to Tender No CMG/C/CON/258726 dated 05.02.2026 Name of work: **"Construction of OH Tank at PCR, Rasayani, Mumbai" (Est cost Rs.280 Lakhs)**;

**Sale period extended up to 05.03.2026**

Interested tenderer may visit https://www.isro.gov.in/Tenders.html or www.tenderwizard.com/ISRO for details.

Sd/- GROUP HEAD, CMG/SDSC SHAR

MUNICIPAL COUNCIL ERANDOL, DIST.JALGAON
(OPEN TENDER NOTICE)

O/w No./PWD/41/2025-26 Dated: 24/02/2026

1. Refer to open tenders published on **25th February, 2026.**
2. Please visit the website at **https://mahatenders.gov.in** for further details.
3. Due date for submission of quotation and opening of tenders is amended as follows:

| | | |
|---|---|---|
| Due date of submission of Quotations | 11/03/2026 | Time: 12.00 PM (IST) |
| Pre-Bid Meeting | 05/03/2026 | Time: 11.00 AM (IST) |
| Opening of Tenders | 12/03/2026 | Time: 12.00 PM (IST) Onwards |

4. Attendance of bidders should be compulsory at the time of Pre-bid meeting.
5. There are no other changes in the terms and conditions of the open tender notice.

(Amol Prabhakar Bagul)
Chief Officer
Municipal Council Erandol

(Dr.Narendra Dhudaku Thakur)
President
Municipal Council Erandol

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे
ई-निविदा सूचना

अनु. क्र. (1) ई-निविदा क्र. : 97-एसटी-टेंडर 2025 दिनांक :16.02.2026 **काम** : बिलासपूर मंडळातील गटोरा, ब्रजराजनगर व ईबी या 03 स्थानकांवर क्रिटिकल डीसी ट्रॅक सर्किटसह स्टँडबाय MSDAC उपलब्ध करून विश्वासार्हता सुधारण्याचे काम. **निविदा मूल्य** : रु. 8,98,16,905.15 (रुपये आठ कोटी अठ्ठ्याण्णव लाख सोळा हजार नऊशे पाच रुपये व पंधरा पैसे फक्त) **ईएमडी** : रु. 5,99,100/- (रुपये पाच लाख नव्याण्णव हजार एकशे फक्त) **निविदा सादर करण्याची अंतिम वेळ** : 11.03.2026 रोजी 15.00 वाजेपर्यंत
वरील ई-निविदा सूचनेची संपूर्ण माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे :https://www.ireps.gov.in. ई-निविदे व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारच्या बोली स्वीकारल्या जाणार नाहीत.

मंडळ सिग्नल व दूरसंचार अभियंता (ML)
सीपीआर/10/AM/717 द.पू.म.रेल्वे, बिलासपूर
South East Central Railway @secrail

पूर्वोत्तर रेल्वे
खुल्या निविदा सूचनेचे
१ ले शुद्धिपत्रक

अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम (ईपीसी) पद्धतीने इलेक्ट्रिक ट्रॅक्शन पॉवर सप्लाय इंस्टॉलेशनच्या क्षमता वाढीसाठी ईशान्य रेल्वेच्या लखनौ विभागातील मनकापूर-गोरखपूर कॅन्ट विभागात २x२५ केव्ही एटी ट्रॅक्शन फिडिंग सिस्टमसाठी ट्रॅक्शन सब स्टेशन्सच्या संबंधित स्विचिंग पोस्टसह डिझाइन, पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वित करण्याच्या कामाच्या खुल्या निविदा सूचना क्रमांक ईपीसी-पीएसआय-एमयूआर-जीकेसी-एनईआर दिनांक ३०.०१.२०२६मध्ये खालील बदल केले आहेत. **अनुक्रमांक :- १, वर्णन :-** पहिल्या पूर्व बोली चौकशीनंतर विशिष्ट ईपीसी निविदा दस्तऐवज कलमांमध्ये बदल., **प्रकाशित:- सुधारित:-** नवीन दस्तऐवज अपलोड केले. पूर्व बोली चौकशी उत्तर. अतिरिक्त संबंधित माहिती **www.ireps.gov.in** संकेतस्थळावर तपासता येईल.

मुख्य विद्युत अभियंता (प्रकल्प),
सीपीआरओ/ईएल २८८ लखनौ

गाडीमध्ये बिडी/ सिगारेट ओढू नका

ई-जाहिर निविदा
कार्यालयाचे नाव - चिपळूण नगर परिषद
ता.चिपळूण, जि.रत्नागिरी
ई-निविदा मागविणारी सूचना क्र. १०९ सन २०२५-२६

चिपळूण नगर परिषदेकडील **ई-निविदा सूचना क्रमांक १०९ सन २०२५-२६ जिल्हास्तर नगरोत्थान सन २०२५-२६ अंतर्गत** चिपळूण नगरपरिषद हद्दीतील विविध विकास कामांसाठी योग्य त्या कंत्राटदारांकडून ई-निविदा प्रणालीद्वारे **ई-निविदा** मागविण्यात येत आहेत. सदर निविदाबाबतचा सविस्तर तपशील अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाचे https://www.mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर **दिनांक २६.०२.२०२६ रोजी**पासून पहावयास उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. निविदा सादर करणेची अंतिम तारीख **दिनांक ०४.०३.२०२६ रोजी**पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.

दिनांक : २३.०२.२०२६

सही/-
मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)

कार्यकारी अभियंता गोरेगाव विभाग यांचे कार्यालय, कक्ष क्र. ३३८, २ रा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१
दूरध्वनी क्र. : २२-६६४०५२७७ ईमेल : goregaonee@gmail.com

जाहीर सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA), महाराष्ट्र यांनी प्रस्ताव क्र. SIA/MH/INFRA२/५५२८९९/२०२५ अंतर्गत प्लॉट -ए, स.क्र. २९ (पी), सी.टी.एस. क्र. ५०ए (भाग), पहाडी गोरेगाव (पश्चिम), पी/एस वॉर्ड (नवीन सुभाष नगर), मुंबई येथील निवासी प्रकल्पाच्या बांधकामाला पर्यावरणीय मंजुरी (Environmental Clearance) प्रदान केली आहे.

सदर पर्यावरणीय मंजुरीच्या प्रती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (MPCB) कार्यालयात संदर्भासाठी उपलब्ध आहेत आणि parivesh.nic.in या संकेतस्थळावर देखील पाहता येतील.

CPRO/A/126
म्हाडा-गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us:@mhadaofficial

सही/-
(विहार बोडके)
कार्यकारी अभियंता
गोरेगाव विभाग/ मुंबई मंडळ

कर्मचारी भविष्य निधि संघटना
(श्रम आणि रोजगार मंत्रालय, भारत सरकार)
प्रादेशिक कार्यालय मुंबई-१ (दादर)
१ला, ४था आणि ५वा मजला, टेलिफोन एक्सचेंज बिल्डिंग, एमटीएनएल, करी रोड, मुंबई-४०० ०१२
टेलि.:- ०२२-२४०३०१९८ पीआरओ :- ८३५६८३६३६३ व्हॉट्सॲप :- ९३२१२५५३१५ ईमेल : ro.bandra2@epfindia.gov.in

जाहीर सूचना

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि विविध तरतुदी कायदा १९५२ (ईपीएफ आणि एमपी कायदा) च्या कलम ७अ अंतर्गत त्यांच्या मृत कर्मचाऱ्यांच्या संदर्भात देय असलेल्या पीएफ देयकाच्या मूल्यांकनासाठी खालील उल्लेखित आस्थापनांविरुद्ध चौकशी प्रलंबित आहे.

| अ. क्र. | आस्थापनेचे नाव आणि पत्ता | मृत कर्मचाऱ्यांचे नाव | करनिर्धारण अधिकारी | पुढील सुनावणीची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | **कंत्राटदार** **(ईपीएफमध्ये समाविष्ट नाही)** मे. नॅशनल इंजिनियरिंग ॲण्ड स्ट्रक्चरल सोल्यूशन्स (मालक: श्री राजेशकुमार राम) येथे: वैशाली गाझियाबाद इंदिरापुरम, न्याय खंड-३, इंदिरापुरम, ६२-बी, गाझियाबाद, उत्तर प्रदेश, पिन कोड - २०१०१४ - रोहतक येथील कुंडली मानेसर पानिपत द्रुतगती मार्गावरील जसापूर खेरी पुलाच्या देखभालीच्या कामासाठी. **प्रमुख नियोक्ता** मेसर्स एस्सेल इन्फ्राप्रोजेक्ट्स लि., १३५ कॉन्टिनेंटल बिल्डिंग ए बी रोड, वरळी, मुंबई - ४०००१८ (पीएफ कोड क्र. एमएच/बीएएन/१२६३२३) | १) श्री. सुशील, रुपन यांचा मुलगा २) श्री. शशिकांत, बहादूर सिंग यांचा मुलगा ३) श्री. कांतिस्वरूप, चंद्रपाल यांचा मुलगा वरील कर्मचाऱ्यांचे दि. १९.०५.२०२२ रोजी निधन झाले. **अपघाताचे ठिकाण** कुंडली मानेसर पलवल हायवे रोड असोदा टोल प्लाझाजवळ | श्री. मनोज कोळी, सहाय्यक भविष्य निर्वाह निधी आयुक्त, प्रादेशिक अधिकारी मुंबई (दादर) | ०६.०३.२०२६ |
| | | **समन्स क्रमांक आणि दिनांक** एमएच/बीएएन/१२६३२३/आरओ दादर/कंप्लायन्स/४४५ दि. १२.१०.२०२२ **आवश्यक माहिती:-** आधार कार्ड, पॅन कार्ड, कुटुंबाची माहिती. रुजू होण्याची तारीख. मृत कर्मचाऱ्यांच्या पीएफ आणि संबंधित देणीचे मूल्यांकन करण्यासाठी पगार स्लिप आणि इतर कोणतेही तपशील आवश्यक आहेत. तसेच, कंत्राटदार आणि त्याच्या मालकाचा ठावठिकाणा. | | |

सदर या संदर्भात, या आस्थापनेशी संबंधित वर उल्लेखित आस्थापना/ नियोक्त्याला सुनावणीला उपस्थित राहण्यासाठी आणि चौकशी पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेले रेकॉर्ड सादर करण्यासाठी पुरेशा संधी देण्यात आल्या होत्या. तथापि, आस्थापना/ नियोक्ता कार्यवाहीला उपस्थित राहण्यास आणि संबंधित रेकॉर्ड सादर करण्यात अयशस्वी ठरला. मृत कर्मचाऱ्यांच्या दावेदारांचा शोध घेण्यासाठी ईपीएफओ प्रादेशिक कार्यालय, दादरने केलेल्या सर्व शक्य प्रयत्नांनंतरही, वरील आस्थापना/ नियोक्ता, मृत कर्मचाऱ्यांच्या दावेदारांचा पत्ता, आस्थापना/ नियोक्ता कुठे आहे हे माहित नाही.

सदर या संदर्भात, जाहीर सूचना जारी करण्यात येत आहे ज्यामध्ये मृत कर्मचाऱ्यांच्या वरील दावेदारांच्या ठावठिकाणाबद्दल माहिती असलेल्या सर्वसामान्य जनतेला/ कर्मचाऱ्यांना आवाहन केले जाते, सदर निर्देशित उल्लेखित आस्थापनेत चौकशी कालावधीत काम केलेल्या आस्थापना/ नियोक्ता किंवा कोणत्याही कर्मचाऱ्याने पुढे येऊन मूल्यांकन अधिकाऱ्याला माहिती द्यावी आणि चौकशीशी संबंधित कोणतेही कागदोपत्री पुरावे सदर ही सूचना प्रकाशित झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत **ईपीएफओ प्रादेशिक कार्यालय, मुंबई (दादर), १ला, ४था आणि ५वा मजला, टेलिफोन एक्सचेंज इमारत, एमटीएनएल, करी रोड, मुंबई-४०००१२ येथे सादर करावेत.**

सही/-
(मनोज एम. कोळी)
सहायक पीएफ आयुक्त
आर.ओ. मुंबई (दादर)

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना
EMPLOYEES' PROVIDENT FUND ORGANISATION
(कामगार आणि रोजगार मंत्रालय, भारत सरकार) (MINISTRY OF LABOUR & EMPLOYMENT, GOVT. OF INDIA)
प्रादेशिक कार्यालय, मुंबई (दादर), Regional Office, Mumbai (Dadar)
१ला, ४था आणि ५वा मजला, टेलिफोन एक्सचेंज इमारत, एमटीएनएल, करी रोड, मुंबई ४०० ०१२
1st, 4th & 5th Floor, Telephone Exchange Building, MTNL, Currey Road, Mumbai 400 012

क्र./एमएच/दादर/पब्लिसिटी/ दिनांक: २४/०२/२०२६

'निधी आपके निकट २.०'
!! नियोक्ते/कर्मचारी/पेन्शनधारकांनी लक्ष द्या!!

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना **दि. २७ ऑक्टोबर २०२५ (सोमवार) रोजी सकाळी १०.०० वा. ते दुपारी ४.३० वा.** या वेळेत मुंबई प्रदेशात खालील ठिकाणी **'निधी आपके निकट २.०'** नावाचा कार्यक्रम आयोजित करत आहे.

| अ.क्र. | ठिकाणाची माहिती | फेसबुक आणि ट्विटर |
|---|---|---|
| १ | मेसर्स एल ॲण्ड टी कन्स्ट्रक्शन, प्रेस्टीज १०१ बीकेसी, जी ब्लॉक, टाटा कॉलनी, भरत नगर, एनएससी बिल्डिंगसमोर, बीकेएस, मुंबई, महाराष्ट्र - ४०००५१. दिनांक : २७.०२.२०२६ सकाळी १०.३० वा. ते दुपारी ४.३० वा. पर्यंत | फेसबुक : https://www.facebook.com/epfo.robandra1 ट्विटर : https://twitter.com/epfobandra (@epfobandra) |
| २ | नेटवर्क १८ मीडिया ॲण्ड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड, श्री राम मिल्स कंपाउंड, जीएम भोसले मार्ग, वरळी नाका, बीडीडी चाळ वरळी, वरळी, मुंबई, महाराष्ट्र - ४०००१३. दिनांक : २७.०२.२०२६ सकाळी १०.३० वा. ते दुपारी ४.३० वा. पर्यंत | फेसबुक : https://www.facebook.com/epfo.rodadar.5 ट्विटर : https://twitter.com/epfodadar (@epfodadar) |
| ३ | स्टेट बँक ऑफ इंडिया मुंबई मुख्य शाखा, ऑडिटोरियम, मेझानाइन फ्लोअर, मुंबई समाचार मार्ग, हॉर्निमन सर्कलजवळ, फोर्ट, मुंबई, महाराष्ट्र - ४००००१. दिनांक : २७.०२.२०२६ सकाळी १०.३० वा. ते दुपारी ४.३० वा. पर्यंत | फेसबुक : https://www.facebook.com/epfonarimanpoint ट्विटर : https://twitter.com/EPFONarimanPt (@EPFONarimanPt) |
| ४ | मार्स्क ग्लोबल सर्व्हिस सेंटर्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड नोंदणीकृत कार्यालयः युनिट # एनबी १२०१,१२०२ आणि एसबी १२०२, १२ वा मजला एम्पायर टॉवर, गाव एलथान, ठाणे बेलापूर रोडवरील ऐरोली, नवी मुंबई, ठाणे, महाराष्ट्र - ४००७०८. दिनांक : २७.०२.२०२६ सकाळी १०.३० वा. ते दुपारी ४.३० वा. पर्यंत | फेसबुक : https://www.facebook.com/epfopowai ट्विटर : https://twitter.com/epfomumbaipowai (@epfomumbaipowai) |
| ५ | मेसर्स महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँक लिमिटेड, एसआयआर व्हीटीएम बीएलडीजी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई, महाराष्ट्र - ४००००१. दिनांक : २७.०२.२०२६ सकाळी १०.३० वा. ते दुपारी ४.३० वा. पर्यंत | फेसबुक : https://www.facebook.com/people/RO-Fort-Mumbai/61585580942284/ ट्विटर : https://twitter.com/ROMUMBAIFORT (@ROMUMBAIFORT) |

नियोक्ते, कर्मचारी, पेन्शनधारक आणि त्यांच्या संघटनांना **'निधी आपके निकट २.०'** यामध्ये उपस्थित राहण्याची विनंती आहे. सदर कार्यक्रमात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती फेसबुक आणि ट्विटरवर उपलब्ध आहे.

सही/-
प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त-१,
क्षेत्रीय कार्यालय-मुंबई-१.

## कोल्हापूर - मुंबई विमानसेवा पुढील महिन्यापासून दोन सत्रांत

**कोल्हापूर :** कोल्हापूर ते मुंबई या मार्गावर २९ मार्चपासून दररोज सकाळी आणि संध्याकाळी अशा दोन सत्रांमध्ये विमान सेवा सुरू होत असल्याची माहिती खासदार धनंजय महाडिक यांनी दिली.

रोज सकाळी आठ वाजता नवी मुंबई विमानतळावरून कोल्हापूरसाठी विमान उड्डाण घेईल आणि सव्वानऊ वाजता हे विमान कोल्हापुरात येईल. त्यानंतर सकाळी ९ वाजून ३५ मिनिटांनी कोल्हापूर विमानतळावरून उड्डाण घेतलेले विमान, नवी मुंबई विमानतळावर १० वाजून ३५ मिनिटांनी पोहोचेल.

दरम्यान, सायंकाळी ७.२० वाजता नवी मुंबई विमानतळावरून उड्डाण घेतलेले विमान रात्री साडेआठ वाजता कोल्हापुरात येईल. त्यानंतर रात्री ८ वाजून ५० मिनिटांनी कोल्हापुरातून सुटणारे विमान ९.५० वाजता नवी मुंबई विमानतळावर उतरेल.

# पेंच व्याघ्र प्रकल्पालगतच्या महोत्सवाची गंभीर दखल

## ‘लोकसत्ता’तील बातमीच्या आधारावर ‘सुमोटो’ याचिका

**लोकसत्ता प्रतिनिधी**


पेंच व्याघ्रप्रकल्पालगत ‘संगीत महोत्सव’!

पेंच व्याघ्रप्रकल्पाच्या संवेदनशील क्षेत्रात संगीत महोत्सवाच्या आयोजनाचे वृत्त ‘लोकसत्ता’ने प्रसिद्ध केले होते.

**नागपूर :** पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात ‘संगीत महोत्सव’ आयोजित करण्यात आला. ‘लोकसत्ता’ने याबाबतचे वृत्त प्रकाशित केल्यानंतर पेंच प्रशासनाने महोत्सव रद्द करण्याचा निर्णय घेतला. आता मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या प्रकरणाची दखल घेत स्वतःहून जनहित याचिका दाखल करण्याचे निर्देश दिले.

पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्राजवळच ‘कोलितमारा संगीत महोत्सव’ आयोजित करण्यात आला होता. याबाबत ‘लोकसत्ता’ने वन विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पर्यावरण संवेदनशील क्षेत्र मार्गदर्शक तत्त्वे, ध्वनिप्रदूषण नियंत्रण २०००, वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अशांतता कलम, आदी कायद्यांअंतर्गत संरक्षित क्षेत्राजवळ अशा कोणत्याही उपक्रमांना परवानगी देता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाने तीन महिन्यांपूर्वीच जंगलाच्या सीमेपासून काही किलोमीटरपर्यंत ‘शांतता क्षेत्र’ जाहीर करण्याचे निर्देश दिले. तर पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात आधीपासूनच हे नियम लागू आहे. या नियमाअंतर्गत निसर्ग शिबीर, आदिवासी नृत्य, आदिवासी संस्कृतीची ओळख पर्यटकांना करून देता येते. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून शिबिराच्या नावाखाली येथे पार्ट्या आयोजित केल्या जात आहेत. काही दिवसांपूर्वी येथे व्हॅलेंटाइन डे, ३१ डिसेंबर यानिमित्त कार्यक्रम ‘द वीकेन्ड एस्केपर्स’ने पेंच प्रशासनाच्या सहकार्याने घेतले. लोकसत्ताच्या बातमीनंतर प्रशासनाने हा महोत्सव रद्द केला. यानंतर प्रशासनाने यासाठी कोणतीही अधिकृत परवानगी दिली नव्हती असे सांगितले.

# कढीपत्त्याला उच्चांकी भाव

## बाजारात तुटवडा; आंध्र प्रदेशातून आवक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** फोडणीसाठी सढळ हाताने कढीपत्त्याचा वापर करणाऱ्या गृहिणींना आता हात आखडता घ्यावा लागणार आहे. बाजारात सध्या कढीपत्त्याचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे आंध्र प्रदेशातून कढीपत्ता मागविण्यात आला आहे.

एरवी घाऊक बाजारात ५० ते ७० रुपये किलो अशा भावाने कढीपत्त्याची विक्री केली जाते. बाजारात कढीपत्ता उपलब्ध नसल्याने आंध्र प्रदेशातून मागविण्यात आलेल्या एक किलो कढीपत्त्याला नवी मुंबईतील बाजार समितीच्या आवारात ३५० ते ४०० रुपये किलो असा भाव मिळाला आहे. पुण्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात एक किलो कढीपत्त्याची १५० ते २०० रुपये किलो अशा भावाने विक्री केली जात आहे.



सध्या बाजारात कढीपत्त्याचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवत आहे. आंध्र प्रदेशातून कढीपत्त्याची आवक होत असून, मागणीच्या तुलनेत आवक अपुरी पडत आहे. **– सिद्धार्थ चव्हाण,** कढीपत्ता व्यापारी, श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड

गेल्या महिनाभरापासून बाजारात कढीपत्त्याचा तुटवडा जाणवत आहे. पुणे जिल्ह्यातील दौंड, यवत, केडगाव, तसेच अहिल्यानगर भागातील मांडवगण फराटा भागात कढीपत्त्याची लागवड केली जाते. या भागातून कढीपत्ता पुण्यातील बाजारपेठेत विक्रीस पाठविला जातो. मुंबईतील बाजारपेठेत नाशिक, खेड, मंचर परिसरातून कढीपत्ता विक्रीस पाठविला जातो. मागणीच्या तुलनेत कढीपत्त्याची आवक अतिशय कमी प्रमाणावर होत आहे. त्यामुळे आंध्र प्रदेशातील बाजारपेठेतून शेतकऱ्यांकडून कढीपत्ता खरेदी करण्यात येत आहे. कढीपत्त्याला चांगला दर मिळत असल्याने तेथील शेतकऱ्यांनी पुण्या-मुंबईतील बाजारात कढीपत्ता विक्रीस पाठविण्यास सुरुवात केली आहे.

‘कढीपत्त्याला वर्षभर मागणी असते. केटरिंग व्यावसायिक, उपाहारगृहचालक, तसेच किरकोळ बाजारातील भाजीपाला विक्रेत्यांकडून कढीपत्त्याला मागणी असते. किरकोळ बाजारात कढीपत्त्याच्या जुडीची विक्री केली जाते. महिनाभरापूर्वी कढीपत्त्याची जुडी किरकोळ बाजारात दहा रुपयांना होती. कढीपत्त्याचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर सध्या मुंबई, पुणे, ठाण्यातील बाजारपेठेत कढीपत्त्याच्या एका जुडीची विक्री २० ते ३० रुपये दराने केली जात आहे,’ असे किरकोळ बाजारातील भाजीपाला व्यापारी प्रकाश ढमढेरे यांनी सांगितले.

# अनिश्चिततेमुळे अस्थिरता

(पान १ वरून) झाल्यावरच भारत अमेरिकेशी व्यापार चर्चा सुरू करेल असे केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी स्पष्ट केले.

ट्रम्प आणि ‘सीबीपी’ने केलेल्या वेगवेगळ्या घोषणांमुळे आयातशुल्काच्या नेमक्या दरावरून गोंधळ कायम आहे. सवलती दिलेल्या वस्तू वगळता, सर्व आयात वस्तूंवर अतिरिक्त १० मूल्यानुसार (अॅड व्हॅलोरेम) कर लागू केला जाणार आहे, असे ‘सीबीपी’च्या नोटिशीत नमूद करण्यात आले आहे. यामुळे अमेरिकेने विविध देशांशी केलेल्या व्यापार करारात निर्धारित करण्यात आलेल्या आयातशुल्कावर अतिरिक्त १० टक्के आयातशुल्क आकारले जाणार आहे का, हा गुंता सुटलेला नाही. ट्रम्प यांनी १५ टक्क्यांची घोषणा केली असतानाही त्यापेक्षा कमी आयातशुल्क दर का लागू करण्यात आला, याचे स्पष्टीकरण ‘सीबीपी’ किंवा ट्रम्प प्रशासनाने दिलेले नाही. तसेच ही पंधरा टक्क्यांची वाढ केव्हापासून लागू होणार हे स्पष्ट झाले नाही. व्हाइट हाऊसच्या एका अधिकाऱ्याने ‘फायनान्शिअल टाइम्स’ला अशी माहिती दिली की, १५ टक्के आयातशुल्क नंतर लागू केले जाईल.

ट्रम्प यांच्या आयातशुल्कासंबंधी धोरणाबाबत वाढलेल्या अनिश्चिततेने जागतिक बाजारात उमटलेल्या नकारात्मक प्रतिक्रियेचे अनुकरण करत खुल्या झालेल्या देशांतर्गत बाजारात, सेन्सेक्स-निफ्टी निर्देशांकांना तब्बल सव्वा टक्क्याचे मोठे नुकसान मंगळवारी सोसावे लागले. दिवसभरात १,३६० अंशांच्या घसरणीतून ८२ हजारांची पातळी मोडत सेन्सेक्स, दिवसाचे व्यवहार थंडावताना १,०६८.७४ अंशांची (१.२८ टक्के) तूट सोसत, ८२,२२५.९२ वर स्थिरावला. दुसरीकडे निफ्टी निर्देशांक २८८.३५ अंशांच्या घसरणीतून २५,४२४.६५ वर बंद झाला.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे आता ट्रम्प यांना मनमानी करून नवे आयातशुल्क लागू करता येणार नाहीत. मात्र, या निकालानंतरही गेल्या वर्षभरात अमेरिका आणि उर्वरित जगातील उद्योग विश्व ठप्प करणारी व्यापार धोरणातील अनिश्चितता कमी होण्याची शक्यता कमी असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. ‘‘परिस्थिती सर्वांसाठी अधिक गुंतागुंतीची झाली आहे,’’ असा इशारा ‘किंग अँड स्पॉल्डिंग’ या संस्थेचे भागीदार आणि अमेरिकेचे माजी वाणिज्य अधिकारी रायन मॅजेरस यांनी दिला आहे.

## सागरी मार्गासाठी १८४ झाडांवर कुऱ्हाड!

(पान १ वरून) आहे. त्यामुळे स्थानिकांनी निदर्शने केली. येथील सर्व झाडे तीन दशकांपासून आहेत. ही झाडे विकासाच्या नावाखाली तोडली जाणे, हे अस्वस्थ करणारे आहे. मुख्यमंत्री व महापालिका आयुक्तांना ई-मेल पाठविले आहेत. अधिकाधिक स्थानिकांनी या विरोधात एकत्र यावे, असे आवाहन स्थानिक रहिवासी सेविका भसीन यांनी केले. बॉम्बे कॅथोलिक सभेचे उपाध्यक्ष इलेक्स डिसूझा म्हणाले की, ‘जंगल आणि झाडांना आपली गरज नाही. पण आपल्याला त्यांची खूप गरज आहे. सागरी मार्गावरील शहरासाठी तिवरांची जंगले आणि झाडे खूप महत्त्वाची आहेत. ती नष्ट करणे चुकीचे आहे.’

# गडहिंग्लजमधील पराभवानंतर जनता दल अस्तंगत

**दयानंद लिपारे, लोकसत्ता**

**कोल्हापूर :** कधी काळी देशात सत्तेवर असलेल्या जनता दलाचा राज्यातील शेवटचा गडहिंग्लजचा बुरूजही नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत ढासळला आहे. जनता दलाचे दिवंगत प्रदेशाध्यक्ष, माजी आमदार श्रीपतराव शिंदे यांच्यानंतर त्यांच्या कन्या माजी नगराध्यक्षा स्वाती कोरी यांच्याकडून तालुक्यात पक्षाचे अस्तित्व टिकून होते. मात्र त्यांच्या भाजप प्रवेशानंतर आता जनता दल केवळ आठवणीपुरता उरला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांवर पक्षाने आपले प्राबल्य राखलेले होते. मात्र अलीकडे राष्ट्रवादी फुटीनंतर मुश्रीफ यांच्या आघाडीने गडहिंग्लज पालिका निवडणुकीत नगराध्यक्षपदासह १५ जागांवर विजय मिळवला. मूळच्या जनता दलाच्या आणि जून महिन्यात भाजपमध्ये प्रवेश केलेल्या कोरी यांना येथे केवळ पाच जागा निवडून आणता आल्या. लोकसभा निवडणुकीत त्यांनी आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचा प्रचार केला. धर्मांध शक्तीसमवेत जाणार नाही, असे जनता दलाच्या मेळाव्यात त्यांनी जाहीर केले होते. अर्थात त्यांचे हे मनोबल यंदाच्या जूनपर्यंतच टिकले आणि त्या भाजपवासी झाल्या. आगामी काळात नव्या पुनर्रचित मतदारसंघात कोरी यांना रिंगणात उतरवण्याच्या हालचाली भाजपकडून सुरू आहेत.

### दोन तालुक्यांत प्राबल्य

कोल्हापुरात एके काळी इचलकरंजीत कम्युनिस्टांचे आमदार निवडून येत होते तेव्हा राधानगरी व गडहिंग्लजमध्ये जनता दलाचे आमदार दबदबा निर्माण करून होते. श्रीपतराव शिंदे यांनी गडहिंग्लजमध्ये तत्कालीन काँग्रेस नेते बाबा कुपेकर यांना आव्हान देताना साखर कारखान्यावर प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. गडहिंग्लज कारखान्यावर सत्ता मिळाली, तरी आर्थिक अडचणी ते दूर करू शकले नाहीत. अशा वेळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याकडून अर्थसाहाय्य मिळवण्याचा प्रयत्न होता. त्या काळात काही डाव्या- जनता दल नेत्यांना पाठबळ देण्याची पवारांची भूमिका होती.


# लोकसत्ता क्लासिफाइडस्
सगळ्यांकरिता सर्वकाही

## पाहिजेत

टीचर, रिसेप्शनिस्ट, कॉम्प्युटर ऑपरेटर, क्लर्क, क्लिनिक स्टाफ, ड्रायव्हर, प्यून, कॅथड्रल इंटरनॅशनल स्कूल, मिरा रोड (पूर्व), जि. ठाणे. मो. नं. ७२०८३९६३६८.
0071020764-2

REQUIRED Office Computer Staff With Knowledge of Tally & Excel. Office @ Ghatkopar East, Male/ Female, Part Time/ Full Time, Interested Candidate Contact 9769579044/ 9322217109.
0071020103-1

SALES Engineer required. Male/ Female Qualification. - Degree/ Diploma in Electronics/ Electrical Instrumentation. Must be fluent in English and conversant with Computers related to sales activities. Address - Flameproof Instrumeentation E 14 Additional Ambernath MIDC Anand Nagar. Contact - 11a.m to 7p.m 9324164455. Anil JAYAWANT.
0071020695-1

Wanted a Female staff for Back Office and Sales Coordinator for real estate operation at Dadar office. 9820441241.
0071020715-1

श्री बोरिवली गुजराती सेवा मंडळ चिकित्सा केंद्राला कॉम्प्युटरचे ज्ञान असलेली ग्रॅज्युएट मुली त्वरित पाहिजेत. खालील नंबरवर फोन करा. 9833059044/ 9867932468. Email : sbgsm1967@gmail.com
0071020146-1

साई संकेत क्रिटिकेअर हॉस्पिटल, कल्याण (पश्चिम) तातडीने आवश्यक अनुभवी हॉस्पिटल स्टाफ, रिसेप्शनिस्ट, नर्सिंग स्टाफ, RMO (ICU अनुभव आवश्यक). अकाउंट्स- बिलिंग, सपोर्ट स्टाफ, मामा/ मावशी, आकर्षक पगार + तात्काळ जॉईनिंग. संपर्क- 8888411872/ 9137994414.
0071020528-1

Vaishali Enterprises General Manager - 1 post (BE Electrical, MBA/ Mtech) Exp- min 15 years. Electrical Project engineer - 5 post (BE Electrical) Exp min 5-10 years. Electrical Site Supervisor- 7 post (BE electrical/ diploma electrical) Exp- min 2-3 years. Electrical procurement & estimation engineer - 5 post (BE Electrical) Exp min 2-3 year. Project coordinator- (Any graduate) Exp- min 1-2 year. Contact - +91 9372217871/ 9082779047 vaishali@vaishalienterprises.co.in
0071018968-2

ROTARY-School, Ambernath, We are hiring the following post for Pre-Primary, Primary, Secondary & College (Commerce & Science), Admin Staff, Accountant, Computer Staff, Digital Marketing Coordinator, P.E. Master, ECCED, B.A. D.Ed, M.A. B.Ed., BSC/MSC., B.Ed. & Subject Teacher. Mail your CV : rotaryschool50@gmail.com
0071020718-1

REQUIRED Electronic/ Electrical Engineer Diploma/ I.T.I For Instrument Factory Near Dadar For A) Production And B) Marketing Of Electrical/Electronic Instruments. Apply : E-MAIL: jobs@goliyainstruments.com
0071020717-1

## पार्ट टाईम जॉब

START Your 2nd Innings In Managementl Role With Fix Pay + PF + Incentives + Trips. Invites VRS/ Retired/ Bankers. 8692935611.
0071020513-1

बोरीवलीमध्ये पार्टटाइम काम. सरकारमान्य कंपनीत निवृत्त/ VRS/ सुशिक्षित गृहिणींना. पगार ६५०००/- + PF+ ESIC. वय : 45+. Call: 8850226871 *Surprise Gift.
0071020409-1

निवृत्त व्यक्ती/ गृहिणी/ व्यावसायिक व्यक्तींसाठी करियर संधी. वय ३५+ वर्षे/ ४५+ वर्षे. निश्चित पगार+ PF+ प्रोत्साहन. 8097181975 वर संपर्क करा.
0071020803-1

सरकारमान्य नामांकित कंपनीत पाहिजेत- शासकीय सेवानिवृत्त, सुशिक्षित गृहिणी, व्यावसायिक, बँकर्स, VRS, शिक्षिका, आपल्या वेळेनुसार काम, वय : ४०+. उत्कृष्ट पगार + प्रोत्साहन + सवलती. 9821657418.
0071020722-1

सरकारमान्य कंपनीमध्ये vacancy Retired, VRS, बँकर्स, शिक्षिका, सुशिक्षित महिला. वय: 35-70 Salary+PF+Medical. Vandana: 9821460808/ 9819258847
0071003726-1

## जागाविषयक

डोंबिवली (पूर्व) स्टेशनपासून ५ मिनिटांवर, रामनगर, टाटा पॉवर लेन, ४० वर्षे जुन्या बिल्डिंगमध्ये 1 BHK, ३ रा मजला, 485 sq.ft carpet विकणे आहे. Rs 40 Lakh Negotiable. संपर्क- 9820446524. एजन्ट क्षमस्व.
0071019906-1

## जागा भाड्याने देणे आहे

दादर स्टेशनजवळील 10, 50, 100 sq. ft., गोडाऊन, ऑफिसेस, पेइंगगेस्ट (जेण्टस) उपलब्ध. सशुल्क L&L ऑनलाइन रजिस्ट्रेशन. 9819854009/ 9076388458/ 9076071568.
0071020134-1

## व्यावसायिक जागा

डोंबिवली (पूर्व), लोढा हेरिटेज येथे १७५ स्क्वे. फूट एरियाचा रोड फ्रन्ट फेसिंग गाळा विकणे आहे. (पार्किंग). ४० लाख. संपर्क- 8692980304.
0071020074-1

PEN-DIST-RAIGAD, Sale/ lease 2000 sft carpet, 1st floor - For banks, insurance, MNCs, back offices, polyclinics etc. 9819374959/ 9819032829.
0071017279-1

## मालमत्ताविषयक

आकर्षक सूट! महाराष्ट्रात शेतजमीन घेण्यासाठी दाते लँडस 7/12 उतारा बनवितात. Govt. वेबसाईटवर खात्रीने नाव दिसते. 9076188458/ 9324371568/ 9326165294.
0071017006-1

## प्लॉट विक्रीविषयक

चिपळूणमध्ये विकासासाठी आकर्षक भूखंड मुंबई- गोवा महामार्गावर इंडियन ऑइल पेट्रोल पंपाच्या मागे, महामार्गापासून ८० फूटावर ९ मीटर रोडवर असलेली विकासासाठी व्यावसायिक आणि निवासी भूखंड. संपर्क :- ८२३७५९४१०९ (सकाळी ११ ते संध्याकाळी ६).
0071020378-1

फार्महाऊस... प्लॉटस कर्जतपासून सुमारे १७ किमी फलोद्यान, सोसायटीतील विकसित स्कीममधील फार्महाऊस, प्लॉटस् सुलभ हप्त्याने उपलब्ध. कमीतकमी ५००० स्क्वेअर फूट. रेट १५०/- रु. प्रति स्क्वे. फूट बारमाही नदीला लागूनच १५० एकरचे भव्य प्रोजेक्ट : चव्हाण : 7385068141, अनंत : 9172891981.
0071015523-1

## जाहिरातविषयक

‘‘फक्त १ फोन’’ ‘‘त्वरित जाहिराती छापतो.’’ ‘‘टाईम अॅडव्हर्टायझिंग’’ 022-24466191/ 022-24468556/ 8976181891- “PMC” Public NOTICE” ‘‘हरवले/ सापडले’’ ‘‘पुण्यस्मरण’’ “Property” ‘‘जीवनसाथी’’ ‘‘नावबदल’’ ‘‘वाढदिवस’’.
0070973749-4

## यात्रासहल

दोस्ती टूर- उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा, चारधाम यात्रा, श्रीदत्त धाम परिक्रमा, हिमाचल, ट्युलिपसह काश्मीर, नैनीताल, सिक्कीम- दार्जिलिंग, भूतान, आदिकैलाश यात्रा सिंगापूर- थायलँड- मलेशिया, बाली. 9594880123/ 9702251584.
0070987728-11

देशपांडे ट्रॅव्हल्स 9820962500 9702528795
२५ वर्षांची यशस्वी वाटचाल
अष्टविनायक-जेजुरी प्रतिबालाजी-आळंदीसह दर शुक्रवारी, इकॉनॉमिक 3,351/- स्वतंत्र रुम 4,251/-, एसी बस व एसी रुम 5,551/-
पंढरपूर-तुळजापूर गाणगापूर-अक्कलकोट दर गुरुवारी, इकॉनॉमिक 3,551/-, स्वतंत्र रुम 4,451/-, एसी बस, नॉन-एसी रुम 5,551/-
गणपतीपुळे-पावस मार्लेश्वर-डेरवण-रत्नागिरी 4 दिवस, दर गुरुवारी, इकॉनॉमिक 4,151/-, स्वतंत्र रुम 5,551/-
कोल्हापूर-ज्योतिबा नरसोबाची वाडी-कण्हेरी मठ बाळूमामा-चाफळसह 26 फेब्रुवारी, 5, 12, 19, 26 मार्च, 5,551/- प्रत्येकी
उज्जैन-इंदौर ओंकारेश्वर-महेश्वरसह 5 दिवस, 19 मार्च, इकॉनॉमिक 11,501/- एसी बस, फॅमिलीवाईज रुम 13,501/- प्रत्येकी
(रेल्वे रिझर्वेशन ७५ दिवस अगोदर बुकींग सुरु)
चारधाम यात्रा बद्रीनाथ-केदारनाथ यमुनोत्री-गंगोत्री हरिद्वार-ऋषीकेशसह 13 दिवस, 20, 30 एप्रिल, 11, 21 मे, 1, 11, 22 जून, रेल्वे 3rd एसी, 37,500/- प्रत्येकी
वैष्णोदेवी-काश्मिरसह (ट्युलिप स्पेशल) 11 दिवस, रेल्वे 3rd एसी, 28 मार्च, 4, 11, 18, 25 एप्रिल, 2, 9, 16, 23, 30 मे, 31,501/- प्रत्येकी
वैष्णोदेवी-काश्मिर अमृतसरसह (ट्युलिप स्पेशल) 12 दिवस, रेल्वे 3rd एसी, 28 मार्च, 4, 11, 18, 25 एप्रिल, 2, 9, 16, 23, 30 मे, 36,501/- प्रत्येकी
सिमला-कुलू-मनाली चंदिगडसह 10 दिवस 5, 13, 21, 29 एप्रिल, 7, 15, 23, 31 मे रेल्वे 3rd एसी 31,500/- प्रत्येकी
दार्जिलिंग-सिक्कीम भूतानसह 12 दिवस 10, 21 मे, मुंबई ते मुंबई रेल्वे 3rd एसी 54,500/- प्रत्येकी विमान प्रवास 74,500/- प्रत्येकी
डलहौसी-धरमशाला ज्वालाजी मंदिर खजियार-अमृतसरसह 10 दिवस, रेल्वे 3rd एसी, 25 एप्रिल, 2, 9, 16, 23, 30 मे, 26,500/- प्रत्येकी
काश्मिर-लेह लडाखसह 12 दिवस, जाताना रेल्वे 3rd एसी, (मुंबई ते जम्मू), 23 मे, 6 जून, श्रीनगर ते मुंबई विमान प्रवास 62,501/- प्रत्येकी
अयोध्या-वाराणसी प्रयागराजसह 6 दिवस, 12 मार्च, रेल्वे 3rd एसी 13,501/- प्रत्येकी विमान प्रवासासह 29,500/-
www.deshpandetours.com
0071009345-16-1

To place your ad in Classifieds call:
Jitendra : 9967966093
Sanjeev: 9967552226
Vinay : 8451957053

*श्रीरामकृष्ण *:- चारधाम त्रियुगीनारायणसह- २३/०४/२०२६// ०४/०५/२६ *त्रिस्थळी- नैमिष्यारण्यसह- ०४/०३/२०२६// नर्मदा परिक्रमा- १४/०३/२०२६// भूतान- १२/०५/२०२६// * नेपाळ- मुक्तिनाथसह- २५/०४/२०२६// १३/०५/२०२६ * संपूर्ण हिमाचल- १८/०४/२०२६// काश्मीर- टुलिपसह प्रत्येक गुरुवारी// सिक्कीम- दार्जिलींग- ०६/०५/२०२६// १६/५/२०२६// उत्तरवाहिनी नर्मदापरिक्रमा- २३/०३/२०२६// ३०/०३/२०२६// नैनिताल जिम कॉर्बेटसह- ०८/०५/२०२६// कोकण दर्शन प्रत्येक गुरुवारी. बापट- 9137001395/ 9820023106.
0071007592-5

‘‘साळुंखे ट्रॅव्हल्स- ठाणे’’ * अष्टविनायक- २७/२/२०२६ (३ दिवस) * नेपाळ- ०६/०३/२०२६ (१२ दिवस) * कोस्टल कर्नाटका- २३/०३/२०२६ (८ दिवस) * अयोध्या, काशी, प्रयाग- २०/०३/२०२६ (७ दिवस) * इंदौर, उज्जैन, ओंकारेश्वर, महाकालेश्वर- २६/०३/२०२६ (५ दिवस) * बाबा वैद्यनाथ, काशी विश्ववश्वर, झारखंड- ११/०३/२०२६ (७ दिवस) * समर्थ स्थापित अकरा मारुती- २६/०२/२०२६ (३ दिवस) * केरळ, कन्याकुमारी, रामेश्वर, मदुराई- २१/०४/२०२६ (१२ दिवस) * आसाम, मेघालय, अरुणाचल- ०८/०४/२०२६ (१३ दिवस) * बेंगलोर, म्हैसूर, उटी- ०३/०४/२०२६ (८ दिवस). फोन : 9324559383/ 8591363036/ 9833559388/ 8879080777/ 9321559383.
0070959978-39

## यात्रासहल

चितारी ट्रॅव्हल्स कबुतरखाना-जैनमंदिरालागून दादर, मुंबई – ४०० ०२८.
फोन : 022-24307744 / 9869742603/ 8779267256
काश्मीर म्हणजेच चितारी! चितारी म्हणजेच काश्मीर!!
सरहद्द काश्मीर – फक्त चितारीच दाखवतात
अमृतसर-वैष्णोदेवी-काश्मीर | नैनीताल-जीमकॉर्बेट-मसुरी
लेह-लडाख-नुब्रासह | सिमला-मनाली-डलहौसी
नेपाळ-दार्जिलिंग-सिक्किम | सुंदरबन-शांतीनिकेतन
कोणार्क-पुरी-भुवनेश्वर-चिल्का | भूतान-पारो-थिंपू-पुनाखा
आसाम-मेघालय-अरुणाचल | चारधाम-दोनधाम-दिल्ली-आग्रा
केरळ-काशी-अयोध्या | सारहान-स्पिती व्हॅली

VANRAJ सीता स्मृती, राजाराम केशव मार्ग, दादर (प)
9723307777/9820084266
9082872631, www.vanrajtravels.com
नेपाळ-पशुपतिनाथ-मुक्तिनाथ पोखरा-चितवन-जनकपुर-अयोध्या २२ मार्च (मुंबई ते अयोध्या विमानाने)
मालवण-तारकर्ली-गणपतीपुळे गुहागर-दापोली-२१ मार्च, १४ एप्रिल
इंदौर-ओंकारेश्वर-महाकाळेश्वर १४ मार्च, २३ एप्रिल, ४ जून
चारधाम-लाखामंडल-हरिद्वार २८ एप्रिल, ११, २४ मे, ६, १८ जून
सिमला-कुलू-मनाली-धरमशाला डलहौसी/अमृतसर १५ एप्रिल, १२, २२ मे
नैनिताल-कॉर्बेट-मसुरी-कैंचिधाम ऋषिकेश-हरिद्वार १७ एप्रिल, १३, २१ मे
काश्मिर- वैष्णोदेवी- अमृतसर ३ एप्रिल, १, १२, २२ मे
हैद्राबाद-रामोजी-श्री शैल्यम २५ मार्च, १५ एप्रिल, १ जून
काशी-गया-प्रयाग- अयोध्या १ जून
लेह-लडाख- कारगिल १२ जुलै
सोमनाथ-द्वारकाजुनागड ६ जून
अष्टविनायक -शुक्र./ दत्तधाम -गुरु.

## मॅरेज ब्युरो

सौ. कुळकर्णी विवाहसंस्था- सर्व जातींची, उच्चशिक्षित स्थळे उपलब्ध. ४३ वर्षांची परंपरा. लाखो विवाह जुळविण्याचा अनुभव. ‘रिलेशनशिप मॅनेजर’ सर्व्हिस उपलब्ध. 8369692734/ 9892625606.
0071014856-1

## ट्यूटर्स

रिझल्ट ओरिएन्टेड ‘‘होमट्युशन’’ VIII/ IX/ X/ XI/ XII/ JEE/ NEET/ MHT-CET/ B.Com./ Engg./ SSC/ CBSE/ ICSE 91%, 92%, 93%. प्रशांतसर: 9930004564/ 7039487944.
0070964717-3

## भविष्यविषयक

## 43 वर्षांचा अनुभव असलेले, सत्य व अचूक भविष्य कथन करणारे एकमेव ज्योतिषी श्री. विजय हजारी- विवाहसौख्य स्पेशालिस्ट (व्हॉट्सअॅपवरून भविष्य कथन शक्य). 9870335562.
0071012544-1

श्रीनाथजी ज्योतिष- काय! आपला मुलगा- मुलगी कोणत्याही वशमध्ये/ प्रेमामध्ये आहे? जुना आजार, पतीदुःख, शत्रुनाश, मूठकरणी, लग्न-विलंब, निराश व्यक्ती त्वरित भेटा (फी ५००/-) मालाड (पश्चिम). 9833390898/ 9920991344/ 02228898500.
0071005737-1

अॅस्ट्रॉलॉजी : गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा- चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच/ वास्तुशास्त्राचे महत्त्व. वास्तुशांतीचे साधे- सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, कु. यशश्री सुधाकर जोशी. सोमवार ते शनिवार सकाळी १० ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई- ४०००६४. 9820553276/ 9820612578. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0071013631-1

## भविष्यविषयक

मुंबईत सर्वात जुने आणि लोकप्रिय ज्योतिषी
श्री गायत्री एस्ट्रो सेंटर
२५ वा वर्धापन सोहळा !!
रामला शास्त्रात उत्कृष्ट भविष्यवाणी, चेहरा वाचून, कुंडली आणि हस्तरेखा बघून, संख्या - ६00 वर्ष जुने अत्यंत चांगला उपचार आणि आध्यात्मिक शक्ती, संपूर्ण खाजगी / पारिवारीक / स्वास्थ समस्या आणि कोणत्याही इतर जटील समस्यांवर सल्ला. शांतिपूर्ण, सूरक्षात्मक आणि प्रगतीशील भविष्यासाठी आम्हाला भेटा आणि चांगले लाभ प्राप्त करा!


अपॉइन्टमेंट घेण्यासाठी संपर्क करा
शॉप न. १, त्रिवेणी सी.एच.एस.एल., शास्त्री नगर, रोड न.१, सिध्दार्थ हॉस्पीटल समोर, गोरेगांव (प.), मुंबई - १०४.
Rajguru Sri Sri Raghavan S Shastriji
Contact: 9867608928 / 9821208928
VISIT US : srigayathriastromumbai.com

## कुरिअर सर्व्हिस

जगभरात डोमेस्टिक, इन्टरनॅशनल पार्सल सर्व्हिसेस नास्ता, मसाले, कपडे, मेडिसिन, दुसरे सामान होलसेल दरात अमेरिका, केनडा, युरोप, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलँड युके, दुबई. 9769691025- 26822572.
0071017000-1

अमेरिका, लंडन, युरोप, दुबई, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, हाँगकाँग- पार्सल पाठवा, औषध पाठवा, सर्वात स्वस्त आणि लवकर पोहचविणारे- मीनल पंडित- 8879991866.
0070966752-1

## पेस्ट कंट्रोल

* अल्फा पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस (सरकारमान्य) झुरळे, मुंग्या, वाळवी, ढेकूण यावर शास्त्रीय पद्धतीने उपाय. १००% खात्री!! ५००० पेक्षा अधिक समाधानी ग्राहक. 8433242630/ 8975968422.
0071020333-1

## स्मृतिदिन

चतुर्थ स्मृतिदिन

विद्याधर गोपीनाथ आचार्य
मृत्यू : २५/०२/२०२२
भावपूर्ण श्रद्धांजली
आचार्य परिवार वाडवली, चेंबूर
0071020522-2-1

## व्यवसायविषयक

फ्रेंचाईसी देणे. नामांकित कंपनीला अत्याधुनिक थेरपी सेंटर सुरू करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात वितरक नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क करावा. Mob.: 9892936307.
0071018199-1

## पाहिजेत

JOB OPPORTUNITY
DATAR ABHINAV Films Creation
REQUIRES
Editors | VFX Artist | Software Engineer
Ai Expert | Music Director | Software Developer
dafcmail@gmail.com
8779390204 / 7304421017


### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (अॅडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

## व्यावसायिक संधीसाठी 'प्रोजेक्ट्स टुडे'चे एआयवर आधारित पाऊल

**मुंबई :** देशातील प्रकल्प क्षेत्राला मजबूत करण्यासाठी कृत्रिम प्रज्ञा अर्थात 'एआय'वर आधारित नवीन व्यवसाय संधीचे व्यासपीठ 'प्रोजेक्ट्स टुडे' या पायाभूत सुविधा प्रकल्पांवर देखरेख ठेवणाऱ्या कंपनीने सुरू केले आहे.

या सुविधेमुळे आता प्रस्तावित प्रकल्पांची संपूर्ण माहिती, निविदा प्रक्रिया, सर्वात कमी बोली आणि कार्यादेशांचे अद्ययावत स्वरूप, तसेच संबंधित महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती इच्छुकांना एकाच ठिकाणी मिळविता येईल. यातून त्यांना योग्य वेळी, योग्य प्रकल्पांशी जोडले जाणे सोपे होईल. शिवाय कंत्राटदार, सल्लागार, माल पुरवठादार, सेवा पुरवठादार आणि वित्त पुरवठादार यांना पुढे काय करावे हे समजणे सोपे होईल. २५ वर्षांहून अधिक काळाचा संशोधन अनुभव गाठीशी असलेल्या प्रोजेक्ट्स टुडेकडे सध्या ५०,००० हून अधिक सक्रिय प्रकल्पांची माहिती उपलब्ध आहे. तर नव्या व्यासपीठावर दरमहा १,५०० हून अधिक नवीन प्रकल्प आणि १०,००० पेक्षा जास्त निविदा प्रक्रियांची भर पडत असते.

# विक्रीचा तडाखा!

## 'आयटी'साठी २३ वर्षांतील सर्वात वाईट महिना

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** माहिती-तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील शेअर्समध्ये विक्रीच्या जोरदार माऱ्यामुळे भांडवली बाजार मंगळवारी कोसळला. प्रगत एआय टुल्सच्या परिणामांबाबत धाकधुकीमुळे या क्षेत्रासाठी एप्रिल २००३ नंतरचा म्हणजेच मागील २३ वर्षातील यंदाचा फेब्रुवारी हा सर्वात वाईट महिना ठरण्याची शक्यता आहे.

अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयात शुल्कासंबंधी धोरणाबाबत वाढलेल्या अनिश्चिततेने जागतिक बाजारात उमटलेल्या नकारात्मक प्रतिक्रियेचे अनुकरण करत खुल्या झालेल्या स्थानिक बाजारात, सेन्सेक्स-निफ्टी निर्देशांकांना तब्बल सव्वा टक्क्यांचे मोठे नुकसान मंगळवारी सोसावे लागले. दिवसभरात १,३६० अंशांच्या घसरणीतून ८२ हजारांची पातळी सोडलेला सेन्सेक्स, दिवसाचे व्यवहार थंडावताना १,०६८.७४ अंशांची (१.२८ टक्के) तूट सोसत, ८२,२२५.९२ वर स्थिरावला. दुसरीकडे निफ्टी निर्देशांक २८८.३५ अंशांच्या घसरणीतून २५,४२४.६५ वर बंद झाला.

बाजारातील पडझडीस कारण ठरलेले आयटी शेअर्स ४.७ टक्क्यांहून अधिक घसरून ३० महिन्यांच्या नीचांकी पातळीवर पोहोचले. अग्रस्थानी असलेल्या टीसीएस, इन्फोसिस, एचसीएलटेक आणि विप्रो यांना २.७ टक्के ते ६.१ टक्क्यांचे नुकसान झाले. फेब्रुवारीमध्ये आतापर्यंत आयटी-निर्देशांक २१ टक्क्यांनी घसरला आहे. या निर्देशांकात सामील प्रमुख १० आयटी कंपन्यांचे या काळात एकूण ६.१७ लाख कोटी रुपयांचे (६८.५ अब्ज डॉलर) बाजार मूल्य लयाला गेले आहे.

भारतीय बाजाराच्या अगदी उलट परिस्थिती दक्षिण कोरिया आणि तैवान या आशियाई बाजारांची राहिली. एआय-संलग्न शेअर्समुळे मंगळवारी या बाजारांनी विक्रमी उच्चांक गाठला.

अँथ्रोपिक ही कंपनी आणि तिचे 'क्लॉड' हे एआय मॉडेल सध्याच्या जागतिक पडझडीच्या केंद्रस्थानी आहे. हे मॉडेल कोडिंगमध्ये अत्यंत अचूक मानले जाते. भारतीय आयटी कंपन्यांचा मुख्य व्यवसाय सॉफ्टवेअर विकसन आणि देखभाल हेच आहे. अँथ्रोपिकमुळे हे काम कमी वेळेत आणि कमी मनुष्यबळात केले जाईल. पारंपरिक सॉफ्टवेअर व्यवसाय प्रारूपांचा वापर यातून निरर्थक ठरेल.

### गुंतवणूक धोरण बदलण्याचा सल्ला




एआयच्या धक्क्यामुळे गडगलेले माहिती-तंत्रज्ञान कंपन्यांचे समभाग लवकरच सावरण्याची शक्यता नाही. भारतीय आयटी कंपन्यांना आणखी संघर्ष करावा लागणार आहे. आयटीमधून इतर चांगली कामगिरी करणाऱ्या क्षेत्रांकडे निधी वळवल्यास गुंतवणूकदारांना फायदा होईल, असे मत जिओजित इन्व्हेस्टमेंट्सचे गुंतवणूक रणनीतीकार, डॉ. व्ही.के. विजयकुमार यांनी व्यक्त केले. आयटी क्षेत्रासंबंधाने जोखीम भावना विपरित बनली असल्याचे ते म्हणाले.

### प्रमुख आयटी कंपन्यांतील घसरण

| कंपनी | वार्षिक उच्चांकापासून घसरण | २०२६ मधील घसरण | बाजार भांडवलातील घट |
|---|---|---|---|
| टीसीएस | -१५% | -८% | ८०,००० कोटी |
| इन्फोसिस | -२२% | -१०% | ६५,००० कोटी |
| विप्रो | -२८% | -१२% | २५,००० कोटी |
| एचसीएल टेक | -१२% | -७% | १८,००० कोटी |
| टेक महिंद्र | -२५% | -११% | १५,००० कोटी |

### 'सार्स' उद्रेकाने निर्माण केलेल्या घबराटीची पुनरावृत्ती

फेब्रुवारी महिन्यांतील आगामी उर्वरित तीन सत्रांमध्ये आयटीतील घसरणीची मालिका कायम राहिली, तर 'निफ्टी आयटी निर्देशांका'ची २३ वर्षांतील ही सर्वात वाईट मासिक कामगिरी ठरेल. एप्रिल २००३ मध्ये अमेरिका-इराक युद्ध, इन्फोसिसची वाईट तिमाही कामगिरी आणि आग्नेय आशियातील सार्स विषाणूच्या उद्रेकामुळे शेअर बाजारात घबराट पसरून, त्यातून आयटी क्षेत्राला जबर नुकसान सोसावे लागले होते.



# चंद्रशेखरन यांच्या टाटा समूहाच्या अध्यक्षपदी पुनर्नियुक्तीचा निर्णय लांबणीवर

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**



**मुंबई:** टाटा समूहातील १०० हून अधिक कंपन्यांचे नियंत्रण असलेल्या टाटा सन्सच्या संचालक मंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत अंतर्गत मतभेद पुन्हा पटलावर आले आणि त्यातून समूहाचे अध्यक्ष म्हणून एन. चंद्रशेखरन यांच्या पुनर्नियुक्तीबाबत कोणताही निर्णय न होता बैठक आटोपती घेतली गेल्याचे विश्वसनीयरित्या समजते.

फेब्रुवारी २०२७ पासून टाटा सन्सच्या अध्यक्षपदावरील तिसऱ्या कार्यकाळासाठी चंद्रशेखरन यांच्या पुनर्नियुक्तीचा विषय या बैठकीपुढे होता. परंतु ही प्रक्रिया मंगळवारी पुढे सरकू शकली नाही, असे वृत्त 'रॉयटर्स'ने माहितगार सूत्रांच्या हवाल्याने दिले आहे.

या बैठकीपूर्वी, टाटा विश्वस्त न्यासांचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी अनेक विश्वस्तांशी संपर्क साधून, चंद्रशेखरन यांच्या पुनर्नियुक्तीला दिलेल्या एकमुखी पाठिंब्याचा फेरविचार केला जावा, असे सुचविल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. तथापि, विश्वस्तांनी या विषयावर चर्चा करण्यासाठी बैठक घेतली नसल्याचेही असे समजते. उल्लेखनीय म्हणजे टाटा न्यासांनी गेल्या वर्षी चंद्रशेखरन यांना तिसऱ्यांदा पदावर कायम ठेवण्यास पाठिंबा देणाऱ्या अंतर्गत ठरावासा एकमताने सहमती दर्शविली होती.

टाटा समूहाच्या काही नवीन व्यवसायांमधील तोटा आणि भांडवलाच्या उपलब्धतेच्या गतीबद्दल बैठकीत चिंता व्यक्त केली गेल्याचे समजते. बैठकीतील चर्चेला वेगळे वळण लागल्यानंतर, अध्यक्षपदाच्या नियुक्तीच्या प्रस्तावावर मतदान घेतले जाण्याऐवजी ही पूर्ण प्रक्रियाच लांबणीवर टाकण्यात आल्याचे समजते.

मंगळवारी झालेल्या या बैठकीत संचालक वेणू श्रीनिवासन आणि स्वतंत्र संचालक अनिता जॉर्ज यांनी चंद्रशेखरन यांच्या पुनर्नियुक्तीला पाठिंबा दिला. नवीन व्यवसायांमधील तोटा हा चिंतेचा विषय ठरू नये, ही एक दीर्घकालीन गुंतवणूक असल्याचे त्यांनी मत मांडले. वृत्तसंस्थेने टाटा न्यास, टाटा सन्स आणि नोएल टाटा यांच्याशी प्रतिक्रियेसाठी संपर्क साधला असता प्रतिसाद मिळू शकला नाही.

# विकासदर ८.१ टक्के शक्य!

## सुधारीत मालिकेनुसार तिसऱ्या तिमाहीत वाढीचा अंदाज

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**




**मुंबई:** भारताच्या अर्थव्यवस्थेत मजबूत वाढीचा वेग कायम राहण्याची अपेक्षा असून, चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत सकल राष्ट्रीय उत्पादन अर्थात जीडीपी वाढीचा दर ८.१ टक्क्यांवर नोंदवला जाण्याचा अंदाज मंगळवारी स्टेट बँकेच्या अहवालाने व्यक्त केला.

आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी जीडीपी वाढीचा दुसरा आगाऊ अंदाज, येत्या शुक्रवारी २७ फेब्रुवारीला जाहीर केला जाणार आहे. तथापि जीडीपी मापनासाठी आधारभूत वर्ष हे २०२२-२३ असे बदलणार असल्याने, यापूर्वी घोषित पहिल्या आणि दुसऱ्या तिमाहीतील आकडेही बदलण्याची अपेक्षा आहे. जुन्या मालिकेनुसार, २०२५-२६ पहिल्या सहामाहीत विकास दर ८ टक्के राहिला आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) गेल्या महिन्यात जाहीर केलेल्या पहिल्या आगाऊ अंदाजानुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये वास्तविक जीडीपी वाढ ७.४ टक्के राहण्याचा अंदाज आहे, जी मागील आर्थिक वर्षात ६.५ टक्के पातळीवर होती

स्टेट बँकेच्या अहवालात, नवीन मालिकेनुसार आणि सुधारित पद्धतीची दखल घेऊन तिसऱ्या तिमाहीत वास्तविक जीडीपी वाढ ८.१ टक्क्यांच्या जवळ राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. बाह्य अडचणी असूनही, भारतीय अर्थव्यवस्था मजबूत देशांतर्गत मागणी आणि सर्व क्षेत्रांमध्ये स्थिर आर्थिक क्रियाशीलतेमुळे मजबूत राहिली आहे, असे अहवालाने अधोरेखित केले आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या सध्याच्या रचनेचे चांगले प्रतिबिंब पडण्यासाठी आधारभूत वर्षात सुधारणा केली गेली आहे. नव्या मालिकेत, डिजिटल कॉमर्स आणि सेवा क्षेत्राची वाढती भूमिकेसारख्या बदलांचा समावेश केला गेला आहे. नवीन जीडीपी मापनाची मालिका २७ फेब्रुवारीलाच प्रसिद्ध होणार आहे.

## फिडेलकडून आयएम कॉर्पोरेशनचे अधिग्रहण

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**पुणे:** पुण्यातील फिडेल सॉफ्टेक लिमिटेडने जपानमधील आयएम कॉर्पोरेशन या माहिती तंत्रज्ञान (आयटी) सल्लागार आणि सॉफ्टवेअर सर्व्हिस कंपनी ताब्यात घेतली आहे. या संपादनामुळे जपानमधील फिडेलच्या स्थानिक सेवा वितरण क्षमतेला बळकटी मिळणार असून, जपानी कंपन्यांसाठी फिडेलच्या एंटरप्राइज आयटी व कृत्रिम प्रज्ञा (एआय) सेवांच्या विस्तारास पाठबळ मिळेल.

फिडेलचे मुख्याधिकारी सुनील कुलकर्णी आणि आयएम कॉर्पोरेशनचे मुख्याधिकारी किकुची-सान यांनी पत्रकार परिषदेत या अधिग्रहणाची घोषणा केली. फिडेलने आयएम कॉर्पोरेशनमधील ८३ टक्के हिस्सा खरेदी केला आहे. यामुळे कंपनीची मालकी आता फिडेलकडे आली आहे. फिडेलने आयएम कॉर्पोरेशन अधिग्रहित केल्याने भारत आणि-जपान यांच्यामधील सहयोगाला बळकटी मिळाली आहे. आयएम ही सॉफ्टवेअर सेवा क्षेत्रात ३० वर्षांहून कार्यरत आहे. याबाबत सुनील कुलकर्णी म्हणाले की, जपान ही फिडेलसाठी एक धोरणात्मक बाजारपेठ आहे आणि हे संपादन आमच्या जागतिक विकासाच्या वाटेवरचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. आयएम कॉर्पोरेशनचे जपानी बाजारपेठेविषयी सखोल ज्ञान आणि फिडेलचे आयटी व एआय-आधारित सेवांमधील नैपुण्य यांच्या एकत्रीकरणामुळे जपान आणि त्याबाहेरील ग्राहकांना अधिक दर्जेदार सेवा पुरवण्यासाठी एक मजबूत पाया तयार झाला आहे.

# बँकांच्या किरकोळ कर्ज वितरणांत १८ टक्क्यांनी वाढ

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** सरलेल्या डिसेंबरअखेर संपलेल्या तिसऱ्या तिमाहीत देशातील बँकांची एकूण किरकोळ कर्जे १८.१ टक्क्यांनी वाढून १६२ लाख कोटी रुपयांवर पोहोचली, असे मंगळवारी एका अहवालातून स्पष्ट करण्यात आले. किरकोळ कर्जांमध्ये सर्वाधिक योगदान हे गृह कर्जाचे असून, तिमाहीत त्यात १०.५ टक्क्यांनी वाढ होऊन ती ४३ लाख कोटी रुपयांवर गेली, असे पत-गुणांकन संस्था 'सीआरआयएफ हाय मार्क'ने संकलित केलेल्या आकडेवारीने सूचित केले.

सर्व कर्जदात्या बँका आणि वित्तीय कंपन्यांकडून सोने तारण कर्ज सरलेल्या तिमाहीत सर्वाधिक ४४.१ टक्क्यांनी वाढले. डिसेंबरअखेर या विभागात एकूण १६.२ लाख कोटी रुपये वितरीत झाले आहेत. तर वैयक्तिक कर्ज विभागातील एकूण वितरीत रक्कम १५.९ लाख कोटी रुपयांची असून, या विभागात तिमाहीतील वाढ ११.६ टक्क्यांची होती.

जीएसटीचे दरातील कपातीची, वाहन कर्जे (वार्षिक १४.६ टक्क्यांची वाढ), दुचाकी कर्जे (१२.३ टक्के) आणि ग्राहकोपयोगी वस्तू खरेदीसाठी कर्जे (१४.३ टक्के) यासारख्या कर्ज विभागांना मोठी मदत झाली, असे पत-गुणांकन कंपनीने म्हटले आहे. डिसेंबर तिमाहीत एकल मालकी असलेल्या कंपन्या आणि व्यावसायिकांनी घेतलेल्या कर्जांमध्येही २६.२ टक्क्यांची भरीव वाढ दिसून आली. पत गुणवत्तेच्या दृष्टीने सरलेली डिसेंबर तिमाही चांगली राहिली आहे. या काळात ३० ते १८० दिवसांसाठी थकीत राहिलेले किरकोळ कर्ज मागील वर्षातील ३.२ टक्क्यांवरून, २.८ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहेत, असे आकडेवारी दर्शविते.

'सीआरआयएफ हाय मार्क' आकडेवारीने गृहकर्जांच्या बाबतीत अधिक माहिती देताना स्पष्ट केले की, या विभागात सक्रिय कर्ज खात्यांमध्ये ३.३ लाखांनी वाढ झाली. त्यामुळे प्रति व्यक्ती सरासरी कर्जाचे आकारमान वाढले आहे. राज्यवार प्रमाण पाहिल्यास, दिल्लीने गृहकर्जामध्ये सर्वात कमी ७.७ टक्के वाढ नोंदवली, तर तेलंगणा, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये १०.५ टक्क्यांच्या सरासरीपेक्षा जास्त वाढ दिसून आली आहे.

# कर्मचाऱ्यांना यंदा ९.१ टक्के वेतनवाढ!

**पीटीआय, नवी दिल्ली**

**यंदाच्या २०२६** या वर्षात सर्व क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना सरासरी ९.१ टक्के पगारवाढ मिळण्याची अपेक्षा आहे, जी गेल्या वर्षी मिळालेल्या सरासरी ८.९ टक्क्यांच्या वाढीपेक्षा अधिक आहे, असे मंगळवारी प्रसिद्ध झालेल्या जागतिक सल्लागार संस्था 'एऑन'च्या पाहणी अहवालात म्हटले आहे.

देशातील ४५ उद्योगांमधील १,४०० हून अधिक संस्थांमधून संकलित आकडेवारीच्या विश्लेषणावर आधारित हा पाहणी अहवाल आहे. गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना सरासरी १०.२ टक्के अशी अधिकची वेतनवाढ मिळण्याची अपेक्षा आहे, त्यानंतर बँकेतर वित्तीय कंपन्यांमध्ये (एनबीएफसी) काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना १०.१ टक्के वेतनवाढ मिळू शकेल, असे अहवालात म्हटले आहे.

ऑटोमोटिव्ह आणि वाहन उत्पादन क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना ९.९ टक्के वेतनवाढ मिळण्याची अपेक्षा आहे, तर अभियांत्रिकी डिझाइन सेवांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ९.९ टक्के वेतनवाढ मिळण्याची अपेक्षा आहे. अभियांत्रिकी आणि उत्पादन क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना सरासरी ९.५ टक्के वेतनवाढ मिळेल आणि किरकोळ विक्री उद्योगातील कर्मचाऱ्यांना ९.५ टक्के वेतनवाढ मिळण्याची अपेक्षा आहे, असे पाहणी अहवालाने नमूद केले आहे.

भारतातील नियोक्ते हे तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि ग्राहकांशी सामना करण्याच्या क्षमता मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करत आहेत.

# आयसीआयसीआय प्रु. बिझनेस सायकल फंडाचा चक्रवाढ परतावा

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई:** व्यवसाय-चक्र-आधारित गुंतवणूक संकल्पनेवर आधारित आयसीआयसीआय प्रुडेन्शियल बिझनेस सायकल फंडाने पाच वर्षे पूर्ण केली आहेत, जी वेगवेगळ्या बाजार परिस्थितीत सातत्यपूर्ण कामगिरी दर्शवत, तिने गुंतवणूकदारांना या काळात २०.२१ टक्के चक्रवाढ परतावा दिला आहे.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियलच्या या फंडाने एका वर्षात १८.१२ टक्के आणि तीन वर्षांत २२.८२ टक्के परतावा दिला आहे. तर याच काळात कोटक म्युच्युअल फंडाच्या याच श्रेणीतील फंडाने अनुक्रमे १०.४८ टक्के आणि १७.८० टक्के, टाटांच्या योजनेने अनुक्रमे ६.२३ टक्के आणि १७.२८ टक्के आणि एचडीएफसीच्या तत्सम योजनेने ८.५९ टक्के आणि १४.९७ टक्के परतावा दिला आहे.

सुरुवात १८ जानेवारी २०२१ रोजी करणाऱ्या आयसीआयसीआय प्रु. बिझनेस सायकल फंडाचे उद्दिष्ट व्यवसाय चक्राच्या प्रचलित टप्प्यावर आधारित उपलब्ध संधीनुरूप विविध उद्योग क्षेत्रात गुंतवणुकीतून दीर्घकालीन भांडवल वाढीचे आहे. आर्थिक चक्राच्या वेगवेगळ्या टप्प्यांमधून फायदा मिळवण्यासाठी तेजीतील प्रवाह ओळखून गतिमानपणे भांडवल वाटप करणे यावर फंडाची कामगिरी आधारित आहे. त्यानुसार, सुरुवातीस झालेल्या फंडातील १ एक लाख रुपयांच्या एकरकमी गुंतवणुकीचे पाच वर्षांत म्हणजे ३१ जानेवारी २०२६ रोजी मूल्य हे अंदाजे २.५१ लाख रुपये झाले आहे. योजनेचा मानदंड असलेल्या 'निफ्टी ५०० टीआरआय' निर्देशांकातील याच गुंतवणुकीतून २.०६ लाख रुपये, म्हणजेच १५.४७ टक्के चक्रवाढ परतावा मिळाला असता.

TATA
TATA POWER
**दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड**
कॉर्पोरेट आयडेन्टिटी नं. (सीआयएन) : L28920MH1919PLC000567
नोंदणीकृत कार्यालय : बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रिट, मुंबई ४०० ००१.
टेलि : +९१ २२ ६६६५ ८२८२; ईमेल : tatapower@tatapower.com; वेबसाइट : www.tatapower.com

**भागधारकांकरिता सूचना**
**प्रत्यक्ष भागांच्या हस्तांतरण विनंत्यांच्या पुनर्नोंदणीकरिता विशेष खिडकी**

दि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाने तिचे सर्क्युलर दिनांकित ३० जानेवारी, २०२६ द्वारे भागधारकांकरिता, ज्यांनी ०१ एप्रिल, २०१९ या तारखेपूर्वी त्यांच्या प्रत्यक्ष भागांच्या हस्तांतरण विलेखांची नोंदणी केली होती परंतु ज्यांच्या विनंत्या कागदपत्रे/ प्रक्रियेतील विसंगती यामुळे नामंजूर केल्या होत्या/ परत पाठविल्या होत्या/ दुर्लक्षिल्या होत्या, विशेष खिडकी विस्तारित केली आहे. नवीन खिडकी ०५ फेब्रुवारी, २०२६ पासून ते ०४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत सुरू राहील. सर्व प्रतिभूती, एक-वर्ष लॉक-इन विषयाधीन, केवळ डीमॅट स्वरूपात जमा केल्या जातील. सदर प्रतिभूतींचे लॉक-इन कालावधीत हस्तांतरण करता येणार नाही, धारणाधिकार चिन्हांकित करता येणार नाही किंवा तारण ठेवता येणार नाही. आवश्यक प्रक्रिया याखाली दिलेली आहे :

| | |
|---|---|
| पुनर्नोंदणीकरिता खिडकी | ०५ फेब्रुवारी, २०२६ पासून ते ०४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत |
| पुनर्नोंदणीकरिता प्रक्रिया | रजिस्ट्रार टू अॅन इश्यू अँड शेअर ट्रान्सफर एजन्ट म्हणजेच "एमयूएफजी ईन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड" (पूर्वीची लिंक ईन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड)यांच्याकडे अचूक किंवा गहाळ तपशीलासमवेत मूळ हस्तांतरण कागदपत्रे सादर करावीत. |
| कागदपत्रे येथे पाठवावीत | "एमयूएफजी ईन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड" युनिट : दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड सी-१०१, पहिला मजला, २४७ पार्क, लाल बहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी (प), मुंबई - ४०० ०८३. |
| कोणत्याही शंकांकरिता | • हेल्पलाईन नं. : +९१ ८१०८११८४८४;<br>• वेबसाइट : www.tatapower.com;<br>• ईमेल पत्ता : investorcomplaints@tatapower.com<br>• सेवा विनंती यावर पाठवावी :<br>https://web.in.mpms.mufg.com/helpdesk/Service_Request.html |

दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
विस्पी एस. पटेल
कंपनी सचिव
एफसीएस ७०२१

स्थळ : मुंबई
दिनांकित : २४ फेब्रुवारी, २०२६

बृहन्मुंबई महानगरपालिका
**मुख्य वैद्यकीय अधीक्षक आणि विभागप्रमुख (से. हेल्थ केअर सर्व्हिसेस)**
७ वा मजला, के. बी. भाभा म्युनि. जनरल हॉस्पिटल, आर. के. पाटकर मार्ग,
वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०००५०.
**क्र. सीएमएस अॅण्ड एचओडी/एसएचसीएस/११७७८ दिनांकित २४.०२.२०२६**
**ई-निविदा सूचना**

मुख्य वैद्यकीय अधीक्षक आणि एचओडी (एसएचसीएस), के. बी. भाभा म्युनिसिपल जनरल हॉस्पिटल, वांद्रे (प.), मुंबई-४०००५० हे पुढील विषयासाठी तीन टप्प्याची बोली ई-निविदा मागवीत आहेत.

ई-निविदा सूचनेसंदर्भातील तपशील, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या www.mcgm.gov.in वेबसाइटवर तसेच महाटेंडर पोर्टलवर http://mahatenders.gov.in मध्ये उपलब्ध राहतील.

ई-निविदेचे तपशील पुढीलप्रमाणे :

विषय : गाव वांद्रे, आर. के. पाटकर मार्ग, वांद्रे पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र ४०००५० येथील सीटीएस नं. १०७६ एफपी ८९ (पीटी) धारण करणाऱ्या जमिनीवर स्थित सिव्हिक हेल्थ कोलॅबोरेशन मोडच्या माध्यमातून योग्य भरती क्षमता असलेल्या अन्य पॅरामेडिकल व संलग्न पॅरा-टेक्निकल शैक्षणिक अभ्यासक्रमांसह किमान १०० जागा असलेल्या नर्सिंग अभ्यासक्रम असणाऱ्या नर्सिंग कॉलेजच्या स्थापनेसाठी प्रस्तावाची विनंती.

| अ. क्र. | महाटेंडर आयडी नं. | ऑनलाइन ई-निविदा प्रपत्र विक्रीच्या प्रारंभाची तारीख | निविदा शुल्क (रु.) | इ.र.ठे. (रु.) | ई-निविदा प्रपत्र सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | २०२६_एमसीजीएम_१२८१२६४_१ | २६.०२.२०२६ च्या दुपारी १२ वाजल्यापासून | ३०,२५०+ १८% जीएसटी = ३५,६९५/- | ७,५०,०००/- | २३.०३.२०२६ च्या दुपारी १२ वाजेपर्यंत |

नोंद :
- इसारा रक्कम ठेव (इरठे) ऑनलाइन प्रदान करण्याची शेवटची तारीख आहे विहित नियत तारखेला व वेळी किंवा त्यापूर्वी.
- शुद्धिपत्र असल्यास केवळ एमसीजीएम वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात येईल.
- बोलीपूर्व सभा १०.०३.२०२६ रोजी दुपारी ३ वाजता कॉन्फरन्स हॉल, दुसरा मजला, जोड भवन, माननीय पालिका सहआयुक्त (डब्ल्यूएस) यांचे कार्यालय, मुख्यालय, फोर्ट, मुंबई-४००००१ येथे नियोजिली आहे.

पालिका आयुक्त, कोणतीही कारणे न देता कोणतीही किंवा सर्व ई-निविदा नाकारण्याचा अधिकार स्वत:कडे राखून ठेवीत आहेत.

सही/-
(डॉ. चंद्रकांत पवार)
सीएमएस अॅण्ड एचओडी (एसएचसीएस)

पीआरओ/३०९०/एडीव्ही/२०२५-२६
खिडक्यांसाठी जाळ्यांचा व मच्छरदाण्यांचा वापर करा.

Camlin KOKUYO
**कोकुयो कॅम्लिन लिमिटेड**
CIN: L24223MH1946PLC005434
नोंदणीकृत कार्यालय: हिल्टन हाऊस, ४८/२, सेन्ट्रल रोड, एम.आय.डी.सी., अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३.
टेलि: ९१-२२-६६५५ ७०००, फॅक्स: ९१-२२-२८३६ ६५७९
वेबसाईट: www.kokuyocamlin.com; ई-मेल: investorrelations@kokuyocamlin.com

**पोस्टल बॅलट नोटीस व ई-व्होटिंग माहिती**

याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील संदर्भात विशेष ठरावा म्हणून रिमोट ई-व्होटिंग मार्फत पोस्टल बॅलटद्वारा कंपनी तिच्या सदस्यांकडून मान्यता मिळवीत आहे

१) अध्यक्ष आणि गैर कार्यकारी संचालक श्री. दिलिप डी. दांडेकर (डीआयएन: ००८४६९०१) यांना भत्यांद्वारे मानधन देणे.
२) उपाध्यक्ष आणि बिगर कार्यकारी संचालक श्री. श्रीराम श. दांडेकर (डीआयएन: ०१०५६३१८) यांना भत्यांद्वारे मानधन देणे.
३) श्री सतीश वीरप्पा (डीआयएन: ००५०७९५५), व्यवस्थापकीय संचालक यांना देय असलेल्या मानधनात सुधारणा.

पोस्टल बॅलट नोटीस https://www.kokuyocamlin.com या कंपनीच्या वेबसाइटवर,https://www.evoting.nsdl.com या नॅशनल सिक्यूरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या (''एनएसडीएल'') वेबसाइटवर आणि स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाइटवर जेथे कंपनीचे समन्याय भाग सूचिबद्ध आहेत म्हणजेच बीएसई लिमिटेड (''बीएसइ'') (www.bseindia.com) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या (''एनएसई'') (www.nseindia.com) वेबसाइट्सवर उपलब्ध आहे.

कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ (कोणत्याही वैधानिक दुरूस्ती(दुरूस्त्या) किंवा त्यातील पुनर्अधिनियम(मां) चा सध्या अंमलात असलेला समावेश) सह वाचलेल्या कंपनी कायदा, २०१३ (कायदा) च्या कलम १०८, ११० च्या तरतुदी तसेच इतर लागू तरतुदींच्या अनुपालनात, परिपत्रक क्रमांक १४/२०२० दिनांक ८ एप्रिल २०२०, परिपत्रक क्रमांक १७/२०२० दिनांक १३ एप्रिल, २०२० आणि या संबंधित दिलेले इतर संबंधित परिपत्रक, जे नुकतेच कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (यापुढे एकत्रितपणे ''एमसीए परिपत्रक'' म्हणून संबोधले जाईल) ने परिपत्रक क्रमांक ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर २०२५ ला दिले होते, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सूचीबद्ध बंधने आणि खुलासा आवश्यकता) नियमन, २०१५ (''सूचिबद्ध नियमन'') चे नियमन ४४, (कोणत्याही वैधानिक दुरूस्ती(दुरूस्त्या) किंवा त्यातील पुनर्अधिनियम(मां) चा सध्या अंमलात असलेला समावेश) आणि काही असल्यास, इतर लागू कायदे आणि नियमनाच्या अनुशंगाने, कंपनीने मंगळवार २४ फेब्रुवारी २०२६ यादिवशी पोस्टल मतपत्रिका (बॅलोट) सूचना केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ज्या सदस्यांचा ई-मेल पत्ता कंपनी / डिपॉझिटरीजमध्ये नोंदणीकृत आहे आणि ज्यांची नावे २० फेब्रुवारी २०२६ (''समाप्ती दिनांक'') रोजी कामकाज वेळेच्या समाप्तीपर्यंत कंपनी / डिपॉझिटरीजद्वारे ठेवलेल्या सदस्यांच्या नोंदणीमध्ये / लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये दिसतात त्यांनाच प्रसारित केली आहे. सदस्यांच्या संमती किंवा असहमतीचा संवाद केवळ ई-मतदान प्रणालीद्वारे होईल.

कंपनीने तिच्या सदस्यांना रिमोट ई-व्होटिंग सुविधेची तरतूद करण्याकरिता एनएसडीएलची सेवा नियुक्त केली आहे. रिमोट ई-व्होटिंग कालावधी बुधवार, २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी स. ०९.०० वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि गुरुवारी २६ मार्च, २०२६ रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे) संपेल. ई-व्होटिंग प्रणाली त्यानंतर एनएसडीलद्वारा नि:समर्थ करण्यात येईल. सदस्यांच्या मतदानाचा हक्क कट-ऑफ तारखेनुसार कंपनीच्या भरणा केलेल्या समन्याय भाग भांडवलाच्या प्रमाणशीर असेल व ते रिमोट ई-व्होटिंगद्वारा त्यांचे मतदान करण्यास हक्कदार असतील. केवळ तेच सदस्य ज्यांची नावे सदस्याच्या नोंदणीमध्ये/ लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये कट-ऑफ तारखेनुसार दिसतात. सदस्याद्वारा ठरावावर एकदा मतदान केल्यास, तद्नंतर त्याला/तिला ते बदलण्यास अनुमती दिली जाणार नाही. कट-ऑफ तारखेला सदस्य नसलेल्या कोणत्याही व्यक्तीने पोस्टल बॅलेट नोटीस केवळ माहितीच्या उद्देशाने हाताळली पाहिजे.

**भागधारक ज्यांचे ईमेल आयडीज युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्याकरिता नोंदणीकृत केलेले नाहीत याकरिता प्रक्रिया आणि या सूचनेमध्ये नमूद केलेल्या ठरावावर ई-व्होटिंगकरिता ई-मेल आयडीजची नोंदणी**

प्रत्यक्ष स्वरुपात असलेल्या भागांबाबत कृपया investorrelations@kokuyocamlin.com यावर ई-मेलद्वारा फोलिओ नं., भागधारकाचे नाव, भाग प्रमाणपत्राची स्कॅन्ड प्रत (पुढील व मागील बाजू), पॅन (पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), आधार (आधार कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत) इ. ची तरतूद करावी.

डिमॅट स्वरुपात असलेल्या भागांबाबत कृपया investorrelations@kokuyocamlin.com यावर ईमेलद्वारा डीपीआयडी सीएलआयडी (१६ डिजिट डीपीआयडी + सीएलआयडी किंवा १६ डिजिट बेनिफिशियरी आयडी), नाव, क्लाइंट मास्टर किंवा एकत्रीकृत खाते विवरणाची प्रत पॅन (पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), आधार (आधार कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), इ. ची तरतूद करावी.

असे स्पष्ट करण्यात येते की, ईमेल पत्त्याच्या कायमस्वरूपी नोंदणीकरिता, सदस्यांना तथापि विनंती करण्यात येते की, त्यांनी इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील भागांच्या बाबतीत त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सद्वारा डिपॉझिटरीकडे आणि प्रत्यक्ष स्वरुपातील भागांच्या बाबतीत कार्यपद्धतीचे अनुपालन करून कंपनीचे रजिस्ट्रार अॅण्ड शेयर ट्रान्सफर एजन्ट, मेसर्स एमयूएफजी इन्टाइम प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इन्टाइम प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) (युनिट: कोकुयो कॅम्लिन लिमिटेड), ईमेल: rnt.helpdesk@in.mpms.mufg.com टेली. नं. ०२२४९१८६००० / ८१०८११६७६७ यांच्याशी संपर्क साधावा.

ई-व्होटिंगसंबंधित तपशिलाकरिता कृपया पोस्टल बॅलट नोटीस पाहावी. कोणतीही शंका असल्यास, तुम्ही https://www.evoting.nsdl.com यावरील डाऊनलोड सेक्शनवर भागधारकांकरिता उपलब्ध असलेले ई-व्होटिंग युजर मॅन्युअल आणि भागधारकांकरिता असलेल्या फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन (एफएक्यू'ज) पाहू शकाल किंवा १८०० १०२० ९९० या टोल फ्री नंबर वर किंवा evoting@nsdl.co.in यावर विनंती पाठवू शकाल. जर इलेक्ट्रॉनिक, पणालीद्वारा मतदानाकरिता सुविधेसंबंधित कोणतीही तक्रार असल्यास, कृपया संपर्क साधा: श्री. संजीव यादव, उपव्यवस्थापक, एनएसडीएल, ईमेल: evoting@nsdl.co.in, टेलि: ०२२-४८८६ ७०००.

कंपनीच्या संचालक मंडळाने ई-व्होटिंग प्रक्रियेचे आयोजन स्वच्छ व पारदर्शक पद्धतीने होण्याकरिता परिनिरीक्षक म्हणून श्री. जे. एच. रानडे, भागीदार यांच्या अनुपस्थितीत श्री. सोहन जे. रानडे, भागीदार यांच्या अनुपस्थितीत श्रीमती तेजस्वी जोगल, मेसर्स जेएचआर अॅण्ड असोसिएट्सचे यांची नेमणूक केली आहे.

पोस्टल बॅलटचा निकाल २७ मार्च, २०२६ रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे) किंवा तत्पूर्वी घोषित करण्यात येणार आहे. परिनिरीक्षकाच्या अहवालासमवेत उक्त निकाल बीएसई www.bseindia.com व एनएसई www.nseindia.com कडे कळविण्यात येईल आणि https://www.kokuyocamlin.com या कंपनीच्या वेबसाइटवर तसेच www.evoting.nsdl.com या एनएसडीएलच्या वेबसाइटवरसुद्धा अपलोड करण्यात येणार आहे.

कोकुयो कॅम्लिन लिमिटेड करिता

स्थळ : मुंबई
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२६

विपुल भोय
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

(मूळ इंग्रजी मसुद्याचे हे भाषांतर असून सर्व विवादामध्ये मूळ इंग्रजी मुसदा प्रमाण मानण्यात येईल.)




**आजचा सामना**
श्रीलंका वि. न्यूझीलंड
वेळ : सायं. ७ वा.





थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १, २, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.



## हेटमायर तिसऱ्या स्थानावरील बहुमूल्य खेळाडू -होप

**मुंबई :** शिम्रोन हेटमायर सध्या सुरू असलेल्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत तिसऱ्या स्थानी संघासाठी बहुमूल्य खेळाडू ठरत आहे, असे वेस्ट इंडिजचा कर्णधार शाय होप म्हणाला. हेटमायरच्या ३४ चेंडूंतील ८५ धावांच्या खेळीमुळे विंडीजने 'अव्वल आठ' फेरीतील सामन्यात झिम्बाब्वेला १०७ धावांनी नमविले. "हेटमायर ज्या पद्धतीने फलंदाजी करीत आहे, त्याला पाहता इतके दिवस त्याची प्रतिभा वाया जात होती. तो कोणत्याही परिस्थितीत फलंदाजी करू शकतो. तिसऱ्या स्थानी तो संघासाठी बहुमूल्य खेळाडू ठरत आहे. या स्थानी तो मोकळेपणाने खेळतो. या स्पर्धेत संघासाठी महत्त्वपूर्ण खेळाडू ठरत आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत आम्ही त्याच्यावर ही जबाबदारी दिली होती. त्याने योग्य पद्धतीने ती पाडली आहे," असे होप म्हणाला.

# 'चेपॉक'ची खेळपट्टी फलंदाजांना पूरक?

## झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यासाठी भारतीय संघ व्यवस्थापन सतर्क

**एक्स्प्रेस वृत्त**

**चेन्नई :** ट्वेन्टी २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या 'अव्वल आठ' फेरीतील दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेला भारताचा पराभव अजूनही विसरता येत नाही. त्याचमुळे आता आव्हान राखण्यासाठी भारताला झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिज या दोन्ही सामन्यांत विजय आवश्यक असून, त्या दृष्टीने प्रयत्नांना सुरुवात झाली आहे. चेन्नईतील 'चेपॉक' मैदानाची खेळपट्टी यजमान भारताला साजेशी अशी मिळू शकते. त्यासाठी तीन खेळपट्टी तयार ठेवण्यात आल्या आहेत.

स्पर्धेपूर्वी सर्वोत्तम क्रिकेट खेळणाऱ्या भारताला स्पर्धेत मात्र खेळलेल्या एकाही केंद्रावर फलंदाजीची लय राखता आलेली नाही. आघाडीच्या फळीतील फलंदाजांच्या अपयशामुळे भारताच्या समस्यांमध्ये भर पडली आहे. घरच्या मैदानावर आपल्याचसाठी तयार करण्यात आलेल्या खेळपट्टींच्या स्वरूपाशी जुळवून घेण्यात भारताला कठीण गेले आहे. कर्णधार सूर्यकुमार यादव आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी स्पर्धेवर लक्ष ठेवून सुरुवातीपासून सपाट खेळपट्ट्यांवर खेळणे पसंत केले. मात्र, या खेळपट्ट्या त्यांच्या पसंतीस उतरलेल्या नाहीत.

या सगळ्या पार्श्वभूमीवर चेन्नईत भारताला त्यांना हवी तशी खेळपट्टी मिळू शकते अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. सामन्यासाठी एक लाल मातीची, तर दोन काळ्या मातीच्या अशा तीन खेळपट्ट्या तयार ठेवण्यात आल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. यातील कुठली खेळपट्टी वापरायची याचा निर्णय संघ व्यवस्थापन घेणार आहे.



### नेमकी कशी असेल खेळपट्टी

सामन्यासाठी तीन खेळपट्ट्या तयार असल्या तरी त्या नेमक्या कशा असतील हे कुणीच सांगू शकत नाही. दोन काळ्या मातीच्या खेळपट्ट्यांपैकी एका खेळपट्टीवर अजिबात गवत नाही, तर दुसरी हिरवीगार दिसून येत आहे. अशा खेळपट्ट्या या स्पर्धेत बहुतेक ठिकाणी दिसून आल्या. बॅट आणि चेंडू यांच्यात समान स्पर्धा व्हावी यासाठी खेळपट्टीवर थोड्या प्रमाणात गवत ठेवण्यात आले आहे. तिसरी खेळपट्टी मात्र पूर्ण लाल मातीची आहे. मात्र, खेळपट्टीचे स्वरुप आणि यजमान संघाचा फायदा यात आतापर्यंत कायम विरोधाभास दिसून आला आहे. मंगळवारच्या सरावानंतर खेळपट्टी लाल आणि काळ्या मातीची संमिश्र असेल असे बोलले जात आहे. यात नंतरचा म्हणजे काळी माती वर्चस्व गाजवेल अशी अपेक्षा आहे.

अर्थात, खेळपट्टी कुठलीही निवडली, तरी ती फलंदाजीसाठी अनुकूल असणार यात शंका नाही. 'चेपॉक' येथे सहा सामने खेळविण्यात आले होते. यात साखळी गटात प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघाने सर्वात कमी म्हणजे १७३ अशी धावसंख्या उभारली. दोनशे ही येथील सर्वाधिक धावसंख्या ठरली होती. पहिल्या सामन्यात अफगाणिस्तानचे १८३ धावांचे आव्हान न्यूझीलंडने तेरा चेंडू शिल्लक असतानाच पार केले. लाल मातीवर झालेल्या अखेरच्या सामन्यात अफगाणिस्तानने ४ बाद २०० धावा केल्या होत्या. येथील खेळपट्टीचा एक पैलू म्हणजे येथे चेंडू चांगला उसळी घेत आहे. आतापर्यंत ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये फिरकी गोलंदाजांसाठी आवडते असलेले हे मैदान चार वर्षांपासून मात्र चांगले बदलले आहे. आता येथे १८० ते २०० धावा सामान्य झाल्या आहेत.

**खेळपट्टीच्या स्वरूपाचा ताण**

आतापर्यंत खेळपट्टीच्या स्वरूपाशी जुळवून घेण्यात अपयश आल्यामुळे भारताने आपले अधिक लक्ष खेळपट्टीच्या स्वरूपावर केंद्रित केले आहे. मुंबईत अमेरिकेविरुद्धच्या पहिल्या सामन्यापासून भारताला त्यांच्या पसंतीची खेळपट्टी मिळालेली नाही. दिल्ली आणि अहमदाबाद येथे भारताने अखेरचे दोन सामने खेळले आहेत. तेथील खेळपट्ट्या या धिम्या होत्या. विशेष म्हणजे भारताने अशा वेळी अद्याप अजून आपला दुसरा पर्याय वापरलेला नाही. 'अव्वल आठ' मधील भारताचा अखेरचा सामना ईडन गार्डन्सवर आहे. जेथे सहसा यजमानांच्या पसंतीनुसार खेळपट्ट्या तयार केल्या जात नाहीत. याचाच अर्थ की भारताला आता परिस्थितीवर मात करावी लागणार आहे.

आता झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्याकडेच पाहायचे झाले, तर भारतीय संघ त्यांच्या रणनीतीचा पुनर्विचार करत असल्याचे समजते. प्रमुख तीन फलंदाज डावखुरे असल्यामुळे प्रतिस्पर्धी संघ ऑफ स्पिन गोलंदाज खेळविण्याचे नियोजन करत आहे. संघ व्यवस्थापन हे नियोजन मोडणार की नाही हे अजून गुलदस्त्यात आहे. मक्तेदारी मोडण्यासाठी संजू सॅमसनला सलामीला पसंती मिळू शकते.

झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिज दोन्ही संघांत ऑफ स्पिनर आहेत आणि भारतीय संघ आता अशा वळणावर आहे की जिथे त्यांना आघाडीच्या फळीला फलंदाजीत आलेले अपयश विसरून चालणार नाही. सरावाला सोमवारी एका दिवसाची सुट्टी देण्यात आली असली, तरी मंगळवारपासून संघ व्यवस्थापन उर्वरित दोन सामन्यांसाठी पूर्ण संतुलित आणि सर्व परिस्थितींना तोंड देणारा संघ निवडण्याचा विचार करेल.

### वॉशिंग्टनसह अक्षरला संधी?

दक्षिण आफ्रिका संघात चार डावखुरे फलंदाज असल्यामुळे ऑफ स्पिनर वॉशिंग्टन सुंदरला खेळविण्याचा निर्णय भारताने घेतला होता. त्यासाठी अक्षर पटेलला वगळण्यात आले. मात्र, हा निर्णय चांगलाच महागात आणि नंतर टिकेचा ठरला. आता झिम्बाब्वेविरुद्ध अक्षरला संधी मिळणार हे जवळपास निश्चित समजले जात आहे. त्याने नेटमध्ये जोरदार सराव देखील केला. मात्र, वडिलांच्या आजारपणामुळे रिंकू सिंहला मायदेशी परतावे लागल्यामुळे संघातील एक जागा मोकळी आहे. अक्षर पटेलला तर संधी मिळेलच, पण वॉशिंग्टनचेही स्थान कायम राहू शकते अशी सध्याची स्थिती आहे.

# इंग्लंड उपांत्य फेरीत

## पाकिस्तानवर दोन गडी राखून मात; ब्रूकची निर्णायक शतकी खेळी

**वृत्तसंस्था, पालेकेले**




**कर्णधार हॅरी** ब्रूकच्या (५१ चेंडूंत १०० धावा) निर्णायक शतकी खेळीच्या जोरावर इंग्लंडने 'आयसीसी' ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेतील चुरशीच्या झालेल्या 'अव्वल आठ' फेरीतील सामन्यात पाकिस्तानवर दोन गडी व पाच चेंडू राखून विजय मिळवला. या विजयामुळे त्यांनी उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले.

चांगल्या लयीत असलेल्या साहिबझादा फरहानच्या (६३) अर्धशतकामुळे पाकिस्तानने ९ बाद १६४ धावसंख्या उभारली. यानंतर ब्रूकने ट्वेन्टी-२० आंतरराष्ट्रीय मधील आपल्या पहिल्या शतकामुळे इंग्लंडला ८ बाद १६६ धावांपर्यंत पोहोचवत विजय मिळवून दिला. ब्रूकने 'पॉवरप्ले'मध्ये तीन आणि नंतर ५८ धावांत चार गडी गमावून देखील पाचव्या गड्यासाठी सॅम करनसह (१५ चेंडूंत १६) २८ चेंडूंत ४५ आणि विल जॅक्ससह (२३ चेंडूंत २८) सहाव्या गड्यासाठी ३१ चेंडूंत ५२ धावा करीत संघाचा विजय साकारला. पाकिस्तानकडून शाहीन शाह आफ्रिदी (४/३०) याने चांगली गोलंदाजी केली. त्याला मोहम्मद नवाझ (२/२६) आणि उस्मान तारिक (२/३१) यांची साथ मिळाली. मात्र, संघाला विजय मिळवून देण्यात त्यांना अपयश आले. आफ्रिदीने सुरुवातीला फिल सॉल्ट (०) व जोस बटलर (२) यांना बाद केले. आफ्रिदीच्या चेंडूवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात जेकब बेथल (८) देखील माघारी परतल्याने इंग्लंडचा संघ ३ बाद ३५ असा अडचणीत सापडला. आठव्या षटकात तारिकने टॉम बँटमला (२) बाद केल्याने ब्रूकवर धावा करण्यासाठी दबाव वाढला. यानंतर ब्रूकला जॅक्स व करन यांची साथ मिळाल्याने संघाचा विजय सोपा झाला. इंग्लंडला अखेरच्या तीन षटकांत दहा धावा हव्या होत्या. नवाझने १९व्या षटकांत दोन फलंदाज बाद करीत सामन्यात चुरस निर्माण केली. मात्र, जोफ्रा आर्चरने अखेरच्या षटकात चौकार लगावर उपांत्य फेरीतील संघाचे स्थान निश्चित केले. ब्रूकने आपल्या खेळीत १० चौकार व चार षटकारांची आतषबाजी केली.

त्यापूर्वी, फरहानने आपल्या खेळीत सात चौकार व दोन षटकारांसह संघाला समाधानकारक धावसंख्या उभारुन दिली. त्याला बाबर आझम (२५), फखर झमान (२५) आणि शादाब खान (२३) यांची साथ मिळाली. पाकिस्तानची सुरुवातही चांगली झाली नव्हती. संघ एकवेळ ३ बाद ७३ असा अडचणीत होता. मात्र, फरहानने संघाची एक बाजू सांभाळली. इंग्लंडकडून लिआम डॉसन (३/२४), जोफ्रा आर्चर (२/३२) व जेमी ओव्हर्टन (२/२६) यांनी चांगली गोलंदाजी केली.

### संक्षिप्त धावफलक

**पाकिस्तान :** २० षटकांत ९ बाद १६४ (साहिबझादा फरहान ६३, बाबर आझम २५; लिआम डॉसन ३/२४, जोफ्रा आर्चर २/३२, जेमी ओव्हर्टन २/२६) **पराभूत वि.**
**इंग्लंड :** १९.१ षटकांत ८ बाद १६६ (हॅरी ब्रूक १००, विल जॅक्स २८; शाहीन शाह आफ्रिदी ४/३०, मोहम्मद नवाझ २/२६)
**सामनावीर :** हॅरी ब्रूक.

**५** इंग्लंड संघ २०१६ ते २०२६ या कालावधीत ट्वेन्टी २० विश्वचषक स्पर्धेत सलग पाचव्यांदा उपांत्य फेरीत

**१** ट्वेन्टी २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत शतकी खेळी करणारा हॅरी ब्रूक एकमेव कर्णधार. ब्रूकचे ट्वेन्टी २० क्रिकेटमधील देखिल पहिलीच शतकी खेळी

**४** ट्वेन्टी २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आव्हानाचा पाठलाग करताना शतक ठोकणारा ब्रूक चौथा फलंदाज.

# श्रीलंकेला विजय अनिवार्य

## 'अव्वल आठ' फेरीत आज न्यूझीलंडचे आव्हान

**कोलंबो :** श्रीलंकेला ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेतील आपले आव्हान कायम राखायचे झाल्यास त्यांना आज, बुधवारी होणाऱ्या न्यूझीलंडविरुद्धच्या 'अव्वल आठ' फेरीतील सामन्यात विजय मिळवणे अनिवार्य असेल. यासाठी त्यांना आपल्या फलंदाजीत सुधारणा करणे आवश्यक आहे.

पालेकेले येथील धिम्या खेळपट्टीवर इंग्लंडविरुद्ध श्रीलंकेच्या फलंदाजांचा फिरकीपुढे निभाव लागला नाही आणि १४७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना त्यांना पराभूत व्हावे लागले. श्रीलंकेतील खेळपट्ट्या या सहयजमान भारताच्या खेळपट्ट्यांच्या तुलनेने खेळण्यास कठीण आहेत. प्रेमदासा येथील खेळपट्टीवरदेखील फिरकीपटूंना मदत मिळणे अपेक्षित आहे. येथील सीमारेषा मोठ्या असल्याने षटकार लगावणे सोपे नाही. 'अव्वल आठ' फेरीतील पहिल्या सामन्यात मिळालेल्या पराभवानंतर फलंदाजांनी खेळलेल्या फटक्यांवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्यामुळे त्यांना या लढतीत उतरण्यापूर्वी चुकांवर काम केले पाहिजे.



"हा एक ट्वेन्टी-२० सामना आहे. त्यामुळे साहजिकच अधिकाधिक धावा करण्याचा फलंदाजांचा प्रयत्न असतो. मात्र, चेंडू योग्य पद्धतीने न आल्यास वेगाने धावा करणे आव्हानात्मक असते," असे श्रीलंकेचे फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड यांनी सांगितले. पथुम निसांकाने श्रीलंकेकडून चांगली फलंदाजी केली आहे. तर, डावखुरा फिरकीपटू दुनिथ वेल्लालागेने आपल्या गोलंदाजीने प्रभावित केले आहे. दुसरीकडे, प्रेमादासा स्टेडियम येथील सामना पावसामुळे रद्द झाल्यानंतर न्यूझीलंडला पाकिस्तानसह गुण विभागून घ्यावा लागला. या सामन्यात पावसाची शक्यता नसून दोन्ही संघांचा प्रयत्न 'अव्वल आठ' फेरीत पहिला विजय नोंदविण्याचा असेल.

● **वेळ** : सायं. ७ वा.

# पुंडीरचे नाबाद शतक

## जम्मू-काश्मीरच्या पहिल्या दिवसअखेर २ बाद २८४ धावा

**पीटीआय, हुबळी**

**नयनरम्य निसर्ग** आणि बर्फाच्छादित डोंगराळ भागातील उत्कट प्रतिभेने रणजी चषकाच्या अंतिम सामन्यात पहिल्याच दिवशी अनुभवाला आव्हान दिले. शुभम पुंडीर (नाबाद ११७), यावर हसन (८८) आणि अब्दुल समद (नाबाद ५२) यांच्या दमदार फलंदाजीच्या जोरावर जम्मू काश्मीरने कर्नाटकविरुद्ध पहिल्या दिवसअखेर २ बाद २८४ अशी आश्वासक सुरुवात केली. प्रथम फलंदाजी करताना शुभम पुंडीरच्या नाबाद शतकी खेळीबरोबर त्याला यावर आणि समद यांच्याकडून मिळालेली साथ उचित होती. कर्णधार पारस डोग्रा निवृत्त झाल्यानंतर पुंडीर आणि समद यांनी तिसऱ्या गड्यासाठी १०५ धावांची अभेद्य भागीदारी केली.

नाणेफेक जिंकल्यानंतर जम्मू काश्मीरचा कर्णधार पारस डोग्राने अपेक्षित प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, त्यांची सुरुवात निराशाजनक राहिली. कामरान इक्बाल (६) वेगवान गोलंदाज प्रसिध कृष्णाच्या गोलंदाजीवर स्लिपमध्ये राहुलकडे झेल देऊन बाद झाला. पण, नंतर पुंडीर आणि यावर जोडीने कर्नाटकच्या गोलंदाजांना निराश केले. खेळपट्टीवर खेळणे एका क्षणी कठीण जात होते. फलंदाजांकडून चुकादेखील झाल्या. अनेकदा चेंडूने बॅटची कड घेतली.



कर्नाटकच्या अनुभवी गोलंदाजीसमोर यावर आणि पुंडीर फारसे प्रवाही नव्हते. पण, तरीही त्यांच्या फलंदाजीचा प्रभाव पडला. संथ फलंदाजी करत त्यांनी जम्मू काश्मीरला चांगली सुरुवात दिली होती. फिरकी गोलंदाज श्रेयस गोपालचा या जोडीने केलेला सामनाही लक्षवेधक ठरला. श्रेयसला लय मिळवू न देणे हेच एकमेव उद्दिष्ट या जोडीचे होते आणि ते त्याच दृढनिश्चयाने खेळले. या जोडीने दुसऱ्या गड्यासाठी १३९ धावांची भागीदारी केली. प्रसिधच्या गोलंदाजीवर स्लिपमध्ये राहुलनेच यावरचा झेल घेतला. यावरने आपल्या खेळीत १५० चेंडूंचा सामना करताना १३ चौकार ठोकले. त्यानंतर कर्णधार पारसला जायबंदी झाल्याने मैदान सोडावे लागले. प्रसिधचा एक उसळता चेंडू त्याच्या मानेवर आदळला. फॉरवर्ड शॉर्टलेगवर झेल घेतल्याचे अपीलही झाले. पण, फलंदाज म्हणून तो सुरक्षित होता. मात्र, दुखापतीमुळे त्याला मैदान सोडावे लागले. या दुर्दैवी क्षणानंतर मैदानावर तळ ठोकून असलेल्या पुंडीरला अब्दुल समदने सुरेख साथ दिली. पुंडीरने २२१ चेंडू खेळल्यानंतर १२ चौकार, २ षटकारांसह शतक साजरे केले. समदनेही अर्धशतक साजरे करत दिवसअखेरीस जम्मू काश्मीरचे आणखी नुकसान होऊ दिले नाही.

## संघर्षानंतरही भारताचा आणखी एक पराभव

**होबार्ट :** 'एफआयएच' प्रो हॉकी लीगच्या ऑस्ट्रेलियातील दुसऱ्या टप्प्यात सलग दुसऱ्या सामन्यात भारतीय पुरुष हॉकी संघाने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. आवश्यक तो संघर्ष केला. मात्र, अखेरीस भारतीय संघाला आणखी एका पराभवाचा सामना करावा लागला. स्पेनविरुद्ध मंगळवारी झालेल्या परतीच्या सामन्यात नियोजित वेळेतील १-१ अशा बरोबरीनंतर भारताला शूटआऊटध्ये ३-४ असा पराभव स्वीकारावा लागला.

स्पेनने सामन्याला वेगवान सुरुवात करून देताना आठव्याच मिनिटाला गोल नोंदवला. मात्र, जोस बस्टनचा हा गोल रद्द ठरविण्यात आला. अखेर १९व्या मिनिटाला कर्णधार हार्दिक सिंगची एक चाल मनिंदरने यशस्वी करत भारताला आघाडी मिळवून दिली. सामन्याच्या ५९व्या मिनिटापर्यंत भारताने आघाडी टिकवून ठेवली होती. मात्र, भारताच्या बचावातील त्रुटीचा या वेळी फॉन्टने अचूक उठवला आणि सुरेख मैदानी गोल करत स्पेनला बरोबरी साधून दिली.

# ऑस्ट्रेलियाकडून मूनी, हिलीची चमक

**ब्रिस्बेन :** ॲश्ले गार्डनरच्या (३/३३) प्रभावी गोलंदाजीनंतर बेथ मूनी (७६) आणि कर्णधार अलिसा हिली (५०) यांच्या अर्धशतकांच्या जोरावर ऑस्ट्रेलिया महिला संघाने पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारतावर सहा गडी व ७० चेंडू शिल्लक ठेवत विजय साकारला. या कामगिरीनंतर तीन सामन्यांच्या मालिकेत ऑस्ट्रेलियाने १-० अशी आघाडी घेतली.

एकदिवसीय प्रारूपातील विश्वविजेत्या भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, कर्णधार हरमनप्रीत कौर (८४ चेंडूंत ५३) आणि उपकर्णधार स्मृती मनधानाच्या (६८ चेंडूंत ५८) अर्धशतकानंतरही संघाला ४८.३ षटकांत २१४ धावाच करता आल्या. ऑस्ट्रेलियाला आव्हानाचा पाठलाग करताना फारशी अडचण झाली नाही. त्यांनी ३८.२ षटकांतच ४ फलंदाजांच्या मोबदल्यात २१७ धावा केल्या. हिलीने संघाला चांगली सुरुवात करून दिली. यानंतर मूनी आणि



ॲनाबेल सदरलँडने (४४ चेंडूंत नाबाद ४८ धावा) चौथ्या गड्यासाठी ८५ धावांची भागीदारी करीत ऑस्ट्रेलियाचा विजय सुनिश्चित केला. हिली व फोबे लिचफील्ड (३२) यांनी पहिल्या गड्यासाठी ५५ धावांची भागीदारी केली. श्री चरणीने (२/४१) लिचफील्डला बाद केले. यानंतर जॉर्जिया वोलही (०) माघारी परतली. हिलीने मग मूनीसह तिसऱ्या गड्यासाठी ६४ धावा जोडल्या. क्रांती गौडने हिलीला बाद केले. यानंतर मूनीने जबाबदारीने खेळ केला. आपल्या अर्धशतकी खेळीदरम्यान एकदिवसीय क्रिकेटमध्ये तीन हजार धावांचा टप्पा गाठला. दोन्ही संघांतील दुसरा एकदिवसीय सामना शुक्रवारी होबार्ट येथे होईल.

### तेंडुलकरला बाद दिल्याच्या निर्णयाचा पंच बकनर यांना बावीस वर्षांनी पश्चात्ताप

# होय! माझा तो निर्णय चुकीचा

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेटमधील अलौकिक खेळाडू सचिन तेंडुलकरला पायचित ठरविण्याचा तो निर्णय चुकीचा होता अशी उपरती तो निर्णय देणारे पंच स्टीव्ह बकनर यांना तब्बल बावीस वर्षांनी झाली. दोन दशकांहून अधिक काळ जागतिक क्रिकेटमधील आदरणीय पंच म्हणून बकनर यांची ओळख होती. ते २००९ मध्ये निवृत्त झाले.

आता वेस्ट इंडिज क्रिकेट पंच संघटनेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. यातील एक आठवणही तेंडलकरला बाद देण्याच्या निर्णयाविषयी होती. आयुष्यातील सर्वात कठीण निर्णय कुठला असे या वेळी त्यांना विचारले




असताना त्यांनी ब्रिस्बेनच्या मैदानावर २२ वर्षांपूर्वी झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी सामन्यात तेंडुलकरला पायचित देण्याचा निर्णय सर्वात कठीण होता असे सांगितले.

या निर्णयाविषयी आजही बोलले जाते. तो निर्णय म्हणजे माझी चूक होती. मी त्याला का बाद दिले? तो बाद कसा? वगैरे प्रश्न त्यानंतर उपस्थित झाले. पण, आयुष्यात माणसाकडून चुका होतच राहतात आणि मी ती चूक स्वीकारली आणि पुढे चालू राहिलो, असे बकनर म्हणाले.

तेव्हा जेसन गिलेस्पीचा चेंडू पॅडच्या वर लागला होता. बकनर यांना ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी केलेली अपील पटली आणि त्यांनी त्याला बाद ठरवले. मात्र, पुन्हा पाहिल्यानंतर चेंडू यष्ट्यांच्या वरून जात होता असे स्पष्ट दिसून आले. समालोचन करणाऱ्या टोनी ग्रेगसह प्रत्येकाने हा निर्णय भयानक असल्याचे सांगितले.

बकनर यांनी तेंडुलकरला चुकीच्या पद्धतीने बाद देण्याची ही काही एकमेव घटना नाही. ईडन गार्डन्सवर २००५ मध्ये पाकिस्तानविरुद्ध काहीच जणांनी अपील केल्यानंतरही तेंडुलकरला यष्टिरक्षकाकरवी झेलबाद ठरवले होते. यानंतर बॅट आणि चेंडूंमध्ये बरेच अंतर असल्याचे दिसून आले होते.

**तेंडुलकरचे मिश्कील उत्तर**

सचिन तेंडुलकरला २०२४ मध्ये एका मुलाखतीत पंच बकनर यांच्याशी असलेल्या नात्याविषयी विचारण्यात आले. मी फलंदाजी करताना बकनर यांना बॉक्सिंग ग्लोव्ह्ज घालायला द्यावेत, जेणेकरुन तो बाद असल्याची खूण करू शकणार नाही, अशी मिश्कील टिप्पणी तेंडुलकरने तेव्हा केली होती.

# गुकेशच्या कामगिरीकडे लक्ष

**प्राग :** जगज्जेता दोम्माराजू गुकेश प्राग आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत वर्षातील आपले पहिले जेतेपद मिळविण्याचा प्रयत्न करेल. विश्वचषक आणि टाटा स्टील मास्टर्स स्पर्धेत गुकेशला प्रभावी कामगिरी करता आली नव्हती.

दुसऱ्या मानांकित गुकेशला अग्रमानांकित व्हिन्सेंट केमर आणि उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोवचे आव्हान असेल. हे दोन्ही खेळाडू सध्या चांगल्या लयीत आहेत. केमर 'लाइव्ह रेटिंग'मध्ये चौथ्या, तर नोदिरबेक पाचव्या स्थानी आहे. गुकेश दहाव्या स्थानी आहे. गेल्या काही काळापर्यंत या रेटिंगच्या अव्वल दहामध्ये भारताचे तीन खेळाडू असायचे. मात्र, अर्जुन एरिगेसी आणि आर. प्रज्ञानंद यांची कामगिरी खालावल्याने त्यांची



घसरण झाली.

गुकेश अरविंद चिदंबरमसह आपले आव्हान उपस्थित करेल. गुकेशप्रमाणेच हान्स नीमनकडेही सर्वांचे लक्ष असेल. इराणचा परहम मघसूदलू आणि नेदरलँड्सचा जॉर्डन व्हॅन फॉरेस्ट हेदेखील स्पर्धेत सहभागी होणार आहेत. भारताच्या चिदंबरमसमोर आपली कामगिरी सुधारण्याचे आव्हान असेल. उझबेकिस्तानचा नोदिरबेक याकुबोएव्ह, स्पेनचा डेव्हिड गुज्जारो आणि स्थानिक खेळाडू डेव्हिड नवारा हे अव्वल दहा खेळाडूंमध्ये सहभागी आहेत. चॅलेंजर्स गटात सूर्य शेखर गांगुली आणि महिला विश्वचषक विजेती दिव्या देशमुख भारताचे आव्हान उपस्थित करतील.




हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
**महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. नं. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ खांडेकर*** (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.

बुधवार,
२५ फेब्रुवारी २०२६

# लोकसत्ता [मुंबई]

LOKSATTA.COM, FACEBOOK.COM/LOKSATTALIVE लोकमान्य, लोकशक्ती! TWITTER.COM/LOKSATTALIVE, LOKSATTA.COM/APPS

## अंतरंग

### मेट्रोला अर्थबळ

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) ३३७ किमीहून अधिक लांबीचे मेट्रोचे जाळे विणले जात आहे. या प्रकल्पातील काही मार्गिकांची कामे सध्या सुरू आहेत. निर्माणाधीन मेट्रो मार्गिकांसाठी दुय्यम कर्जाच्या रूपाने राज्य सरकारने एमएमआरडीएला ३४८ कोटी रुपये निधी दिला आहे. १० मेट्रो मार्गिकांसाठी हा निधी देण्यात आला आहे. वृत्त...४

### केईएममध्ये 'माँ' आयव्हीएफ केंद्र

**मुंबई :** केईएम रुग्णालयामध्ये जागतिक दर्जाचे 'माँ' आयव्हीएफ केंद्र सुरू करण्यात आले आहे. ही सुविधा सर्वसामान्य नागरिकांना परवडेल अशा माफक दरात उपलब्ध व्हावी, असे मत सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केले. केईएम रुग्णालयात अत्याधुनिक 'आयव्हीएफ' केंद्राचे उद्घाटन आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. वृत्त...४

### मेट्रो १३ मार्गिकेचा मार्ग मोकळा

**मुंबई :** मेट्रो १३ मार्गिकेच्या सुधारित संरेखनास व सुधारित आराखड्यास एमएमआरडीए बैठकीत मान्यता देण्यात आली. 'दहिसर ते मिरा-भाईंदर मेट्रो ९' मार्गिकेचा विस्तार मिरा-भाईंदर ते वसई-विरार असा केला जाईल वृत्त...४

### माथाडी कामगारांचा १ मार्चपासून 'कामबंद'चा इशारा

**नवी मुंबई :** तुर्भे येथील एपीएमसी कांदा-बटाटा मार्केटमध्ये ५० किलोपेक्षा जादा वजनाच्या पोत्यांची आवक सुरूच असल्याचा आरोप करत माथाडी कामगार संघटनेने १ मार्च २०२६ पासून कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शासनाने निश्चित केलेली ५० किलो वजनमर्यादा काटेकोरपणे पाळावी आणि कामगारांच्या मूळ मजुरी दरात वाढ करावी, या मागण्यांसाठी संघटनेने व्यापाऱ्यांना पत्र दिले आहे.

शासनाच्या आदेशानुसार कोणत्याही मालाच्या पोत्यांचे वजन ५० किलोपर्यंत ठेवणे बंधनकारक आहे. जादा वजनामुळे कामगारांच्या गुडघे, मणके आणि शरीराच्या इतर भागांवर ताण येऊन आरोग्यावर परिणाम होत असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. ६० ते ७० किलो वजनाची पोती बाजारात येत असल्याच्या तक्रारी संघटनेकडे येत असल्याचे नमूद केले आहे.

# सोने, चांदी की तांबे? बदलत्या अर्थचक्रातील गुंतवणुकीचा 'भविष्यवेध'

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई: एकीकडे** सोन्याची झळाळी कायम असताना, तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे चांदी आणि तांब्यासारख्या धातूला सोन्याचे मोल प्राप्त होत आहे. तरी या धातूंच्या किमतीत वाढ-घसरणीचे बदलणारे समीकरण नेमके काय? परंपरेने दागिन्यांचा की डिजिटल गुंतवणुकीचा नवा मार्ग अनुसरायचा? शेअर बाजार, म्युच्युअल फंड आणि बँक ठेवींच्या तुलनेत या धातूंचा परतावा किती? या सर्व प्रश्नांचा वेध घेणारे 'लोकसत्ता अर्थभान'चे विशेष सत्र मुलुंडमध्ये येत्या शनिवारी सायंकाळी होत आहे.

गुंतवणूक साक्षरतेचा जागर म्हणून होत असलेल्या या कार्यक्रमात तज्ज्ञांकडून गुंतवणुकीचा कानमंत्र दिला जाणार आहे. हे 'लोकसत्ता अर्थभान'चे सत्र शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६, सायंकाळी ६.०० वाजता, महाराष्ट्र सेवा संघ सभागृह, पं. जवाहरलाल नेहरू मार्ग, अपना बाजारच्या वर, मुलुंड (प.) येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे 'आदित्य बिर्ला सन लाइफ मुच्युअल फंड' मुख्य प्रायोजक आहेत. या ठिकाणी सोने-चांदी, म्युच्युअल फंड आणि इतर गुंतवणुकांबाबत नियोजनाविषयीची दिशा उपस्थितांना ठरेल. शिवाय आपले प्रश्न व शंका तज्ज्ञांना वाचून, त्यांचे निरसन करता येईल.

मौल्यवान धातूंच्या किमतीतील चढ-उताराची जोखीम की शेअर बाजाराचे भीतीदायी हेलकावे या चक्रात आपला पैसा नेमका कुठे वळवायचा, हे ठरविता यायला हवे. शिवाय कोणत्या धातूत आणि कशी गुंतवणूक करावी? याबद्दल वस्तू बाजाराचे विश्लेषक श्रीकांत कुवळेकर हे या कार्यक्रमात मार्गदर्शन करतील. याच परिसंवादात, 'सेबी नोंदणीकृत आर्थिक नियोजनकार' प्रीती झेंडे या 'गुंतवणुकीद्वारे अर्थनियोजन' या विषयाद्वारे जीवनाच्या विविध टप्प्यांत अनुसरायचे गुंतवणुकीचे मार्ग सांगतील. थोड्या थोडक्या बचतीतून इच्छित संपत्ती निर्माण शक्य आहे. पारंपरिक बँक ठेवींव्यतिरिक्त, म्युच्युअल फंड, शेअर बाजारात गुंतवणुकीच्या वाटा त्या समजावून सांगतील. केवळ नफा नाही, तर गुंतवणुकीची नवी दृष्टी देणारा हा परिसंवाद सर्वांसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल.

कार्यक्रमास प्रवेश सर्वांसाठी खुला व निःशुल्क असून, प्रथम येणाऱ्यास, प्रथम प्राधान्य असेल.

Aditya Birla Sun Life Mutual Fund
ADITYA BIRLA CAPITAL
प्रस्तुत
लोकसत्ता अर्थभान

- **सोने-चांदी नव्हे सुरक्षित ढाल!**
  श्रीकांत कुवळेकर
  (वस्तू बाजाराचे विश्लेषक)
- **गुंतवणुकीद्वारे अर्थनियोजन**
  प्रीती झेंडे (सेबी नोंदणीकृत आर्थिक नियोजनकार)

- **कुठेः** महाराष्ट्र सेवा संघ सभागृह, पं. जवाहरलाल नेहरू मार्ग, अपना बाजारच्या वर, मुलुंड (प.)
- **कधी :** शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६, सायंकाळी ६.०० वाजता

**इच्छुकांनी नाव नोंदणीसाठी -** ९९२००९९९४३, (०२२) ६७४४०३९०, (०२२) ६७४४०२७५ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

अस्वीकरणः म्युच्युअल फंड गुंतवणूक ही बाजारातील जोखमींच्या अधीन आहे, योजनांसंबंधित सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा.

## कॉल सेंटरवर कारवाई

**पालघर :** आंतरराष्ट्रीय स्तरावर फसवणूक करणाऱ्या अनधिकृत कॉल सेंटरवर पालघर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली. या प्रकरणी पाच जणांना अटक केली. पालघर पश्चिमेला माहीम रोडवरील फियां एकांत इमारतीत हे कॉलसेंटर चालवले जात होते. आरोपी अमेरिकन नागरिकांचे नाव व नंबर मिळवून त्यांना मायक्रोसॉफ्ट वा ॲपल कंपनीचे प्रतिनिधी असल्याचे सांगितले जात होते. मोबाइल हॅक झाल्याची भीती त्यांच्याकडून ५०० ते ४००० अमेरिकन डॉलर उकळले जात होते.

# मालमत्ता कराचे उद्दिष्ट अद्याप दूरच

## आतापर्यंत ७७ टक्के वसुली पूर्ण

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** आर्थिक वर्ष संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक असून आजवर मुंबई महानगरपालिकेच्या करनिर्धारण व संकलक विभागाने ५,६८७ कोटी रुपये मालमत्ता कर वसूल केला आहे. एकूण उद्दिष्टाच्या ७७ टक्के वसुली पूर्ण झाली आहे. ते गाठण्यास अजून १,६५४ कोटी रुपयांची तूट आहे. एकूण उद्दिष्टाच्या ७७ टक्के करवसुली करण्यात पालिका प्रशासनाला यश आले आहे. तर मालमत्ता कराची अनेक वर्षांची एकूण थकबाकी २२ हजार कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

मालमत्ता कर हा मुंबई महापालिकेचा एक महत्त्वाचा उत्पन्नाचा स्रोत आहे. जकात रद्द झाल्यानंतर पालिकेकडे मालमत्ता कर आणि विकास नियोजन हे दोन महत्त्वाचे उत्पन्नाचे स्रोत उरले आहेत. तसेच जकातीपोटी नुकसान भरपाईतूनही पालिकेला उत्पन्न मिळत असते. मालमत्ता करातून दरवर्षी पालिकेला सुमारे सहा हजार कोटी रुपये उत्पन्न मिळत असते. यंदा पालिकेच्या करनिर्धारण विभागाने मालमत्ता कर वसुलीसाठी मोठी मोहीम हाती घेतली असून त्याला चांगले यश आले आहे. अनेक वर्षे मालमत्ता कर थकवणाऱ्या मालमत्ताधारकांना नोटीसा बजावणे, त्यांच्या स्थावर मालमत्तांचा लिलाव करण्यासाठी नोटीसा बजावणे अशी कठोर पावले उचलली जात आहेत. चालू वर्षाचा मालमत्ता कर भरण्यासाठी अद्याप एक महिन्याचा अवधी असून अनेक मालमत्ताधारक शेवटच्या दिवसापर्यंत म्हणजेच ३० मार्चपर्यंत करभरणा करतात. त्यामुळे मालमत्ता कर वसुलीच्या उद्दिष्टातील ही तूट भरून निघेल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

### गेल्या काही वर्षांतील मालमत्ता करातील उत्पन्न



| वर्ष | उत्पन्न |
|---|---|
| २०२१-२२ | ५७९१ कोटी |
| २०२२-२३ | ५५७५ कोटी |
| २०२३-२४ | ४८५९ कोटी |
| २०२४-२५ | ६१९८ कोटी |
| २०२५-२६ | ५६८७ कोटी (२४ फेब्रुवारीपर्यंत) |

**७७.२०** टक्के करवसुली

**१,६५४** कोटी रुपयांची तूट

**२२,०००** कोटी रुपयांची थकबाकी

आतापर्यंत ५,६८७ कोटी मालमत्ता कर वसूल केल्याची माहिती उपायुक्त विश्वास शंकरवार यांनी दिली. थकबाकीदारांना नोटिसा, जप्ती, अटकावणी केली जात आहे, असेही ते म्हणाले.

### मालमत्ता कराच्या सुधारित उद्दिष्टात वाढ

पालिका प्रशासनाने चालू अर्थसंकल्प मांडताना मालमत्ता करातून ५२०० कोटी इतके उद्दीष्ट गृहीत धरले होते. मात्र हे उद्दीष्ट्य सुधारित करण्यात आले असून यंदा ७३४१ कोटींचे उद्दीष्ट्य ठरवण्यात आले आहे. चालू अर्थसंकल्पात सुधारणा करताना मालमत्ता कराच्या उद्दिष्ट्यात २१४१ कोटी रुपयांनी वाढ करण्यात आली आहे.

## बेस्ट ताफ्याचा विस्तार, मार्ग नियोजनाची गरज

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई महानगरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट करण्यासाठी बेस्टच्या ताफ्याचा विस्तार करावा, तसेच मार्गांचे योग्य प्रकारे नियोजन केले तर बेस्टची प्रवासी संख्या वाढू शकेल, असा महत्त्वाचा निष्कर्ष मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर स्थापन सात सदस्यीय समितीने अहवालात नोंदविला आहे. (पान ३वर)

### प्रदूषणकारी वाहनांवर जास्त कर

राज्य परिवहन विभागाला १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सादर केलेल्या अहवालात समितीने एमएमआरमध्ये सीएनजी पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याची गरज अधोरेखित केली आहे. यात इंधन भरणा केंद्रांची संख्या वाढवणे आणि पुरवठा साखळी सुनिश्चित करण्याचा समावेश आहे.

#### वरळीस्थित बीडीडी चाळ पुनर्विकास

# टॉवर-१ मधील वितरणाच्या सोडतीला स्थगिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** वरळी येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकासातील टॉवर क्रमांक १ मधील घरांच्या वितरणाच्या वादाची उच्च न्यायालयाने दखल घेतली. तसेच, याचिकाकर्त्या कुटुंबांसाठी काढण्यात येणाऱ्या सोडतीला स्थगिती दिली. त्याचप्रमाणे, याचिकेवर म्हाडाला म्हणणे मांडण्यासाठी एक आठवड्याची मुदत देताना याचिकाकर्त्या कुटुंबांच्या पात्रतेचा तपशील सादर करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.

या टॉवरमधील घरे आम्हाला मिळणे अपेक्षित होती. परंतु, राजकीय दबावाखाली ही घरे पोलिसांना दिल्याचा आरोप करून बीडीडी चाळ क्रमांक १२, १३, १४, १५, २१ व २९ मधील ३२९ कुटुंबीयांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठापीठापुढे या कुटुंबीयांच्या याचिकेवर सुनावणी झाली. त्यावेळी, न्यायालयाने याचिकेत उपस्थित मुद्यांची दखल घेतली आणि सोडतीला पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली.

तत्पूर्वी, २०२१ च्या आराखड्याप्रमाणे या ३२९ कुटुंबांना टॉवर १ मध्ये घरे मिळणार होती. मात्र २०२५ मध्ये म्हाडाने नवीन आराखडा सादर केला व या टॉवरमधील घरे पोलिसांना दिली. आता या ३२९ कुटुंबांना अन्य टॉवरमध्ये घरे दिली जाणार असून म्हाडाचा हा निर्णय बेकायदा असल्याचा दावा याचिकाकर्त्यांतर्फे वकील नंदकुमार बागवे यांनी युक्तिवाद करताना केला. तसेच, याचिकाकर्त्यांना २०२१ च्या आराखड्यानुसार टॉवर क्रमांक १ मध्येच घरे द्यावीत, अशी मागणीही त्यांनी केली. याचिकाकर्ते अजूनही बीडीडी चाळीतच राहत आहेत. म्हाडाकडून त्यांना घरे रिकामी करण्यास सांगितले जात आहे.

### याचिका नेमकी कोणी केली?

सुमारे दहा हजार घरांचा पुनर्विकास केला जाईल. यासाठी २०२१ मध्ये म्हाडाने आराखडा तयार केला. त्यात कोणत्या इमारतींतील रहिवाशांना कोणत्या टॉवरमध्ये घरे मिळेल, याचा तपशील नमूद करण्यात आला होता. या आराखड्यानुसार टॉवर क्रमांक ३ व ५ मध्ये पोलिसांना घरे दिली जाणार होती. मात्र, गेल्यावर्षी अचानक टॉवर १ मध्ये पोलिसांना घरे मिळणार असल्याचे म्हाडाने जाहीर केले व कोणतीही नोटीस न देता २०२१ चा आराखडा रद्द करण्यात आला.




# मैदानाच्या वादात आदित्य ठाकरेंची उडी

## सुशोभीकरणाच्या नावावर मैदानाचा व्यावसायिक वापर; नार्वेकर कुटुंबियांवर आरोप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कुलाब्यातील सबिना चंद्रशेखर मैदान (बॅक गार्डन) सुशोभीकरणाच्या मुद्द्यावरून चर्चेत आले आहे. सुशोभीकरणाच्या नावावर मैदानाची रचना बदलण्याचा घाट प्रशासनाने घातल्याचा आरोप स्थानिकांनी केला असतानाच आता आमदार आदित्य ठाकरे यांनीही या फुटबॉल मैदानाच्या वादात उडी घेतली आहे.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर व कुटुंबियांच्या दबावाखाली महापालिका प्रशासन काम करत असून बॅक गार्डनमध्ये काँक्रीटचे जंगल उभारण्याचा ते प्रयत्न करत आहेत, असा आरोप आदित्य यांनी केला. तसेच, मुंबईतील सर्व खेळाच्या मैदानांच्या लेखापरीक्षणाची मागणी त्यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे.

कुलाबा येथे फुटबॉल खेळाडूंसाठी कूपरेज व सबिना चंद्रशेखर (बॅक गार्डन) ही दोनच मैदाने आहेत. कूपरेज मैदानात सर्वसामान्यांना प्रवेश बंदी असून तेथे क्लबचे खेळाडू खेळण्यासाठी येतात. त्यामुळे सर्वसामान्य खेळाडूंना केवळ सबिना चंद्रशेखर मैदानात खेळता येते. मैदानाची देखभाल करणाऱ्या संस्थेला प्रशासनाने नुकतीच सुशोभीकरणाची परवानगी दिली असून त्याअंतर्गत उद्यानातील नैसर्गिक गवत काढून कृत्रिम गवत लावण्यात येणार आहे.

### 'बदल नकोत'

बॅक गार्डन जसे आहे तसेच ठेवावे. त्यात बदल करू नये. व्यावसायिक कारणांसाठी टर्फमध्ये रूपांतरित करण्यात आलेल्या खासगी संस्थांच्या ताब्यातील सर्व मैदानांचे लेखापरीक्षण करावे, अशी मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली.

तसेच, तेथे धावपट्टी तयार करण्याचाही संस्थेचा मानस आहे. मात्र, मैदानात संरचनात्मक बदल करण्यास स्थानिक व खेळाडूंकडून विरोध केला जात आहे. नागरिकांचा विरोध डावलून मैदानात शुक्रवारी बांधकाम झाल्यानंतर नागरिकांनी राहुल नार्वेकर यांच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच, काही वेळातच ते बांधकाम रोखण्यात आले. महापालिका आयुक्तांनाही नागरिकांनी घेराव घालून जाब विचारला. मात्र, त्यांना प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. त्यांनतर आता आदित्य यांनीही आयुक्तांना पत्र पाठवून याप्रकरणी भूमिका मांडली.

दशकभरापूर्वी कुलाब्यातील बॅक गार्डनमध्ये जलतरण तलाव उभारण्याच्या प्रस्तावाला विरोध करून ते मैदान वाचवले. त्यामुळे परिसरातील नागरिक व शाळांना या मैदानाचा वापर करता येत आहे. मात्र, आता पुन्हा दबावाखाली मैदान नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप ठाकरे यांनी केला.

# करिअर वृत्तांत

> जे आपल्याला केवळ माहिती देत नाही तर आपले जीवन अस्तित्वात असलेल्या सर्वांशी सुसंगत बनवते ते म्हणजे सर्वोत्तम शिक्षण.
>
> – रवींद्रनाथ टागोर

**स्पर्धा परीक्षेच्या प्रांगणात**
**एमपीएससी**

रोहिणी शहा

## राज्यसेवा मुख्य परीक्षा : सामान्य अध्ययन (पेपर दोन)

# आंतरराष्ट्रीय संघटना

**राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या सामान्य अध्ययन पेपर दोनच्या तयारीबाबत मागील लेखांमधून चर्चा करण्यात आली. या चर्चेच्या आधारे पेपर दोनमधील आंतरराष्ट्रीय संघटना या मुद्द्यावरील प्रश्नाचे उत्तर या लेखामध्ये पाहू.**

■ **प्रश्न: ''दहशतवाद हा जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी गंभीर धोका बनला आहे.'' या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवादविरोधी समिती (उळउ) व तिच्या संलग्न संस्थांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करा. (१५ गुण २५० शब्द)**

**प्रश्नाचे विश्लेषण–**

प्रश्नामुळे मुद्दे आधी समजून घेऊ. जागतिक शांतता आणि सुरक्षेसाठी दहशतवादाचा धोका; याबाबत दहशतवाद विरोधी समिती व तिच्या संलग्न संस्थांची परिणामकारकता आणि तिचे मूल्यमापन. या तीन मुद्द्यांवर आधारित उत्तर लिहिताना पुढील पायऱ्या वापरता येतील.

- जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी दहशतवाद कशाप्रकारे गंभीर धोका बनला आहे, यावर थोडक्यात भाष्य करा.
- संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची दहशतवादविरोधी समिती ( CTC ) आणि तिच्या संलग्न संस्थांची आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवाद रोखण्यातील व त्याचे शमन करण्यातील भूमिका स्पष्ट करा.
- समितीच्या दहशतवादविरोधी प्रयत्नांपुढील आव्हानांचे विश्लेषण करा.
- उळउच्या कार्यक्षमतेच्या मूल्यमापनावर भर देणे आवश्यक आहे. त्यामुळे उपाययोजना थोडक्यात सुचवून उत्तराचा समारोप करा.

**उत्तर:**

दहशतवाद म्हणजे राजकीय किंवा सामाजिक उद्दिष्टांसाठी हिंसा व भीतीचा वापर. आज तो जागतिक शांतता, आर्थिक स्थैर्य व सामाजिक सलोखा यांना गंभीर धोका निर्माण करतो. उदा. २००८ मुंबई हल्ल्यांमुळे भारताला सुमारे २ अब्ज डॉलर्सचे आर्थिक नुकसान झाले. ISIS च्या उदयामुळे मध्यपूर्वेत लाखो लोक विस्थापित झाले. तसेच, क्राइस्टचर्च ( २०१९ ) घटनेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर धार्मिक



तणाव वाढवला.

अमेरिकेतील २००१ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर, आंतरराष्ट्रीय दहशतवाद रोखण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने दहशतवादविरोधी समितीची ( CTC ) स्थापना केली.

**CTC ची भूमिका व परिणामकारकता:**

- **सदस्य राष्ट्रांना कायदेशीर चौकट मजबूत करण्यासाठी मार्गदर्शन:** दहशतवादाला निधीपुरवठा हा गुन्हा ठरविणे, मालमत्ता गोठविणे यासाठी सदस्य राष्ट्रांना कायदे करण्यात मार्गदर्शन.
- **आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे:** गुप्त माहितीची देवाणघेवाण व संयुक्त कारवाया सुलभ करण्यासाठी सदस्य राष्ट्रांमध्ये समन्वय साधणे
- **प्रशिक्षण आणि क्षमता विकास:** सदस्य राष्ट्रांच्या अंमलबजावणी यंत्रणेसणप्रशिक्षण व तांत्रिक मदत करणे.
- **प्रतिबंधात्मक निर्बंधांची अंमलबजावणी:** आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांवर प्रवासबंदी, शस्त्रबंदी लागू करणे.
- **वित्तीय कारवाई कृती दल ( FATF ) आणि इंटरपोलबरोबर समन्वय:** दहशतवादी वित्तपुरवठ्यावर नियंत्रण साधणे.

**मर्यादा व आव्हाने:**

- **राजकीय मतभेद:** स्थायी सदस्यांच्या नकाराधिकारामुवळे ठोस कारवाईत अडथळे. उदा. सिरीयाबाबत रशिया व चीनचा नकाराधिकार
- **सार्वभौमत्वाचा प्रश्न:** सदस्य राष्ट्रांचा अंतर्गत कायदा निर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत बाह्य हस्तक्षेपास विरोध.
- **संसाधनांची कमतरता:** विकसनशील देशांत अंमलबजावणीत अडचणी.
- **तंत्रज्ञानाचा दुरुपयोग:** एनक्रिप्टेड प्लॅटफॉर्मचा वापर केल्यने दहशतवादी कारवायांवर नियंत्रण आणण्यात अडचणी.
- **मानवाधिकार संतुलन:** कठोर कायद्यांमुळे नागरिकांच्या अधिकारांवर मर्यादा. उदा. वAPA किंवा AFSPA कायदे
- **दहशतवादाचे बदलते स्वरूप:** पारंपरिक संघटित गटांऐवजी स्थानिक पातळीवरील लोन-वुल्फ हल्ले - तपासात अडचणी

एकूणच, CTC ने आंतरराष्ट्रीय चौकट उभी केली असली तरी प्रभावी अंमलबजावणी व राजकीय एकमत यांवर तिचे यश अवलंबून आहे. यासाठी बहुपक्षीय सहकार्य, समन्वय, तंत्रज्ञानाच्या आधारे देखरेख, जनजागृती आणि मानवाधिकारांचा सन्मान राखणारी धोरणे आवश्यक आहेत.

**स्पष्टीकरण**

पूर्ण वाक्य आणि फक्त मुद्दे अशा दोन्ही वाक्यरचनांचा वापर केल्याने कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त मुद्दे मांडणे शक्य झाले आहे.

वेगवेगळ्या दहशतवादी कारवायांमुळे जागतिक शांतता सुरक्षितता यांना निर्माण झालेले धोके उदाहरणे दिल्यामुळे थोडक्यात पण स्पष्टपणे मांडता आले आहेत.

दहशतवाद विरोधी समितीचे मूल्यमापन करताना सकारात्मक मुद्दे आणि मर्यादा या दोन्हीबाबत मुद्दे मांडणे आवश्यक होते. अतिरिक्त शब्द वापरावे लागू नयेत यासाठी हे लक्षात घेऊन सर्व महत्त्वाचे मुद्दे क्रियापदांचा वापर न करता मांडले आहेत.

शक्य तेथे उदाहरणे दिल्यामुळे उत्तराची परिणामकारकता वाढली आहे.

समारोप करताना मूल्यमापनाचा निष्कर्ष मांडून परिणामकारकता वाढविण्यासाठीचे उपाय थोडक्यात मांडले आहेत. यामुळे उत्तराचा भर मूल्यमापनावरच ठेवता आल्याचे लक्षात येते.

steelframe.india@gmail.com

**चौकटी-पल्याड**

आशुतोष शिर्के
रश्मी पटवर्धन

# ॲनिमेशन : मानवी सर्जनशीलतेचा शोध

**ॲनिमेशन म्हणजे जगाकडे नव्या नजरेने पाहायला शिकणे. ॲनिमेशन ही कला आहे, ती मानवी निरीक्षणातून जन्माला येते. एखाद्या चेहऱ्यावरचा क्षणिक भाव, संध्याकाळच्या प्रकाशाचा रंग किंवा शांततेतही घडणारी कथा – हे सगळं पाहण्याची आणि समजण्याची क्षमता सॉफ्टवेअर देऊ शकत नाही.**



**गेल्या दोन** दशकांत ॲनिमेशन ही केवळ मनोरंजनाची शाखा राहिलेली नाही. ॲनिमेशन हे जगाच्या सांस्कृतिक, शैक्षणिक आणि तांत्रिक परिवर्तनाच्या केंद्रस्थानी जाऊन बसले आहे. चित्रपट, वेबसीरिज, गेमिंग, इंजिनीअरिंग, आर्किटेक्चर, वैद्यकीय सिम्युलेशन, व्हर्च्युअल रिॲलिटी या सर्व क्षेत्रामध्ये ॲनिमेशनचा वापर वाढतो आहे. त्यामुळे जगभरातील विद्यापीठे ॲनिमेशन क्षेत्राकडे गंभीरपणे पहात आहेत. ॲनिमेशन शिक्षणाचा अर्थ आपण बऱ्याच वेळेला केवळ 'सॉफ्टवेअर किंवा तंत्र शिकणे' असा घेतो. परंतु खरे तर ॲनिमेशन म्हणजे जगाकडे नव्या नजरेने पाहायला शिकणे.

बहुतेक भारतीय विद्यार्थ्यांच्या मनात ॲनिमेशन शिक्षण म्हटलं की अमेरिका किंवा युरोप हेच पर्याय येतात. कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स, न्यूयॉर्क फिल्म अकॅडमी, शेरिडन कॉलेज (कॅनडा), गोबलिन्स (फ्रान्स) आणि रॉयल कॉलेज ऑफ आर्ट (यूके) या संस्था जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहेत यात शंकाच नाही. या ठिकाणी विद्यार्थ्यांना ॲनिमेशन उद्योग जगतात काम करणारे नामांकित कलाकार आणि दिग्दर्शक शिकवतात. ते विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक कौशल्य देत नाहीत, तर 'दृश्य विचार' करण्याची क्षमता विकसित करतात - कथा, प्रकाश, रंग आणि भावना यांचा परस्परसंबंध समजावतात.

## गायत्रीचा प्रकाश, सावल्या आणि स्वप्नांचा प्रवास

गायत्री अंकम आज कॅनडात आहे. ॲनिमेशनच्या जगात तिने स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. पण हे स्थान तिला सहज मिळालेलं नाही. एआयच्या वेगवान लाटेमुळे तिच्या क्षेत्रात निर्माण झालेली अस्थिरता, बदलणाऱ्या कौशल्यांची मागणी आणि परदेशात स्वतःला सतत सिद्ध करण्याची गरज - या सगळ्यांशी सामना करत ती अजूनही तिच्या सर्जनशीलतेला धरून उभी आहे. तिच्यासाठी ही केवळ नोकरी नाही, तर तिच्या वेडासाठी तिने मोजलेली किंमत आहे.

ही कथा सुरू होते मुंबईतल्या सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट्सच्या वर्गात. रंग, प्रकाश



आणि सावल्यांच्या सूक्ष्म नात्याने तिला तेव्हाच भुरळ घातली होती. पडद्यावर दिसणाऱ्या जगामागचं गूढ तिला खुणावत होतं. त्या खुणेचा पाठलाग करत ती न्यूयॉर्क फिल्म अकॅडमीपर्यंत पोहोचली आणि तिथे तिच्यासाठी एक नवं विश्व उघडलं.

इथे तिला शिकवणारे शिक्षक केवळ प्राध्यापक नव्हते; तेच ते लोक होते ज्यांनी तिच्या लहानपणी तिला भुरळ घालणाऱ्या चित्रपटांच्या जगाची निर्मिती केली होती. ज्यांची नावे तिने पडद्यावर वाचली होती, तेच आता तिचे मार्गदर्शक होते. त्यांनी तिला केवळ सॉफ्टवेअर शिकवलं नाही, तर 'प्रकाश हा कथा सांगतो' हे शिकवलं. तांत्रिक कौशल्य आणि कलात्मक दृष्टी यांचा संगम म्हणजेच खऱ्या अर्थाने ॲनिमेशन, हे तिला तिथे उमगलं.

अमेरिकेत शिकताना आणि नंतर टीचिंग असिस्टंट म्हणून काम करताना तिची ओळख केवळ विद्यार्थिनी म्हणून राहिली नाही; ती त्या विद्यापीठाच्या सर्जनशील परंपरेचा एक भाग बनली. पुढे कॅनडात बार्डेल एंटरटेनमेंटमध्ये तिचं काम होतं नेटफ्लिक्स, डिस्ने आणि अमेझॉन प्राइममधील विविध ॲनिमेटेड दृश्यांना प्रकाश आणि कॉम्पोझिटिंगच्या माध्यमातून जिवंत करणं.

आज ती पुन्हा नव्या तंत्रज्ञानाकडे वळते आहे. परदेशी विद्यापीठातील शिक्षण आणि अनुभवातून ती एक महत्त्वाची गोष्ट शिकली - ॲनिमेशन ही केवळ करिअरची वाट नाही, तर सतत स्वतःला नव्याने घडवत राहण्याची एक जिवंत प्रक्रिया आहे.

पण ॲनिमेशनचं विश्व केवळ पाश्चिमात्य देशांपुरतं मर्यादित नाही. ॲनिमेशन क्षेत्रामध्ये जपान अग्रेसर मानला जातो. टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ द आर्ट्स आणि क्योटो सेइका युनिव्हर्सिटीसारख्या संस्थांनी 'ॲनिमे' या विशिष्ट शैलीला जागतिक प्रतिष्ठा मिळवून दिली. जपानी शिक्षणपद्धतीत निरीक्षण, संयम आणि सूक्ष्म भावनांचं चित्रण यावर भर दिला जातो. चीनमध्येही बीजिंग फिल्म अकॅडमी आणि चायना अकॅडमी ऑफ आर्टसारख्या संस्थांनी ॲनिमेशनमध्ये मोठी प्रगती केली आहे. तिथे पारंपरिक चीनी कलेचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम घडवण्यावर भर दिला जातो. दक्षिण कोरिया आणि सिंगापूर हे देशही या क्षेत्रात झपाट्याने पुढे येत आहेत.

आज एआयमुळे या क्षेत्रात मोठा बदल होत आहे. काही वर्षांपूर्वी ज्यासाठी तासन्तास मेहनत लागायची, ती कामं आता काही मिनिटांत होतात. त्यामुळे अनेकांना वाटतं की ॲनिमेशनमध्ये माणसाची गरज कमी होईल. काही प्रमाणात हे खरे आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये जगभर ॲनिमेशन क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. परंतु ॲनिमेशन तयार करण्याच्या प्रक्रियेतील माणसाचे स्थान गेले आहे असे यामुळे आपण म्हणू शकतो का? एआय दृश्य तयार करू शकतो, पण तो अनुभव तयार करू शकत नाही. भावना, सूक्ष्मता आणि कथेला दिशा देण्याची क्षमता ही माणसाकडेच असते. एआय हे एक साधन आहे; कलाकार हा त्याचा सर्जक आहे. म्हणूनच जगातील सर्वोत्तम विद्यापीठांमध्ये आजही सॉफ्टवेअरला जितकं महत्त्व दिलं जातं तितकंच महत्त्व ड्रॉइंग, स्केचिंग, फोटोग्राफी, सिनेमाचा अभ्यास, मानसशास्त्र आणि कथाकथन यांना दिलं जातं.

ॲनिमेशनमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतःला केवळ 'तंत्रज्ञ' म्हणून नव्हे, तर 'कलाकार' म्हणून घडवणं आवश्यक आहे. सॉफ्टवेअर बदलतील, एआय विकसित होईल, पण मानवी कल्पनाशक्ती आणि संवेदनशीलता हीच या क्षेत्राची खरी ताकद राहील. ॲनिमेशनचं शिक्षण म्हणजे एका साधनाचं प्रशिक्षण नव्हे; ते म्हणजे स्वतःची वेगळी दृष्टी शोधण्याचा आणि जगाला नव्या पद्धतीने व्यक्त करण्याचा प्रवास आहे.

mentorashutosh@gmail.com
(लेखक करिअर समुपदेशक आहेत.)

# कर्मचाऱ्यांची वार्षिक परीक्षा!

**कामगिरीचे वार्षिक अवलोकन ही कर्मचाऱ्यांसाठी स्वत:कडे मागे वळून बघण्याची उत्तम संधी असते. मानसशास्त्रानुसार कामगिरीचे विश्लेषण आणि सुधारणा करण्यासाठी केलेल्या विचारपूर्वक योजना प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतात.**

**कौशल्य तंत्र**

सलील चिंचोरे

**मार्च महिना** येऊ घातला की कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्यातील वेतन वाढ व प्रमोशनचे वेध लागतात. मार्च महिना हा वित्तीय वर्षातील अखेरचा महिना. मार्च महिन्याअखेरीस कंपनीच्या वित्तीय कामगिरीचा आढावा तर घेतला जातोच; तसेच कर्मचाऱ्यांच्या वार्षिक कामगिरीचेही अवलोकन केले जाते. या पद्धतशीर मार्गाला परफॉर्मन्स अप्रेजल म्हणतात. कर्मचाऱ्यांच्या वार्षिक अवलोकनाचे खास महत्त्व असते. कर्मचाऱ्यांच्या कामगिरीनुसार त्यांना परफॉर्मन्स रेटिंग दिले जाते. यानुसार कर्मचाऱ्यांसंबंधीचे वेतनवाढ, प्रमोशन, बदली, बोनस असे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जातात.

म्हणून प्रत्येक कर्मचारी वर्षाअखेरीस आपल्या कामाला रंगरंगोटी करून तिला आकर्षक स्वरूपात बॉससमोर सादर करतो. परफॉर्मन्स अप्रेजल मीटिंगमध्ये आपल्या कामगिरीची बॉसवर छाप पाडून चांगले रेटिंग मिळवण्याचा हा प्रयत्न असतो. काही वेळेला हा प्रयत्न फलद्रूप होतो तर काहीदा तो चक्क फसतो. कारण बॉसने कर्मचाऱ्यांबरोबर वर्षभर खांद्याला खांदा लावून काम केलेले असते. कर्मचाऱ्यांच्या कामातील खाचाकोचा, उणीवा, कर्मचाऱ्यांचा स्वभाव बॉसला चांगला ठाऊक असतो. बॉसपुढे कितीही अतिशयोक्तीपूर्ण सादरीकरण केले तरी प्रत्येक कर्मचाऱ्याला स्वतःच्या कामगिरीची यथार्थ जाणीव असते. पण त्याला रंगरंगोटी करण्याच्या नादात आपण त्यातील सत्व हरवून बसतो.

आज आपण याच गोष्टीकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून बघू. कामगिरीचे वार्षिक अवलोकन ही कर्मचाऱ्यांसाठी स्वतःकडे मागे वळून बघण्याची उत्तम संधी असते. मानसशास्त्रानुसार कामगिरीचे विश्लेषण आणि सुधारणा करण्यासाठी केलेल्या विचारपूर्वक योजना प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतात. प्रत्येक कसलेला खेळाडू मॅच संपल्यावर आपल्या कोचबरोबर बसून मॅचचे व स्वतःच्या कामगिरीचे सखोल विश्लेषण करतो. त्यातून हाती येणाऱ्या त्रुटींवर भर देऊन सराव करतो. त्यामुळे त्या खेळाडूला पुढच्या मॅचसाठी अधिक चांगले तयार होण्यासाठी मदत होते. बऱ्याचदा आपली कामगिरी फुगवून सांगण्याच्या नादात आपण स्वतःला आरशात बघण्याचे विसरतो. यावेळेस परफॉर्मन्स रिव्ह्यूसाठी नेहमीचे पवित्रे सोडून तुम्ही स्वतःचे कठोर मूल्यमापन करा. त्यासाठी मदत म्हणून तुम्हाला मी काही प्रश्न देतो आहे. त्या प्रश्नांची उत्तरे तुम्ही स्वतःच स्वतःसाठी शोधू शकता -

- गेल्या वर्षात वर्षभरात कोणती टार्गेट्स मी पार केली? ते कशामुळे साध्य झाले?
- कोणती टार्गेट्स पार करण्यात मला अपयश आले? त्याची कारणे काय?
- गेल्या वर्षभरात मला कोणत्या अडचणी आल्या? त्यांचा सामना मी कसा केला?
- माझा बॉस व इतर वरिष्ठांनी मला कोणता फीडबॅक दिला? त्याला मी कसा प्रतिसाद दिला?
- माझ्या कामगिरीवर मी पूर्णतः समाधानी आहे का? नसल्यास त्यात कुठे कमतरता जाणवते आहे?
- गेल्या वर्षभरात इतर सहकाऱ्यांबरोबरचे संबंध कसे होते? ते सुधारण्यासाठी मी कोणते प्रयत्न केले?
- गेल्या वर्षात मी काय नवीन शिकलो? त्याचा वापर मला पुढे कसा करता येईल?
- येत्या एक-दोन वर्षातील माझी करिअरची उद्दिष्टे कोणती?
- त्यासाठी येत्या वर्षात मला कोणत्या नवीन गोष्टी अनुभवायच्या अथवा शिकायच्या आहेत?



- सर्व गोष्टींचा सारासार विचार करता पुढच्या वित्तीय वर्षात माझ्या कामाविषयी व करिअरविषयी मी (अ) कोणत्या गोष्टी नव्याने चालू करणार? (ब) कोणत्या गोष्टी अधिक सातत्याने करत राहणार? व (क) कोणत्या गोष्टी कटाक्षाने टाळणार?

या प्रश्नांवर विचार करून त्याची तुमच्या बॉसबरोबर मोकळेपणाने चर्चा करा. सहेतुक केलेली चर्चा निश्चितच पुढील मार्ग दर्शवेल. स्वतःच्या कामगिरीची तुलना तुमच्या सहकाऱ्यांच्या कामगिरीशी करण्याचे टाळा.

बहुतांशी कर्मचाऱ्यांना वाटत असते की आपल्या करिअरची सगळी जबाबदारी कंपनीची आहे. माझ्या भवितव्याचा विचार माझ्या बॉसने आणि कंपनीने करावा. मी पुढे काय करावे, कसे काम करावे हे त्यांनीच ठरवावे. ही धारणा संपूर्णपणे चुकीची आहे. आपल्या कामगिरीची व करिअरची जबाबदारी आपली आहे. विचार-विश्लेषण करून पुढील मार्गही आपल्यालाच आखायचा असतो. त्यासाठी कंपनी व कंपनीतील वरिष्ठांचे मार्गदर्शन घ्यायचे असते.

कंपनी तुमच्या करिअरच्या रथाचे सारथ्य करत असेल तरी तुमचे युद्ध तुम्हीच लढायचे व जिंकायचे असते.

chinchoresalil@gmail.com
(लेखक मनुष्यबळ क्षेत्रातील तज्ज्ञ असून या क्षेत्रात २५ वर्षे कार्यरत आहेत)

## शब्दकोडे- ३५०

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | | ५ | ६ | ■ |
| ७ | | ■ | ८ | | | ■ | ९ | | १० |
| ११ | | १२ | | ■ | १३ | १४ | ■ | १५ | |
| | ■ | | ■ | १६ | | | १७ | | ■ |
| ■ | १८ | | | | ■ | १९ | | ■ | २० |
| २१ | | | ■ | २२ | २३ | ■ | २४ | २५ | |
| २६ | | ■ | २७ | | | २८ | ■ | | ■ |
| | ■ | २९ | | | ■ | ३० | ३१ | | ३२ |
| ३३ | ३४ | ■ | | ■ | ३५ | | | ■ | |
| ३६ | | | ■ | ३७ | | | ■ | ३८ | |

**आडवी विधाने :** (१) ज्याची कल्पना येणार नाही असे (४) पुष्कळ, खूप
(७) XX गबाले - हे मराठी चित्रपट दिग्दर्शक व निर्माते होते
(८) गडबड, गोंधळ
(९) त्रास, श्रम
(११) कोळिष्टक (१३) आड लपून बसणे
(१५) हात, सरकारी देणे
(१६) पळसाचा डिंक
(१८) दागदागिने, अलंकार
(१९) वटवृक्ष
(२१) दहावी तिथी, दुधात पीठ भिजवून केलेली पोळी (२२) प्रवृत्ती, झोक
(२४) गोधडी (२६) दुर्लक्ष, क्षमा
(२७) बोभाटा, गाजावाजा
(२९) छाया, प्रतिबिंब
(३०) मालक, नवरा (३३) कुसुम, पुष्प
(३५) संपूर्ण, फलद्रूप
(३६) चिन्ह, गुणधर्म
(३७) एक कीटक
(३८) सत्कृत्य, सत्कर्माचे फळ

**उभी विधाने :** (१) शासन नसलेली स्थिती (२) पंकज, सरोज
(३) पिकांचा अंदाज
(४) मजुरांवर देखरेख करणारा अधिकारी
(५) दुर्गुण, वाईट सवय
(६) तापाची पूर्वचिन्हे
(१०) नवऱ्याचा भाऊ
(१२) वालुकामय प्रदेश
(१४) पायऱ्या असलेली विहीर
(१६) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक प्रमुख प्रशासकीय तालुका (१७) कठोर, कडक
(१८) सारांश, उद्देश (२०) पंक्ती, रांग
(२१) गरम मसाल्यातला एक पदार्थ
(२३) खांबावर आडवी टाकलेली तुळई
(२५) मुसलमानी धर्मसूत्र
(२७) दुधाचा व्यवसाय करणारा
(२८) निरर्थक, फोल (३१) पाणी, नीर
(३२) लक्षात न घेण्यासारखा
(३४) शंभर हजार, चित्त
(३५) पावसाची झड, ओवलेल्या फुलांचा हार

– चारू नानल

## सुडोकू - ३५०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | ८ |
| | ६ | ४ | १ | | ३ | २ | ९ | |
| | ७ | | ४ | | ८ | | १ | |
| | ८ | २ | ५ | | ७ | १ | ३ | |
| | | | | १ | | | | |
| | १ | ३ | २ | | ६ | ५ | ४ | |
| | २ | | ७ | | ५ | | ८ | |
| | ४ | ७ | ८ | | ९ | ६ | ५ | |
| ५ | | | | | | | | ३ |

## सुडोकू - ३४९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ९ | ३ | १ | ८ | २ | ४ | ५ | ७ |
| १ | ८ | ४ | ३ | ७ | ५ | ९ | ६ | २ |
| ५ | २ | ७ | ६ | ४ | ९ | १ | ३ | ८ |
| ३ | ५ | २ | ४ | १ | ७ | ८ | ९ | ६ |
| ७ | १ | ६ | २ | ९ | ८ | ५ | ४ | ३ |
| ८ | ४ | ९ | ५ | ६ | ३ | ७ | २ | १ |
| ४ | ७ | ८ | ९ | ३ | ६ | २ | १ | ५ |
| ९ | ६ | ५ | ७ | २ | १ | ३ | ८ | ४ |
| २ | ३ | १ | ८ | ५ | ४ | ६ | ७ | ९ |

## शब्दकोडे - ३४९ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | ल्हा | द | के | श | व | अ | त्रे | ■ | ट |
| स्ता | ■ | वा | दा | ■ | र | ■ | धा | म | ण |
| व | सा | ■ | र | स | दा | र | ■ | हा | क |
| ना | र | ळ | ■ | क | न | का | च | ल | ■ |
| ■ | थी | ■ | व | र्म | ■ | ना | ल | ■ | यं |
| कुं | ■ | पा | ■ | क | था | ■ | न | म | दा |
| भ | र | व | सा | ■ | ट | क | ■ | त्स्य | ■ |
| ■ | ता | स | का | टा | ■ | ट | च | ■ | क |
| का | ळे | ■ | र | ■ | प | रा | व | लं | बी |
| थ्या | ■ | ठा | णे | दा | र | ■ | ळी | ■ | र |

# थकबाकीदारांच्या मालमत्तांचा लिलाव

## मुंबई महापालिकेची १२ जणांना नोटीस

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबई महापालिकेने मालमत्ता करापोटी तब्बल ३७८ कोटी रुपये थकविणाऱ्या १२ थकबाकीदारांच्या स्थावर मालमत्तांचा लिलाव करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई महापालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागाने या मालमत्ताधारकांना २१ दिवसांची जाहीर नोटीस बजावली आहे. या थकबाकीदारांचे १० मोकळे भूखंड, १ व्यावसायिक इमारत आणि १ संमिश्र वापराच्या मालमत्तेचा समावेश आहे. मालमत्ता करापोटी १२ थकबाकीदारांकडे एकूण ३७८ कोटी ६३ लाख ६७ हजार ५५७ रुपये इतकी थकबाकी प्रलंबित आहे. वारंवार नोटीस देऊनही थकीत कर भरणा न केल्याने पालिकेने हे कठोर पाऊल उचलले आहे.

वर्षानुवर्षे मालमत्ता कर थकवणाऱ्या थकबाकीदारावर कठोर कारवाई करण्यास प्रशानसाने सुरुवात केली आहे. यापूर्वी अशा मालमत्ता कर थकवणाऱ्या विकासकांच्या गाड्या जप्त करून त्यांचा लिलाव करण्याची कारवाई करण्यात आली. मात्र आता मुंबई महापालिकेने थकबाकीदारांच्या स्थावर मालमत्तांचा लिलाव करण्याचीही प्रक्रिया सुरू केली आहे. मालमत्ताकर थकविणाऱ्या आस्थापनांविरोधात अशीच कठोर कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी स्पष्ट केले.

### कागदपत्रांची छाननी सुरू

- गेल्यावर्षी मुंबई महापालिकेने सहा मालमत्ताधारकांच्या स्थावर मालमत्तांचा लिलाव करण्यासाठी नोटीस दिली होती.
- मात्र त्यानंतर या मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा भरणा केल्यामुळे त्यांच्यावरील लिलावाची कारवाई टळली.
- गेल्यावर्षी काही थकबाकीदारांच्या वाहनांचा लिलाव करण्यात आला होता. मात्र आतापर्यंत मुंबई महापालिकेने कधीही स्थावर मालमत्तांचा लिलाव केला नव्हता.
- न्यायालयीन वाद सुरू असलेले भूखंड, इमारती अशा स्थावर मालमत्तांचा लिलाव करण्यात अडथळा येतो. परंतु, यावेळी मुंबई महापालिकेने २४ विभागांतील बड्या थकबाकीदारांच्या स्थावर मालमत्तांचा शोध घेतला आहे.
- तसेच या मालमत्तांबाबत कोणतेही वाद नाहीत ना याची छाननी विधि विभागामार्फत करण्यात येत आहे. कोणत्याही प्रकारच्या वादात नसलेल्या सहा मालमत्तांना यापूर्वी नोटीस बजावण्यात आली होती.
- आता आणखी १२ मालमत्ताधारकांना नोटीस बजावण्यात आली आहे. तर आणखी १० मालमत्तांच्या कागदपत्रांची छाननी सुरू असल्याची माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# 'पीपल्स क्लायमेट डिक्शनरी'चे प्रकाशन

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** 'मुंबई क्लायमेट वीक'च्या पुढाकाराने तसेच 'प्रॉड' आणि 'प्रोजेक्ट मुंबई' यांच्या सहकार्याने 'पीपल्स क्लायमेट डिक्शनरी'ची निर्मिती करण्यात आली असून या शब्दकोशाचे प्रकाशन नुकतेच करण्यात आले. यामुळे आता हवामान बदलाविषयीच्या अनेक व्याख्या आणि संज्ञा सामान्य नागरिकांनाही सहज समजणार आहे.

हवामानविषयक संज्ञा सोप्या भाषेत उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने मुंबई क्लायमेट वीक'मध्ये 'पीपल्स क्लायमेट डिक्शनरी'ची औपचारिक घोषणा करण्यात आली होती. नुकताच 'स्टोरीटेलिंग ॲण्ड क्लायमेट ॲक्शन' या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पुरस्कारप्राप्त लेखक आणि चित्रपट निर्माते सुमित रॉय उपस्थित होते. या सत्रातच या शब्दकोशाचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी 'प्रॉड'चे संस्थापक झूमर मेहता आणि सुदिप्ती सक्सेना यांनी शब्दकोशाविषयी माहिती दिली. विविध क्षेत्रातील नागरिकांना हवामान बदलाचा दैनंदिन जीवनावर होणाऱ्या परिणामाची माहिती 'पीपल्स क्लायमेट डिक्शनरी' च्या माध्यमातून होईल असे त्यांनी सांगितले.

# शाळांना निवासी दराने कर आकारण्याची मागणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** शाळांना पुरविण्यात येणारी वीज, पाणी व अन्य करांची आकारणी ही व्यावसायिक दराने केली जाते. त्यामुळे शिक्षण संस्थांना शाळेचा आर्थिक कारभार चालवताना तारेवरची कसरत करावी लागते. त्यामुळे शाळांकडून आकारणी करण्यात येणाऱ्या विविध करांची निवासी दराने आकारणी करण्यात यावी, अशी मागणी विविध शैक्षणिक संघटनांनी शिक्षण समितीच्या अध्यक्षा राजश्री शिरवाडकर यांच्याकडे केली.

संघटनांच्या प्रतिनिधींनी शिक्षणाशी संबंधित गंभीर व प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर निवेदन सोमवारी शिक्षण समिती अध्यक्षांना सादर केले. या वेळी महामुंबई शिक्षण संस्था संघटनेचे अध्यक्ष सदानंद रावराणे, उपाध्यक्ष राजेंद्र प्रधान, कार्यवाह डॉ. विनय राऊत, डॉ. विशाल कडणे तसेच फादर स्वामी उपस्थित होते. या भेटीमध्ये महानगरपालिका क्षेत्रातील खासगी विनाअनुदानित तसेच अनुदानित शाळांना भेडसावणाऱ्या प्रमुख समस्या शैक्षणिक संस्थांच्या प्रतिनिधींनी शिरवाडकर यांच्यासमोर मांडला. यामध्ये शाळांवरील वीज, पाणी व अन्य करांची निवासी दराने आकारणी करा, मालमत्ता करातून संपूर्ण सूट, आरटीई कायदा २००९ अंतर्गत अंतिम मान्यतेनंतर दर पाच वर्षांनी घेण्यात येणारी 'मुदतवाढ मान्यता' प्रक्रिया रद्द करा, २५ टक्के आरटीईअंतर्गत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्क प्रतिपूर्तीची प्रलंबित रक्कम तात्काळ अदा करण्याची मागणी यांचा समावेश होता.

# मुंबई विद्यापीठात 'नॅनोहोलिक्स ७.०'

लोकसत्ता प्रतिनिधी




**मुंबई :** मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय नॅनोसायन्स आणि नॅनो तंत्रज्ञान केंद्रातर्फे शाश्वत भविष्यासाठी नाविन्यपूर्ण विज्ञानाचा ध्यास घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि संशोधकांसाठी 'नॅनोहोलिक्स ७.०' हा विज्ञान महोत्सव २७ व २८ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत नॅनो सायन्स, सेमीकंडक्टर्स आणि ऊर्जा-कार्यक्षम तंत्रज्ञान या क्षेत्रांतील नव्या संशोधन प्रवाहांवर विशेष भर देण्यात येणार आहे.

'नॅनोहोलिक्स ७.०' हा दोन दिवसीय विज्ञान महोत्सव मुंबई विद्यापीठाच्या कलिना येथील विद्यानगरीमध्ये होणार आहे. या विज्ञान महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश विनामूल्य आहे. महोत्सवात तांत्रिक सत्रे, पोस्टर सादरीकरणे, प्रात्यक्षिके, विज्ञान प्रदर्शन, तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्या स्पर्धकांना आकर्षक पारितोषिके देण्यात येणार असून तरुण संशोधकांना आपली संशोधन कल्पना मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली या विज्ञान महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 'शाश्वत भविष्यासाठी नाविन्यपूर्ण विज्ञान' या मुख्य संकल्पनेवर आधारित या विज्ञान महोत्सवातून शाश्वत विकासासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाची भूमिका अधोरेखित केली जाणार आहे. नॅनोतंत्रज्ञान, ऊर्जा-बचत उपाययोजना आणि सेमीकंडक्टर क्षेत्रातील संधी याबाबत तज्ज्ञांची मार्गदर्शनपर सत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे. विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा महोत्सव मार्गदर्शक ठरणार आहे. या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन राष्ट्रीय नॅनोसायन्स आणि नॅनो तंत्रज्ञान केंद्राचे संचालक प्रा. विश्वनाथ पाटील यांनी केले.

# बेस्ट ताफ्याचा विस्तार, मार्ग नियोजनाची गरज

(पान १वरून) मुंबई उच्च न्यायालयाने पेट्रोल/डिझेल वाहने टप्प्याटप्प्याने बंद करून फक्त सीएनजी-आधारित आणि इलेक्ट्रिक वाहनांना रस्त्यावर परवानगी देण्याच्या शक्यतेचा विचार करण्याचे निर्देश राज्य सरकारला दिले होते. जानेवारी २०२५ मध्ये सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी सुधीर कुमार श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यांची समिती स्थापन केली होती. समितीने राज्य सरकारने बीएस इंजिन मॉडेलसारख्या जुन्या वाहनांवर जास्त कर लादण्याची, सीएनजी आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक मदतची शिफारस केली आहे.

शिफारशींमध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांचे पुनरुज्जीवन आणि बळकटीकरण करण्यावरही भर दिला आहे. विशेषतः बेस्टच्या बस वाहतुकीवर विशेष लक्ष केंद्रीत करण्याची शिफारस केली आहे. गेल्या काही वर्षांत बेस्ट बसची संख्या आणि प्रवासी संख्येत लक्षणीय घट झाल्याने सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कोलमडल्याचे समितीने म्हटले आहे. प्रवाशांचा बस वाहतुकीवरील विश्वास पुनर्संचयित करण्यासाठी ताफ्याचा विस्तार करून आणि मार्ग नियोजन सुधारून परिस्थिती सुधारता येईल, असे अहवालात म्हटले आहे. मुंबईतील खाजगी वाहनांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सार्वजनिक वाहतूक कनेक्टिव्हिटी वाढवणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचा निष्कर्षही काढण्यात आला आहे.

### वाहनांमुळे वायुप्रदूषण जास्त

वाहनांमधून होणाऱ्या उत्सर्जनाचा हवेच्या खराब गुणवत्तेत ४ ते १२ टक्के वाटा आहे. निष्कर्षांनुसार, काही भागात सुमारे ५० टक्के वायू प्रदूषण पुन्हा उडालेल्या धुळीमुळे होते. हाताने साफसफाई केल्याने हवेत धूळ पुन्हा पसरून समस्या आणखी बिकट होते. रस्ते धुणे प्रभावी असले तरी त्यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी लागते. त्याऐवजी, समितीने अधिक कार्यक्षम पर्याय म्हणून जास्त धूळ असलेल्या भागात व्हॅक्यूम आणि सक्शन साफसफाई यंत्र तैनात करण्याची शिफारस केली आहे. तसेच धूळ कमी करण्यासाठी कालबद्ध कृती योजना प्रस्तावित केली आहे.


## नाटक सिनेमा वाद्यवृंद

आज दु. ४ वा. प्र. ठाकरे, बोरिवली
रवि. १ मार्च स. ११ वा. श्री शिवाजी मंदिर, दादर
रवि. १५ मार्च नाशिक (हाऊसफुल्ल)
माकडचाळे

online bkng- ticketalay & bookmyshow phn bkng 9969635553
शुक्र २७ रात्रौ ८.३० विष्णुदास भावे, वाशी
शनि २८ दु. ४ प्रबोधनकार ठाकरे, बोरिवली
एका लग्नाची पुढची गोष्ट
प्रशांत दामले कविता मेढेकर

रविवार, १ मार्च २०२६, सकाळी १०:३० वा. दीनानाथ नाट्यगृह, विलेपार्ले
निसर्गातून शिकवण
॥ श्री दत्तगुरुंचे २४ गुरु ॥
प्रवेश विनामूल्य

बोरिवलीची ति.वि. उद्यापासून सुरू
online tkts- bookmyshow वर सुरू
रवि १ मार्च दु. ४ प्रबोधनकार ठाकरे, बोरिवली
भूमिका

BMS Online वर सुरू
आज JNPT (उरण)
रवि. १ मार्च दु. ४.३० आचार्य अत्रे, कल्याण
शेट तुमच्या घरातून

online tickets- bookmyshow
शनि २८ दु. ४ डॉ. काशिनाथ घाणेकर, ठाणे
बोलविता धनी

online तिकिटे bookmyshow वर सुरू
आज रात्रौ ८.३० गडकरी रंगायतन, ठाणे
शुक्र २७ रात्रौ ८.३० रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी
शनि २८ रात्रौ ८.३० आचार्य अत्रे, कल्याण
लक्ष्मीपंचमी

रवि १ दु. ४ विष्णुदास भावे, वाशी
सविता दामोदर परांजपे

अमेरिका दौऱ्यापूर्वीचे प्रयोग!
वरवरचे वधू-वर

online tkt- bookmyshow
सुभेदार गेस्ट हाऊस

उद्या दु. ४.३० गडकरी रंगायतन, ठाणे
रवि १ मार्च दु ४ श्रीशिवाजी मंदिर, दादर
शनि १४ दु ४.३० कालिदास, मुलुंड
प्रत्येकाच्या मनात घर करणारे नाटक...
असेन मी...नसेन मी...

online tks- ticketalay & bookmyshow
आज दु. ४ गडकरी रंगायतन, ठाणे
रवि १ मार्च दु. ४ यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा
शिकायला गेलो एक

झी नाट्य गौरव- ५ पुरस्कारांसह सर्वोत्कृष्ट नाटक
करुणाष्टके

॥ न भूतो न भविष्यति ॥
१६० प्रयोग HOUSEFULL
bookmyshow वर FILLING FAST
आज दु. ४.०० वा. दीनानाथ नाट्यगृह, पार्ले
उद्या दु. ४.०० वा. प्रबोधनकार ठाकरे, बोरिवली
देवबाभळी

online tkts- bookmyshow
ऑल द बेस्ट

शनि. २८ फेब्रुवारी दु. ४.३० वा. आचार्य अत्रे रंगमंदिर, कल्याण
तुझे आहे तुजपाशी

online tickets- bookmyshow
शनि २८ रात्रौ ८.३० वा. गडकरी रंगायतन, ठाणे
रवि १ मार्च दु. ४ वा. दीनानाथ नाट्यगृह, पार्ले
जर तरची गोष्ट

सर्व प्रयोगांचे online tkt- bookmyshow वर सुरू
शुक्र २७ रात्रौ ८.१५ वा. आचार्य अत्रे कल्याण
आमने सामने

अधिक जाहिराती पुढील पानावर पाहा

## संक्षिप्त

### मराठी वाचन संस्कृतीचा उत्सव

**मुंबई :** श्री मोरेश्वर सेवा संघ आणि नाना पालकर स्मृती समिती यांच्या तर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त श्री मोरेश्वर सेवा संघाच्या प्रांगणात २७ फेब्रुवारी ते १ मार्चदरम्यान 'मराठी वाचन संस्कृतीचा उत्सव' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २७ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ५:३० वाजता डॉ. संजय ओक यांची मुलाखत होईल. तर २८ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ५:३० वाजता ज्येष्ठ पत्रकार अंबरीश मिश्र यांचे व्याख्यान होणार असून १ मार्च रोजी सेवा भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील सप्रे यांच्या उपस्थितीत रुग्ण सेवा दिन साजरा केला जाईल.

### काव्यवाचन स्पर्धा

**मुंबई :** परळ येथील मूलभूत अधिकार संघर्ष समितीच्या शहीद भगत सिंग स्मृती समितीतर्फे २२ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता नाना चौक येथील मुंबई सर्वोदय मंडळ येथे शहीद भगत सिंग काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १८ वर्षांवरील सर्वांसाठी खुली असून मराठी किंवा हिंदी भाषेतील राजकीय आणि सामाजिक विषयांवरील स्वरचित कविता मोबाइल क्रमांक ९८३३०७५६०६ वर १५ मार्चपर्यंत पाठवावी, निवडक ५० कवितांची स्पर्धा २२ मार्च रोजी होणार आहे, असे समितीकडून सांगण्यात आले.

### विशेष उपक्रम

**मुंबई :** सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र शासन, समाजकल्याण संचलनालय आणि नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने 'करून होलिकेला नमन - करू या व्यसनांचे दहन' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रतिकात्मक व्यसनांच्या राजाचे दहन केले जाणार आहे. हा उपक्रम शनिवार, २८ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील कॅपिटल सिनेमा समोर आयोजित करण्यात आला आहे, असे नशाबंदी मंडळाचे चिटणीस अमोल स. भा. मडामे यांनी सांगितले.

# मेट्रोला अर्थबळ

## १० मार्गिकांसाठी एमएमआरडीएला ३४८ कोटी

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) ३३७ किमीहून अधिक लांबीचे मेट्रोचे जाळे विणले जात आहे. या प्रकल्पातील काही मार्गिकांची कामे सध्या सुरू आहेत. निर्माणाधीन मेट्रो मार्गिकांसाठी दुय्यम कर्जाच्या रूपाने राज्य सरकारने एमएमआरडीएला ३४८ कोटी रुपये निधी दिला आहे. एकूण १० मेट्रो मार्गिकांसाठी हा निधी देण्यात आला आहे. यामुळे मेट्रो मार्गिकांच्या कामाला गती मिळणार आहे.

एमएमआरडीएकडून सध्या मेट्रो ४, मेट्रो ४ अ (वडाळा - ठाणे - कासारवडवली - गायमुख), मेट्रो २ ब (अंधेरी पश्चिम - मंडाले), मेट्रो ५ (ठाणे - भिवंडी कल्याण), मेट्रो ६ (स्वामी समर्थ नगर - कांजूरमार्ग), मेट्रो ७ अ (गुंदवली - मुंबई विमानतळ), मेट्रो ९ (दहिसर - मिरा-भाईंदर), मेट्रो १२ (कल्याण - तळोजा) या मार्गिकांची कामे सुरू आहेत. टप्प्याटप्प्याने मार्गिकांची कामे करण्यात येत असून जसजसे टप्पे पूर्ण होतील तसतसे ते सेवेत दाखल केले जाणार आहेत. तर चालू मेट्रो मार्गिकांची कामे निश्चित वेळेत पूर्ण करण्यासाठी एमएमआरडीएकडून कामांना गती देण्यात येत आहे. मात्र एमएमआरीडएला निधीची चणचण भासते. राज्य सरकारकडून उपलब्ध होणाऱ्या दुय्यम कर्जामुळे निधीची चणचण काहीशी दूर होते. त्यानुसार राज्य सरकारने आता १० मेट्रो मार्गिकांसाठी दुय्यम कर्ज उपलब्ध करून देत मेट्रो मार्गिकांना अर्थबळ दिले आहे. दुय्यम कर्ज उपलब्ध करून देण्यात आलेल्या १० पैकी सात मेट्रो मार्गिकांची कामे सध्या सुरू आहेत. तर एका मार्गिकेचे काम सुरू होणे बाकी आहे.



**कोणत्या मेट्रो मार्गिकेसाठी किती निधी**

- दहिसर पूर्व - डी. एन. नगर मेट्रो २ अ - १९.२० कोटी रुपये
- डी. एन. नगर - मंडाळे मेट्रो २ ब - ७५.२० कोटी रुपये
- वडाळा - कासारवडवली मेट्रो ४ - ४२.७८ कोटी रुपये
- कासारवडवली - गायमुख मेट्रो ४ अ - १८.३७ कोटी रुपये
- ठाणे भिवंडी कल्याण मेट्रो ५ - ३४.९२ कोटी रुपये.
- स्वामी समर्थ नगर - विक्रोळी मेट्रो ६ - २१.९६ कोटी रुपये
- अंधेरी पूर्व - दहिसर मेट्रो ७ - ३३ कोटी रुपये
- दहिसर - मिरा भाईंदर मेट्रो ९ - ४४.४७ कोटी रुपये
- गायमुख - शिवाजी चौक मेट्रो १० - ५७.४३ कोटी रुपये
- कल्याण तळोजा मेट्रो १२ - ७२ लाख रुपये

### बालसुधारगृहातील निवृत्त कर्मचाऱ्यांचे आंदोलन

**मुंबई :** वारंवार मागणी करून सरकार सेवा निवृत्ती वेतन सुरू करीत नसल्यामुळे बालसुधारगृहातील सेवानिवृत्त कर्मचारी संतप्त झाले आहेत. गेली अनेक वर्षे सरकारी कार्यालयात खेटे घातल्यानंतरही पदरात निराशा पडल्यामुळे सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांनी आता आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. निवृत्त कर्मचाऱ्यांनी मंगळवारपासून आझाद मैदानात आंदोलन सुरू केले आहे.

मुंबईमध्ये एकूण सात बालसुधारगृहे असून ती राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाअंतर्गत कार्यरत आहेत. बालसुधारगृहांमध्ये मुलांचा सांभाळ करण्यासाठी अनेक कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. गेल्या काही वर्षांत यापैकी अनेक कर्मचारी सेवा निवृत्त झाले आहेत. मात्र सेवा निवृत्त झाल्यानंतर या कर्मचाऱ्यांना सरकारकडून निवृत्ती वेतन देण्यात येत नाही. त्यामुळे निवृत्ती वेतन सुरू करावे, तसेच भविष्य निर्वाह योजना, वैद्यकीय विमा सुविधा लागू करावी, अशी मागणी अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे.

# केईएम रुग्णालयात अत्याधुनिक 'माँ' आयव्हीएफ केंद्र

## आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते लोकार्पण

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** केईएम रुग्णालयामध्ये जागतिक दर्जाचे 'माँ' आयव्हीएफ (इन-व्हिट्रो फर्टिलायझेशन) केंद्र सुरू करण्यात आले आहे. ही सुविधा सर्वसामान्य नागरिकांना परवडेल अशा माफक दरात उपलब्ध व्हावी, असे मत सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केले. केईएम रुग्णालयात अत्याधुनिक 'आयव्हीएफ' केंद्राचे उद्घाटन आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, आमदार अजय चौधरी, मुंबई महापालिकेच्या विरोधी पक्ष नेत्या किशोरी पेडणेकर, केईएम रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत व तज्ज्ञ डॉक्टर्स उपस्थित होते.




केईएम रुग्णालय शासनाच्या धोरणाशी सुसंगत राहून दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व माफक दरात नागरिकांना आरोग्यसेवा पुरवण्याचे काम करत आहे. या रुग्णालयात सुरू झालेल्या आयव्हीएफ केंद्राच्या माध्यमातून वंध्यत्व उपचारांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहे. केईएममध्ये सुरु होत असलेल्या माँ आयव्हीएफ केंद्राच्या डॉ. अंजली आणि डॉ. अनिरुद्ध मालपाणी यांनी आपल्या मातृसंस्थेला 'आयव्हीएफ' केंद्राच्या रूपाने मोलाची गुरुदक्षिणा दिली आहे. त्यांचा आदर्श घेण्यासारखा आहे. राज्य सरकारच्या वतीने केईएम रुग्णालयातील सेवा गतिमान करण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाही आरोग्यमंत्र्यांनी यावेळी दिली

एकत्रित जन आरोग्य योजनेमार्फत अंगीकृत शासकीय व खासगी रुग्णालयात मोफत आरोग्य सेवा दिली जात असून, उपचारांची संख्या १३५६ वरून २३९९ इतकी वाढवण्यात आली आहे. अंगीकृत रुग्णालयांची संख्या सुद्धा १७९२ वरून ४५३७ पर्यंत वाढवण्यात आली आहे. उपचारांच्या दरातही वाढ करण्यात आली आहे. ही सुविधा अधिक सुलभ होण्यासाठी टीएमएस २.० हे संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे.

# मेट्रो १३ मार्गिकेचा मार्ग अखेर मोकळा

## मिरा-भाईंदर ते वसई-विरार अशा २५ किमीच्या सुधारित संरेखनास मान्यता

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** 'दहिसर ते मिरा-भाईंदर मेट्रो ९' मार्गिकेचा विस्तार मिरा-भाईंदर ते वसई-विरार मेट्रो १३ मार्गिकेच्या माध्यमातून केला जाणार आहे. ही मार्गिका आतापर्यंत कागदावरच होती, पण आता मात्र मेट्रो १३ मार्गिका मार्गी लावण्याच्यादृष्टीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. मेट्रो १३ मार्गिकेच्या सुधारित संरेखनास आणि सुधारित आराखड्यास नुकत्याच झालेल्या प्राधिकरणाच्या १६० व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. सुधारित संरेखनानुसार ही मार्गिका २५.०३ किमी लांबीची असणार आहे. आता या मार्गिकेचा प्रस्ताव पुढील मान्यतेसाठी राज्य सरकारकडे पाठवण्यात येणार आहे.

मुंबई महानगर प्रदेशासाठीच्या १४ मेट्रो मार्गिकांच्या प्रकल्पातील आता केवळ तीन ते चार मार्गिकांचीच कामे सुरू होणे बाकी आहे. त्यात मेट्रो १३ मार्गिकेचाही समावेश आहे. मुंबईला मिरा-भाईंदरशी मेट्रोने जोडणाऱ्या दहिसर ते मिरा-भाईंदर मेट्रो ९ मार्गिकेचा विस्तार मेट्रो १३ मार्गिकेद्वारे केला जात आहे. त्यानुसार मिरा-भाईंदर ते वसई-विरार अशी मेट्रो मार्गिका प्रस्तावित करण्यात आली. या मार्गिकेचा आराखडा, तसेच संरेखन २०१९-२०२० मध्ये तयार करण्यात आले. मात्र प्रत्यक्षात ही मार्गिका मार्गी लावण्यासाठी कोणतीही पाऊले अद्याप उचलण्यात आली नव्हती. आता मात्र या मार्गिकेच्या कामाला शक्य तितक्या लवकर सुरुवात करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे.

**मुंबईहून मिरा-भाईंदर, वसई-विरार प्रवास अतिजलद**

- जुन्या संरेखनानुसार या मार्गिकेची लांबी २३ किमी होती, आता ही लांबी २५.०३ किमी झाली आहे. या मार्गिकेचा खर्च १७ हजार ७२५ कोटी रुपयांवर गेला आहे. मार्गिकेच्या सुधारित संरेखनास आणि आराखड्यास मान्यता मिळाल्याने आता प्रस्ताव राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठवण्यात येईल. राज्य सरकारची मान्यता मिळाल्यानंतर मार्गिकेच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याच्यादृष्टीने पाऊले उचलली जातील, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.
- मेट्रो १३ मार्गिकेच्या संरेखनास आणि आराखड्यास मान्यता मिळाल्याने या मार्गिकेच्या कामाचा मार्ग मोकळा झाला असून वसई-विरारकरांसाठी ही आनंदाची बातमी आहे. वसई-विरारकरांचे मेट्रो प्रवासाचे स्वप्न येत्या काही वर्षांतच पूर्ण होण्याची शक्यता आहे.
- मुंबईहून मिरा-भाईंदर, वसई-विरारला अतिजलद पोहचणे भविष्यात शक्य होणार आहे. मेट्रो २, मेट्रो २ ब मार्गिकेचा विस्तार मेट्रो ९ मार्गिकेच्या माध्यमातून केला जात आहे. तर मेट्रो ९ मार्गिकेची विस्तारीत मार्गिका मेट्रो १३ मार्गिका आहे. त्यामुळे या सर्व मेट्रो मार्गिका सेवेत दाखल झाल्यास मंडाले, मानखुर्द ते वसई-विरार असा मेट्रो प्रवास करता येणार आहे.

## नवी टाटा पंच.ईव्ही







**टाटा ईव्हीने** पंच. ईव्हीचे नवे रूप नुकतेच सादर केले. परवडणारी किंमत, चार्जिंगची सोय व बॅटरीची खात्री देताना ९.६९ लाख रुपयांच्या मूळ किमतीत ती मुंबईत उपलब्ध असेल. पंच.ईव्ही ही छोट्या कारच्या श्रेणीत किफायतशीर ठरेल, असा दावा कंपनीने केला आहे.

नवीन पंच. ईव्हीचे लॉन्च करताना टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल लिमिटेड आणि टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक शैलेश चंद्रा म्हणाले, की नवी पंच.ईव्ही, इलेक्ट्रिक मोबिलिटीला प्रत्येक घरासाठी खरोखरच सोपे, व्यवहार्य व निश्चित ठरते. ३५५ किमीची रिअल-वर्ल्ड रेंज, फास्ट चार्जिंग क्षमता, लाइफटाइम एचव्ही बॅटरी वॉरंटी हे त्यातील फायदे आहेत. प्रगत ॲक्टि.ईव्ही अभियांत्रिकीवर आधारित नवी पंच.ईव्ही शुद्धतेचा नवा पायंडा पाडते. सबकॉम्पॅक्ट अर्थात छोट्या आकाराच्या एसयूव्ही श्रेणीत पंचचे ईव्ही रूप तितकेच आकर्षक आहे.

### २६ मिनिटांत ८० टक्क्यांपर्यंत जलद चार्ज

- मोठ्या ४० केडब्ल्यूएच एलएफपी प्रिझ्मॅटिक सेल बॅटरी संचासह नवी पंच.ईव्ही एका चार्जमध्ये ३५५ किलोमीटरचा टप्पा पूर्ण करते. नवी पंच.ईव्ही रोजच्या शहरी वापरासाठी आणि छोट्या इंटरसिटी प्रवासासाठी उत्तम पर्याय मानता येईल. वारंवार चार्जिंग थांब्यांची गरज त्यामुळे कमी होते.
- नवी पंच.ईव्ही ३० केडब्ल्यूएच बॅटरी पॅक पर्यायासहही उपलब्ध असेल. या दोन पर्यायांच्या संयोगाने, नवीन पंच.ईव्ही ग्राहकांना पारंपरिक इंधनावर धावणाऱ्या वाहनांसाठी इलेक्ट्रिक हा सहज पर्याय उपलब्ध होतो. ड्रायव्हिंगचा उत्कृष्ट दर्जा व कमी रनिंग व मेंटेनन्स खर्च येतो.
- जलदगती चार्जिंग पर्यायांमुळे बॅटरी फक्त २६ मिनिटांत २० ते ८० टक्क्यांपर्यंत जलद चार्ज होऊ शकते. याशिवाय, १५ मिनिटांत बॅटरीला सहजपणे १३५ किमी रिअल-वर्ल्ड रेंज मिळते.

### नायगावमधील घरांचे चावीवाटप रखडले

**मुंबई :** बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत नायगाव बीडीडी चाळीतील पहिल्या टप्प्यातील ८६४ घरांचे काम पूर्ण झाले आहे. तसेच या घरांना निवासी दाखलाही प्राप्त झाला आहे. मात्र अद्याप या घरांचे चावीवाटप झालेले नाही. म्हाडाच्या मुंबई मंडळाने यासाठी मार्चचा मुहूर्त निश्चित केल्याचे समजते.

म्हाडाचे मुंबई मंडळ ना. म. जोशी मार्ग, नायगाव आणि वरळी येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास करीत आहे. या तिन्ही ठिकाणी टप्प्याटप्प्याने पुनर्वसित इमारतींचे बांधकाम केले जात आहे. जसजसे टप्पे पूर्ण होतील तसे घरांचे वाटप करण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. त्यानुसार वरळीतील ५५६ रहिवाशांना २०२५ मध्ये पुनर्वसित इमारतीतील घरांचा ताबा देण्यात आला. वरळीकरांपाठोपाठ नायगावमधील ८६४ रहिवाशांचे पुनर्वसित इमारतीतील ५०० चौरस फुटांच्या घरात वास्तव्यास जाण्याचे स्वप्न २०२५ मध्ये पूर्ण होणार होते. त्यानुसार नायगावमधील पाच पुनर्वसित इमारतींची कामे ऑक्टोबर २०२५ मध्ये पूर्ण करण्यात आली. निवासी दाखला घेऊन नोव्हेंबर २०२५ मध्ये या घरांचा ताबा देण्याचे मंडळाने निश्चित केले होते. मात्र निवासी दाखला मिळण्यास विलंब झाल्याने चावीवाटपाचा कार्यक्रम रद्द करण्याची वेळ मंडळावर आली.

अधिकाऱ्यांना विचारले असता त्यांनी चावीवाटपासाठी वेळ निश्चित करण्यासाठी सरकारकडे पाठपुरावा सुरू असल्याचे 'लोकसत्ता'ला सांगितले. तसेच मार्चमध्येच चावी वाटप होण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## नाटक सिनेमा वाद्यवृंद















तुम्हाला तुमच्या मुलांच्या लग्नासाठी बचत सुरू करायची आहे का?
आजच संपर्क करा!
Krushna Finserv
AMFI REGISTERED MUTUAL FUND DISTRIBUTOR ARN - 94014
18 & 19, Jai Jawan CHS, Sector 17, Vashi, Navi Mumbai
: +91 22 40953636 (30 lines)
म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.

# १४ गावांना कर आकारणी

## दोन वर्षांनंतर महापालिका प्रशासनाची हालचाल

**पूर्वा भालेकर, लोकसत्ता**

**नवी मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि वनमंत्री गणेश नाईक या दोन बड्या नेत्यांमधील राजकीय संघर्षामुळे नवी मुंबई महापालिकेत समावेश होऊन दोन वर्ष उलटली तरी विकास कामांपासून दूर राहिलेल्या कल्याण तालुक्यातील १४ गावांमध्ये उशिरा का होईना आता कर आकारणीच्या हालचालींना वेग आला आहे. ७ मार्च २०२४ मध्ये या गावांचा महापालिकेत समावेश झाला. गेल्या दोन वर्षांत महापालिकेने या गावांमधील एकाही मालमत्तेचे सर्वेक्षण केलेले नाही. सर्वेक्षण नाही त्यामुळे कर आकारणी नाही आणि पायाभूत सुविधांचे प्रकल्पही नाहीत अशी एकंदर परिस्थिती या गावांमध्ये आहे. या पार्श्वभूमीवर येत्या एक एप्रिलपासून या गावांमधील मालमत्तांचे स्वतंत्र्य सर्वेक्षण हाती घेण्याची तयारी प्रशासनाने सुरु केली आहे. या सर्वेक्षणानंतर पुढील आर्थिक वर्षापासून याठिकाणी मालमत्ता कराची आकारणी सुरू केली जाणार आहे.

लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर कल्याण तालुक्यातील दहिसर, मोकाशी, वालिवली, पिंपरी, निघू, नावाळी, वाकळण, बामाली, नारीवली, बाळे, नागांव, भंडार्ली, उत्तरशीव आणि गोटेघर ही १४ गावे राज्य सरकारने नवी मुंबई महापालिका हद्दीत समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला. हा संपूर्ण पट्टा शिंदेसेनेचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण लोकसभा मतदारसंघात मोडतो. त्यामुळे गावातील मतदारांच्या मागणीनुसार तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही गावे नवी मुंबई हद्दीत समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे विद्यमान वनमंत्री आणि ऐरोली मतदारसंघाचे तत्कालीन आमदार गणेश नाईक कमालीचे नाराज झाले. नवी मुंबईकरांना विश्वासात न घेता हा निर्णय घेतला गेला अशी भूमिका नाईक यांनी जोरकसपणे मांडली. या गावांमधून नवी मुंबईकरांवर सहा हजार कोटी रुपयांचा आर्थिक बोजा पडेल अशी तक्रारही नाईकांनी केली.

शिंदे-नाईक या वादात दोन वर्ष उलटल्यानंतरही या गावांमध्ये नवी मुंबई महापालिकेने एकही विकासकाम हाती घेतले नाही. याठिकाणी पाणी पुरवठा योजना, प्राथमिक आरोग्य सेवा, महापालिका शाळांची बांधणी, स्वच्छता, जन्म मृत्यू दाखल्यांच्या सेवाही अद्याप सुरू झालेल्या नाहीत. महापालिका निवडणुकानंतर या गावांमधून निवडून आलेल्या नगरसेवकांनी मात्र या सुविधा सुरू कराव्यात असा आग्रह धरला आहे. शिवाय येथील नगरसेवकांनी सत्ताधारी भाजपला दिलेल्या पाठिंब्यामुळे गावांमधील मुलभूत सुविधा पुरविण्याची कामेही लवकरच सुरू होतील अशी चिन्हे आता दिसू लागली आहेत.



### कर आकारणी अशी

- राज्य सरकारच्या नियमानुसार मार्च २०२४ ते २६ पर्यत या गावांना ग्रामपंचायत काळातील कर आकारणी.
- येत्या आर्थिक वर्षात नवी मुंबई महापालिकेने निश्चित केलेल्या सामान्य कराच्या २० टक्के इतका आणि त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षात या गावांना २० टक्क्यांच्या प्रमाणात करात वाढ.
- नवी मुंबई महापालिका हद्दीतील रहिवाशांना ज्या प्रमाणात कराची आकारणी केली जाते त्या प्रमाणात कर रचनेत येण्यासाठी या गावांना चार वर्षांचा कालावधी.

### मालमत्तांचे नव्याने सर्वेक्षण

राज्य सरकारच्या नियमानुसार ग्रामपंचायत अथवा जिल्हा परिषदेत मोडणारी महसूली गावे महापालिका क्षेत्रात समाविष्ट केली गेल्यास सुरुवातीचे दोन वर्ष त्यांना आहे त्याप्रमाणेच मालमत्ता तसेच इतर करांची आकारणी होत असते. नवी मुंबई महापालिकेने मागील दोन वर्षात या गावांमधील मालमत्तांचे सर्वेक्षण केलेले नाही, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सर्वसाधारण सभेत दिली. येत्या आर्थिक वर्षात हे सर्वेक्षण सुरू केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. राज्य सरकारच्या कर आकारणीसंबंधी जे नियम आहेत त्यानुसार येथे मालमत्तांचे सर्वेक्षण करून आकारणी सुरु केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### गावांना सुविधा देण्याची मागणी

दरम्यान, या गावांमध्ये नागरी सुविधा सुरू केल्या जाव्यात या मागणीसाठी भरत कृष्णा भोईर आणि प्रतीक्षा जयेश पाटील या दोघा नगरसेवकांनी उपमहापौर दशरथ भगत यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे. त्यावर गावांमधील पाणी पुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण व्यवस्था उभी करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशा सूचना उपमहापौर भगत यांनी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना दिल्या.

# रुग्णालय रोखाल तर तुमची बेकायदा बांधकामे बाहेर काढीन

## आमदार मंदा म्हात्रे यांचा भाजप नगरसेवकांनाच इशारा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** नवी मुंबई परिसरात सुसज्ज रुग्णालय उभे राहण्यासाठी यापूर्वी सिडकोने वेळोवेळी भूखंड देण्याचे मान्य केले, परंतु मैदान, रुग्णालयासाठी आरक्षित असलेले भूखंड ठरावीक बिल्डरांना मिळावे यासाठी डाव टाकले गेले. भाजप नगरसेवकांनाच माझ्याविरोधात उभे करत शहरात मल्टी स्पेशलिटी रुग्णालय आणि महाविद्यालय उभारण्याचा प्रकल्प रोखण्याचा प्रयत्न वनमंत्री गणेश नाईक करत आहेत. मात्र मुख्यमंत्री माझ्या पाठीशी आहेत. ज्या नगरसेवकांना पुढे करून रुग्णालयाचा प्रकल्प रोखला जात आहे त्या नगरसेवकांची बेकायदा बांधकामे बाहेर काढल्याशिवाय मी गप्प बसणार नाही, असा थेट इशारा भाजपच्या बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी मंगळवारी सायंकाळी पत्रकार परिषदेत दिला.

बेलापूर सेक्टर-१५ अ मधील भूखंड क्रमांक ४ वर प्रस्तावित सुपर स्पेशालिटी रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीवरून नवी मुंबईत वाद तीव्र झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर हा प्रकल्प पूर्णत्वास नेणारच असा निर्धार म्हात्रे यांनी यावेळी व्यक्त केला.

नव्याने महापालिकेत समाविष्ट झालेल्या १४ गावांमध्ये आरोग्य सुविधांचा अभाव असल्याचा मुद्दा उपस्थित करत अपक्ष नगरसेवक भरत भोईर यांनी रुग्णालय त्या भागात हलवण्याची मागणी केली होती. त्यांच्या भूमिकेला सत्ताधारी भाजपमधील काही सदस्यांनी पाठिंबा दिल्याने प्रकल्पावरील मतभेद उघड झाले. यावर प्रतिक्रिया देताना आमदार म्हात्रे म्हणाल्या की तुम्ही १४ गावांत रुग्णालय उभारण्यास सांगत असाल तर नवी मुंबईकरांनी १४ गावांत जाऊन उपचार घ्यावेत का? सीबीडी परिसरात सुमारे १२ मैदाने असल्याचा दावा करत त्यांनी संबंधित ८ एकरचा भूखंडच का हवा असा सवालही विरोधकांना केला. रुग्णालयाला विरोध करणाऱ्या 'फोर्टी प्लस' ग्रुपच्या नावाखाली व्यावसायिक व्यवहार सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला.

रुग्णालयासाठी लागणारी किमान जागा द्यावी, अशी मागणी करत त्यांनी प्रकल्प विखंडित होऊ देणार नसल्याचे स्पष्ट केले. रुग्णालय पूर्ण झाल्यावर स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आयुक्तांशी चर्चा करून स्वतंत्र नियमावली तयार करण्यात येईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

प्रस्तावावर सखोल विचार करण्यासाठी तो आरोग्य समितीकडे वर्ग करण्यात आला आहे. मात्र, आरोग्य समितीच्या भूमिकेवर मंदा म्हात्रे यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करत रुग्णालय अद्याप झालेच नसताना आरोग्य समितीचा संबंधच येत नसल्याचे सांगितले. दरम्यान, गणेश नाईक समर्थकांकडून रात्री उशिरापर्यंत कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली नव्हती.

### मंदा म्हात्रे यांची आगपाखड

- मैदानाची मोठी जागा पूर्वी खासगी बांधकामासाठी देताना विरोध झाला नाही, मात्र सर्वसामान्यांसाठी सुसज्ज सरकारी रुग्णालय उभारण्यास विरोध का ?
- हिंमत असेल तर माझ्यासमोर येऊन लढा. दुसऱ्याच्या खांद्यावर बंदूक ठेवून लढू नका.
- कोविड काळातील परिस्थिती पाहून मी या रुग्णालयाचा प्रकल्प नवी मुंबईत आणला. प्रकल्पाला विरोधासाठी विरोध करणे चुकीचे आहे. हे रुग्णालय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्न आहे. त्यामुळे ते होणारच.
- महिला काम करते म्हणून तुमचे नाक कापले जाते का ? सभागृहात भाषा वापरताना भान ठेवले पाहिजे. मला कमी लेखू नका; मी कोणाला घाबरत नाही. जखम करा, पण चिमटे काढू नका.



## अंतरंग

### वादग्रस्त महासभेला सचिवांची दांडी

**नवी मुंबई :** महापालिकेच्या पहिल्याच महासभेत सचिव संघरत्ना खिल्लारे यांच्या कामकाजावरून निर्माण झालेला वाद सोमवारी अधिकच चिघळला. तहकूब सभेच्या नियोजनाबाबत माहिती न दिल्याचा आरोप करत विरोधकांनी सचिवांवर नियमबाह्य कामकाजाचा ठपका ठेवला. वृत्त...४

### करंजामध्ये ऐन परीक्षा काळात वीज खंडित

**उरण :** दहावी व बारावी या महत्त्वपूर्ण परीक्षा सध्या सुरू आहेत. याच काळात करंजा परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. याचा फटका येथील परीक्षार्थींना बसल्याने पालक संतप्त झाले. वृत्त...४

### खाडीतील भरावामुळे ताज्या मासळीत घट

**उरण :** उरण तालुक्यात माती भरावामुळे खाडीपट्ट्याचा बहुतांश भाग बुजवला गेला आहे. यामुळे येथे मिळणाऱ्या ताज्या मासळीत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. वृत्त...३

### माथाडी कामगारांचा १ मार्चपासून 'कामबंद'चा इशारा

**नवी मुंबई :** तुर्भे येथील एपीएमसी कांदा-बटाटा मार्केटमध्ये ५० किलोपेक्षा जादा वजनाच्या पोत्यांची आवक सुरूच असल्याचा आरोप करत माथाडी कामगार संघटनेने १ मार्च २०२६ पासून कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शासनाने निश्चित केलेली ५० किलो वजनमर्यादा काटेकोरपणे पाळावी आणि कामगारांच्या मूळ मजुरी दरात वाढ करावी, या मागण्यांसाठी संघटनेने व्यापाऱ्यांना पत्र दिले आहे.

शासनाच्या आदेशानुसार कोणत्याही मालाच्या पोत्यांचे वजन ५० किलोपर्यंत ठेवणे बंधनकारक आहे. जादा वजनामुळे कामगारांच्या गुडघे, मणके आणि शरीराच्या इतर भागांवर ताण येऊन आरोग्यावर परिणाम होत असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. ६० ते ७० किलो वजनाची पोती बाजारात येत असल्याच्या तक्रारी संघटनेकडे येत असल्याचे नमूद केले आहे.

# लॉन टेनिस मैदानाला अवकळा

## वाशीतील समस्येकडे महापालिकेच्या क्रीडा विभागाचे दुर्लक्ष

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** वाशी सेक्टर १० येथील महापालिकेच्या लॉन टेनिस मैदानाला अवकळा आली आहे. यामुळे क्रीडाप्रेमींमध्ये नाराजी आहे. शहरात खेळाची मैदाने वाचवण्यासाठी आंदोलन सुरू असताना प्रत्यक्षात उपलब्ध असलेल्या मैदानांच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे.

मिनी सीशोरसमोरील या प्रशस्त मैदानावर दररोज सकाळी लॉन टेनिस, बॅडमिंटन तसेच योग वर्ग घेतले जातात. मात्र मैदानाच्या कुंपणावर वाढलेल्या वेली, तुटलेले तारकंपाउंड आणि अस्वच्छ परिसर यामुळे देखभालीचा अभाव स्पष्ट होतो. याच ठिकाणी महापालिकेने उभारलेले टेबल टेनिस व स्नूकर कोर्ट सध्या वापरात नसल्याची स्थिती आहे.

माजी नगरसेवक अविनाश लाड आणि स्थानिक क्रीडाप्रेमी यांच्या प्रयत्नातून या ठिकाणी क्रीडा सुविधा उभारण्यात आल्या होत्या. कोट्यवधी रुपये खर्च करून सुविधा निर्माण केल्यानंतर त्यांची नियमित देखभाल न केल्याची टीका नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, शहरातील इतर मैदानांच्या वापराबाबतही वाद निर्माण झाले आहेत. बेलापूर येथील मैदान सुपर स्पेशालिटी शासकीय रुग्णालयासाठी देण्याच्या निर्णयाविरोधात आंदोलन झाले. खेळासाठी स्वतंत्र जागा राखीव ठेवावी, अशी मागणी विविध क्रीडा संघटनांनी केली आहे. शहराची 'फुफ्फुसे' मानल्या जाणाऱ्या मैदानांच्या देखभालीसाठी उद्यान, क्रीडा आणि शहर अभियंता विभागांमध्ये प्रभावी समन्वय आवश्यक असल्याची मागणी नागरिकांनी केली आहे.



वाशी येथील लॉन टेनिस मैदानात असलेल्या क्रीडा व्यवस्थेबाबत पाहणी करून योग्य ती सुधारणा करण्यात येतील. या ठिकाणी नवी मुंबईतील अतिशय चांगले असे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारण्याचे प्रस्तावित आहे.
– **अभिलाषा म्हात्रे,** उपायुक्त, क्रीडा विभाग

नवी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून या मैदानाबाबत योग्य ती व्यवस्था व काळजी घेण्याबाबत पालिकेकडे पाठपुरावा करण्यात येईल. या ठिकाणी चांगले खेळाची व्यवस्था निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून क्रीडा विभागामार्फत योग्य व्यवस्था ठेवण्यासाठी प्रयत्न केला जाईल.
– **सोनवी लाड,** नगरसेविका, क्रीडा समिती सदस्य

# फ्लेमिंगो दर्शनासाठी विशेष बोट, बस सफर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** फ्लेमिंगो दर्शनासाठी यंदापासून प्रथमच विशेष बस सुविधा सुरू करण्यात आली आहे. नेरूळ जेट्टी येथून डीपीएस, टी. एस. चाणक्य आणि एनआरआय परिसरातील पाणथळ भागांपर्यंत पर्यटकांना बसद्वारे नेण्यात येणार आहे. यासह भाऊचा धक्का ते नेरुळ जेट्टी दरम्यान जलवाहतूक सेवाही सुरू झाली आहे.

सिडकोमार्फत 'वॉटरफ्रंट एक्सपिरियन्सेस मुंबई प्रा. लि.' यांच्या माध्यमातून नेरूळ जेट्टीहून ऐरोली जेट्टी जैवविविधता केंद्रापर्यंत बोटसफारीची सोय करण्यात आली आहे. यामुळे बोटसफारीसह बससफारीची जोड मिळाली आहे. या बसचा रंगही फ्लेमिंगोंच्या रंगाशी साधर्म्य साधणारा गुलाबी आहे.

दरवर्षी मोठ्या संख्येने फ्लेमिंगोंच्या आगमनामुळे नवी मुंबईला 'फ्लेमिंगो सिटी' अशी ओळख मिळाली आहे. बेलापूर ते ऐरोलीदरम्यानच्या पाणथळ भागांत फ्लेमिंगो थांबतात.

यंदा गुजरातमधील कच्छ येथे त्यांचा मुक्काम वाढल्याने नवी मुंबईतील आगमन काहीसे उशिरा होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

**नेरूळ जेट्टीहून ऐरोली जेट्टी जैवविविधता केंद्रापर्यंत बोटसफारीची सोय करण्यात आली आहे . बसचा रंगही फ्लेमिंगोंच्या रंगाशी साधर्म्य साधणारा गुलाबी आहे .**



फ्लेमिंगो पाहण्यासाठी मुंबईतून भाऊचा धक्का ते नवी मुंबई नेरूळ जेट्टी येथे सुविधा सुरू केली आहे. तसेच फ्लेमिंगोंचा अधिवास असलेल्या अन्य ठिकाणीही बसद्वारे जाता येणार आहे. ऐरोली खाडीपर्यंतचे फ्लेमिंगोही बोट सफारीने पाहता येणार आहेत. त्यासाठी ठरावीक रक्कम आकारली जाणार आहे.
– **नितीन कदम,** व्यवस्थापक, वॉटरफ्रंट एक्सपिरियन्सेस मुंबई प्रा. लि.




# करिअर वृत्तांत

जे आपल्याला केवळ माहिती देत नाही तर आपले जीवन अस्तित्वात असलेल्या सर्वांशी सुसंगत बनवते ते म्हणजे सर्वोत्तम शिक्षण.
– रवींद्रनाथ टागोर

स्पर्धा परीक्षेच्या प्रांगणात
एमपीएससी
रोहिणी शहा

## राज्यसेवा मुख्य परीक्षा : सामान्य अध्ययन (पेपर दोन)

# आंतरराष्ट्रीय संघटना

**राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या सामान्य अध्ययन पेपर दोनच्या तयारीबाबत मागील लेखांमधून चर्चा करण्यात आली. या चर्चेच्या आधारे पेपर दोनमधील आंतरराष्ट्रीय संघटना या मुद्द्यावरील प्रश्नाचे उत्तर या लेखामध्ये पाहू.**

**प्रश्न: ''दहशतवाद हा जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी गंभीर धोका बनला आहे.'' या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवादविरोधी समिती ( उळउ) व तिच्या संलग्न संस्थांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करा. (१५ गुण २५० शब्द)**

**प्रश्नाचे विश्लेषण–**

प्रश्नामुळे मुद्दे आधी समजून घेऊ. जागतिक शांतता आणि सुरक्षेसाठी दहशतवादाचा धोका; याबाबत दहशतवाद विरोधी समिती व तिच्या संलग्न संस्थांची परिणामकारकता आणि तिचे मूल्यमापन. या तीन मुद्द्यांवर आधारित उत्तर लिहिताना पुढील पायऱ्या वापरता येतील.

- जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी दहशतवाद कशाप्रकारे गंभीर धोका बनला आहे, यावर थोडक्यात भाष्य करा.
- संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची दहशतवादविरोधी समिती ( CTC) आणि तिच्या संलग्न संस्थांची आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवाद रोखण्यातील व त्याचे शमन करण्यातील भूमिका स्पष्ट करा.
- समितीच्या दहशतवादविरोधी प्रयत्नांपुढील आव्हानांचे विश्लेषण करा.
- उळउच्या कार्यक्षमतेच्या मूल्यमापनावर भर देणे आवश्यक आहे. त्यामुळे उपाययोजना थोडक्यात सुचवून उत्तराचा समारोप करा.

**उत्तर:**

दहशतवाद म्हणजे राजकीय किंवा सामाजिक उद्दिष्टांसाठी हिंसा व भीतीचा वापर. आज तो जागतिक शांतता, आर्थिक स्थैर्य व सामाजिक सलोखा यांना गंभीर धोका निर्माण करतो. उदा. २००८ मुंबई हल्ल्यांमुळे भारताला सुमारे २ अब्ज डॉलर्सचे आर्थिक नुकसान झाले. ISIS च्या उदयामुळे मध्यपूर्वेत लाखो लोक विस्थापित झाले. तसेच, क्राइस्टचर्च (२०१९) घटनेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर धार्मिक तणाव वाढवला.



अमेरिकेतील २००१ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर, आंतरराष्ट्रीय दहशतवाद रोखण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने दहशतवादविरोधी समितीची ( CTC) स्थापना केली.

**CTC ची भूमिका व परिणामकारकता:**

- **सदस्य राष्ट्रांना कायदेशीर चौकट मजबूत करण्यासाठी मार्गदर्शन:** दहशतवादाला निधीपुरवठा हा गुन्हा ठरविणे, मालमत्ता गोठविणे यासाठी सदस्य राष्ट्रांना कायदे करण्यात मार्गदर्शन.
- **आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे:** गुप्त माहितीची देवाणघेवाण व संयुक्त कारवाया सुलभ करण्यासाठी सदस्य राष्ट्रांमध्ये समन्वय साधणे
- **प्रशिक्षण आणि क्षमता विकास:** सदस्य राष्ट्रांच्या अंमलबजावणी यंत्रणेसणप्रशिक्षण व तांत्रिक मदत करणे.
- **प्रतिबंधात्मक निर्बंधांची अंमलबजावणी:** आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांवर प्रवासबंदी, शस्त्रबंदी लागू करणे.
- **वित्तीय कारवाई कृती दल ( FATF) आणि इंटरपोलबरोबर समन्वय:** दहशतवादी वित्तपुरवठ्यावर नियंत्रण साधणे.

**मर्यादा व आव्हाने:**

- **राजकीय मतभेद:** स्थायी सदस्यांच्या नकाराधिकारामुवळे ठोस कारवाईत अडथळे. उदा. सिरीयाबाबत रशिया व चीनचा नकाराधिकार
- **सार्वभौमत्वाचा प्रश्न:** सदस्य राष्ट्रांचा अंतर्गत कायदा निर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत बाह्य हस्तक्षेपास विरोध.
- **संसाधनांची कमतरता:** विकसनशील देशांत अंमलबजावणीत अडचणी.
- **तंत्रज्ञानाचा दुरुपयोग:** एनक्रिप्टेड प्लॅटफॉर्मचा वापर केल्यने दहशतवादी कारवायांवर नियंत्रण आणण्यात अडचणी.
- **मानवाधिकार संतुलन:** कठोर कायद्यांमुळे नागरिकांच्या अधिकारांवर मर्यादा. उदा. वAPA किंवा AFSPA कायदे
- **दहशतवादाचे बदलते स्वरूप:**

पारंपरिक संघटित गटांऐवजी स्थानिक पातळीवरील लोन-वुल्फ हल्ले - तपासात अडचणी

एकूणच, CTC ने आंतरराष्ट्रीय चौकट उभी केली असली तरी प्रभावी अंमलबजावणी व राजकीय एकमत यांवर तिचे यश अवलंबून आहे. यासाठी बहुपक्षीय सहकार्य, समन्वय, तंत्रज्ञानाच्या आधारे देखरेख, जनजागृती आणि मानवाधिकारांचा सन्मान राखणारी धोरणे आवश्यक आहेत.

**स्पष्टीकरण**

पूर्ण वाक्य आणि फक्त मुद्दे अशा दोन्ही वाक्यरचनांचा वापर केल्याने कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त मुद्दे मांडणे शक्य झाले आहे.

वेगवेगळ्या दहशतवादी कारवायांमुळे जागतिक शांतता सुरक्षितता यांना निर्माण झालेले धोके उदाहरणे दिल्यामुळे थोडक्यात पण स्पष्टपणे मांडता आले आहेत.

दहशतवाद विरोधी समितीचे मूल्यमापन करताना सकारात्मक मुद्दे आणि मर्यादा या दोन्हीबाबत मुद्दे मांडणे आवश्यक होते. अतिरिक्त शब्द वापरावे लागू नयेत यासाठी हे लक्षात घेऊन सर्व महत्त्वाचे मुद्दे क्रियापदांचा वापर न करता मांडले आहेत.

शक्य तेथे उदाहरणे दिल्यामुळे उत्तराची परिणामकारकता वाढली आहे.

समारोप करताना मूल्यमापनाचा निष्कर्ष मांडून परिणामकारकता वाढविण्यासाठीचे उपाय थोडक्यात मांडले आहेत. यामुळे उत्तराचा भर मूल्यमापनावरच ठेवता आल्याचे लक्षात येते.

steelframe.india@gmail.com

# कर्मचाऱ्यांची वार्षिक परीक्षा!

**कामगिरीचे वार्षिक अवलोकन ही कर्मचाऱ्यांसाठी स्वत:कडे मागे वळून बघण्याची उत्तम संधी असते. मानसशास्त्रानुसार कामगिरीचे विश्लेषण आणि सुधारणा करण्यासाठी केलेल्या विचारपूर्वक योजना प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतात.**



कौशल्य तंत्र
सलील चिंचोरे

**मार्च महिना** येऊ घातला की कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्यातील वेतन वाढ व प्रमोशनचे वेध लागतात. मार्च महिना हा वित्तीय वर्षातील अखेरचा महिना. मार्च महिन्याअखेरीस कंपनीच्या वित्तीय कामगिरीचा आढावा तर घेतला जातोच; तसेच कर्मचाऱ्यांच्या वार्षिक कामगिरीचेही अवलोकन केले जाते. या पद्धतशीर मार्गाला परफॉर्मन्स अप्रेजल म्हणतात. कर्मचाऱ्यांच्या वार्षिक अवलोकनाचे खास महत्त्व असते. कर्मचाऱ्यांच्या कामगिरीनुसार त्यांना परफॉर्मन्स रेटिंग दिले जाते. यानुसार कर्मचाऱ्यांसंबंधीचे वेतनवाढ, प्रमोशन, बदली, बोनस असे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जातात.

म्हणून प्रत्येक कर्मचारी वर्षाअखेरीस आपल्या कामाला रंगरंगोटी करून तिला आकर्षक स्वरूपात बॉससमोर सादर करतो. परफॉर्मन्स अप्रेजल मीटिंगमध्ये आपल्या कामगिरीची बॉसवर छाप पाडून चांगले रेटिंग मिळवण्याचा हा प्रयत्न असतो. काही वेळेला हा प्रयत्न फलद्रूप होतो तर काहीदा तो चक्क फसतो. कारण बॉसने कर्मचाऱ्यांबरोबर वर्षभर खांद्याला खांदा लावून काम केलेले असते. कर्मचाऱ्यांच्या कामातील खाचाकोचा, उणीवा, कर्मचाऱ्यांचा स्वभाव बॉसला चांगला ठाऊक असतो. बॉसपुढे कितीही अतिशयोक्तीपूर्ण सादरीकरण केले तरी प्रत्येक कर्मचाऱ्याला स्वत:च्या कामगिरीची यथार्थ जाणीव असते. पण त्याला रंगरंगोटी करण्याच्या नादात आपण त्यातील सत्व हरवून बसतो.

आज आपण याच गोष्टीकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून बघू. कामगिरीचे वार्षिक अवलोकन ही कर्मचाऱ्यांसाठी स्वत:कडे मागे वळून बघण्याची उत्तम संधी असते. मानसशास्त्रानुसार कामगिरीचे विश्लेषण आणि सुधारणा करण्यासाठी केलेल्या विचारपूर्वक योजना प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतात. प्रत्येक कसलेला खेळाडू मॅच संपल्यावर आपल्या कोचबरोबर बसून मॅचचे व स्वत:च्या कामगिरीचे सखोल विश्लेषण करतो. त्यातून हाती येणाऱ्या त्रुटींवर भर देऊन सराव करतो. त्यामुळे त्या खेळाडूला पुढच्या मॅचसाठी अधिक चांगले तयार होण्यासाठी मदत होते. बऱ्याचदा आपली कामगिरी फुगवून सांगण्याच्या नादात आपण स्वत:ला आरशात बघण्याचे विसरतो. यावेळेस परफॉर्मन्स रिव्ह्यूसाठी नेहमीचे पवित्रे सोडून तुम्ही स्वत:चे कठोर मूल्यमापन करा. त्यासाठी मदत म्हणून तुम्हाला मी काही प्रश्न देतो आहे. त्या प्रश्नांची उत्तरे तुम्ही स्वत:च स्वत:साठी शोधू शकता -

- गेल्या वर्षात वर्षभरात कोणती टार्गेट्स मी पार केली? ते कशामुळे साध्य झाले?
- कोणती टार्गेट्स पार करण्यात मला अपयश आले? त्याची कारणे काय?
- गेल्या वर्षभरात मला कोणत्या अडचणी आल्या? त्यांचा सामना मी कसा केला?
- माझा बॉस व इतर वरिष्ठांनी मला कोणता फीडबॅक दिला? त्याला मी कसा प्रतिसाद दिला?
- माझ्या कामगिरीवर मी पूर्णत: समाधानी आहे का? नसल्यास त्यात कुठे कमतरता जाणवते आहे?
- गेल्या वर्षभरात इतर सहकाऱ्यांबरोबरचे संबंध कसे होते? ते सुधारण्यासाठी मी कोणते प्रयत्न केले?
- गेल्या वर्षात मी काय नवीन शिकलो? त्याचा वापर मला पुढे कसा करता येईल?
- येत्या एक-दोन वर्षातील माझी करिअरची उद्दिष्टे कोणती?
- त्यासाठी येत्या वर्षात मला कोणत्या नवीन गोष्टी अनुभवायच्या अथवा शिकायच्या आहेत?



- सर्व गोष्टींचा सारासार विचार करता पुढच्या वित्तीय वर्षात माझ्या कामाविषयी व करिअरविषयी मी (अ) कोणत्या गोष्टी नव्याने चालू करणार? (ब) कोणत्या गोष्टी अधिक सातत्याने करत राहणार? व (क) कोणत्या गोष्टी कटाक्षाने टाळणार?

या प्रश्नांवर विचार करून त्याची तुमच्या बॉसबरोबर मोकळेपणाने चर्चा करा. सहेतुक केलेली चर्चा निश्चितच पुढील मार्ग दर्शवेल. स्वत:च्या कामगिरीची तुलना तुमच्या सहकाऱ्यांच्या कामगिरीशी करण्याचे टाळा.

बहुतांशी कर्मचाऱ्यांना वाटत असते की आपल्या करिअरची सगळी जबाबदारी कंपनीची आहे. माझ्या भवितव्याचा विचार माझ्या बॉसने आणि कंपनीने करावा. मी पुढे काय करावे, कसे काम करावे हे त्यांनीच ठरवावे. ही धारणा संपूर्णपणे चुकीची आहे. आपल्या कामगिरीची व करिअरची जबाबदारी आपली आहे. विचार-विश्लेषण करून पुढील मार्गही आपल्यालाच आखायचा असतो. त्यासाठी कंपनी व कंपनीतील वरिष्ठांचे मार्गदर्शन घ्यायचे असते.

कंपनी तुमच्या करिअरच्या रथाचे सारथ्य करत असेल तरी तुमचे युद्ध तुम्हीच लढायचे व जिंकायचे असते.

chinchoresalil@gmail.com
(लेखक मनुष्यबळ क्षेत्रातील तज्ज्ञ असून या क्षेत्रात २५ वर्षे कार्यरत आहेत)

# ॲनिमेशन : मानवी सर्जनशीलतेचा शोध

चौकटी-पल्याड
आशुतोष शिर्के
रश्मी पटवर्धन

**ॲनिमेशन म्हणजे जगाकडे नव्या नजरेने पाहायला शिकणे. ॲनिमेशन ही कला आहे, ती मानवी निरीक्षणातून जन्माला येते. एखाद्या चेहऱ्यावरचा क्षणिक भाव, संध्याकाळच्या प्रकाशाचा रंग किंवा शांततेतही घडणारी कथा – हे सगळं पाहण्याची आणि समजण्याची क्षमता सॉफ्टवेअर देऊ शकत नाही.**



**गेल्या दोन** दशकांत ॲनिमेशन ही केवळ मनोरंजनाची शाखा राहिलेली नाही. ॲनिमेशन हे जगाच्या सांस्कृतिक, शैक्षणिक आणि तांत्रिक परिवर्तनाच्या केंद्रस्थानी जाऊन बसले आहे. चित्रपट, वेबसीरिज, गेमिंग, इंजिनीअरिंग, आर्किटेक्चर, वैद्यकीय सिम्युलेशन, व्हर्च्युअल रिॲलिटी या सर्व क्षेत्रामध्ये ॲनिमेशनचा वापर वाढतो आहे. त्यामुळे जगभरातील विद्यापीठे ॲनिमेशन क्षेत्राकडे गंभीरपणे पहात आहेत. ॲनिमेशन शिक्षणाचा अर्थ आपण बऱ्याच वेळेला केवळ 'सॉफ्टवेअर किंवा तंत्र शिकणे' असा घेतो. परंतु खरे तर ॲनिमेशन म्हणजे जगाकडे नव्या नजरेने पाहायला शिकणे.

बहुतेक भारतीय विद्यार्थ्यांच्या मनात ॲनिमेशन शिक्षण म्हटलं की अमेरिका किंवा युरोप हेच पर्याय येतात. कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स, न्यूयॉर्क फिल्म अकॅडमी, शेरिडन कॉलेज (कॅनडा), गोबलिन्स (फ्रान्स) आणि रॉयल कॉलेज ऑफ आर्ट (यूके) या संस्था जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहेत यात शंकाच नाही. या ठिकाणी विद्यार्थ्यांना ॲनिमेशन उद्योग जगतात काम करणारे नामांकित कलाकार आणि दिग्दर्शक शिकवतात. ते विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक कौशल्य देत नाहीत, तर 'दृश्य विचार' करण्याची क्षमता विकसित करतात - कथा, प्रकाश, रंग आणि भावना यांचा परस्परसंबंध समजावतात.

## गायत्रीचा प्रकाश, सावल्या आणि स्वप्नांचा प्रवास

गायत्री अंकम आज कॅनडात आहे. ॲनिमेशनच्या जगात तिने स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. पण हे स्थान तिला सहज मिळालेलं नाही. एआयच्या वेगवान लाटेमुळे तिच्या क्षेत्रात निर्माण झालेली अस्थिरता, बदलणाऱ्या कौशल्यांची मागणी आणि परदेशात स्वतःला सतत सिद्ध करण्याची गरज - या सगळ्यांशी सामना करत ती अजूनही तिच्या सर्जनशीलतेला धरून उभी आहे. तिच्यासाठी ही केवळ नोकरी नाही, तर तिच्या वेडासाठी तिने मोजलेली किंमत आहे.



ही कथा सुरू होते मुंबईतल्या सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट्सच्या वर्गात. रंग, प्रकाश आणि सावल्यांच्या सूक्ष्म नात्याने तिला तेव्हाच भुरळ घातली होती. पडद्यावर दिसणाऱ्या जगामागचं गूढ तिला खुणावत होतं. त्या खुणेचा पाठलाग करत ती न्यूयॉर्क फिल्म अकॅडमीपर्यंत पोहोचली आणि तिथे तिच्यासाठी एक नवं विश्व उघडलं.

इथे तिला शिकवणारे शिक्षक केवळ प्राध्यापक नव्हते; तेच ते लोक होते ज्यांनी तिच्या लहानपणी तिला भुरळ घालणाऱ्या चित्रपटांच्या जगाची निर्मिती केली होती. ज्यांची नावे तिने पडद्यावर वाचली होती, तेच आता तिचे मार्गदर्शक होते. त्यांनी तिला केवळ सॉफ्टवेअर शिकवलं नाही, तर 'प्रकाश हा कथा सांगतो' हे शिकवलं. तांत्रिक कौशल्य आणि कलात्मक दृष्टी यांचा संगम म्हणजेच खऱ्या अर्थाने ॲनिमेशन, हे तिला तिथे उमगलं.

अमेरिकेत शिकताना आणि नंतर टीचिंग असिस्टंट म्हणून काम करताना तिची ओळख केवळ विद्यार्थिनी म्हणून राहिली नाही; ती त्या विद्यापीठाच्या सर्जनशील परंपरेचा एक भाग बनली. पुढे कॅनडात बार्डेल एंटरटेनमेंटमध्ये तिचं काम होतं नेटफ्लिक्स, डिस्ने आणि अमेझॉन प्राइममधील विविध ॲनिमेटेड दृश्यांना प्रकाश आणि कॉम्पोझिटिंगच्या माध्यमातून जिवंत करणं.

आज ती पुन्हा नव्या तंत्रज्ञानाकडे वळते आहे. परदेशी विद्यापीठातील शिक्षण आणि अनुभवातून ती एक महत्त्वाची गोष्ट शिकली - ॲनिमेशन ही केवळ करिअरची वाट नाही, तर सतत स्वतःला नव्याने घडवत राहण्याची एक जिवंत प्रक्रिया आहे.

पण ॲनिमेशनचं विश्व केवळ पाश्चिमात्य देशांपुरतं मर्यादित नाही. ॲनिमेशन क्षेत्रामध्ये जपान अग्रेसर मानला जातो. टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ द आर्ट्स आणि क्योटो सेइका युनिव्हर्सिटीसारख्या संस्थांनी 'ॲनिमे' या विशिष्ट शैलीला जागतिक प्रतिष्ठा मिळवून दिली. जपानी शिक्षणपद्धतीत निरीक्षण, संयम आणि सूक्ष्म भावनांचं चित्रण यावर भर दिला जातो. चीनमध्येही बीजिंग फिल्म अकॅडमी आणि चायना ॲकॅडमी ऑफ आर्टसारख्या संस्थांनी ॲनिमेशनमध्ये मोठी प्रगती केली आहे. तिथे पारंपरिक चीनी कलेचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम घडवण्यावर भर दिला जातो. दक्षिण कोरिया आणि सिंगापूर हे देशही या क्षेत्रात झपाट्याने पुढे येत आहेत.

आज एआयमुळे या क्षेत्रात मोठा बदल होत आहे. काही वर्षांपूर्वी ज्यासाठी तासन्तास मेहनत लागायची, ती कामं आता काही मिनिटांत होतात. त्यामुळे अनेकांना वाटतं की ॲनिमेशनमध्ये माणसाची गरज कमी होईल. काही प्रमाणात हे खरे आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये जगभर ॲनिमेशन क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. परंतु ॲनिमेशन तयार करण्याच्या प्रक्रियेतील माणसाचे स्थान गेले आहे असे यामुळे आपण म्हणू शकतो का? एआय दृश्य तयार करू शकतो, पण तो अनुभव तयार करू शकत नाही. भावना, सूक्ष्मता आणि कथेला दिशा देण्याची क्षमता ही माणसाकडेच असते. एआय हे एक साधन आहे; कलाकार हा त्याचा सर्जक आहे. म्हणूनच जगातील सर्वोत्तम विद्यापीठांमध्ये आजही सॉफ्टवेअरला जितकं महत्त्व दिलं जातं तितकंच महत्त्व ड्रॉइंग, स्केचिंग, फोटोग्राफी, सिनेमाचा अभ्यास, मानसशास्त्र आणि कथाकथन यांना दिलं जातं.

ॲनिमेशनमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतःला केवळ 'तंत्रज्ञ' म्हणून नव्हे, तर 'कलाकार' म्हणून घडवणं आवश्यक आहे. सॉफ्टवेअर बदलतील, एआय विकसित होईल, पण मानवी कल्पनाशक्ती आणि संवेदनशीलता हीच या क्षेत्राची खरी ताकद राहील. ॲनिमेशनचं शिक्षण म्हणजे एका साधनाचं प्रशिक्षण नव्हे; ते म्हणजे स्वतःची वेगळी दृष्टी शोधण्याचा आणि जगाला नव्या पद्धतीने व्यक्त करण्याचा प्रवास आहे.

mentorashutosh@gmail.com
(लेखक करिअर समुपदेशक आहेत.)

## शब्दकोडे- ३५०



**आडवी विधाने :** (१) ज्याची कल्पना येणार नाही असे (४) पुष्कळ, खूप
(७) XX गबाले - हे मराठी चित्रपट दिग्दर्शक व निर्माते होते
(८) गडबड, गोंधळ
(९) त्रास, श्रम
(११) कोळिष्टक (१३) आड लपून बसणे
(१५) हात, सरकारी देणे
(१६) पळसाचा डिंक
(१८) दागदागिने, अलंकार
(१९) वटवृक्ष
(२१) दहावी तिथी, दुधात पीठ भिजवून केलेली पोळी (२२) प्रवृत्ती, झोक
(२४) गोधडी (२६) दुर्लक्ष, क्षमा
(२७) बोभाटा, गाजावाजा
(२९) छाया, प्रतिबिंब
(३०) मालक, नवरा (३३) कुसुम, पुष्प
(३५) संपूर्ण, फलद्रूप
(३६) चिन्ह, गुणधर्म
(३७) एक कीटक
(३८) सत्कृत्य, सत्कर्माचे फळ

**उभी विधाने :** (१) शासन नसलेली स्थिती (२) पंकज, सरोज
(३) पिकांचा अंदाज
(४) मजुरांवर देखरेख करणारा अधिकारी
(५) दुर्गुण, वाईट सवय
(६) तापाची पूर्वचिन्हे
(१०) नवऱ्याचा भाऊ
(१२) वालुकामय प्रदेश
(१४) पायऱ्या असलेली विहीर
(१६) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक प्रमुख प्रशासकीय तालुका (१७) कठोर, कडक
(१८) सारांश, उद्देश (२०) पंक्ती, रांग
(२१) गरम मसाल्यातला एक पदार्थ
(२३) खांबावर आडवी टाकलेली तुळई
(२५) मुसलमानी धर्मसूत्र
(२७) दुधाचा व्यवसाय करणारा
(२८) निरर्थक, फोल (३१) पाणी, नीर
(३२) लक्षात न घेण्यासारखा
(३४) शंभर हजार, चित्त
(३५) पावसाची झड, ओवलेल्या फुलांचा हार

– चारू नानल

## सुडोकू - ३५०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | ८ |
| | ६ | ४ | १ | | ३ | २ | ९ | |
| | ७ | | ४ | | ८ | | १ | |
| | ८ | २ | ५ | | ७ | १ | ३ | |
| | | | | १ | | | | |
| | १ | ३ | २ | | ६ | ५ | ४ | |
| | २ | | ७ | | ५ | | ८ | |
| | ४ | ७ | ८ | | ९ | ६ | ५ | |
| ५ | | | | | | | | ३ |

## सुडोकू - ३४९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ९ | ३ | १ | ८ | २ | ४ | ५ | ७ |
| १ | ८ | ४ | ३ | ७ | ५ | ९ | ६ | २ |
| ५ | २ | ७ | ६ | ४ | ९ | १ | ३ | ८ |
| ३ | ५ | २ | ४ | १ | ७ | ८ | ९ | ६ |
| ७ | १ | ६ | २ | ९ | ८ | ५ | ४ | ३ |
| ८ | ४ | ९ | ५ | ६ | ३ | ७ | २ | १ |
| ४ | ७ | ८ | ९ | ३ | ६ | २ | १ | ५ |
| ९ | ६ | ५ | ७ | २ | १ | ३ | ८ | ४ |
| २ | ३ | १ | ८ | ५ | ४ | ६ | ७ | ९ |

## शब्दकोडे - ३४९ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | ल्हा | द | के | श | व | अ | त्रे | | ट |
| स्ता | | वा | दा | | र | | धा | म | ण |
| व | सा | | र | स | दा | र | | हा | क |
| ना | र | ळ | | क | न | का | च | ल | |
| | थी | | व | र्म | | ना | ल | | यं |
| कुं | | पा | | क | था | | न | म | दा |
| भ | र | व | सा | | ट | क | | त्स्य | |
| | ता | स | का | टा | | ट | च | | क |
| का | ळे | | र | | प | रा | व | लं | बी |
| थ्या | | ठा | णे | दा | र | | ळी | | र |

# उरण खाडीतील भरावामुळे ताज्या मासळीत घट

## स्थानिक व्यावसायिकांना फटका

लोकसत्ता प्रतिनिधी

**उरण :** उरण तालुक्यातील खाडीक्षेत्रात विकासाच्या नावाखाली होत असलेल्या माती भरावामुळे खाडीपट्टयाचा बहुतांश भाग बुजवला गेला आहे. यामुळे येथे मिळणाऱ्या ताज्या मासळीत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. आवक घटल्याने मासळीच्या दरात वाढ झाली आहे. याचा फटका येथील स्थानिक व्यवसायिकांना बसत असून अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे.

उरण तालुका हा खाडी किनाऱ्यावर असल्याने येथील मुख्य व्यवसाय हा शेती होता. तर शेतीला जोड म्हणून शेतकरी मासेमारीचा व्यवसाय करीत आहेत. समुद्रातून येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाबरोबर येणारी विविध प्रकारची ताजी मासळी येथील खाडीतून मिळते. मात्र गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या विकास कामांसाठी येथील नैसर्गिक खाडीत मातीचा भराव टाकून बंद किंवा मार्ग बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे समुद्रातील पाण्याचा प्रवाह घटला आहे. परिणामी मासळीचे प्रमाण ही घटले आहे. ताजी मासळी मिळत असल्याने त्याचे दर ही कमी होते. मात्र आता मासळी मिळत नसल्याने येथील स्थानिक मासेमारी करणाऱ्यांवरही उपासमारीचे संकट आले आहे.

**अधिक पैसे मोजण्याची वेळ**

येथील खाडी किनाऱ्यावर आणि चिखलात निवटे, खरब्या, खुबे, माकोल, कोळीम, ताजी कोलंबी आदी प्रकारचे मासळीचे प्रमाण मोठे होते. यापैकी अनेक प्रकारची मासळी ही हंगामी असली तर मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत होती. स्थानिक मासळीचे प्रमाण कमी झाल्याने मासळीच्या दरात प्रचंड वाढ झाली असून परंपरागत खाद्य असलेल्या मासळीला अधिकचे पैसे मोजावे लागत असल्याची माहिती उरणमधील स्थानिक संदेश पाटील यांनी दिली आहे.



### जैवविविधता धोक्यात

किनाऱ्यावरील वाढत्या तेल तवंगामुळे जैवविविधता धोक्यात आली आहे. यामुळे येथील स्थानकांच्या मासेमारी व्यवसायावरही परिणाम होत असून समुद्राच्या पाण्याबरोबर वाहून आलेला हा काळ्याकुट्ट तवंग किनारपट्टीवरील खडकावर पसरला आहे. या तेलतवंगातून खारफुटीची झाडेही सुटलेली नाहीत. याकडे प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि स्थानिक प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप येथील नागरिक करत आहेत. समुद्रात चालणारी प्रवासी तसेच मालवाहू जहाजातून मोठ्या प्रमाणात बाहेर पडणाऱ्या तेलामुळे किनारपट्टीही धोक्यात आली आहे.

# मारहाणप्रकरणी चौघांना अटक

**नवी मुंबई :** दोन दिवसांपूर्वी कोपरखैरणेतील हाणामारीत दोन जखमी झाल्याची घटना ताजी असतानाच सोमवारी दिघा स्टेशनजवळ मारहाणीचा प्रकार घडला. याप्रकरणी चौघांना ताब्यात घेतले.

करण शिंगे, सनी गौड, सुरज याव, ओंकार बापकर आणि अन्य आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सोमवारी रात्री दीडच्या सुमारास दिघा स्टेशनजवळ गणेश ढोहरे या युवकाला आरोपींनी बेदम मारहाण केली. शस्त्राने त्याच्यावर वार करून सर्व जण पळून गेले. याबाबत माहिती मिळताच रबाळे एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत गणेश याला रुग्णालयात दाखल केले. दरम्यान वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील वाघमारे यांनी तात्काळ शोध पथके नेमून चौघांना अटक केली.

# वाशीतील मैदाने मद्यपींच्या गराड्यात

लोकसत्ता प्रतिनिधी

**नवी मुंबई :** महापालिका क्षेत्रात पालिकेची एकूण ७८ मैदाने असून त्यात २८ शाळेची मैदाने आहेत. महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण व राजीव गांधी या मैदानावर पालिकेची सुरक्षा व्यवस्था आहे. मात्र वाशीसारख्या मध्यवर्ती व गजबजलेल्या विभागात असलेली मैदाने तळीरामांकडून मद्यप्राशन करण्याचे ठिकाणे बनले आहे. दिवसाढवळ्या असे प्रकार घडत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

वाशी सेक्टर १ ए परिसरात नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान आहे. परंतु याच मैदानाच्या बाहेर मुख्य रस्त्यावरच मद्य प्राशन करून बाटल्या ठेवण्यात येतात. याच खेळाच्या मैदानासमोर इंडियन एज्युकेशन सोसायटीची शाळा आहे. तर काही अंतरावरच वाशी पोलीस ठाणे आहे.

या मैदानावर दिवसा तसेच रविवारी सुट्टीच्या दिवशी खेळण्यासाठी मुलांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. रविवारी तर शहरातील विविध भागातून येथे क्रिकेटचे सामने भरवले जातात. याच मैदानाच्या बाहेर लगतच भाजी मार्केट तसेच मासळी मार्केट आहे. त्यामुळे रहदारीच्या या मुख्य रस्त्यालगतच मद्यप्राशन होत असल्याने लहान मुले, त्यांना घेऊन येणाऱ्या पालकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत शहरातील मैदाने ही सर्वांसाठी खुलीच असतात. त्यामुळे या खेळाच्या मैदानांवर घडणाऱ्या घडामोडी, तसेच वापरावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याचे स्थानिक महेश पाटील यांनी सांगितले.

> नवी मुंबई शहरातील खेळांच्या मैदानांमध्ये तसेच मैदानाबाहेर गैरप्रकार होत असतील तर याबाबत पाहणी केली जाईल. पोलिसांनीही याबाबत पाहणी करणे आवश्यक आहे.
> – **सुखदेव येडवे**, सहाय्यक आयुक्त, वाशी

> नवी मुंबई शहरातील विविध उद्याने तसेच मैदानांमध्ये चुकीचे प्रकार होत असतात. त्यामुळे याबाबत नवी मुंबई पोलीसांकडून पेट्रोलिंगच्या माध्यमातून अशा सार्वजिनक जागांच्या ठिकाणी गस्त वाढवून योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या जातील.
> – **पंकज डहाणे**, पोलीस उपायुक्त परिमंडळ –१

# रुग्णालयाच्या नावाने ऑनलाइन फसवणूक

लोकसत्ता प्रतिनिधी




**पनवेल :** रुग्णालयाच्या नावाचा गैरवापर करून ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक फसवणूक झाली. कर्नाटक येथील एका प्रसिद्ध आयुर्वेद रुग्णालयात उपचार घेण्यासाठी माहिती शोधत असताना कळंबोलीतील ज्येष्ठाने ऑनलाइन व्यवहारात तब्बल ६ लाख ४० हजार रुपये गमावले.

कळंबोली येथील सेक्टर १ मधील सोसायटीत राहणारे ६० वर्षीय ज्येष्ठ नागरिक उपचारांसाठी कर्नाटक राज्यातील नागरमोळी येथील एका रुग्णालयाची माहिती इंटरनेटवर शोधत होते. या वेळी रुग्णालयाच्या अधिकृत संकेतस्थळासारखे दिसणाऱ्या एका बनावट संकेतस्थळावरून त्यांचा संपर्क दोन संशयित व्यक्तींशी झाला. संशयितांनी पीडित ज्येष्ठ नागरिकांच्या मोबाइलवर 'डॉट एपीके' स्वरूपाची फाइल पाठवून ती डाऊनलोड करण्यास भाग पाडले. त्या फाइलमधील लिंकद्वारे बँक खात्यातून ६ लाख ४० हजार रुपयांची रक्कम अन्य खात्यात वर्ग करण्यात आली.

नंतर पीडितांनी मूळ रुग्णालयाशी थेट संपर्क साधला असता, कोणतीही रक्कम प्राप्त झाली नसल्याचे स्पष्ट झाल्याने फसवणूक उघडकीस आली. त्यानंतर ज्येष्ठ नागरिकांनी कळंबोली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

# महामार्गावर डिझेल लूट

**पनवेल :** परिसरातील महामार्गांवर उभ्या केलेल्या ट्रेलरमधून तब्बल अडीचशे लिटर डिझेलची चोरी झाली. ही घटना सोमवारी पहाटे कळंबोली सर्कल ते जेएनपीटी महामार्गावर घडली.

पनवेलझ्जेएनपीटी महामार्ग तसेच मुंबईझ्पुणे द्रुतगती महामार्गालगत अनेक ट्रेलर आणि ट्रक चालक रात्रीच्या वेळी विश्रांतीसाठी आपली वाहने उभी करतात. मात्र वारंवार महामार्गावर डिझेल चोरीचे प्रकार घडू लागल्याने पोलिसांसमोर आव्हान उभे राहिले आहे.

या प्रकरणी २९ वर्षीय ट्रेलर चालक राजकुमार यादव यांनी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तक्रारीनुसार, यादव यांनी कळंबोली सर्कलवरून जेएनपीटीकडे जाणाऱ्या सेवा रस्त्यावर त्यांचा ट्रेलर विश्रांतीसाठी उभा केला होता. सोमवारी पहाटे सुमारे पावणे पाच वाजण्याच्या सुमारास तीन अनोळखी व्यक्तींनी ट्रेलरच्या डिझेल टाकीचे कुलूप तोडून त्यामधील अंदाजे २५० लिटर डिझेलची चोरी केली. या प्रकरणी २२,५०० रुपयांचे डिझेल चोरीला गेल्याची नोंद कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली.

# कोपरखैरणेत रोकड लंपास

**नवी मुंबई :** कोपरखैरणे येथे पार्क केलेल्या दुचाकीच्या डिक्कीत ठेवलेले ३ लाख २० हजार रुपयांचे पाकीट लंपास केले. जयदीप उजगरे हे कोपरखैरणेत राहणारे असून त्यांनी त्यांच्या दुचाकीच्या डिक्कीत ३ लाख २० हजारांची रोकड असलेले पाकीट ठेवले होते. डिक्कीला कुलूप असल्याने त्यांनी दुचाकी सेक्टर पाच येथील रस्त्यावर पार्क केली. दुपारी केवळ १४ मिनिटे गाडी त्यांच्या नजरेच्या टप्प्याबाहेर असताना ही चोरी झाली. या प्रकरणी त्यांनी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून तपास पोलीस उपनिरीक्षक गजानन टाकळे करीत आहेत.

# तांब्याच्या तारांची चोरी

**नवी मुंबई :** तांब्याचे दर वाढत असल्याने भंगारमध्ये विकण्यासाठी तांब्याच्या तारांची चोरी करण्यात आली. महापे एमआयडीसीमध्ये इंटिग्रेट सोल्युशन नावाची कंपनी असून या ठिकाणी विविध वायर ठोक दरात विकल्या जातात. १९ ते २० फेब्रुवारी दरम्यान रात्रीच्या वेळी कंपनीच्या प्रवेशद्वारावरील कुलूप तोडून आत प्रवेश करीत तारांचे २४ नग चोरी केले. याबाबत शंका आल्याने पाहणी केली असता २४ नग कमी आढळून आले. त्याचे बाजार मूल्य २ लाख ११ हजार ५०० आहे. याबाबत रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यांत गुन्हा दाखल करण्यात आला.




# वादग्रस्त महासभेला सचिवांची दांडी

## विरोधकांकडून प्रशासनाच्या कारभाराचा समाचार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेच्या पहिल्याच महासभेत सचिव संघरत्ना खिल्लारे यांच्या कामकाजावरून निर्माण झालेला वाद सोमवारी अधिकच तीव्र झाला. तहकूब सभेच्या नियोजनाबाबत माहिती न दिल्याचा आरोप करत विरोधकांनी सचिवांवर नियमबाह्य कामकाजाचा ठपका ठेवला. दरम्यान, संबंधित सचिव रजेवर गेल्याने त्यांच्या अनुपस्थितीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत विरोधकांनी सचिवांच्या कारभाराचा चांगलाच समाचार घेतला.

शुक्रवारी गोंधळामुळे महासभा तहकूब करण्यात आली होती. त्यानंतर सोमवारी सभा होणार असल्याचे सांगण्यात आले. मात्र अनेक नगरसेवकांना सचिव विभागाकडून सभेबाबत संदेश पाठवण्यात आला नसल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला. यामुळे तहकूब सभा नेमकी कधी होणार, याबाबत नवनिर्वाचित सदस्यांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे शिवसेनेच्या बेलापूर येथील नगरसेविका सरोज पाटील यांनी निदर्शनास आणून दिले. पहिल्याच महासभेत सचिवांच्या कार्यपद्धतीवरून उफाळलेल्या या वादामुळे पालिकेतील प्रशासन, सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील समन्वयाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सचिव हे सत्ताधाऱ्यांच्या बाजूने निर्णय घेत असल्याचा आरोप विरोधकांनी केला असून, प्रशासन या संदर्भात कोणता निर्णय घेणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### प्रक्रियेत त्रुटी राहिल्याचा आरोप

- सर्व सदस्यांना सभेबाबत अधिकृत माहिती देणे ही सचिव विभागाची जबाबदारी आहे. काहींना संदेश न मिळाल्याने ही सभा ग्राह्य धरता येईल का, असा सवाल पाटील यांनी उपस्थित केला. विरोधी पक्षातील नवख्या सदस्यांना सभेची माहिती कशी मिळणार, याबाबतही त्यांनी महापौरांकडून स्पष्टीकरण मागितले.
- शिवसेनेचे गटनेते मनोज हळदणकर यांनीही याच मुद्द्यावर नाराजी व्यक्त केली. 'जे सदस्य रजेवर होते किंवा बाहेरगावी होते, त्यांना सभेबाबत माहिती नव्हती. अशा वेळी किमान वर्तमानपत्रात जाहिरात देणे अपेक्षित होते,'असे त्यांनी सांगितले. सचिव विभागाकडून प्रक्रियेत त्रुटी राहिल्याचा आरोप केला.
- विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांनी सचिवांच्या नियुक्ती व अधिकारांबाबत प्रश्न उपस्थित करत, सचिव हे आयुक्तांच्या आदेशानुसार कार्य करतात, असे स्पष्ट केले. सचिव रजेवर असल्याचा आदेश आयुक्तांनी काढल्याचे त्यांनी सांगितले.

### कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शन सभेची मागणी

या वेळी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी, महासभा तहकूब झाल्यास पुढील सभेबाबत माहिती देणे गरजेचे असल्याचे सांगत सचिवांवर यासंदर्भात जबाबदारी निश्चित करण्यात येईल अशी माहिती दिली. यानंतर सभागृहातील अधिकार, नियम व कार्यपद्धती याबाबत विशेष मार्गदर्शनपर सभा घेण्याची मागणी सागर नाईक यांनी केली.

### सत्ताधारी पक्षातही मतभेद

सभागृह नेते सागर नाईक यांनी सचिवांचे समर्थन करत, ही सभा तहकूब नसून सलग सुरू असल्याचे मत व्यक्त केले. त्यामुळे स्वतंत्र जाहिरातीची आवश्यकता नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र त्याच पक्षाचे उपमहापौर दशरथ भगत यांनी सदस्यांना अवगत होण्यासाठी लहानशी जाहिरात देण्यात हरकत नसल्याचे मत मांडले. त्यामुळे सत्ताधारी पक्षातही मतभेद असल्याचे चित्र दिसून आले.

# 'मोफत वह्यावाटपाची चौकशी करा'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** शाळा सुरू होताना पहिल्याच आठवड्यात मुलांना शासनाकडून पुस्तके मिळतात, तर महापालिकेकडून महापालिका शाळेतील मुलांना वह्यांचे वाटप केले जाते. परंतु यंदा दहावीची परीक्षा सुरू झाली असताना मुलांना वह्यावाटप करण्यात आले. या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी मनसेने नवी मुंबई महापालिकेकडे केली आहे. त्यामुळे पालिकेच्या शिक्षण विभागाचा सावळागोंधळ चौकशीत समोर येणार का, अशी चर्चा सुरू झाली आहे.

शालेय शैक्षणिक वर्ष १५ जूनला सुरू होते. शासनाकडून पालकांच्या थेट बँक खात्यात पैसे जमा करण्याच्या डीबीटी योजनेमुळे गोंधळ होत आहे. परंतु यंदा वह्या दहावीची परीक्षा सुरू होण्याच्या आदल्या दिवशी शाळांमध्ये वाटप करण्यासाठी पाठवण्यात आल्या. याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी विद्यार्थी सनेचे शहराध्यक्ष संदेश डोंगरे यांनी केली.

# कोट्यवधींचा अमली पदार्थांचा साठा जप्त

**पनवेल :** तळोजा येथील घोटकॅम्प परिसरात सोमवारी केलेल्या कारवाईत पोलिसांनी अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या दोन तरुणांना अटक केली. यावेळी सुमारे एक कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे पंजाबमधून होणारी तस्करी पुन्हा एकदा उघड झाली आहे.

घोटकॅम्प परिसरात अमली पदार्थ आणले जाणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने छापा टाकला. यावेळी ११८ ग्रॅम वजनाचे हेरॉईन आणि १४३.६ ग्रॅम वजनाची अफू पावडर जप्त करण्यात आली. याची बाजारभावानुसार किंमत १ कोटी २ लाख ८ हजार आहे. यासोबतच चार वजनकाटे, दहा इंजेक्शन तसेच सुमारे दीडशे प्लास्टिक पिशव्याही जप्त केल्या.

# नवी टाटा पंच.ईव्ही







**टाटा ईव्हीने** पंच. ईव्हीचे नवे रूप नुकतेच सादर केले. परवडणारी किंमत, चार्जिंगची सोय व बॅटरीची खात्री देताना ९.६९ लाख रुपयांच्या मूळ किमतीत ती मुंबईत उपलब्ध असेल. पंच.ईव्ही ही छोट्या कारच्या श्रेणीत किफायतशीर ठरेल, असा दावा कंपनीने केला आहे.

नवीन पंच. ईव्हीचे लॉन्च करताना टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल लिमिटेड आणि टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक शैलेश चंद्रा म्हणाले, की नवी पंच.ईव्ही, इलेक्ट्रिक मोबिलिटीला प्रत्येक घरासाठी खरोखरच सोपे, व्यवहार्य व निश्चित ठरते. ३५५ किमीची रिअल-वर्ल्ड रेंज, फास्ट चार्जिंग क्षमता, लाइफटाइम एचव्ही बॅटरी वॉरंटी हे त्यातील फायदे आहेत. प्रगत ॲक्टि.ईव्ही अभियांत्रिकीवर आधारित नवी पंच.ईव्ही शुद्धतेचा नवा पायंडा पाडते. सबकॉम्पॅक्ट अर्थात छोट्या आकाराच्या एसयूव्ही श्रेणीत पंचचे ईव्ही रूप

### २६ मिनिटांत ८० टक्क्यांपर्यंत जलद चार्ज

- मोठ्या ४० केडब्ल्यूएच एलएफपी प्रिझ्मॅटिक सेल बॅटरी संचासह नवी पंच.ईव्ही एका चार्जमध्ये ३७५ किलोमीटरचा टप्पा पूर्ण करते. नवी पंच.ईव्ही रोजच्या शहरी वापरासाठी आणि छोट्या इंटरसिटी प्रवासासाठी उत्तम पर्याय मानता येईल. वारंवार चार्जिंग थांब्यांची गरज त्यामुळे कमी होते.
- नवी पंच.ईव्ही ३० केडब्ल्यूएच बॅटरी पॅक पर्यायासहही उपलब्ध असेल. या दोन पर्यायांच्या संयोगाने, नवीन पंच.ईव्ही ग्राहकांना पारंपरिक इंधनावर धावणाऱ्या वाहनांसाठी इलेक्ट्रिक हा सहज पर्याय उपलब्ध होतो. ड्रायव्हिंगचा उत्कृष्ट दर्जा व कमी रनिंग व मेंटेनन्स खर्च येतो.
- जलदगती चार्जिंग पर्यायांमुळे बॅटरी फक्त २६ मिनिटांत २० ते ८० टक्क्यांपर्यंत जलद चार्ज होऊ शकते. याशिवाय, १५ मिनिटांत बॅटरीला सहजपणे १३५ किमी रिअल-वर्ल्ड रेंज मिळते.



- 'हिंद दी चादर' या विशेष कार्यक्रमांतर्गत मंगळवारी कामोठे येथील 'इंडोस्कॉट ग्लोबल' शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी मानवी साखळी उभी करून भारताचा नकाशा तयार केला. यावेळी विविधतेतील एकतेतून देशभक्तीचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाची जबाबदारी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली होती.
- ९ मार्चपर्यंत सुरू असलेल्या या उपक्रमात विविध संस्था व सामाजिक संघटनांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. या उपक्रमांतर्गत पनवेल, कळंबोली व कामोठे परिसरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी एकत्र येत सांस्कृतिक संचलन सादर केले. यावेळी रायगड जिल्हा परिषद शाळेच्या बालकलाकारांनी स्वागत गीतावर नृत्य सादर केले.
- या कार्यक्रमातून पंजाब, महाराष्ट, दाक्षिणात्य संस्कृतीचे दर्शन घडविणारे नृत्यप्रकार सादर करण्यात आले, तर स्काऊट-गाईड, आरएसपी व एनसीसी संचलनही करण्यात आले. कार्यक्रमात सामूहिक गायन, जीवनावर आधारित गीत सादरीकरण झाले. सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांच्या सहभागाने हा उपक्रम उत्साहात पार पडला.

# करंजामध्ये परीक्षा काळात वीजपुरवठा खंडित

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**उरण :** दहावी व बारावी या महत्त्वपूर्ण परीक्षा सुरू आहेत. याच काळात करंजा परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. याचा फटका येथील परीक्षार्थींना बसल्याने पालक संतप्त झाले.

करंजा गावातील सुरकीचा पाडा येथे तीन दिवसांपासून सतत विजेचा लपंडाव सुरू आहे. सततच्या अंधारामुळे परिसरातील दैनंदिन जीवन पूर्णतः विस्कळीत झाले असून ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. विद्युत रोहित्र बंद पडल्यामुळे वारंवार ही परिस्थिती ओढावते. तीन दिवसांपासून घरात वीज नसल्याने पाणीपुरवठाही विस्कळीत झाला आहे, तर मोबाइल चार्जिंग, विद्यार्थ्यांचा अभ्यास, लहान मुले आणि ज्येष्ठांचे हाल होत आहेत. किरकोळ व्यवसाय, दूध व किराणा दुकाने यांनाही याचा फटका बसला असून आर्थिक नुकसान होत असल्याची तक्रार व्यापाऱ्यांनी केली आहे.

ग्रामस्थांनी महावितरणशी संपर्क साधला असता रोहित्र दुरुस्तीचे काम लवकरच करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. मात्र प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही झाली नाही. वारंवार वीजपुरवठा खंडित होतो. प्रशासनाने तात्काळ नवीन रोहित्र बसवून वीजपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

> काही कालावधीकरिता वीजपुरवठा खंडित झाला होता. मात्र महावितरण कंपनीकडून तो तातडीने पूर्ववत करण्यात आला आहे. आता यापुढे सुरळीत वीजपुरवठा होईल.
> -**विकास गायकवाड,** अतिरिक्त अभियंता, महावितरण, उरण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED), ठाणे द्वारा आयोजित
अनुसुचित जातीच्या (SC) प्रवर्गातील युवक-युवती करिता
तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम
1 कॉम्प्युटर डी.टी.पी. कालावधी: २५/०२/२०२६ ते २८/०३/२०२६ रोजी
2 ड्रोन ऑपरेशन अँड मेंटेनन्स कालावधी: ०२/०३/२०२६ ते ३१/०३/२०२६ रोजी
3 ॲनिमेशन अँड ग्राफिक्स कालावधी: ०५/०३/२०२६ ०३/०५/२०२६ रोजी
नि:शुल्क (FREE)
अधिक माहितीसाठी संपर्क-
इच्छुक उमेदवारांनी खालील Google लिंकवर जाऊन ऑनलाइन फॉर्म भरावा.- https://forms.gle/zGUSAPk5sPBBVEYL8

## संक्षिप्त

### वसंतोत्सव उत्साहात

**नवी मुंबई :** सीबीडी बेलापूर येथील सेक्टर ९ मधील ॲग्रो गार्डनमध्ये रविवारी १६ वा 'वसंतोत्सव' उत्साहात पार पडला. स्थानिक रहिवाशांच्या पुढाकारातून ॲग्रो व्हेजिटेबल फार्म आणि बटर फ्लाय गार्डन येथे उभारलेल्या या उपक्रमात दिवसभर निसर्ग, कला आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संगम अनुभवायला मिळाला. नागरिकांच्या प्रबोधनासाठी 'भारुड-ए-बिबट' हा कार्यक्रम उत्सवाचे विशेष आकर्षण ठरले. वस्तूंचे स्टॉल्स, स्थानिक उद्योजकांनी उभारलेले खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, मातीच्या वस्तू बनविण्याच्या कार्यशाळा, निसर्ग छायाचित्रण, भरतकाम, अनवट नृत्यप्रकार तसेच मोकळ्या गवतात बसून चित्रकला अशा विविध उपक्रमांत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

### महिला दिनानिमित्त विविध उपक्रम

**नवी मुंबई :** जागतिक महिला दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. महिलांच्या समूहाने तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी विनामूल्य स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ४ ते ६ मार्च या कालावधीत समूह गायन स्पर्धा, भजन स्पर्धा, लघु व्हिडीओ स्पर्धा, समूह नृत्य स्पर्धा, समूह नाटिका स्पर्धा आणि मंगळागौर स्पर्धा यांचा समावेश आहे. या स्पर्धांच्या प्राथमिक आणि अंतिम फेऱ्या वाशी येथील महात्मा फुले स्मृती भवन येथे पार पडतील.

## नाटक सिनेमा वाद्यवृंद















बुधवार,
२५ फेब्रुवारी २०२६

लोकसत्ता | पालघर

LOKSATTA.COM, FACEBOOK.COM/LOKSATTALIVE लोकमान्य, लोकशक्ती! TWITTER.COM/LOKSATTALIVE, LOKSATTA.COM/APPS

## अंतरंग

### बाह्यवळण रस्त्याचे काम ठप्प

**बोईसर :** बोईसरमधील रस्ते वाहतुकीसाठी सोयीचा असलेल्या सिडको बाह्यवळण रस्तेकामात झाडांचा अडथळा निर्माण झाला आहे. झाडांचे हे अतिक्रमण हटविण्यात प्रशासनाला अपयश आल्याने सध्या या रस्त्याचे काम ठप्प झाले आहे.

वृत्त...४

### जलस्त्रोतांची स्वच्छता

**डहाणू :** पर्यावरणाचे रक्षण आणि जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी संत निरंकारी मिशनच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या देशव्यापी अभियानाला चांगला प्रतिसाद लाभला. श्रमदानातून जलस्त्रोतांची स्वच्छता केली.

वृत्त...४

### महिलेची हत्या

**वसई :** नालासोपाऱ्यात मनोरुग्ण व्यक्तीने सख्ख्या बहिणीची कोयत्याने वार करून हत्या केली. टाकीपाडा येथे मंगळवारी ही घटना घडली. पहाटेच्या सुमारास महिलेचे भावासोबत भांडण झाले. या भांडणात भावाने त्यांच्यावर वार केला. त्यात त्यांचा मृत्यू झाला. भांडण सोडविण्यासाठी त्यांची आई मधे पडली. तेव्हा त्यांच्यावरही हल्ला करण्यात आला. तुळींज पोलिसांनी याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली.

# चिकूच्या बागांत बिबट्याचा वावर

## भीतीने फळवेचक मजुरांची कामाकडे पाठ; बागायतदारांना चिंता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पालघर :** बोर्डी परिसरात चिकुच्या बागांत बिबट्याचा वावर वाढला आहे. त्याच्या भीतीपोटी चिकूवाडीमध्ये फळ वेचणाऱ्या मजुरांनी बागांमध्ये जाऊन काम करण्याकडे पाठ फिरवली आहे. याचा परिणाम चिकू उत्पादनावर झाला असून बागायतदारांनी याबाबत चिंता व्यक्त केली आहे. बोर्डी भागात नर-मादी बिबट्यांसह दोन बछड्यांचे परिसरात वास्तव्य असल्याचे त्यांच्या पंजाच्या ठशावरून आढळून आले आहे.

बोर्डी परिसरात १५०० ते २००० एकर क्षेत्रफळात चिकूची लागवड केली जाते. सद्या हंगाम सुरू असल्याने अनेक बागांमध्ये झाडे उंच व घनदाट झाली आहेत. अशा ठिकाणी बिबट्याला वास्तव्य करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्याचा वावर या या बागांमध्ये दिसून येत आहे.

बोर्डी येथील वहिंद्र खाडी परिसरात एका बिबट्याचा वावर गेल्या आठ महिन्यांपासून आढळून आला आहे. या बिबट्याचा महिनाभरापासून मानवी वस्तीमध्ये वावर असल्याचे आढळून आले आहे. या बिबट्यासोबत एक मादी दोन बछडेही दिसून आले आहेत. बिबट्याने परिसरातील पाळीव गुरे तसेच डुक्कर व कुत्र्यांची शिकार केल्याची माहिती येथील ग्रामस्थांकडून देण्यात येते.

वन विभागाने बिबट्या आणि त्याच्या बछड्यावर लक्ष ठेवण्यासाठी ठिकठिकाणी ट्रॅप कॅमेरे लावले आहेत. त्यामधील छायाचित्रणात बिबट्याचा बोर्डीपासून २० किलोमीटर परिसरात वावर असल्याचे पाहायला मिळते. मात्र सोबत मादी व बछडे हे मात्र अद्याप आढळले नसल्याचे वन विभागाकडून सांगण्यात येते.

पालघर जिल्ह्यात जंगल भागातून अनेक राष्ट्रीय प्रकल्प उभारले जात असताना वन्यप्राण्यांसाठी विशेष कॉरिडोर उभारणे व जंगल परिसरातील मानवी हस्तक्षेप रोखण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. जंगलामधील प्राण्यांना अन्नसाखळी पुनर्स्थापित करणारी ठोस उपाययोजना राबवणे आवश्यक झाल्याचे मत प्राणीमित्रांकडून व्यक्त होते.

दरम्यान, गेल्या महिन्यात चिखला येथे वन विभागाने लावलेल्या सापळ्यालगत काही शिकाऱ्यांनी लावलेल्या फासामध्ये अडकून एका बिबट्याचा मृत्यू झाला होता. मृत बिबट्याच्या मौल्यवान अवयवांची तस्करी केल्याचेही या वेळी आढळून आले, या प्रकरणी वन विभागाने गुन्हा दाखल केला आहे.



### वावर कोठे?

सद्यःस्थितीत बोर्डी व वहिंद्र पुलाच्या परिसरात नर व मादी बिबट्यासह दोन बछडे, गुजरातच्या सीमालगत, धाकटी डहाणूतील खाजण तसेच सफाळे परिसरात प्रत्येकी एक बिबट्या, चिखला, बोईसर परिसरात प्रत्येकी दोन बिबट्यांचे अस्तित्व असल्याची माहिती देण्यात येते.

पालघर जिल्ह्याच्या किनारपट्टीच्या भागांमध्ये अनेक बिबट्यांचा वावर असून त्याला सहजगत तृणभक्षी जनावरांची उपलब्धता असल्याने अजून तरी बिबट्याने परिसरात लहान मुले, विद्यार्थी अथवा मानवी वस्तीमध्ये हल्ला केला नाही. मानव हे बिबट्याचे खाद्य नसले तरीही नागरिकांमध्ये भय कायम आहे. डोंगरातील वणवे पेटण्याचे रोखणे आवश्यक झाले आहे. बिबट्याला जंगल परिसरात पुनर्स्थापित करण्यासाठी जंगलातील अन्नसाखळी कायम करणे गरजेचे झाले आहे

**-सूर्यहास चौधरी,** वन्यजीव अभ्यासक, बोर्डी.

### वनवे कारणीभूत

- गेल्या वर्षी उन्हाळ्यामध्ये बोर्डी परिसरातील डोंगरामध्ये अनेकदा वणवे पेटल्याचे प्रकार घडले होते.
- यामुळे जंगलातील तृण नष्ट झाल्याने त्यावर अवलंबून असणारे ससे, रानडुक्कर, भेकर हे जंगलापासून समुद्रकिनाऱ्याजवळ असणाऱ्या मानवी वस्ती व कृषी क्षेत्रामध्ये शिरकाव केल्याचे दिसून आले.
- बिबट्याला जंगलामध्ये पुरेशा प्रमाणात खाद्य मिळत नसल्याने तसेच डोंगरापासून किनारादरम्यानच्या भागांमध्ये तृणभक्षी जनावर स्थलांतरित झाल्याने त्यांच्यापाठोपाठ मांसभक्षी असणारे बिबट्या हे पालघर जिल्ह्याच्या किनारी भागात सहजपणे वावरू लागल्याचे वन्यजीव अभ्यासक सूर्यहास चौधरी यांनी मत व्यक्त केले.
- बोर्डी व डहाणू तालुक्याच्या वेगवेगळ्या भागात कुत्रे, डुकरे, गुरांची शिकार केल्याच्या घटना घडल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

# राष्ट्रीय महामार्गावरील विरार बुलेट ट्रेन स्थानक परिसराचा विकास

## व्यापारी केंद्र, पर्यटनस्थळ, नागरी वसाहती आणि रुग्णालय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गावरील विरार रेल्वे स्थानक परिसर विकसित केला जाणार आहे. या ठिकाणी व्यापारी केंद्र, पर्यटन स्थळं, नागरी वसाहती आणि रुग्णालयासह विविध पायाभूत सुविधांचे प्रकल्प उभारण्यात येणार आहे. याबाबत सोमवारी महापालिका प्रशासन आणि जपानच्या जायका संस्थेचे सदस्य यांच्यात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी विकासाबाबत चर्चा करण्यात आली.

मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वेच्या (बुलेट ट्रेन) राज्यातील चार स्थानकांपैकी एक असलेले विरार स्थानक नालासोपारा पूर्वेच्या वालईपाडा येथे तयार केले जाणार आहे. स्थानक परिसराचा विकास करण्यासाठी 'प्रोजेक्ट स्मार्ट' हा प्रकल्प तयार करण्यात आला आहे. त्यासाठी केंद्रीय गृहनिर्माण मंत्रालयाने विशेष समिती स्थापन केली आहे. यात वसई-विरार महानगरपलिकेच्या अधिकाऱ्यांचाही समावेश आहे.

सध्या पालघरमधील बुलेट ट्रेनचे काम प्रगतीपथावर असून सोमवारी मुंबई-अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे संदर्भात (बुलेट ट्रेन) जपानची आंतरराष्ट्रीय संस्था जायका यांचे प्रमुख व सदस्य यांची मुख्यालयात बैठक पार पडली. यावेळी महापौर अजीव पाटील, उपमहापौर मार्शल लोपीस, आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी, माजी आमदार क्षितीज ठाकूर, सभागृह नेते प्रफुल साने, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे व दीपक सावंत, परिवहन व्यवस्थापक धैर्यशील जाधव, उपसंचालक नगररचना मनिष भिष्णूरकर, नगररचनाकार श्वेता माने, जपान आंतरराष्ट्रीय संस्था जायकाचे प्रमुख सेईचिरो अकीमुरा व संस्थेचे इतर सदस्य उपस्थित होते.

यावेळी स्थानकाचा नवा आराखडा आणि स्थानक परिसराचा विकास याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच संबंधित प्रकल्पाचे दृकश्राव्य माध्यमाद्वारे सादरीकरण करण्यात आले. प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर तयार केल्या जाणाऱ्या स्थानकाच्या विकासासाठी आवश्यक बाबींवर, तसेच स्थानकाच्या कामादरम्यान निर्माण होणारे संभाव्य अडचणी अशा विविध गोष्टींचा आढावा घेण्यात आला असल्याची माहिती महापौर अजीव पाटील यांनी दिली.



### जपानच्या धर्तीवर विकास

विरारमधील बुलेट ट्रेन स्थानकाच्या सभोवतालचा तब्बल साडेचारशे हेक्टर परिसर विकसित केला जाणार आहे. मुंबईतील बीकेसीच्या धर्तीवर व्यापारी केंद्र तयार केले जाणार आहे. तसेच याठिकाणी जपानच्या धर्तीवर नागरी वसाहती, पर्यटन स्थळे विकसित केली जतील. विविध अत्याधुनिक रुग्णालये, आरोग्य व्यवस्था यांसह विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याची माहिती नगररचनाकार श्वेता माने यांनी दिली.

### आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर

विरार बुलेट स्थानक परिसराचा विकास आराखडा तयार करण्यात आला होता. पण, ऑगस्ट २०२३ साली शासनाने एमआरटीपी कायद्यात केलेल्या सुधारणांमुळे आता या आराखड्यातही बदल केले जाणार आहेत. हद्द निश्चिती आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यावर आराखडा अंतिम केला जाणार असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# विक्रमगड शहरातील तीन स्वच्छतागृहांसाठी २४ लाखांचा निधी

## निविदा प्रक्रिया कार्यवाही सुरू

**सिद्धार्थ सांबरे, लोकसत्ता**

**वाडा :** विक्रमगड शहरात तीन ठिकाणी स्वच्छतागृह उभारण्यासाठी २४ लाख रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागणार आहे.

विक्रमगड नगर पंचायतीकडून स्वच्छ भारत २:० अभियानांतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागाकडे सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. शहरातील बाजारपेठ पाटील पाडा, पंचायत समिती परिसर आणि एसटी बसस्थानक या मुख्य वर्दळीच्या तीन ठिकाणी स्वच्छतागृहांची उभारणी केली जाणार आहे. 'लोकसत्ता'मध्ये याबाबतचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर हालचालींना वेग आला. नगर पंचायतीचे स्वच्छता निरीक्षक अलीम मुल्ला यांनी दिलेल्या माहितीनुसार, पाटील पाडा आणि पंचायत समिती येथे पुरुषांसाठी प्रत्येकी दोन स्वच्छतागृह व मुतारी, तसेच महिलांसाठी दोन स्वतंत्र स्वच्छतागृह उभारण्यात येणार आहेत. तर एसटी बस स्थानक परिसरात पुरुष व महिलांसाठी प्रत्येकी एक स्वच्छतागृह उभारले जाणार आहे. या कामासाठी मंजूर निधीअंतर्गत निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

विक्रमगड हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून ९४ गाव-पाड्यांतील हजारो नागरिक विविध शासकीय, व्यापारी आणि वैद्यकीय कामांसाठी येथे येत असतात. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, पंचायत समिती आणि एसटी बस स्थानक परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. मात्र या ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा नसल्याने नागरिक, विद्यार्थी, विशेषतः महिला आणि एसटी प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. ती आता दूर होणार आहे.



सार्वजनिक स्वच्छतागृहांचा अभाव

विक्रमगडमधील बाजारपेठ, बस स्थानक येथे सुविधा नसल्याने गैरसोय

'लोकसत्ता' मध्ये प्रसिद्ध झालेले वृत्त.

# कॉल सेंटरवर कारवाई

**पालघर :** आंतरराष्ट्रीय स्तरावर फसवणूक करणाऱ्या अनधिकृत कॉल सेंटरवर पालघर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली. या प्रकरणी पाच जणांना अटक केली. पालघर पश्चिम येथील माहीम रोडवरील फियां एकांत इमारतीत हे कॉलसेंटर चालवले जात होते. आरोपी अमेरिकन नागरिकांचे नाव आणि नंबर मिळवत असत, त्यांना मायक्रोसॉफ्ट किंवा ॲपल कंपनीचे प्रतिनिधी असल्याचे सांगून फोन करत, तुमच्या डिव्हाईसमध्ये व्हायरस शिरला असून ते हॅक झाले आहे, अशी भीती त्यांना दाखवत. समस्या सोडवण्यासाठी ५०० ते ४००० अमेरिकन डॉलर्सचे नामांकित कंपनीचे गिफ्ट कार्ड उकळले जात असे. रक्कम हवालामार्फत भारतात रोख स्वरूपात मिळवली जात होती. २४ फेब्रुवारीच्या मध्यरात्री छापा टाकला. त्यात भरत लालवानी, रोहीत झोन्हे रोहीत निंबाळकर, पुणे, (२३, ), अमरदीप गिल, भाईंदर, सागर पाठडिया, सुरत यांना पालघर पोलिसांनी अटक केली.

# विद्यार्थ्यांच्या पायाभूत कौशल्यासाठी जादा तास

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पालघर :** पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांनी पायाभूत कौशल्य आत्मसात करावी यासाठी अभ्यासाचे जादा तास घेण्यात येणार आहेत. संख्याज्ञान म्हणजे वाचन, लेखन आणि अंकगणित यांसारखी मूलभूत कौशल्यांवर भर देण्यात येणार आहे.

आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांसाठी हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने 'प्रथम' संस्थेसोबत सामंजस्य करार केला आहे. विद्यार्थ्यांना लेखन, वाचन आणि संख्याज्ञान शिकवण्यासाठी मुख्याध्यापक आणि शिक्षकांना वैयक्तिक लक्ष देणे आणि शालेय वेळेव्यतिरिक्त ह्यजादा तासह्व घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यासाठी 'प्रथम' संस्थेने विशेषतः तयार केलेले संच शाळांना वितरित करण्यात आले आहेत.

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षा तसेच इतर स्पर्धात्मक परीक्षांमध्ये बसण्यासाठी तयारी करण्याच्या दृष्टीने देखील प्रयत्न केले जाणार आहेत. या उपक्रमातील संचांमार्फत अक्षर, शब्द आणि संख्यांचे ज्ञान खेळ आणि कृती आधारित पद्धतीने दिले जाते. इयत्ता १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांचा मंडळाचा अभ्यासक्रम वेळेत पूर्ण व्हावा, यासाठी उन्हाळी सुट्टीत 'क्रॅश कोर्स'चे देखील आयोजन करण्यात आले आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत ५४ आश्रमशाळांमधील सुमारे ३० हजार विद्यार्थ्यांचे २७ जानेवारी रोजी मूल्यमापन करण्यात आले. या चाचणीत (पान ३ वर)

**पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन आणि अंकगणित यामध्ये कौशल्य मिळवावे यासाठी जादा तास घेण्यात येणार आहेत.**





जे आपल्याला केवळ माहिती देत नाही तर आपले जीवन अस्तित्वात असलेल्या सर्वांशी सुसंगत बनवते ते म्हणजे सर्वोत्तम शिक्षण.
– रवींद्रनाथ टागोर

**स्पर्धा परीक्षेच्या प्रांगणात**
**एमपीएससी**
रोहिणी शहा

**राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या सामान्य अध्ययन पेपर दोनच्या तयारीबाबत मागील लेखांमधून चर्चा करण्यात आली. या चर्चेच्या आधारे पेपर दोनमधील आंतरराष्ट्रीय संघटना या मुद्द्यावरील प्रश्नाचे उत्तर या लेखामध्ये पाहू.**

## राज्यसेवा मुख्य परीक्षा : सामान्य अध्ययन (पेपर दोन)

# आंतरराष्ट्रीय संघटना



■ **प्रश्न: ''दहशतवाद हा जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी गंभीर धोका बनला आहे.'' या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवादविरोधी समिती ( उळउ) व तिच्या संलग्न संस्थांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करा. (१५ गुण २५० शब्द)**

**प्रश्नाचे विश्लेषण–**

प्रश्नामुळे मुद्दे आधी समजून घेऊ. जागतिक शांतता आणि सुरक्षेसाठी दहशतवादाचा धोका; याबाबत दहशतवाद विरोधी समिती व तिच्या संलग्न संस्थांची परिणामकारकता आणि तिचे मूल्यमापन. या तीन मुद्द्यांवर आधारित उत्तर लिहिताना पुढील पायऱ्या वापरता येतील.

- जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी दहशतवाद कशाप्रकारे गंभीर धोका बनला आहे, यावर थोडक्यात भाष्य करा.
- संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची दहशतवादविरोधी समिती ( CTC ) आणि तिच्या संलग्न संस्थांची आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवाद रोखण्यातील व त्याचे शमन करण्यातील भूमिका स्पष्ट करा.
- समितीच्या दहशतवादविरोधी प्रयत्नांपुढील आव्हानांचे विश्लेषण करा.
- उळउच्या कार्यक्षमतेच्या मूल्यमापनावर भर देणे आवश्यक आहे. त्यामुळे उपाययोजना थोडक्यात सुचवून उत्तराचा समारोप करा.

**उत्तर:**

दहशतवाद म्हणजे राजकीय किंवा सामाजिक उद्दिष्टांसाठी हिंसा व भीतीचा वापर. आज तो जागतिक शांतता, आर्थिक स्थैर्य व सामाजिक सलोखा यांना गंभीर धोका निर्माण करतो. उदा. २००८ मुंबई हल्ल्यांमुळे भारताला सुमारे २ अब्ज डॉलर्सचे आर्थिक नुकसान झाले. ISIS च्या उदयामुळे मध्यपूर्वेत लाखो लोक विस्थापित झाले. तसेच, क्राइस्टचर्च (२०१९) घटनेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर धार्मिक तणाव वाढवला.

अमेरिकेतील २००१ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर, आंतरराष्ट्रीय दहशतवाद रोखण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने दहशतवादविरोधी समितीची ( CTC ) स्थापना केली.

**CTC ची भूमिका व परिणामकारकता:**

- **सदस्य राष्ट्रांना कायदेशीर चौकट मजबूत करण्यासाठी मार्गदर्शन:** दहशतवादाला निधीपुरवठा हा गुन्हा ठरविणे, मालमत्ता गोठविणे यासाठी सदस्य राष्ट्रांना कायदे करण्यात मार्गदर्शन.
- **आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे:** गुप्त माहितीची देवाणघेवाण व संयुक्त कारवाया सुलभ करण्यासाठी सदस्य राष्ट्रांमध्ये समन्वय साधणे
- **प्रशिक्षण आणि क्षमता विकास:** सदस्य राष्ट्रांच्या अंमलबजावणी यंत्रणेसणप्रशिक्षण व तांत्रिक मदत करणे.
- **प्रतिबंधात्मक निर्बंधांची अंमलबजावणी:** आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांवर प्रवासबंदी, शस्त्रबंदी लागू करणे.
- **वित्तीय कारवाई कृती दल ( FATF) आणि इंटरपोलबरोबर समन्वय:** दहशतवादी वित्तपुरवठ्यावर नियंत्रण साधणे.

**मर्यादा व आव्हाने:**

- **राजकीय मतभेद:** स्थायी सदस्यांच्या नकाराधिकारामुवळे ठोस कारवाईत अडथळे. उदा. सिरीयाबाबत रशिया व चीनचा नकाराधिकार
- **सार्वभौमत्वाचा प्रश्न:** सदस्य राष्ट्रांचा अंतर्गत कायदा निर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत बाह्य हस्तक्षेपास विरोध.
- **संसाधनांची कमतरता:** विकसनशील देशांत अंमलबजावणीत अडचणी.
- **तंत्रज्ञानाचा दुरुपयोग:** एनक्रिप्टेड प्लॅटफॉर्मचा वापर केल्यने दहशतवादी कारवायांवर नियंत्रण आणण्यात अडचणी.
- **मानवाधिकार संतुलन:** कठोर कायद्यांमुळे नागरिकांच्या अधिकारांवर मर्यादा. उदा. वAPA किंवा AFSPA कायदे
- **दहशतवादाचे बदलते स्वरूप:**

पारंपरिक संघटित गटांऐवजी स्थानिक पातळीवरील लोन-वुल्फ हल्ले - तपासात अडचणी

एकूणच, CTC ने आंतरराष्ट्रीय चौकट उभी केली असली तरी प्रभावी अंमलबजावणी व राजकीय एकमत यांवर तिचे यश अवलंबून आहे. यासाठी बहुपक्षीय सहकार्य, समन्वय, तंत्रज्ञानाच्या आधारे देखरेख, जनजागृती आणि मानवाधिकारांचा सन्मान राखणारी धोरणे आवश्यक आहेत.

**स्पष्टीकरण**

पूर्ण वाक्य आणि फक्त मुद्दे अशा दोन्ही वाक्यरचनांचा वापर केल्याने कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त मुद्दे मांडणे शक्य झाले आहे.

वेगवेगळ्या दहशतवादी कारवायांमुळे जागतिक शांतता सुरक्षितता यांना निर्माण झालेले धोके उदाहरणे दिल्यामुळे थोडक्यात पण स्पष्टपणे मांडता आले आहेत.

दहशतवाद विरोधी समितीचे मूल्यमापन करताना सकारात्मक मुद्दे आणि मर्यादा या दोन्हीबाबत मुद्दे मांडणे आवश्यक होते. अतिरिक्त शब्द वापरावे लागू नयेत यासाठी हे लक्षात घेऊन सर्व महत्त्वाचे मुद्दे क्रियापदांचा वापर न करता मांडले आहेत.

शक्य तेथे उदाहरणे दिल्यामुळे उत्तराची परिणामकारकता वाढली आहे.

समारोप करताना मूल्यमापनाचा निष्कर्ष मांडून परिणामकारकता वाढविण्यासाठीचे उपाय थोडक्यात मांडले आहेत. यामुळे उत्तराचा भर मूल्यमापनावरच ठेवता आल्याचे लक्षात येते.

steelframe.india@gmail.com

# कर्मचाऱ्यांची वार्षिक परीक्षा!

**कामगिरीचे वार्षिक अवलोकन ही कर्मचाऱ्यांसाठी स्वत:कडे मागे वळून बघण्याची उत्तम संधी असते. मानसशास्त्रानुसार कामगिरीचे विश्लेषण आणि सुधारणा करण्यासाठी केलेल्या विचारपूर्वक योजना प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतात.**

**कौशल्य तंत्र**
सलील चिंचोरे

**मार्च महिना** येऊ घातला की कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्यातील वेतन वाढ व प्रमोशनचे वेध लागतात. मार्च महिना हा वित्तीय वर्षातील अखेरचा महिना. मार्च महिन्याअखेरीस कंपनीच्या वित्तीय कामगिरीचा आढावा तर घेतला जातोच; तसेच कर्मचाऱ्यांच्या वार्षिक कामगिरीचेही अवलोकन केले जाते. या पद्धतशीर मार्गाला परफॉर्मन्स अप्रेजल म्हणतात. कर्मचाऱ्यांच्या वार्षिक अवलोकनाचे खास महत्त्व असते. कर्मचाऱ्यांच्या कामगिरीनुसार त्यांना परफॉर्मन्स रेटिंग दिले जाते. यानुसार कर्मचाऱ्यांसंबंधीचे वेतनवाढ, प्रमोशन, बदली, बोनस असे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जातात.

म्हणून प्रत्येक कर्मचारी वर्षाअखेरीस आपल्या कामाला रंगरंगोटी करून तिला आकर्षक स्वरूपात बॉससमोर सादर करतो. परफॉर्मन्स अप्रेजल मीटिंगमध्ये आपल्या कामगिरीची बॉसवर छाप पाडून चांगले रेटिंग मिळवण्याचा हा प्रयत्न असतो. काही वेळेला हा प्रयत्न फलद्रूप होतो तर काहीदा तो चक्क फसतो. कारण बॉसने कर्मचाऱ्यांबरोबर वर्षभर खांद्याला खांदा लावून काम केलेले असते. कर्मचाऱ्यांच्या कामातील खाचाकोचा, उणीवा, कर्मचाऱ्यांचा स्वभाव बॉसला चांगला ठाऊक असतो. बॉसपुढे कितीही अतिशयोक्तीपूर्ण सादरीकरण केले तरी प्रत्येक कर्मचाऱ्याला स्वतःच्या कामगिरीची यथार्थ जाणीव असते. पण त्याला रंगरंगोटी करण्याच्या नादात आपण त्यातील सत्व हरवून बसतो.

आज आपण याच गोष्टीकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून बघू. कामगिरीचे वार्षिक अवलोकन ही कर्मचाऱ्यांसाठी स्वतःकडे मागे वळून बघण्याची उत्तम संधी असते. मानसशास्त्रानुसार कामगिरीचे विश्लेषण आणि सुधारणा करण्यासाठी केलेल्या विचारपूर्वक योजना प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतात. प्रत्येक कसलेला खेळाडू मॅच संपल्यावर आपल्या कोचबरोबर बसून मॅचचे व स्वतःच्या कामगिरीचे सखोल विश्लेषण करतो. त्यातून हाती येणाऱ्या त्रुटींवर भर देऊन सराव करतो. त्यामुळे त्या खेळाडूला पुढच्या मॅचसाठी अधिक चांगले तयार होण्यासाठी मदत होते. बऱ्याचदा आपली कामगिरी फुगवून सांगण्याच्या नादात आपण स्वतःला आरशात बघण्याचे विसरतो. यावेळेस परफॉर्मन्स रिव्ह्यूसाठी नेहमीचे पवित्रे सोडून तुम्ही स्वतःचे कठोर मूल्यमापन करा. त्यासाठी मदत म्हणून तुम्हाला मी काही प्रश्न देतो आहे. त्या प्रश्नांची उत्तरे तुम्ही स्वतःच स्वतःसाठी शोधू शकता -

- गेल्या वर्षात वर्षभरात कोणती टार्गेट्स मी पार केली? ते कशामुळे साध्य झाले?
- कोणती टार्गेट्स पार करण्यात मला अपयश आले? त्याची कारणे काय?
- गेल्या वर्षभरात मला कोणत्या अडचणी आल्या? त्यांचा सामना मी कसा केला?
- माझा बॉस व इतर वरिष्ठांनी मला कोणता फीडबॅक दिला? त्याला मी कसा प्रतिसाद दिला?
- माझ्या कामगिरीवर मी पूर्णतः समाधानी आहे का? नसल्यास त्यात कुठे कमतरता जाणवते आहे?
- गेल्या वर्षभरात इतर सहकाऱ्यांबरोबरचे संबंध कसे होते? ते सुधारण्यासाठी मी कोणते प्रयत्न केले?
- गेल्या वर्षात मी काय नवीन शिकलो? त्याचा वापर मला पुढे कसा करता येईल?
- येत्या एक-दोन वर्षांतील माझी करिअरची उद्दिष्टे कोणती?
- त्यासाठी येत्या वर्षात मला कोणत्या नवीन गोष्टी अनुभवायच्या अथवा शिकायच्या आहेत?



- सर्व गोष्टींचा सारासार विचार करता पुढच्या वित्तीय वर्षात माझ्या कामाविषयी व करिअरविषयी मी (अ) कोणत्या गोष्टी नव्याने चालू करणार? (ब) कोणत्या गोष्टी अधिक सातत्याने करत राहणार? व (क) कोणत्या गोष्टी कटाक्षाने टाळणार?

या प्रश्नांवर विचार करून त्याची तुमच्या बॉसबरोबर मोकळेपणाने चर्चा करा. सहेतुक केलेली चर्चा निश्चितच पुढील मार्ग दर्शवेल. स्वतःच्या कामगिरीची तुलना तुमच्या सहकाऱ्यांच्या कामगिरीशी करण्याचे टाळा.

बहुतांशी कर्मचाऱ्यांना वाटत असते की आपल्या करिअरची सगळी जबाबदारी कंपनीची आहे. माझ्या भवितव्याचा विचार माझ्या बॉसने आणि कंपनीने करावा. मी पुढे काय करावे, कसे काम करावे हे त्यांनीच ठरवावे. ही धारणा संपूर्णपणे चुकीची आहे. आपल्या कामगिरीची व करिअरची जबाबदारी आपली आहे. विचार-विश्लेषण करून पुढील मार्गही आपल्यालाच आखायचा असतो. त्यासाठी कंपनी व कंपनीतील वरिष्ठांचे मार्गदर्शन घ्यायचे असते.

कंपनी तुमच्या करिअरच्या रथाचे सारथ्य करत असेल तरी तुमचे युद्ध तुम्हीच लढायचे व जिंकायचे असते.

chinchoresalil@gmail.com
(लेखक मनुष्यबळ क्षेत्रातील तज्ज्ञ असून या क्षेत्रात २५ वर्षे कार्यरत आहेत)

**चौकटी-पल्याड**
आशुतोष शिर्के
रश्मी पटवर्धन

# ॲनिमेशन : मानवी सर्जनशीलतेचा शोध

**ॲनिमेशन म्हणजे जगाकडे नव्या नजरेने पाहायला शिकणे. ॲनिमेशन ही कला आहे, ती मानवी निरीक्षणातून जन्माला येते. एखाद्या चेहऱ्यावरचा क्षणिक भाव, संध्याकाळच्या प्रकाशाचा रंग किंवा शांततेतही घडणारी कथा – हे सगळं पाहण्याची आणि समजण्याची क्षमता सॉफ्टवेअर देऊ शकत नाही.**



**गेल्या दोन** दशकांत ॲनिमेशन ही केवळ मनोरंजनाची शाखा राहिलेली नाही. ॲनिमेशन हे जगाच्या सांस्कृतिक, शैक्षणिक आणि तांत्रिक परिवर्तनाच्या केंद्रस्थानी जाऊन बसले आहे. चित्रपट, वेबसीरिज, गेमिंग, इंजिनीअरिंग, आर्किटेक्चर, वैद्यकीय सिम्युलेशन, व्हर्च्युअल रिॲलिटी या सर्व क्षेत्रामध्ये ॲनिमेशनचा वापर वाढतो आहे. त्यामुळे जगभरातील विद्यापीठे ॲनिमेशन क्षेत्राकडे गंभीरपणे पहात आहेत. ॲनिमेशन शिक्षणाचा अर्थ आपण बऱ्याच वेळेला केवळ 'सॉफ्टवेअर किंवा तंत्र शिकणे' असा घेतो. परंतु खरे तर ॲनिमेशन म्हणजे जगाकडे नव्या नजरेने पाहायला शिकणे.

बहुतेक भारतीय विद्यार्थ्यांच्या मनात ॲनिमेशन शिक्षण म्हटलं की अमेरिका किंवा युरोप हेच पर्याय येतात. कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स, न्यूयॉर्क फिल्म अकॅडमी, शेरिडन कॉलेज (कॅनडा), गोबलिन्स (फ्रान्स) आणि रॉयल कॉलेज ऑफ आर्ट (यूके) या संस्था जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहेत यात शंकाच नाही. या ठिकाणी विद्यार्थ्यांना ॲनिमेशन उद्योग जगतात काम करणारे नामांकित कलाकार आणि दिग्दर्शक शिकवतात. ते विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक कौशल्य देत नाहीत, तर 'दृश्य विचार' करण्याची क्षमता विकसित करतात - कथा, प्रकाश, रंग आणि भावना यांचा परस्परसंबंध समजावतात.

## गायत्रीचा प्रकाश, सावल्या आणि स्वप्नांचा प्रवास



गायत्री अंकम आज कॅनडात आहे. ॲनिमेशनच्या जगात तिने स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. पण हे स्थान तिला सहज मिळालेलं नाही. एआयच्या वेगवान लाटेमुळे तिच्या क्षेत्रात निर्माण झालेली अस्थिरता, बदलणाऱ्या कौशल्यांची मागणी आणि परदेशात स्वतःला सतत सिद्ध करण्याची गरज - या सगळ्यांशी सामना करत ती अजूनही तिच्या सर्जनशीलतेला धरून उभी आहे. तिच्यासाठी ही केवळ नोकरी नाही, तर तिच्या वेडासाठी तिने मोजलेली किंमत आहे.

ही कथा सुरू होते मुंबईतल्या सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट्सच्या वर्गात. रंग, प्रकाश आणि सावल्यांच्या सूक्ष्म नात्याने तिला तेव्हाच भुरळ घातली होती. पडद्यावर दिसणाऱ्या जगामागचं गूढ तिला खुणावत होतं. त्या खुणेचा पाठलाग करत ती न्यूयॉर्क फिल्म अकॅडमीपर्यंत पोहोचली आणि तिथे तिच्यासाठी एक नवं विश्व उघडलं.

इथे तिला शिकवणारे शिक्षक केवळ प्राध्यापक नव्हते; तेच ते लोक होते ज्यांनी तिच्या लहानपणी तिला भुरळ घालणाऱ्या चित्रपटांच्या जगाची निर्मिती केली होती. ज्यांची नावे तिने पडद्यावर वाचली होती, तेच आता तिचे मार्गदर्शक होते. त्यांनी तिला केवळ सॉफ्टवेअर शिकवलं नाही, तर 'प्रकाश हा कथा सांगतो' हे शिकवलं. तांत्रिक कौशल्य आणि कलात्मक दृष्टी यांचा संगम म्हणजेच खऱ्या अर्थाने ॲनिमेशन, हे तिला तिथे उमगलं.

अमेरिकेत शिकताना आणि नंतर टीचिंग असिस्टंट म्हणून काम करताना तिची ओळख केवळ विद्यार्थिनी म्हणून राहिली नाही; ती त्या विद्यापीठाच्या सर्जनशील परंपरेचा एक भाग बनली. पुढे कॅनडात बार्डेल एंटरटेनमेंटमध्ये तिचं काम होतं नेटफ्लिक्स, डिस्ने आणि अमेझॉन प्राइममधील विविध ॲनिमेटेड दृश्यांना प्रकाश आणि कॉम्पोझिटिंगच्या माध्यमातून जिवंत करणं.

आज ती पुन्हा नव्या तंत्रज्ञानाकडे वळते आहे. परदेशी विद्यापीठातील शिक्षण आणि अनुभवातून ती एक महत्त्वाची गोष्ट शिकली - ॲनिमेशन ही केवळ करिअरची वाट नाही, तर सतत स्वतःला नव्याने घडवत राहण्याची एक जिवंत प्रक्रिया आहे.

पण ॲनिमेशनचं विश्व केवळ पाश्चिमात्य देशांपुरतं मर्यादित नाही. ॲनिमेशन क्षेत्रामध्ये जपान अग्रेसर मानला जातो. टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ द आर्ट्स आणि क्योटो सेइका युनिव्हर्सिटीसारख्या संस्थांनी 'ॲनिमे' या विशिष्ट शैलीला जागतिक प्रतिष्ठा मिळवून दिली. जपानी शिक्षणपद्धतीत निरीक्षण, संयम आणि सूक्ष्म भावनांचं चित्रण यावर भर दिला जातो. चीनमध्येही बीजिंग फिल्म अकॅडमी आणि चायना ॲकॅडमी ऑफ आर्टसारख्या संस्थांनी ॲनिमेशनमध्ये मोठी प्रगती केली आहे. तिथे पारंपरिक चीनी कलेचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम घडवण्यावर भर दिला जातो. दक्षिण कोरिया आणि सिंगापूर हे देशही या क्षेत्रात झपाट्याने पुढे येत आहेत.

आज एआयमुळे या क्षेत्रात मोठा बदल होत आहे. काही वर्षांपूर्वी ज्यासाठी तासन्तास मेहनत लागायची, ती कामं आता काही मिनिटांत होतात. त्यामुळे अनेकांना वाटतं की ॲनिमेशनमध्ये माणसाची गरज कमी होईल. काही प्रमाणात हे खरे आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये जगभर ॲनिमेशन क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. परंतु ॲनिमेशन तयार करण्याच्या प्रक्रियेतील माणसाचे स्थान गेले आहे असे यामुळे आपण म्हणू शकतो का? एआय दृश्य तयार करू शकतो, पण तो अनुभव तयार करू शकत नाही. भावना, सूक्ष्मता आणि कथेला दिशा देण्याची क्षमता ही माणसाकडेच असते. एआय हे एक साधन आहे; कलाकार हा त्याचा सर्जक आहे. म्हणूनच जगातील सर्वोत्तम विद्यापीठांमध्ये आजही सॉफ्टवेअरला जितकं महत्त्व दिलं जातं तितकंच महत्त्व ड्रॉइंग, स्केचिंग, फोटोग्राफी, सिनेमाचा अभ्यास, मानसशास्त्र आणि कथाकथन यांना दिलं जातं.

ॲनिमेशनमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतःला केवळ 'तंत्रज्ञ' म्हणून नव्हे, तर 'कलाकार' म्हणून घडवणं आवश्यक आहे. सॉफ्टवेअर बदलतील, एआय विकसित होईल, पण मानवी कल्पनाशक्ती आणि संवेदनशीलता हीच या क्षेत्राची खरी ताकद राहील. ॲनिमेशनचं शिक्षण म्हणजे एका साधनाचं प्रशिक्षण नव्हे; ते म्हणजे स्वतःची वेगळी दृष्टी शोधण्याचा आणि जगाला नव्या पद्धतीने व्यक्त करण्याचा प्रवास आहे.

mentorashutosh@gmail.com
(लेखक करिअर समुपदेशक आहेत.)

## शब्दकोडे- ३५०



**आडवी विधाने :** (१) ज्याची कल्पना येणार नाही असे (४) पुष्कळ, खूप
(७) XX गबाले - हे मराठी चित्रपट दिग्दर्शक व निर्माते होते
(८) गडबड, गोंधळ
(९) त्रास, श्रम
(११) कोळिष्टक (१३) आड लपून बसणे
(१५) हात, सरकारी देणे
(१६) पळसाचा डिंक
(१८) दागदागिने, अलंकार
(१९) वटवृक्ष
(२१) दहावी तिथी, दुधात पीठ भिजवून केलेली पोळी (२२) प्रवृत्ती, झोक
(२४) गोधडी (२६) दुर्लक्ष, क्षमा
(२७) बोभाटा, गाजावाजा
(२९) छाया, प्रतिबिंब
(३०) मालक, नवरा (३३) कुसुम, पुष्प
(३५) संपूर्ण, फलद्रूप
(३६) चिन्ह, गुणधर्म
(३७) एक कीटक
(३८) सत्कृत्य, सत्कर्माचे फळ

**उभी विधाने :** (१) शासन नसलेली स्थिती (२) पंकज, सरोज
(३) पिकांचा अंदाज
(४) मजुरांवर देखरेख करणारा अधिकारी
(५) दुर्गुण, वाईट सवय
(६) तापाची पूर्वचिन्हे
(१०) नवऱ्याचा भाऊ
(१२) वालुकामय प्रदेश
(१४) पायऱ्या असलेली विहीर
(१६) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक प्रमुख प्रशासकीय तालुका (१७) कठोर, कडक
(१८) सारांश, उद्देश (२०) पंक्ती, रांग
(२१) गरम मसाल्यातला एक पदार्थ
(२३) खांबावर आडवी टाकलेली तुळई
(२५) मुसलमानी धर्मसूत्र
(२७) दुधाचा व्यवसाय करणारा
(२८) निरर्थक, फोल (३१) पाणी, नीर
(३२) लक्षात न घेण्यासारखा
(३४) शंभर हजार, चित्त
(३५) पावसाची झड, ओवलेल्या फुलांचा हार

**– चारू नानल**

## सुडोकू - ३५०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | ८ |
| | ६ | ४ | १ | | ३ | २ | ९ | |
| | ७ | | ४ | | ८ | | १ | |
| | ८ | २ | ५ | | ७ | १ | ३ | |
| | | | | १ | | | | |
| | १ | ३ | २ | | ६ | ५ | ४ | |
| | २ | | ७ | | ५ | | ८ | |
| | ४ | ७ | ८ | | ९ | ६ | ५ | |
| ५ | | | | | | | | ३ |

## सुडोकू - ३४९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ९ | ३ | १ | ८ | २ | ४ | ५ | ७ |
| १ | ८ | ४ | ३ | ७ | ५ | ९ | ६ | २ |
| ५ | २ | ७ | ६ | ४ | ९ | १ | ३ | ८ |
| ३ | ५ | २ | ४ | १ | ७ | ८ | ९ | ६ |
| ७ | १ | ६ | २ | ९ | ८ | ५ | ४ | ३ |
| ८ | ४ | ९ | ५ | ६ | ३ | ७ | २ | १ |
| ४ | ७ | ८ | ९ | ३ | ६ | २ | १ | ५ |
| ९ | ६ | ५ | ७ | २ | १ | ३ | ८ | ४ |
| २ | ३ | १ | ८ | ५ | ४ | ६ | ७ | ९ |

## शब्दकोडे - ३४९ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | ल्हा | द | के | श | व | अ | त्रे | | ट |
| स्ता | | वा | दा | | र | | धा | म | ण |
| व | सा | | र | स | दा | र | | हा | क |
| ना | र | ळ | | क | न | का | च | ल | |
| | थी | | व | र्म | | ना | ल | | यं |
| कुं | | पा | | क | था | | न | म | दा |
| भ | र | व | सा | | ट | क | | त्स्य | |
| | ता | स | का | टा | | ट | च | | क |
| का | ळे | | र | | प | रा | व | लं | बी |
| थ्या | | ठा | णे | दा | र | | ळी | | र |

## संक्षिप्त

### धवलारिणींची गाणी, कवितांचा जागर

**पालघर :** जिल्ह्यातील संस्कृती आणि परंपरेचा वारसा जपणारा आगरी समाज होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतो. यंदा मायखोप गावात होळीचा सण केवळ गुलाल आणि विधीपुरता मर्यादित न राहता, एका नव्या सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमाने साजरा होणार आहे. गावातील समाजसेवक रामदास पाटील यांनी यावर्षी होळीच्या निमित्ताने 'साहित्य कवीकट्टा' व 'धवलारिणींच्या सन्माना'चा उपक्रम हाती घेतला. आगरी समाजात लग्नाकार्यात ज्याप्रमाणे ह्यधवलारिणीह्ण गीते गायली जातात, त्याच धर्तीवर होळीच्या रात्री 'होळी गीते' आणि 'कविता सादरीकरणा'चा कवीकट्टा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या प्रत्येक धवलारिणीचा (पारंपारिक गाणी गाणाऱ्या महिला) विशेष गौरव करण्यात येणार आहे.

### 'सालवड महोत्सव'

**बोईसर :** बोईसरजवळील सालवड येथे दोन दिवसीय सालवड महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच पर्यटन वृद्धीसाठी शिवकन्या फाऊंडेशनमार्फत आयोजित या महोत्सवात विविध कार्यक्रम सादर होतील. २७-२८ फेब्रुवारी अशा दोन दिवस रंगणाऱ्या सालवड महोत्सवाचे हे तिसरे वर्ष असून यावर्षी विविध स्पर्धांची रेलचल असेल. लहान मुलांसाठी नृत्य, फॅन्सी ड्रेस आणि किल्ले बांधणी स्पर्धा होतील. ग्राहकांना महोत्सवात कलाकुसरीच्या शोभिवंत वस्तू, घरगुती मसाले, लोणची, पापड, चटण्या आणि इतर वस्तू खरेदी करता येणार असून खवय्यांना स्थानिक लज्जतदार खाद्यपदार्थांची चव चाखण्याची संधी मिळणार आहे. महोत्सवात जास्तीत- जास्त नागरिकांनी सहभागी होण्याची आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

### आरोग्य शिबीर

**पालघर :** कृषी विज्ञान केंद्र कोसबाड हिल आणि काळबादेवी मुंबई येथील माऊली फाऊंडेशन यांच्या वतीने गोखले एज्युकेशन सोसायटीचे माजी सचिव तथा महासंचालक शिक्षण महर्षी कै. डॉ. मो. स. गोसावी यांच्या स्मरणार्थ डहाणू तालुक्यातील कोसबाड हिल येथे २८ फेब्रुवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या आरोग्य शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मदतीने तपासणी केली जाईल. तसेच प्रसिद्ध नेत्र तज्ज्ञांमार्फत मोतीबिंदू, डोळ्यांची तपासणी केली जाणार आहे. शिबिराचे उद्घाटन गोखले एज्युकेशन सोसायटीच्या चेअरमन डॉ. सुहासिनी संत यांच्या हस्ते होणार असून या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. विलास जाधव तसेच माऊली फाऊंडेशनचे अध्यक्ष अ‍ॅड. विश्वनाथ टाळकुटे यांनी केले आहे.

### नावझे गावात पर्यावरणपूरक उपक्रम

**बोईसर :** पालघर तालुक्यातील नावझे गावामध्ये उद्योगांच्या सामाजिक दायित्व कार्यक्रमांतर्गत पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्यात येत असून या शिवजयंतीचे औचित्य साधून या उपक्रमांचे लोकार्पण करण्यात आले. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील गॅलेक्सी या कंपनीने आपल्या 'समृद्ध गाव व्हिजन' या योजनेअंतर्गत नावझे गावामध्ये जलसंधारण, सौर ऊर्जा प्रकल्प, प्लास्टिक संकलन केंद्र आणि मधुमक्षिका पालन या पर्यावरणपूरक उपक्रमांची सुरुवात केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या दिवशी कंपनीचे व्यवस्थापक राजेश खटावकर, सीएसआर प्रमुख अमरजीत दास यांच्या हस्ते उपक्रमाचे लोकार्पण केले. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, सदस्य अरे गावातील नागरिक उपस्थित होते.

# बाह्यवळण रस्त्याचे काम ठप्प

## बोईसरमध्ये रस्ता रुंदीकरणात झाडांचा अडथळा

लोकसत्ता वार्ताहर



**बोईसर :** बोईसरमधील रस्ते वाहतुकीसाठी सोयीचा असलेल्या सिडको बाह्यवळण रस्तेकामात झाडांचा अडथळा निर्माण झाला आहे. झाडांचे हे अतिक्रमण हटविण्यात प्रशासनाला अपयश आल्याने सध्या या रस्त्याचे काम ठप्प झाले आहे.

बोईसरमधील सिडको बाह्यवळण मार्ग हा नवापूर रस्ता ते ओसवाल संकुलमार्गे तारापूर रस्त्याला जोडणारा सोयीचा मार्ग आहे. जवळपास ६५० मीटर लांबी असलेल्या या रस्त्याच्या ५०० मीटर टप्प्याचे काँक्रीटीकरण यापूर्वीच पूर्ण झाले. मात्र, उर्वरित १५० मीटर टप्प्याच्या रुंदीकरणांमध्ये रस्त्याशेजारील इमारतीच्या मागील भागात लावलेली झाडे अडथळा ठरत असल्यामुळे वर्षभरापासून काम रखडले होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काही दिवसांपूर्वी रखडलेल्या टप्प्याच्या कामाला सुरुवात केली. मात्र, ८५ मीटर टप्प्याचे काँक्रीटीकरण करून पुन्हा काम बंद करण्यात आले. काँक्रीटीकरणाच्या कामात अडथळा ठरणाऱ्या झाडांचे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही होत नसल्याने कंत्राटदाराने काम थांबवले आहे. सध्या रस्त्याचा ४२ मीटरचा टप्पा कच्चा असून पावसाळ्यात या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल होत असल्यामुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागतो. चिखलामुळे दुचाकी घसरून यापूर्वी अनेक अपघात घडले आहेत. त्यामुळे रखडलेले काँक्रीटीकरणाचे काम तातडीने पूर्ण करून दिलासा देण्याची मागणी वाहनचालकांकडून होत आहे.

> सिडको बाह्यवळण रस्त्याच्या रुंदीकरणात अडथळा ठरणारी झाडे काढून त्यांचे पुन्हा रोपण करण्याची मागणी वन विभागाकडे करण्यात आली आहे.
> – कमलेश संखे, ग्रामपंचायत अधिकारी, बोईसर

### वाहनचालकांसाठी उपयुक्त मार्ग

बोईसर रेल्वे स्थानक, बसस्थानक, नवापूर नाका ओसवाल परिसर आणि तारापूर मार्गावरील वाहतूक कोंडी लक्षात घेता सिडको बाह्यवळण रस्ता अत्यंत उपयुक्त ठरतो. बोईसरमधील निम्म्याहून अधिक वाहतुकीचा भार या मार्गावरून वळविला जात असल्याने वाहनचालकांसाठी हा रस्ता अतिशय उपयुक्त ठरणारा आहे.





### भंगार बसगाड्यांचा वाहतुकीला अडथळा

पालघर- बोईसर मार्गावर पालघर औद्योगिक वसाहतीपासून एसटी कार्यशाळेसमोर नादुरुस्त व भंगार बस रस्त्यालगत उभ्या आहेत. या बसगाड्यांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून रात्रीच्या वेळी उभ्या बस निदर्शनास न आल्यास अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या नादुरुस्त, भंगार बसगाड्यांची लवकरात-लवकर विल्हेवाट लावण्याची मागणी प्रवासी करीत आहेत. (छायाचित्र : अमोल रायपुरे)

# डहाणूत जलस्त्रोतांची स्वच्छता

## 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' अभियानाचा जागर



लोकसत्ता वार्ताहर

**डहाणू :** पर्यावरणाचे रक्षण आणि जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी संत निरंकारी मिशनच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या देशव्यापी अभियानाला डहाणू तालुक्यात चांगला प्रतिसाद लाभला. 'प्रोजेक्ट अमृत' च्या चौथ्या टप्प्यांतर्गत आयोजित या विशेष मोहिमेत डहाणूसह परिसरातील विविध गावांमधील शेकडो स्वयंसेवकांनी एकत्र येत श्रमदानातून जलस्त्रोतांची स्वच्छता केली.

परम श्रद्धेय माता सुदीक्षा महाराज यांच्या प्रेरणेतून देशभरातील १५०० हून अधिक केंद्रांवर ही मोहीम एकाचवेळी पार पडली. डहाणू तालुक्यात डहाणू मुख्य केंद्रासह आंबेसरी, हळदपाडा, सायवन, चारोटी व ऐना या सहा शाखांमधील स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग नोंदवला. सकाळीच नदी-नाल्यांच्या काठावर व सार्वजनिक पाणीपुरवठा केंद्रांच्या परिसरात स्वयंसेवकांनी साचलेला कचरा, प्लास्टिक आणि अनावश्यक झुडपे काढून परिसर स्वच्छ केला. या मोहिमेला स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांची मोलाची साथ लाभली. शाखा प्रमुख लक्ष्मण बुंधाडा, संचालक नरेश राबड, शिक्षक दिपक इभाड आदींनी या उपक्रमाचे नेतृत्व केले.

# नवी टाटा पंच.ईव्ही



### ऑटोचक्र

**टाटा ईव्हीने** पंच. ईव्हीचे नवे रूप नुकतेच सादर केले. परवडणारी किंमत, चार्जिंगची सोय व बॅटरीची खात्री देताना ९.६९ लाख रुपयांच्या मूळ किमतीत ती मुंबईत उपलब्ध असेल. पंच.ईव्ही ही छोट्या कारच्या श्रेणीत किफायतशीर ठरेल, असा दावा कंपनीने केला आहे.

नवीन पंच. ईव्हीचे लॉन्च करताना टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल लिमिटेड आणि टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक शैलेश चंद्रा म्हणाले, की नवी पंच.ईव्ही, इलेक्ट्रिक मोबिलिटीला प्रत्येक घरासाठी खरोखरच सोपे, व्यवहार्य व निश्चित ठरते. ३५५ किमीची रिअल-वर्ल्ड रेंज, फास्ट चार्जिंग क्षमता, लाइफटाइम एचव्ही बॅटरी वॉरंटी हे त्यातील फायदे आहेत. प्रगत ॲक्टि.ईव्ही अभियांत्रिकीवर आधारित नवी पंच.ईव्ही शुद्धतेचा नवा पायंडा पाडते. सबकॉम्पॅक्ट अर्थात छोट्या आकाराच्या एसयूव्ही श्रेणीत पंचचे ईव्ही रूप तितकेच आकर्षक आहे.

### २६ मिनिटांत ८० टक्क्यांपर्यंत जलद चार्ज

- मोठ्या ४० केडब्ल्यूएच एलएफपी प्रिझ्मॅटिक सेल बॅटरी संचासह नवी पंच.ईव्ही एका चार्जमध्ये ३५५ किलोमीटरचा टप्पा पूर्ण करते. नवी पंच.ईव्ही रोजच्या शहरी वापरासाठी आणि छोट्या इंटरसिटी प्रवासासाठी उत्तम पर्याय मानता येईल. वारंवार चार्जिंग थांब्यांची गरज त्यामुळे कमी होते.
- नवी पंच.ईव्ही ३० केडब्ल्यूएच बॅटरी पॅक पर्यायासहही उपलब्ध असेल. या दोन पर्यायांच्या संयोगाने, नवीन पंच.ईव्ही ग्राहकांना पारंपरिक इंधनावर धावणाऱ्या वाहनांसाठी इलेक्ट्रिक हा सहज पर्याय आहे. ड्रायव्हिंगचा उत्कृष्ट दर्जा व मेंटेनन्स खर्च येतो.
- जलदगती चार्जिंग पर्यायांमुळे बॅटरी फक्त २६ मिनिटांत २० ते ८० टक्क्यांपर्यंत जलद चार्ज होऊ शकते. याशिवाय, १५ मिनिटांत बॅटरीला सहजपणे १३५ किमी रिअल-वर्ल्ड रेंज मिळते.

# वसईत 'जागर मराठी'चा कार्यक्रम

**वसई :** मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने वसईत साहित्य जल्लोष प्रतिष्ठान आणि समाज उन्नती मंडळ संचालित मनोहर वाचनालयतर्फे 'जागर मराठीचा' कार्यक्रम शुक्रवार, २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी वसईतील माणिकपूर येथील समाज उन्नती मंडळ सभागृहात होईल.कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर अजीव पाटील यांच्या हस्ते होईल. तर कवयित्री स्नेहा संदिप पंडित यांच्या 'निसर्ग किमया' या कवितासंग्रहाचे प्रकाशन यावेळी होणार आहे.

सोळावा स्मृतिदिन



स्व.सौ.कामिनी द.अधिकारी
माऊली तु बळ दिले आम्हा बलवंत होण्यासाठी
दिशा दिली आम्हा यशवंत होण्यासाठी
शिकवण दिली आम्हा माणुसकीचा झरा जपण्यासाठी
तुझा खंबिर स्वभाव व स्फूर्तीदायी विचाराने
यशाची प्रत्येक पायरी गाठतो आम्ही
आम्हा सर्वांचे दैवत तु आम्हा सर्वांची मार्गदर्शक तु
आई तुला लक्ष लक्ष प्रणाम.
तुझ्या पवित्र स्मृतिस आम्हा सर्वांचे विनम्र अभिवादन!
मुल : विनोद व रमेश, सुन: सौ. तनुजा
मुली: सौ. मिना व सौ. विजू नातवंडे: सौ. संध्या, डॉ.सौ. शोभा, मनोज डॉ श्रध्दा, शुभम, नातसुन: डॉ. सौ. मीरा व अधिकारी परिवार
नागझरी, (बोईसर पूर्व) तालुका व जिल्हा पालघर.

## नाटक सिनेमा वाद्यवृंद















बुधवार,
२५ फेब्रुवारी २०२६

# लोकसत्ता [ठाणे]

LOKSATTA.COM, FACEBOOK.COM/LOKSATTALIVE लोकमान्य, लोकशक्ती! TWITTER.COM/LOKSATTALIVE, LOKSATTA.COM/APPS

## अंतरंग

### अनधिकृत बांधकामांवर हातोडा

**बदलापूर :** दोन आठवड्यांपूर्वी बदलापूर शहरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली होती. त्या वेळी काही दुकानदार आणि नागरिकांनी थोडा वेळ देण्याची मागणी केली होती. त्यानुसार दोन आठवड्यांनंतर सोमवारी पुन्हा एकदा प्रशासनाने कारवाई केली.

वृत्त...३

### ३१६ कोटींची कर वसुली

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महापालिकेने आतापर्यंत एकूण ३१६ कोटी मालमत्ता कराची वसुली केली आहे. मालमत्ता कराचा लक्ष्यांक पूर्ण करण्यासाठी मालमत्ता कर विभागाने कर थकबाकीदारांना जप्ती नोटिसा, मालमत्ता जप्त करून लिलाव नोटिसा बजावण्यास सुरुवात केली आहे.

वृत्त...३

### दहा मिनिटांत १९ विषय मंजूर

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या सोमवारी झालेल्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत प्रश्न आणि लक्षवेधी घेण्यास नकार दिल्याच्या कारणावरून शिवसेना व भाजप यांच्यात वाद होऊन सभागृहात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. त्यात अवघ्या दहा मिनिटांत १९ विषयांना शिवसेनेने मंजुरी दिली.

वृत्त...४

### कंत्राटी कामगारांचे प्रश्न मार्गी

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या फायलेरिया विभागातील कर्मचाऱ्यांसह पाच हजार कंत्राटी कामगारांना विविध सेवा सुविधांचा लाभ देण्यास आयुक्त सौरभ राव यांनी तत्त्वतः मान्यता दिली. त्याचबरोबर पालिकेतील कंत्राटी शिक्षकांनाही कायम करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

वृत्त...४

# सोने, चांदी की तांबे? बदलत्या अर्थचक्रातील गुंतवणुकीचा 'भविष्यवेध'

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई: एकीकडे** सोन्याची झळाळी कायम असताना, तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे चांदी आणि तांब्यासारख्या धातूला सोन्याचे मोल प्राप्त होत आहे. तरी या धातूंच्या किमतीत वाढ-घसरणीचे बदलणारे समीकरण नेमके काय? परंपरेने दागिन्यांचा की डिजिटल गुंतवणुकीचा नवा मार्ग अनुसरायचा? शेअर बाजार, म्युच्युअल फंड आणि बँक ठेवींच्या तुलनेत या धातूंचा परतावा किती? या सर्व प्रश्नांचा वेध घेणारे 'लोकसत्ता अर्थभान'चे विशेष सत्र मुलुंडमध्ये येत्या शनिवारी सायंकाळी होत आहे.

गुंतवणूक साक्षरतेचा जागर म्हणून होत असलेल्या या कार्यक्रमात तज्ज्ञांकडून गुंतवणुकीचा कानमंत्र दिला जाणार आहे. हे 'लोकसत्ता अर्थभान'चे सत्र शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६, सायंकाळी ६.०० वाजता, महाराष्ट्र सेवा संघ सभागृह, पं. जवाहरलाल नेहरू मार्ग, अपना बाजारच्या वर, मुलुंड (प.) येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे 'आदित्य बिर्ला सन लाइफ मुच्युअल फंड' मुख्य प्रायोजक आहेत. या ठिकाणी सोने-चांदी, म्युच्युअल फंड आणि इतर गुंतवणुकांबाबत नियोजनाविषयीची दिशा उपस्थितांना ठरेल. शिवाय आपले प्रश्न व शंका तज्ज्ञांना वाचून, त्यांचे निरसन करता येईल.

मौल्यवान धातूंच्या किमतीतील चढ-उताराची जोखीम की शेअर बाजाराचे भीतीदायी हेलकावे या चक्रात आपला पैसा नेमका कुठे वळवायचा, हे ठरविता यायला हवे. शिवाय कोणत्या धातूत आणि कशी गुंतवणूक करावी? याबद्दल वस्तू बाजाराचे विश्लेषक श्रीकांत कुवळेकर हे या कार्यक्रमात मार्गदर्शन करतील. याच परिसंवादात, 'सेबी नोंदणीकृत आर्थिक नियोजनकार' प्रीती झेंडे या 'गुंतवणुकीद्वारे अर्थनियोजन' या विषयाद्वारे जीवनाच्या विविध टप्प्यांत अनुसरायचे गुंतवणुकीचे मार्ग सांगतील. थोड्या थोडक्या बचतीतून इच्छित संपत्ती निर्माण शक्य आहे. पारंपरिक बँक ठेवींव्यतिरिक्त, म्युच्युअल फंड, शेअर बाजारात गुंतवणुकीच्या वाटा त्या समजावून सांगतील. केवळ नफा नाही, तर गुंतवणुकीची नवी दृष्टी देणारा हा परिसंवाद सर्वांसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल.

कार्यक्रमास प्रवेश सर्वांसाठी खुला व निःशुल्क असून, प्रथम येणाऱ्यास, प्रथम प्राधान्य असेल.

Aditya Birla Sun Life Mutual Fund | ADITYA BIRLA CAPITAL MUTUAL FUNDS
प्रस्तुत
लोकसत्ता अर्थभान

- **सोने-चांदी नव्हे सुरक्षित ढाल!**
  श्रीकांत कुवळेकर (वस्तू बाजाराचे विश्लेषक)
- **गुंतवणुकीद्वारे अर्थनियोजन**
  प्रीती झेंडे (सेबी नोंदणीकृत आर्थिक नियोजनकार)

- **कुठेः** महाराष्ट्र सेवा संघ सभागृह, पं. जवाहरलाल नेहरू मार्ग, अपना बाजारच्या वर, मुलुंड (प.)
- **कधी :** शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६, सायंकाळी ६.०० वाजता

**इच्छुकांनी नाव नोंदणीसाठी -** ९९२००९९९४३, (०२२) ६७४४०३९०, (०२२) ६७४४०२१५ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

अस्वीकरणः म्युच्युअल फंड गुंतवणूक ही बाजारातील जोखमींच्या अधीन आहे, योजनांसंबंधित सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा.

# मेअखेरीस वाहतूक कोंडीमुक्ती

## मुंबई-नाशिक महामार्गावरील माजिवडा-वडपे प्रकल्प ८३ टक्के पूर्ण

**किशोर कोकणे, लोकसत्ता**

**ठाणे :** ठाणे, भिवंडी, कल्याण, नाशिक व समृद्धी महामार्गाला जोडणाऱ्या मुंबई-नाशिक महामार्गावरील माजिवडा-वडपे मार्गाच्या रुंदीकरणाचे ८३ टक्के काम पूर्ण झाले असून मेअखेरीस हा संपूर्ण प्रकल्प वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तो खुला झाल्यास पावसाळ्यात ठाणे, भिवंडी शहरात होणाऱ्या वाहतूक कोंडीतून वाहनचालकांना दिलासा मिळेल. मुंबईहून समृद्धीच्या दिशेकडील प्रवासही काहीसा वेगवान होण्याची चिन्हे आहेत.

भिवंडी व नाशिक भागांत गोदामे असल्याने उरण जेएनपीटी, गुजरात येथून हजारो अवजड वाहने मुंबई नाशिक महामार्गावरून वाहतूक करतात. महामार्गावरील अनेक ठिकाणी रस्ता अरुंद आहे. हा महामार्ग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत असला तरी प्राधिकरणाला या रस्त्याची देखभाल दुरुस्ती करता आलेली नाही. त्यामुळे २०२१पासून राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) या महामार्गावरील ठाण्यातील माजिवडा ते भिवंडी येथील वडपे या २३.८० किमी प्रकल्प निर्माणाचे, रुंदीकरणाचे काम हाती घेतले होते, परंतु अस्तित्वात असलेल्या रस्त्यावर अवजड वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात खड्डे पडत होते. त्यामुळे प्रकल्पासही विलंब झाला होता. महामार्गावर पाच वर्षे दुरुस्तीचे काम सुरू होते. काही दिवसांपूर्वी येथील नव्या साकेत पुलावरून वाहतूकही सुरू झाली आहे. लवकरच इतर पुलांची कामेही पूर्ण होणार असल्याची माहिती एका अभियंत्याने दिली.



### प्रकल्प का महत्त्वाचा?

या महामार्गाचा वापर कल्याण, भिवंडी, मुंब्रा, नाशिक आणि समृद्धी महामार्गावरील हजारो नागरिक करतात. त्यामुळे हा प्रकल्प पूर्ण होणे अत्यंत महत्त्वाचे होते. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ठाण्यातील माजिवडा, साकेत, खारेगाव, भिवंडी भागात होणाऱ्या वाहतुक कोंडीतून नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

### प्रकल्पाची सद्यःस्थिती

या प्रकल्पातील मुख्य रस्ता २३.८० किमीचा असून सेवा रस्ता १८.३५ किमी इतका आहे. त्यापैकी मुख्य रस्त्याचे काम १९.३० किमी आणि सेवा रस्त्याचे काम १६.३३ किमीपर्यंत पूर्ण झाले आहे. म्हणजेच, मुख्य रस्त्याचे काम ८३ टक्के, तर सेवा रस्त्याचे काम ८९ टक्के पूर्ण झाले.

### भुयारी मार्ग

येवई, वालशिंद, सोनाळे, सरवली, पिंपळास, ओवळी, दिवे या भुयारी मार्गाचे काम पूर्ण झाले असून पोहोच रस्त्याचे काम मार्च महिन्यात पूर्ण होईल. तर खारेगाव भुयारी मार्ग एप्रिलपर्यंत पूर्ण होईल.

### मोठ्या पुलांची कामे

वडपे पूल ९४ टक्के, रेल्वे पूल ७० टक्के, खारेगाव पूल ९७ टक्के आणि साकेत पुलाचे काम पूर्ण झाले असून तो वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

# सत्ताधाऱ्यांची कोंडी

## भाजप नगरसेवकांची प्रश्नांची सरबत्ती

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत शहरातील समूह विकास योजना (क्लस्टर) व प्रशासकीय कालावधीत शासकीय अनुदानातून झालेल्या कामांचा विषय उपस्थित करत सत्तेत सहभागी असलेल्या भाजपनेच सत्ताधारी शिवसेनेची कोंडी केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रीपद असताना महापालिकेला वेगवेगळ्या विकासकामांसाठी शेकडो कोटी रुपयांचा निधी मिळाला. तसेच 'क्लस्टर'च्या कामासाठीही शासकीय निधी मंजूर झाला. या दोन्ही कामांची सविस्तर माहिती सभागृहात सादर करावी, अशी मागणी भाजप नगरसेवकांनी केल्याने शिवसेनेत नाराजीचा सूर आहे.

पहिल्याच सर्वसाधारण सभेत प्रश्नोत्तर, लक्षवेधीऐवजी थेट विषयपत्रिकेचे वाचन सुरू झाल्याने शिवसेना व भाजप या दोन्ही सत्ताधारी पक्षांच्या नगरसेवकांमध्ये शाब्दिक चकमक (पान ३ वर)

> शिवसेनेविरोधात रणनीती नव्हती. आम्ही काही प्रश्न विचारले होते. लक्षवेधीही मांडण्यात आली होती. आमचे म्हणणे इतकेच होते की, प्रश्नांची उत्तरे आणि लक्षवेधीवर पुढच्या सभेत चर्चा करा पण, आता ती वाचून दाखवा पण, त्यांनी तसे केले नाही.
> **-मृणाल पेंडसे,** नगरसेविका, भाजप

# माजिवडा भागात महिनाभर वाहतूक बदल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** जलवाहिनी भूमिगत करण्याचे काम माजिवडा, कॅडबरी भागात सुरू असून ठाणे पोलिसांनी वाहतूक बदल लागू केले आहेत. हे बदल मंगळवारपासून लागू करण्यात आले असून ते ३१ मार्चपर्यंत कायम असतील.

केंद्र सरकारच्या अमृत २.० योजनेअंतर्गत ठाणे पालिका क्षेत्रातील पाणीपुरवठ्याची वितरण व्यवस्था सुरळीत व विस्तारित करण्याचे काम सुरू आहे. या कामासाठी माजिवडा ते रवी स्टील नाका परिसरातील सेवा रस्त्याचे खोदकाम केले आहे. त्यामुळे येथील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे.

या अधिसूचनेनुसार, कॅडबरी जंक्शन ते ज्युपिटर रुग्णालय येथे सेवा रस्त्याने रवी वजन काटा, पोखरण रोड क्रमांक २ च्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना हरदासनगर परिसरात प्रवेशबंदी असेल. येथील वाहने हरदासनगर येथून डावीकडे वळण घेऊन वसंत लॉन्स गृहसंकुलाजवळून वा ज्युपिटर रुग्णालयाजवळील अंतर्गत रस्त्यावरून वाहतूक करतील.

लोढा कासा मल्टिमा गृहसंकुल, टीसीएस कंपनी, वसंत लॉन्स गृहसंकुलासमोरील मार्गाने हरदासनगर परिसरातून डावे वळण घेऊन सेवा रस्त्याने रवी वजन काटा, पोखरण रोड क्रमांक २ येथे जाणाऱ्या वाहनांना हरदासनगर येथे प्रवेशबंदी असेल. येथील वाहने ज्युपिटर रुग्णालयासमोरील मार्गाने जातील.



# शालेय बसगाड्यांमध्ये आता 'डॅशकॅम'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** शालेय बसचे अपघात टाळण्यासह चालकांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी बसच्या पुढील भागात 'डॅश कॅमेरे' बसविण्याच्या सूचना ठाणे जिल्हास्तरीय स्कूल बस सुरक्षा समितीने केली. शिवाय शाळा भरताना व सुटताना अर्धा तास आधी बस शाळेजवळ उभ्या कराव्यात, असेही समितीने म्हटले आहे.

प्रवासात विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शासनस्तरावर विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्यात जिल्हास्तरीय शालेय बस सुरक्षितता समितीची त्रैमासिक बैठक मंगळवारी ठाणे शहर वाहतूक विभागाचे उपायुक्त पंकज शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी समितीचे सदस्य ठाणे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर व कल्याण उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी सुरक्षाविषयक निर्देश दिले.

बसमधील 'डॅशकॅम'मुळे अपघात टाळण्यासह अपघात वा नियमभंग झाल्यास नेमकी चूक कोणाची हे स्पष्ट होण्यास मदत होईल. शालेय वाहनांच्या मालकांनी नियमितपणे चालकांशी संवाद साधावा. मार्ग, वाहतूक स्थिती व (पान ३वर)






# करिअर वृत्तांत

जे आपल्याला केवळ माहिती देत नाही तर आपले जीवन अस्तित्वात असलेल्या सर्वांशी सुसंगत बनवते ते म्हणजे सर्वोत्तम शिक्षण.
– रवींद्रनाथ टागोर

**स्पर्धा परीक्षेच्या प्रांगणात**
**एमपीएससी**
रोहिणी शहा

## राज्यसेवा मुख्य परीक्षा : सामान्य अध्ययन (पेपर दोन)
# आंतरराष्ट्रीय संघटना

**राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या सामान्य अध्ययन पेपर दोनच्या तयारीबाबत मागील लेखांमधून चर्चा करण्यात आली. या चर्चेच्या आधारे पेपर दोनमधील आंतरराष्ट्रीय संघटना या मुद्द्यावरील प्रश्नाचे उत्तर या लेखामध्ये पाहू.**

■ **प्रश्न: ''दहशतवाद हा जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी गंभीर धोका बनला आहे.'' या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवादविरोधी समिती (उळउ) व तिच्या संलग्न संस्थांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करा. (१५ गुण २५० शब्द)**

**प्रश्नाचे विश्लेषण–**

प्रश्नामुळे मुद्दे आधी समजून घेऊ. जागतिक शांतता आणि सुरक्षेसाठी दहशतवादाचा धोका; याबाबत दहशतवाद विरोधी समिती व तिच्या संलग्न संस्थांची परिणामकारकता आणि तिचे मूल्यमापन. या तीन मुद्द्यांवर आधारित उत्तर लिहिताना पुढील पायऱ्या वापरता येतील.

- जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी दहशतवाद कशाप्रकारे गंभीर धोका बनला आहे, यावर थोडक्यात भाष्य करा.
- संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची दहशतवादविरोधी समिती (CTC) आणि तिच्या संलग्न संस्थांची आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवाद रोखण्यातील व त्याचे शमन करण्यातील भूमिका स्पष्ट करा.
- समितीच्या दहशतवादविरोधी प्रयत्नांपुढील आव्हानांचे विश्लेषण करा.
- उळउच्या कार्यक्षमतेच्या मूल्यमापनावर भर देणे आवश्यक आहे. त्यामुळे उपाययोजना थोडक्यात सुचवून उत्तराचा समारोप करा.

**उत्तर:**

दहशतवाद म्हणजे राजकीय किंवा सामाजिक उद्दिष्टांसाठी हिंसा व भीतीचा वापर. आज तो जागतिक शांतता, आर्थिक स्थैर्य व सामाजिक सलोखा यांना गंभीर धोका निर्माण करतो. उदा. २००८ मुंबई हल्ल्यांमुळे भारताला सुमारे २ अब्ज डॉलर्सचे आर्थिक नुकसान झाले. ISIS च्या उदयामुळे मध्यपूर्वेत लाखो लोक विस्थापित झाले. तसेच, क्राइस्टचर्च (२०१९) घटनेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर धार्मिक तणाव वाढवला.



अमेरिकेतील २००१ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर, आंतरराष्ट्रीय दहशतवाद रोखण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने दहशतवादविरोधी समितीची (CTC) स्थापना केली.

**CTC ची भूमिका व परिणामकारकता:**

- **सदस्य राष्ट्रांना कायदेशीर चौकट मजबूत करण्यासाठी मार्गदर्शन:** दहशतवादाला निधीपुरवठा हा गुन्हा ठरविणे, मालमत्ता गोठविणे यासाठी सदस्य राष्ट्रांना कायदे करण्यात मार्गदर्शन.
- **आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे:** गुप्त माहितीची देवाणघेवाण व संयुक्त कारवाया सुलभ करण्यासाठी सदस्य राष्ट्रांमध्ये समन्वय साधणे
- **प्रशिक्षण आणि क्षमता विकास:** सदस्य राष्ट्रांच्या अंमलबजावणी यंत्रणेसणप्रशिक्षण व तांत्रिक मदत करणे.
- **प्रतिबंधात्मक निर्बंधांची अंमलबजावणी:** आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांवर प्रवासबंदी, शस्त्रबंदी लागू करणे.
- **वित्तीय कारवाई कृती दल (FATF) आणि इंटरपोलबरोबर समन्वय:** दहशतवादी वित्तपुरवठ्यावर नियंत्रण साधणे.

**मर्यादा व आव्हाने:**

- **राजकीय मतभेद:** स्थायी सदस्यांच्या नकाराधिकारामुवळे ठोस कारवाईत अडथळे. उदा. सिरीयाबाबत रशिया व चीनचा नकाराधिकार
- **सार्वभौमत्वाचा प्रश्न:** सदस्य राष्ट्रांचा अंतर्गत कायदा निर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत बाह्य हस्तक्षेपास विरोध.
- **संसाधनांची कमतरता:** विकसनशील देशांत अंमलबजावणीत अडचणी.
- **तंत्रज्ञानाचा दुरुपयोग:** एनक्रिप्टेड प्लॅटफॉर्मचा वापर केल्यने दहशतवादी कारवायांवर नियंत्रण आणण्यात अडचणी.
- **मानवाधिकार संतुलन:** कठोर कायद्यांमुळे नागरिकांच्या अधिकारांवर मर्यादा. उदा. वAPA किंवा AFSPA कायदे
- **दहशतवादाचे बदलते स्वरूप:**

पारंपरिक संघटित गटांऐवजी स्थानिक पातळीवरील लोन-वुल्फ हल्ले - तपासात अडचणी

एकूणच, CTC ने आंतरराष्ट्रीय चौकट उभी केली असली तरी प्रभावी अंमलबजावणी व राजकीय एकमत यांवर तिचे यश अवलंबून आहे. यासाठी बहुपक्षीय सहकार्य, समन्वय, तंत्रज्ञानाच्या आधारे देखरेख, जनजागृती आणि मानवाधिकारांचा सन्मान राखणारी धोरणे आवश्यक आहेत.

**स्पष्टीकरण**

पूर्ण वाक्य आणि फक्त मुद्दे अशा दोन्ही वाक्यरचनांचा वापर केल्याने कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त मुद्दे मांडणे शक्य झाले आहे.

वेगवेगळ्या दहशतवादी कारवायांमुळे जागतिक शांतता सुरक्षितता यांना निर्माण झालेले धोके उदाहरणे दिल्यामुळे थोडक्यात पण स्पष्टपणे मांडता आले आहेत.

दहशतवाद विरोधी समितीचे मूल्यमापन करताना सकारात्मक मुद्दे आणि मर्यादा या दोन्हीबाबत मुद्दे मांडणे आवश्यक होते. अतिरिक्त शब्द वापरावे लागू नयेत यासाठी हे लक्षात घेऊन सर्व महत्त्वाचे मुद्दे क्रियापदांचा वापर न करता मांडले आहेत.

शक्य तेथे उदाहरणे दिल्यामुळे उत्तराची परिणामकारकता वाढली आहे.

समारोप करताना मूल्यमापनाचा निष्कर्ष मांडून परिणामकारकता वाढविण्यासाठीचे उपाय थोडक्यात मांडले आहेत. यामुळे उत्तराचा भर मूल्यमापनावरच ठेवता आल्याचे लक्षात येते.

steelframe.india@gmail.com

# कर्मचाऱ्यांची वार्षिक परीक्षा!

**कामगिरीचे वार्षिक अवलोकन ही कर्मचाऱ्यांसाठी स्वत:कडे मागे वळून बघण्याची उत्तम संधी असते. मानसशास्त्रानुसार कामगिरीचे विश्लेषण आणि सुधारणा करण्यासाठी केलेल्या विचारपूर्वक योजना प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतात.**



**कौशल्य तंत्र**
सलील चिंचोरे

**मार्च महिना** येऊ घातला की कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्यातील वेतन वाढ व प्रमोशनचे वेध लागतात. मार्च महिना हा वित्तीय वर्षातील अखेरचा महिना. मार्च महिन्याअखेरीस कंपनीच्या वित्तीय कामगिरीचा आढावा तर घेतला जातोच; तसेच कर्मचाऱ्यांच्या वार्षिक कामगिरीचेही अवलोकन केले जाते. या पद्धतशीर मार्गाला परफॉर्मन्स अप्रेजल म्हणतात. कर्मचाऱ्यांच्या वार्षिक अवलोकनाचे खास महत्त्व असते. कर्मचाऱ्यांच्या कामगिरीनुसार त्यांना परफॉर्मन्स रेटिंग दिले जाते. यानुसार कर्मचाऱ्यांसंबंधीचे वेतनवाढ, प्रमोशन, बदली, बोनस असे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जातात.

म्हणून प्रत्येक कर्मचारी वर्षाअखेरीस आपल्या कामाला रंगरंगोटी करून तिला आकर्षक स्वरूपात बॉससमोर सादर करतो. परफॉर्मन्स अप्रेजल मीटिंगमध्ये आपल्या कामगिरीची बॉसवर छाप पाडून चांगले रेटिंग मिळवण्याचा हा प्रयत्न असतो. काही वेळेला हा प्रयत्न फलद्रूप होतो तर काहीदा तो चक्क फसतो. कारण बॉसने कर्मचाऱ्यांबरोबर वर्षभर खांद्याला खांदा लावून काम केलेले असते. कर्मचाऱ्यांच्या कामातील खाचाकोचा, उणीवा, कर्मचाऱ्यांचा स्वभाव बॉसला चांगला ठाऊक असतो. बॉसपुढे कितीही अतिशयोक्तीपूर्ण सादरीकरण केले तरी प्रत्येक कर्मचाऱ्याला स्वतःच्या कामगिरीची यथार्थ जाणीव असते. पण त्याला रंगरंगोटी करण्याच्या नादात आपण त्यातील सत्व हरवून बसतो.

आज आपण याच गोष्टीकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून बघू. कामगिरीचे वार्षिक अवलोकन ही कर्मचाऱ्यांसाठी स्वतःकडे मागे वळून बघण्याची उत्तम संधी असते. मानसशास्त्रानुसार कामगिरीचे विश्लेषण आणि सुधारणा करण्यासाठी केलेल्या विचारपूर्वक योजना प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतात. प्रत्येक कसलेला खेळाडू मॅच संपल्यावर आपल्या कोचबरोबर बसून मॅचचे व स्वतःच्या कामगिरीचे सखोल विश्लेषण करतो. त्यातून हाती येणाऱ्या त्रुटींवर भर देऊन सराव करतो. त्यामुळे त्या खेळाडूला पुढच्या मॅचसाठी अधिक चांगले तयार होण्यासाठी मदत होते. बऱ्याचदा आपली कामगिरी फुगवून सांगण्याच्या नादात आपण स्वतःला आरशात बघण्याचे विसरतो. यावेळेस परफॉर्मन्स रिव्ह्यूसाठी नेहमीचे पवित्रे सोडून तुम्ही स्वतःचे कठोर मूल्यमापन करा. त्यासाठी मदत म्हणून तुम्हाला मी काही प्रश्न देतो आहे. त्या प्रश्नांची उत्तरे तुम्ही स्वतःच स्वतःसाठी शोधू शकता -

- गेल्या वर्षात वर्षभरात कोणती टार्गेट्स मी पार केली? ते कशामुळे साध्य झाले?
- कोणती टार्गेट्स पार करण्यात मला अपयश आले? त्याची कारणे काय?
- गेल्या वर्षभरात मला कोणत्या अडचणी आल्या? त्यांचा सामना मी कसा केला?
- माझा बॉस व इतर वरिष्ठांनी मला कोणता फीडबॅक दिला? त्याला मी कसा प्रतिसाद दिला?
- माझ्या कामगिरीवर मी पूर्णतः समाधानी आहे का? नसल्यास त्यात कुठे कमतरता जाणवते आहे?
- गेल्या वर्षभरात इतर सहकाऱ्यांबरोबरचे संबंध कसे होते? ते सुधारण्यासाठी मी कोणते प्रयत्न केले?
- गेल्या वर्षात मी काय नवीन शिकलो? त्याचा वापर मला पुढे कसा करता येईल?
- येत्या एक-दोन वर्षातील माझी करिअरची उद्दिष्टे कोणती?
- त्यासाठी येत्या वर्षात मला कोणत्या नवीन गोष्टी अनुभवायच्या अथवा शिकायच्या आहेत?



- सर्व गोष्टींचा सारासार विचार करता पुढच्या वित्तीय वर्षात माझ्या कामाविषयी व करिअरविषयी मी (अ) कोणत्या गोष्टी नव्याने चालू करणार? (ब) कोणत्या गोष्टी अधिक सातत्याने करत राहणार? व (क) कोणत्या गोष्टी कटाक्षाने टाळणार?

या प्रश्नांवर विचार करून त्याची तुमच्या बॉसबरोबर मोकळेपणाने चर्चा करा. सहेतुक केलेली चर्चा निश्चितच पुढील मार्ग दर्शवेल. स्वतःच्या कामगिरीची तुलना तुमच्या सहकाऱ्यांच्या कामगिरीशी करण्याचे टाळा.

बहुतांशी कर्मचाऱ्यांना वाटत असते की आपल्या करिअरची सगळी जबाबदारी कंपनीची आहे. माझ्या भवितव्याचा विचार माझ्या बॉसने आणि कंपनीने करावा. मी पुढे काय करावे, कसे काम करावे हे त्यांनीच ठरवावे. ही धारणा संपूर्णपणे चुकीची आहे. आपल्या कामगिरीची व करिअरची जबाबदारी आपली आहे. विचार-विश्लेषण करून पुढील मार्गही आपल्यालाच आखायचा असतो. त्यासाठी कंपनी व कंपनीतील वरिष्ठांचे मार्गदर्शन घ्यायचे असते.

कंपनी तुमच्या करिअरच्या रथाचे साराथ्य करत असेल तरी तुमचे युद्ध तुम्हीच लढायचे व जिंकायचे असते.

chinchoresalil@gmail.com
(लेखक मनुष्यबळ क्षेत्रातील तज्ज्ञ असून या क्षेत्रात २५ वर्षे कार्यरत आहेत)

# ॲनिमेशन : मानवी सर्जनशीलतेचा शोध



**चौकटी-पल्याड**
आशुतोष शिर्के
रश्मी पटवर्धन

**ॲनिमेशन म्हणजे जगाकडे नव्या नजरेने पाहायला शिकणे. ॲनिमेशन ही कला आहे, ती मानवी निरीक्षणातून जन्माला येते. एखाद्या चेहऱ्यावरचा क्षणिक भाव, संध्याकाळच्या प्रकाशाचा रंग किंवा शांततेतही घडणारी कथा – हे सगळं पाहण्याची आणि समजण्याची क्षमता सॉफ्टवेअर देऊ शकत नाही.**



**गेल्या दोन** दशकांत ॲनिमेशन ही केवळ मनोरंजनाची शाखा राहिलेली नाही. ॲनिमेशन हे जगाच्या सांस्कृतिक, शैक्षणिक आणि तांत्रिक परिवर्तनाच्या केंद्रस्थानी जाऊन बसले आहे. चित्रपट, वेबसीरिज, गेमिंग, इंजिनीअरिंग, आर्किटेक्चर, वैद्यकीय सिम्युलेशन, व्हर्च्युअल रिॲलिटी या सर्व क्षेत्रामध्ये ॲनिमेशनचा वापर वाढतो आहे. त्यामुळे जगभरातील विद्यापीठे ॲनिमेशन क्षेत्राकडे गंभीरपणे पहात आहेत. ॲनिमेशन शिक्षणाचा अर्थ आपण बऱ्याच वेळेला केवळ 'सॉफ्टवेअर किंवा तंत्र शिकणे' असा घेतो. परंतु खरे तर ॲनिमेशन म्हणजे जगाकडे नव्या नजरेने पाहायला शिकणे.

बहुतेक भारतीय विद्यार्थ्यांच्या मनात ॲनिमेशन शिक्षण म्हटलं की अमेरिका किंवा युरोप हेच पर्याय येतात. कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स, न्यूयॉर्क फिल्म अकॅडमी, शेरिडन कॉलेज (कॅनडा), गोबलिन्स (फ्रान्स) आणि रॉयल कॉलेज ऑफ आर्ट (यूके) या संस्था जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहेत यात शंकाच नाही. या ठिकाणी विद्यार्थ्यांना ॲनिमेशन उद्योग जगतात काम करणारे नामांकित कलाकार आणि दिग्दर्शक शिकवतात. ते विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक कौशल्य देत नाहीत, तर 'दृश्य विचार' करण्याची क्षमता विकसित करतात - कथा, प्रकाश, रंग आणि भावना यांचा परस्परसंबंध समजावतात.

## गायत्रीचा प्रकाश, सावल्या आणि स्वप्नांचा प्रवास

गायत्री अंकम आज कॅनडात आहे. ॲनिमेशनच्या जगात तिने स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. पण हे स्थान तिला सहज मिळालेलं नाही. एआयच्या वेगवान लाटेमुळे तिच्या क्षेत्रात निर्माण झालेली अस्थिरता, बदलणाऱ्या कौशल्यांची मागणी आणि परदेशात स्वतःला सतत सिद्ध करण्याची गरज - या सगळ्यांशी सामना करत ती अजूनही तिच्या सर्जनशीलतेला धरून उभी आहे. तिच्यासाठी ही केवळ नोकरी नाही, तर तिच्या वेडासाठी तिने मोजलेली किंमत आहे.



ही कथा सुरू होते मुंबईतल्या सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट्सच्या वर्गात. रंग, प्रकाश आणि सावल्यांच्या सूक्ष्म नात्याने तिला तेव्हाच भुरळ घातली होती. पडद्यावर दिसणाऱ्या जगामागचं गूढ तिला खुणावत होतं. त्या खुणेचा पाठलाग करत ती न्यूयॉर्क फिल्म अकॅडमीपर्यंत पोहोचली आणि तिथे तिच्यासाठी एक नवं विश्व उघडलं.

इथे तिला शिकवणारे शिक्षक केवळ प्राध्यापक नव्हते; तेच ते लोक होते ज्यांनी तिच्या लहानपणी तिला भुरळ घालणाऱ्या चित्रपटांच्या जगाची निर्मिती केली होती. ज्यांची नावे तिने पडद्यावर वाचली होती, तेच आता तिचे मार्गदर्शक होते. त्यांनी तिला केवळ सॉफ्टवेअर शिकवलं नाही, तर 'प्रकाश हा कथा सांगतो' हे शिकवलं. तांत्रिक कौशल्य आणि कलात्मक दृष्टी यांचा संगम म्हणजेच खऱ्या अर्थाने ॲनिमेशन, हे तिला तिथे उमगलं.

अमेरिकेत शिकताना आणि नंतर टीचिंग असिस्टंट म्हणून काम करताना तिची ओळख केवळ विद्यार्थिनी म्हणून राहिली नाही; ती त्या विद्यापीठाच्या सर्जनशील परंपरेचा एक भाग बनली. पुढे कॅनडात बार्डेल एंटरटेनमेंटमध्ये तिचं काम होतं नेटफ्लिक्स, डिस्ने आणि अमेझॉन प्राइममधील विविध ॲनिमेटेड दृश्यांना प्रकाश आणि कॉम्पोझिटिंगच्या माध्यमातून जिवंत करणं.

आज ती पुन्हा नव्या तंत्रज्ञानाकडे वळते आहे. परदेशी विद्यापीठातील शिक्षण आणि अनुभवातून ती एक महत्त्वाची गोष्ट शिकली - ॲनिमेशन ही केवळ करिअरची वाट नाही, तर सतत स्वतःला नव्याने घडवत राहण्याची एक जिवंत प्रक्रिया आहे.

पण ॲनिमेशनचं विश्व केवळ पाश्चिमात्य देशांपुरतं मर्यादित नाही. ॲनिमेशन क्षेत्रामध्ये जपान अग्रेसर मानला जातो. टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ द आर्ट्स आणि क्योटो सेइका युनिव्हर्सिटीसारख्या संस्थांनी 'ॲनिमे' या विशिष्ट शैलीला जागतिक प्रतिष्ठा मिळवून दिली. जपानी शिक्षणपद्धतीत निरीक्षण, संयम आणि सूक्ष्म भावनांचं चित्रण यावर भर दिला जातो. चीनमध्येही बीजिंग फिल्म अकॅडमी आणि चायना ॲकॅडमी ऑफ आर्टसारख्या संस्थांनी ॲनिमेशनमध्ये मोठी प्रगती केली आहे. तिथे पारंपरिक चीनी कलेचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम घडवण्यावर भर दिला जातो. दक्षिण कोरिया आणि सिंगापूर हे देशही या क्षेत्रात झपाट्याने पुढे येत आहेत.

आज एआयमुळे या क्षेत्रात मोठा बदल होत आहे. काही वर्षांपूर्वी ज्यासाठी तासन्तास मेहनत लागायची, ती कामं आता काही मिनिटांत होतात. त्यामुळे अनेकांना वाटतं की ॲनिमेशनमध्ये माणसाची गरज कमी होईल. काही प्रमाणात हे खरे आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये जगभर ॲनिमेशन क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. परंतु ॲनिमेशन तयार करण्याच्या प्रक्रियेतील माणसाचे स्थान गेले आहे असे यामुळे आपण म्हणू शकतो का? एआय दृश्य तयार करू शकतो, पण तो अनुभव तयार करू शकत नाही. भावना, सूक्ष्मता आणि कथेला दिशा देण्याची क्षमता ही माणसाकडेच असते. एआय हे एक साधन आहे; कलाकार हा त्याचा सर्जक आहे. म्हणूनच जगातील सर्वोत्तम विद्यापीठांमध्ये आजही सॉफ्टवेअरला जितकं महत्त्व दिलं जातं तितकंच महत्त्व ड्रॉइंग, स्केचिंग, फोटोग्राफी, सिनेमाचा अभ्यास, मानसशास्त्र आणि कथाकथन यांना दिलं जातं.

ॲनिमेशनमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतःला केवळ 'तंत्रज्ञ' म्हणून नव्हे, तर 'कलाकार' म्हणून घडवणं आवश्यक आहे. सॉफ्टवेअर बदलतील, एआय विकसित होईल, पण मानवी कल्पनाशक्ती आणि संवेदनशीलता हीच या क्षेत्राची खरी ताकद राहील. ॲनिमेशनचं शिक्षण म्हणजे एका साधनाचं प्रशिक्षण नव्हे; ते म्हणजे स्वतःची वेगळी दृष्टी शोधण्याचा आणि जगाला नव्या पद्धतीने व्यक्त करण्याचा प्रवास आहे.

mentorashutosh@gmail.com
(लेखक करिअर समुपदेशक आहेत.)

## शब्दकोडे- ३५०



**आडवी विधाने :** (१) ज्याची कल्पना येणार नाही असे (४) पुष्कळ, खूप
(७) XX गबाले - हे मराठी चित्रपट दिग्दर्शक व निर्माते होते
(८) गडबड, गोंधळ
(९) त्रास, श्रम
(११) कोळिष्टक (१३) आड लपून बसणे
(१५) हात, सरकारी देणे
(१६) पळसाचा डिंक
(१८) दागदागिने, अलंकार
(१९) वटवृक्ष
(२१) दहावी तिथी, दुधात पीठ भिजवून केलेली पोळी (२२) प्रवृत्ती, झोक
(२४) गोधडी (२६) दुर्लक्ष, क्षमा
(२७) बोभाटा, गाजावाजा
(२९) छाया, प्रतिबिंब
(३०) मालक, नवरा (३३) कुसुम, पुष्प
(३५) संपूर्ण, फलद्रूप
(३६) चिन्ह, गुणधर्म
(३७) एक कीटक
(३८) सत्कृत्य, सत्कर्माचे फळ

**उभी विधाने :** (१) शासन नसलेली स्थिती (२) पंकज, सरोज
(३) पिकांचा अंदाज
(४) मजुरांवर देखरेख करणारा अधिकारी
(५) दुर्गुण, वाईट सवय
(६) तापाची पूर्वचिन्हे
(१०) नवऱ्याचा भाऊ
(१२) वालुकामय प्रदेश
(१४) पायऱ्या असलेली विहीर
(१६) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक प्रमुख प्रशासकीय तालुका (१७) कठोर, कडक
(१८) सारांश, उद्देश (२०) पंक्ती, रांग
(२१) गरम मसाल्यातला एक पदार्थ
(२३) खांबावर आडवी टाकलेली तुळई
(२५) मुसलमानी धर्मसूत्र
(२७) दुधाचा व्यवसाय करणारा
(२८) निरर्थक, फोल (३१) पाणी, नीर
(३२) लक्षात न घेण्यासारखा
(३४) शंभर हजार, चित्त
(३५) पावसाची झड, ओवलेल्या फुलांचा हार

– चारू नानल

## सुडोकू - ३५०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | ८ |
| | ६ | ४ | १ | | ३ | २ | ९ | |
| | ७ | | ४ | | ८ | | १ | |
| | ८ | २ | ५ | | ७ | १ | ३ | |
| | | | | १ | | | | |
| | १ | ३ | २ | | ६ | ५ | ४ | |
| | २ | | ७ | | ५ | | ८ | |
| | ४ | ७ | ८ | | ९ | ६ | ५ | |
| ५ | | | | | | | | ३ |

## सुडोकू - ३४९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ९ | ३ | १ | ८ | २ | ४ | ५ | ७ |
| १ | ८ | ४ | ३ | ७ | ५ | ९ | ६ | २ |
| ५ | २ | ७ | ६ | ४ | ९ | १ | ३ | ८ |
| ३ | ५ | २ | ४ | १ | ७ | ८ | ९ | ६ |
| ७ | १ | ६ | २ | ९ | ८ | ५ | ४ | ३ |
| ८ | ४ | ९ | ५ | ६ | ३ | ७ | २ | १ |
| ४ | ७ | ८ | ९ | ३ | ६ | २ | १ | ५ |
| ९ | ६ | ५ | ७ | २ | १ | ३ | ८ | ४ |
| २ | ३ | १ | ८ | ५ | ४ | ६ | ७ | ९ |

## शब्दकोडे - ३४९ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | ल्हा | द | के | श | व | अ | त्रे | ■ | ट |
| स्ता | ■ | वा | दा | ■ | र | ■ | धा | म | ण |
| व | सा | ■ | र | स | दा | र | ■ | हा | क |
| ना | र | ळ | ■ | क | न | का | च | ल | ■ |
| ■ | थी | ■ | व | र्म | ■ | ना | ल | ■ | यं |
| कुं | ■ | पा | ■ | क | था | ■ | न | म | दा |
| भ | र | व | सा | ■ | ट | क | ■ | त्स्य | ■ |
| ■ | ता | स | का | टा | ■ | ट | च | ■ | क |
| का | ळे | ■ | र | ■ | प | रा | व | लं | बी |
| थ्या | ■ | ठा | णे | दा | र | ■ | ळी | ■ | र |

# संक्षिप्त

## साहित्यिक कार्यक्रम

**ठाणे :** मायबोली मराठी साहित्य रसिक मंडळतर्फे मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त 'शब्दातीत' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी सुसंवादक अमेय रानडे आणि निवेदक तपस्या नेवे यांची उपस्थिती असणार आहे. त्यासह, 'नाते साहित्यिकांचे' हा मायबोली सभासदांचा साहित्यिक कार्यक्रम सादर होणार आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता प्रकृती पार्क सोसायटी क्लब हाऊस, राज रतन सोसायटीजवळ, ब्रह्मांड, घोडबंदर रोड, ठाणे येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी ९८१९२९२०७४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## महिलांकरिता योगवर्ग

**डोंबिवली :** श्री अंबिका योग निकेतन या संस्थेच्या वतीने महिलांकरिता त्रैमासिक योगवर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. हे योगवर्ग शनिवार, २८ फेब्रुवारीपासून दर शनिवारी सायंकाळी ५ ते ६.३० या वेळेत श्री अंबिका योग निकेतन शाखा, मधुकुंज सोसायटी टेरेस, सम्राट हॉटेलजवळ, उमेश बंगल्यासमोर, डोंबिवली (प) येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी ९५९४९३२७९९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# अनधिकृत बांधकामांवर हातोडा

## उल्हास नदीकिनारची ५० अतिक्रमणे जमीनदोस्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**बदलापूर :** दोन आठवड्यांपूर्वी बदलापूर शहरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली होती. त्या वेळी काही दुकानदार आणि नागरिकांनी थोडा वेळ देण्याची मागणी केली होती. त्यानुसार दोन आठवड्यांनंतर सोमवारी पुन्हा एकदा प्रशासनाने कारवाई केली. या वेळी बदलापूर पश्चिमेतील उल्हास नदीकिनारी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते बदलापूर गाव रस्त्यावरील अनधिकृत बांधकामे कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या वतीने जमीनदोस्त करण्यात आली.

### रहिवाशांना दोन दिवसांचा कालावधी

कारवाई वेळी नगर परिषदेच्या आरक्षणावरील अनधिकृत घरांवरही कारवाई होणार होती. येथील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर कारवाईला विरोध केला. मात्र त्यांना नगर परिषद प्रशासनाने दोन दिवसांचा वेळ दिला असून त्यांनी त्या काळात साहित्य काढून घ्यायचे आहे, असे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी स्पष्ट केले. या दरम्यान, नागरिकांच्या तात्पुरत्या सुविधेसाठी त्यांना बीएसयूपी योजनेतील घरे खुली करण्यात आली आहेत, असेही गायकवाड यांनी स्पष्ट केले.

अनेक दुकानदार आणि रहिवाशांच्या विरोधाचा सामना या कारवाईदरम्यान पालिका प्रशासनाला करावा लागला. दिवसभरात ५० हून अधिक अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली, असे नगर परिषदेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

कुळगाव-बदलापूर नगर परिषद क्षेत्रातील एका याचिकेच्या सुनावणीवेळी शहरातील अनधिकृत बांधकामांचा प्रश्न चर्चेला आला. त्यानंतर नगर परिषदेने शहरातील अनधिकृत बांधकामांची थेट यादीच जाहीर करून टाकली, मात्र त्यावर कारवाई झाली नव्हती.

# डोंबिवलीत ३१६ कोटींची करवसुली

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महापालिकेने आतापर्यंत एकूण ३१६ कोटी मालमत्ता कराची वसुली केली आहे. मालमत्ता कराचा लक्ष्यांक पूर्ण करण्यासाठी मालमत्ता कर विभागाने कर थकबाकीदारांना जप्ती नोटिसा, मालमत्ता जप्त करून लिलाव नोटिसा बजावण्यास सुरुवात केली आहे.

मालमत्ता कराचा चालू वर्षीचा वसुली लक्ष्यांक ६०० कोटी आहे. मागील अनेक वर्षांची थकीत रक्कम आणि चालू वर्षाचा लक्ष्यांक अशा एकूण ७६० कोटी रुपयांच्या वसुलीसाठी पालिका अधिकाऱ्यांनी कंबर कसली आहे. मालमत्ता कर पालिकेचा महसुली उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. ही कर वसुली करण्यासाठी मालमत्ता कर विभाग प्रमुखांनी पालिकेच्या दहा प्रभाग साहाय्यक आयुक्तांना दररोज किमान दहा लाख ते ४० लाखांहून अधिक मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट दिले आहे.

### 'अभय' नाही

अनेक मालमत्ता कर थकबाकीदार पालिका 'अभय' योजना कधी लागू करते या प्रतीक्षेत होते, परंतु पालिका मालमत्ता कर विभागाप्रमुखांनी यावर्षी अशा प्रकारची कोणतीही अभय योजना कर थकबाकीदारांसाठी लागू करण्याचा पालिका प्रशासनाचा विचार नाही, असे जाहीर केले आहे. त्यामुळे थकबाकीदारांमध्ये अस्वस्थता आहे.

दहा प्रभागांमधील एकूण कर वसुलीत डोंबिवलीतील फ प्रभागात सर्वाधिक म्हणजे ७२ टक्के कर वसुली झाली आहे. त्यानंतर ब प्रभागात ५९, ग प्रभागात ५५ तर ह प्रभागात ५६ टक्के कर वसुली झाली आहे. इतर प्रभागांची वसुली १६ ते ३६ टक्के दरम्यान आहे. थकीत रकमेतील एकूण वसुली लक्ष्यांक ३९७ कोटी, चालू कर रकमेचा वसुली लक्ष्यांक ३६३ आहे.

# बिश्नोई टोळीच्या नावाने व्यावसायिकाला धमकी

**ठाणे :** ठाण्यात बिश्नोई टोळीच्या नावाने एका बांधकाम व्यवसायिकाकडून १० कोटी रुपयांची खंडणी मागण्याचा प्रयत्न झाला. तसेच त्याला जीवे ठार मारण्याची धमकी देखील देण्यात आली. याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलीस तपास सुरू आहे.

बांधकाम व्यवसायिकांचे कार्यालय पाचपाखाडी भागात आहे. ११ फेब्रुवारीला महाशिवरात्री निमित्ताने बांधकाम व्यवसायिक त्यांच्या कुटुंबासह मध्य प्रदेशमध्ये गेले होते. त्यावेळी त्यांना एका व्यक्तीने आंतरराष्ट्रीय मोबाईल क्रमांकावरुन संपर्क साधून १० कोटी रुपयांची खंडणी मागितली. खंडणीची रक्कम दिली नाही तर जीवे मारले जाईल अशी धमकी देखील त्या व्यक्तीने दिली. त्यानंतर २० फेब्रुवारीला पुन्हा धमकी दिली. त्यामुळे बांधकाम व्यवसायिकाने ठाणे पोलिसांकडे धाव घेतली.

# मोठागाव-ठाणे बससेवा लवकरच

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेतील मोठागाव ते ठाणे अशी बससेवा सुरू करण्यास ठाणे महापालिका परिवहन उपक्रमाने तयारी दर्शवली आहे. टीएमटीच्या ताफ्यात लवकरच काही नवीन बस दाखल होणार आहेत. या बस दाखल झाल्यानंतर मोठागाव ते ठाणे बस मार्गाचे सर्वेक्षण करून या मार्गावर बससेवा सुरू करण्यास टीएमटी पुढाकार घेईल, असे पत्र ठाणे परिवहन उपक्रमाचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांनी मोठागाव येथील भाजप नगरसेवक दीपेश म्हात्रे यांना पाठविले आहे.

लोकलमधील गर्दीतून प्रवाशांची सुटका करण्यासाठी बस सेवा सुरू करण्याची मागणी दीपेश म्हात्रे यांनी केली होती.

# शालेय बसगाड्यांमध्ये 'डॅशकॅम'

(पान १वरून) विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भातील सूचना याबाबत समन्वय साधण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

चालक व त्यांचे वाहनातील सहकारी यांना रस्ता सुरक्षा प्रशिक्षणासाठी पाठविणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. प्रशिक्षित मनुष्यबळामुळे अपघातांची शक्यता कमी होईल. ई-चलानबाबत आक्षेप असल्यास संबंधितांनी महापोलीस ॲपमध्ये 'ग्रिव्हेन्स' विभागात आपले म्हणणे नोंदवावे. त्यानंतर पडताळणी करून योग्य तो निर्णय घेतला जाईल. सर्व शालेय बसमध्ये बसविण्यात आलेल्या श्वास तपासणी मशिनद्वारे दररोज प्रतिबंधात्मक तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. सीएनजी इंधनावर चालणाऱ्या शालेय बसच्या टाक्यांची दर तीन वर्षांनी अनिवार्य तपासणी करावी, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. पोलीस तसेच अन्य प्राधिकरणे व प्रशासन, परिवहन विभाग, शाळा व्यवस्थापन, बसगाडी मालक आणि चालक यांनी समन्वयाने काम केल्यास शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित व निर्धास्त होईल, ठाणे शहर वाहतूक शाखा उपायुक्त पंकज शिरसाट यांनी सांगितले.

# ठाण्यात सत्ताधाऱ्यांची कोंडी

(पान १वरून) झडली. राज्य शासनाने क्लस्टर प्रकल्पासाठी दिलेल्या १४९ कोटी रुपयांच्या विशेष अनुदानातून नेमकी कोणती कामे करण्यात आली, यासंबंधीची लक्षवेधी व शासनाने प्रशासकीय काळात मिळालेल्या निधीतून केलेली कामे यासंबंधीचे प्रश्न भाजपच्या नगरसेवकांनी सभेच्या पटलावर मांडले होते. हे दोन्ही विषय सत्ताधारी पक्षाने चर्चेसाठी घेतले नाहीत. त्यामुळे आक्रमक झालेल्या भाजपच्या उपमहापौरांनीच सभागृहात येत सत्ताधाऱ्यांविरोधात घोषणाबाजी सुरू केली.

भाजप नगरसेविकांनी या वेळी महापौरांसह सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला. विरोधी पक्षांऐवजी मित्र पक्षाने कोंडी करण्याचा प्रयत्न केल्याने पहिल्याच सर्वसाधारण सभेत युतीत मिठाचा खडा पडल्याचे स्पष्ट झाले.

ठाणे महापालिका निवडणुकीत १३१ पैकी ७५ नगरसेवक शिवसेनेचे आहेत. ही निवडणूक युतीत लढवली असली तरी महापालिकेतील पारदर्शक कारभारासाठी चौकीदाराची भूमिका बजावणार असल्याची विधाने भाजपचे नेते करीत आहेत. ते पहिल्याच सर्वसाधारण सभेत दिसून आले.

ठाण्यात क्लस्टर योजना हा शिंदे यांच्यासाठी महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून या प्रकल्पासंदर्भात भाजप नगरसेवक नारायण पवार यांनी लक्षवेधी मांडली. प्रशासकीय कालावधीत नगरविकास विभागाने मंजूर केलेल्या कामांचा लेखाजोखा सादर करावा, अशी मागणी भाजपच्या नौपाडा भागातील नगरसेविका मृणाल पेंडसे यांनी केली होती. इतका महत्त्वाचा प्रश्न महापौरांनी साधा चर्चेसही घेतला नाही. प्रशासकीय कालावधीत झालेल्या कामांच्या दर्जाविषयी यापूर्वीही वेगवेगळ्या तक्रारी पुढे आल्या आहेत. आम्ही कुणाच्या विरोधात नाही आणि आमचे कुणासोबत वादही नाही. क्लस्टर योजना जनतेसाठी आहे. त्यामुळे त्याबाबत लक्षवेधीतून विचारणा केली होती, असे नारायण पवार म्हणाले.

> लक्षवेधीवर सविस्तर चर्चा करावी लागत असल्याने त्यासाठी बराच वेळ लागतो. परंतु परिवहन तसेच इतर समित्यांच्या निवडणुका असल्यामुळे लक्षवेधी दोन सभा तरी घेऊ नका, अशी विनंती महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी करताच सर्वपक्षीय गटनेत्यांच्या बैठकीत त्यास मान्यता दिली होती. प्रश्नांनाही प्रशासनाने समाधानकारक उत्तरे दिली नव्हती. त्यामुळे सविस्तर माहिती संकलन करण्यासाठी प्रशासनाला वेळ हवा होता.
>
> – पवन कदम, शिवसेना गटनेता




बुधवार,
२५ फेब्रुवारी २०२६

# लोकसत्ता वसई विरार

LOKSATTA.COM, FACEBOOK.COM/LOKSATTALIVE लोकमान्य, लोकशक्ती! TWITTER.COM/LOKSATTALIVE, LOKSATTA.COM/APPS

## अंतरंग

### उत्तनची मच्छिमार कुटुंबे पाण्याविना

**भाईंदर :** भाईंदर पश्चिम येथील उत्तन भागात महापालिकेमार्फत होणारा पाणीपुरवठा कमी झाल्याने येथील मच्छिमार कुटुंबांसमोर पाणी टंचाईची समस्या निर्माण झाली आहे. या समस्येला कंटाळून मंगळवारी मच्छिमारांनी महापालिका आयुक्तांची भेट घेत उपायोजना करण्याची मागणी केली. **वृत्त...३**

### करवाढीविरोधात शिवसेनेचे आंदोलन

**भाईंदर :** शिवसेना (शिंदे गट) पक्षाने मिरा-भाईंदर महापालिकेमार्फत नव्याने आकारण्यात येणाऱ्या कर वाढीच्या विरोधात महापालिका मुख्यालयात 'भीक मांगो' आंदोलन केले. यावेळी संतप्त झालेल्या काही कार्यकर्त्यांनी पालिका मुख्यालयाला टाळे ठोकले.

**वृत्त...३**

### मोकाट जनावरांचा अडथळा

**वसई:** वसई - विरार महापालिका क्षेत्रात मागील काही महिन्यांपासून मोकाट जनावरांचा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरात पुरेसे कोंडवाडे नसल्यामुळे मोकाट जनावरे आता वर्दळीचे रस्ते, बाजारपेठा आणि महामार्गावर ठाण मांडत आहेत. त्यामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असून पालिकेने यावर ठोस कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

**वृत्त...४**

### स्मशानभूमीला कचऱ्याचा विळखा

**वसई :** वसई - विरार महापालिकेच्या कचरा भूमीवरील ढिगारे दिवसेंदिवस वाढत आहेत. या ढिगाऱ्यांचा विळखा आता भोयदापाडा स्मशानभूमीला पडला आहे. त्यामुळे नागरिकांना कचऱ्याच्या दुर्गंधीत मृतांवर अंत्यसंस्कार करावे लागत आहे.

**वृत्त...४**

# बुलेट ट्रेन स्थानक परिसराचा विकास

## विरारमध्ये व्यापारी केंद्र, पर्यटनस्थळ, नागरी वसाहती आणि रुग्णालय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गावरील विरार रेल्वे स्थानक परिसर विकसित केला जाणार आहे. या ठिकाणी व्यापारी केंद्र, पर्यटन स्थळ, नागरी वसाहती आणि रुग्णालय यांसह विविध पायाभूत सुविधांचे प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. याबाबत सोमवारी महापालिका प्रशासन आणि जपानच्या जायका संस्थेचे सदस्य यांच्यात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी विकासाबाबत चर्चा करण्यात आली.

मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वेच्या (बुलेट ट्रेन) राज्यातील चार स्थानकांपैकी एक असलेले विरार स्थानक नालासोपारा पूर्वेच्या वालईपाडा येथे तयार केले जाणार आहे. स्थानक परिसराचा विकास करण्यासाठी 'प्रोजेक्ट स्मार्ट' हा प्रकल्प तयार केला आहे. त्यासाठी केंद्रीय गृहनिर्माण मंत्रालयाने विशेष समिती स्थापन केली असून महापालिकेच्या अधिकाऱ्याचाही समावेश आहे. सध्या पालघरमधील बुलेट ट्रेनचे काम प्रगतीपथावर असून सोमवारी मुंबई-अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे संदर्भात जपान आंतरराष्ट्रीय संस्था जायका यांचे प्रमुख व सदस्य यांची बैठक मुख्यालयात पार पडली. यावेळी महापौर अजीव पाटील, उपमहापौर मार्शल लोपीस, आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी, माजी आमदार क्षितीज ठाकूर, सभागृह नेते प्रफुल साने, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, दीपक सावंत, परिवहन व्यवस्थापक धैर्यशील जाधव, उपसंचालक नगररचना मनिष भिष्णूरकर, नगररचनाकार श्वेता माने, जपान आंतरराष्ट्रीय संस्था जायकाचे प्रमुख सेईचिरो अकीमुरा व संस्थेचे इतर सदस्य उपस्थित होते. यावेळी संबंधित प्रकल्पाचे दृकश्राव्य माध्यमाद्वारे सादरीकरण करण्यात आले. बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर तयार केल्या जाणाऱ्या स्थानकाच्या विकासासाठी आवश्यक बाबींवर, तसेच स्थानकाच्या कामादरम्यान निर्माण होणारे संभाव्य अडचणी अशा विविध गोष्टींचा आढावा घेण्यात आला असल्याची माहिती महापौर अजीव पाटील यांनी दिली.



### आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर

महापालिकेकडून विरार बुलेट स्थानक परिसराचा विकास आराखडा तयार करण्यात आला होता. पण, ऑगस्ट २०२३ साली महाराष्ट्र शासनाने एमआरटीपी कायद्यात केलेल्या सुधारणांमुळे आता या आराखड्यातही बदल केले जाणार आहेत. हद्द निश्चिती आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यावर आराखडा अंतिम केला जाणार असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### जपानच्या धर्तीवर विकास

विरारमधील बुलेट ट्रेन स्थानकाच्या सभोवतालचा तब्बल साडे चारशे हेक्टर परिसर विकसित केला जाणार आहे. जास्तीत प्रवाशांनी बुलेट ट्रेनचा वापर करावा यासाठी मुंबईतील बीकेसीच्या धर्तीवर व्यापारी केंद्र तयार केले जाणार आहे. तसेच याठिकाणी जपानच्या धर्तीवर नागरी वसाहती, पर्यटन स्थळे विकसित केली जाणार आहे. तर नागरिकांच्या सोयीसाठी विविध अत्याधुनिक रुग्णालये, आरोग्य व्यवस्था यांसह विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याची माहिती नगररचनाकार श्वेता माने यांनी दिली.

# मेट्रो १३ मार्गिकेचा मार्ग मोकळा

## मिरा-भाईंदर ते वसई-विरार मार्गिकेच्या सुधारित संरेखनास मान्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** 'दहिसर ते मिरा-भाईंदर मेट्रो ९' मार्गिकेचा विस्तार मिरा-भाईंदर ते वसई-विरार मेट्रो १३ मार्गिकेच्या माध्यमातून केला जाणार आहे. मेट्रो १३ मार्गिकेच्या सुधारित संरेखनास आणि सुधारित आराखड्यास नुकत्याच झालेल्या प्राधिकरणाच्या १६० व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. ही मार्गिका २५.०३ किमी लांबीची असणार आहे. मार्गिकेचा प्रस्ताव पुढील मान्यतेसाठी राज्य सरकारकडे पाठवण्यात येईल.

मार्गिकेचा आराखडा, तसेच संरेखन २०१९-२०२० मध्ये तयार करण्यात आले. मात्र प्रत्यक्षात ही मार्गिका मार्गी लावण्यासाठी कोणतीही पाऊले अद्याप उचलण्यात आली नव्हती. आता मात्र या मार्गिकेच्या कामाला शक्य तितक्या लवकर सुरूवात करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे. वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्यासाठी मेट्रो १३ मार्गिकेचे नव्याने संरेखन आणि आराखडा तयार करणे आवश्यक होते. कोणत्या भागात मेट्रोला प्रतिसाद मिळू शकतो याचा नव्याने अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली. त्यामुळे एमएमआरडीएने दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या (डीएमआरसी) माध्यमातून नव्याने संरेखन आणि आराखडा तयार करून घेतला. सुधारित आराखडा आणि संरेखन एमएमआरडीएच्या सोमवारच्या (१६ फेब्रुवारी) प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यास प्राधिकरणाने मान्यता दिल्याची माहिती एमएमआरडीएतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

जुन्या संरेखनानुसार या मार्गिकेची लांबी २३ किमी होती, आता ही लांबी २५.०३ किमी झाली आहे. या मार्गिकेचा खर्च १७ हजार ७२५ कोटी रुपयांवर गेला आहे. सुधारित संरेखनास आणि आराखड्यास मान्यता मिळाल्याने आता प्रस्ताव राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठवण्यात येईल. राज्य सरकारची मान्यता मिळाल्यानंतर मार्गिकेच्या प्रत्यक्ष कामाला सुरूवात करण्याच्यादृष्टीने पाऊले उचलली जातील, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. वसई-विरारकरांचे मेट्रो प्रवासाचे स्वप्न येत्या काही वर्षांतच पूर्ण होण्याची शक्यता आहे.

### अतिजलद प्रवास

मुंबईहून मिरा-भाईंदर, वसई-विरारला अतिजलद पोहचणे भविष्यात शक्य होणार आहे. मेट्रो २, मेट्रो २ ब मार्गिकेचा विस्तार मेट्रो ९ मार्गिकेच्या माध्यमातून केला जात आहे. तर मेट्रो ९ मार्गिकेची विस्तारीत मार्गिका मेट्रो १३ आहे. त्यामुळे या सर्व मेट्रो मार्गिका सेवेत दाखल झाल्यास मंडाले, मानखुर्द ते वसई-विरार असा मेट्रो प्रवास करता येणार आहे.

# परवान्यासाठी पालिकेत फेरीवाल्यांचे ठिय्या आंदोलन

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** महापालिकेकडून नालासोपारा पूर्व-पश्चिम पुलाखाली बसणाऱ्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करून त्यांना परवाना देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. पण, दहा ते बारा वर्ष उलटून परवाना देण्यात आला नसल्यामुळे मंगळवारी मुख्यालयासमोर आगरी सेनेने आंदोलन केले.



२०१४-१५ साली महापालिकेने शहरातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण केले होते. या सर्वेक्षणानंतर पालिकेकडून फेरीवाल्यांना परवाने देण्यात येणार होते. मात्र, जवळपास १० वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही पालिकेकडून फेरीवाल्यांना परवाना देण्यात आलेला नाही. त्यामुळे पालिकेने फेरीवाल्यांना विक्री परवाना द्यावा. तसेच अनधिकृतपणे हातगाड्या रस्त्यात लावून फळ विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशा विविध मागण्या असल्याची माहिती, आगरी सेनेच्या वसई, विरार महिला आघाडीच्या अध्यक्ष रुपाली पाटील यांनी दिली.

**पालिकेच्या फेरीवाला क्षेत्राला विरोध**

वसई-विरार महापालिकेने शहरातील फेरीवाल्यांचे नियोजन करता यावे यासाठी फेरीवाला क्षेत्र निश्चित केले आहेत. त्यामुळे वर्दळीच्या भागातील फेरीवाल्यांचे या नियोजित भागात स्थलांतर केले जाणार आहे.

पण, नालासोपारा येथील फेरीवाल्यांनी मनवेलपाडा आणि सेंट्रल पार्क येथील फेरीवाला क्षेत्रमध्ये स्थलांतरित होण्यास नकार दिला आहे.

# नालासोपाऱ्यात महिलेची हत्या

**वसई :** नालासोपाऱ्यात मंगळवारी एका मनोरुग्ण व्यक्तीने सख्ख्या बहिणीची हत्या केली. भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या त्यांच्या आईवरही त्यांनी हल्ला केला.

नालासोपारा पूर्वेच्या टाकीपाडा येथे ही घटना घडली. मंगळवारी पहाटेच्या सुमारास महिलेचे भावासोबत भांडण झाले. भावाने रागाच्या भरात त्यांच्यावर वार केला. त्यात त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांच्या आईने भांडण सोडवण्यासाठी प्रयत्न केला. परंतु त्यांच्यावरही हल्ला करण्यात आला. व्यक्तीच्या बहिणीचा जागीच मृत्यू झाला तर आई यांना उपचारासाठी वसई-विरार महापालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

आरोपी हा मनोरुग्ण असल्याची माहिती शेजाऱ्यांनी दिली. तक्रारीनंतर तुळींज पोलिसांनी याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली.

# सोपारा खाडीपूल 'फेरीवालामुक्त'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** मागील काही वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सोपारा खाडीपुलावरील फेरीवाले हटविण्यात आल्याने खाडीपूल फेरीवालामुक्त झाला आहे.

नायगाव पूर्वेतील परिसरात नागरिकांना रेल्वे स्थानकावर पोहोचण्यासाठी सोपारा खाडीवर पूल तयार करण्यात आला आहे. त्या पुलाचे कामही अद्याप अपूर्ण आहे. त्या पुलावर व रस्त्यावर फेरीवाले बस्तान मांडून बसत असल्याने ये-जा करण्याचा मार्ग अरुंद झाला होता. स्थानिक नागरिकांनी वारंवार प्रशासनाकडे तक्रारी केल्या होत्या. अखेर प्रशासनाने पुलावरील फेरीवाल्यांना हटवले आहे.



### पश्चिमेकडील उतार मार्गाचा अडथळा कायम

पुलाच्या पश्चिमेकडील उतार मार्गाचा प्रश्न अद्याप कायम आहे. या मार्गाचे काम पूर्ण व्हावे यासाठी स्थानिकांनी अनेक आंदोलने केली, उपोषणेही करण्यात आली तसेच सह्यांची मोहीम राबविण्यात आली. मात्र संबंधित वाद न्यायालयात प्रलंबित असल्याने काम पुढे सरकलेले नाही. दरम्यान, परिसरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता उतार मार्गाचे काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक असल्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. प्रशासनाने न्यायालयीन प्रक्रियेला गती देत लवकरात लवकर तोडगा काढावा आणि पश्चिमेकडील उतार मार्गाचे काम मार्गी लावावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# तरुणांचा पोलीस ठाण्यातच धिंगाणा

**भाईंदर :** भाईंदरमध्ये चौकशीसाठी आणलेल्या तरुण आणि तरुणीने पोलीस ठाण्यातच गोंधळ घालत पोलीस उपनिरीक्षक आणि शिपायाला मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी दोघांविरोधात भाईंदर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबईचे रहिवासी असलेल्या या व्यक्ती रविवारी भाईंदर येथील मॅक्सस मॉल परिसरात गोंधळ घालत होते. ११२ पोलीस मदत कक्षावर प्राप्त तक्रारीनुसार पोलीस शिपाई रवींद्र वाघ घटनास्थळी गेले. दोघेही मद्यधुंद अवस्थेत होते. चौकशीसाठी भाईंदर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्यावेळी त्यांनी गोंधळ घातला.

# दहिसर नाक्यावर शुल्क वसुलीसाठी सॅटेलाइट यंत्रणा

## महत्त्वाच्या निर्णयाने वाहतूक कोंडीत ३० ते ४० टक्के घट झाल्याचा परिवहनमंत्र्यांचा दावा

**मयूर ठाकूर, लोकसत्ता**

**भाईंदर :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील दहिसर पथकर नाक्याचे स्थलांतर सध्या शक्य नसल्यामुळे तेथे नव्याने प्रचलित होणारी सॅटेलाइट आधारित शुल्कवसुली यंत्रणा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या यंत्रणेमुळे वाहन चालकांना ब्रेक न लावता प्रवास करता येणार असल्याचा दावा परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केला.

दहिसर पथकर नाक्यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न मागील काही महिन्यांपासून गंभीर बनला आहे. मधल्या काळात ही कोंडी सोडवण्यासाठी पथकर नाक्याचे स्थलांतर करण्याची घोषणा खुद्द परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी केली होती. मात्र स्थलांतरासाठीच्या जागेवरून मोठा वाद निर्माण झाल्याने हा निर्णय स्थगित करावा लागला. त्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात सुमारे शंभर मीटर अंतरावर **(पान ३ वर)**



### कोंडीत ४० टक्के घट

दहिसर पथकर नाक्यावर होणारी कोंडी दूर करण्यासाठी गेल्या काही महिन्यांत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यात रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करून तो सरळ करण्यात आला आहे. सेवा रस्त्याचे पुनर्निर्माण सुरू असून तो लवकरच वापरासाठी खुला केला जाणार आहे. पूर्वीच्या तुलनेत पथकर नाक्यावरील वाहतूक कोंडीची समस्या ३० ते ४० टक्क्यांनी कमी झाली असून उर्वरित प्रश्नही लवकरच मार्गी लागतील, असा दावा सरनाईक यांनी केला.



# करिअर वृत्तांत

जे आपल्याला केवळ माहिती देत नाही तर आपले जीवन अस्तित्वात असलेल्या सर्वांशी सुसंगत बनवते ते म्हणजे सर्वोत्तम शिक्षण.
– रवींद्रनाथ टागोर

**स्पर्धा परीक्षेच्या प्रांगणात**
**एमपीएससी**
रोहिणी शहा

## राज्यसेवा मुख्य परीक्षा : सामान्य अध्ययन (पेपर दोन)

# आंतरराष्ट्रीय संघटना

**राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या सामान्य अध्ययन पेपर दोनच्या तयारीबाबत मागील लेखांमधून चर्चा करण्यात आली. या चर्चेच्या आधारे पेपर दोनमधील आंतरराष्ट्रीय संघटना या मुद्द्यावरील प्रश्नाचे उत्तर या लेखामध्ये पाहू.**

■ **प्रश्न: ''दहशतवाद हा जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी गंभीर धोका बनला आहे.'' या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवादविरोधी समिती ( उळउ) व तिच्या संलग्न संस्थांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करा. (१५ गुण २५० शब्द)**

**प्रश्नाचे विश्लेषण–**

प्रश्नामुळे मुद्दे आधी समजून घेऊ. जागतिक शांतता आणि सुरक्षेसाठी दहशतवादाचा धोका; याबाबत दहशतवाद विरोधी समिती व तिच्या संलग्न संस्थांची परिणामकारकता आणि तिचे मूल्यमापन. या तीन मुद्द्यांवर आधारित उत्तर लिहिताना पुढील पायऱ्या वापरता येतील.

- जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी दहशतवाद कशाप्रकारे गंभीर धोका बनला आहे, यावर थोडक्यात भाष्य करा.
- संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची दहशतवादविरोधी समिती ( CTC ) आणि तिच्या संलग्न संस्थांची आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवाद रोखण्यातील व त्याचे शमन करण्यातील भूमिका स्पष्ट करा.
- समितीच्या दहशतवादविरोधी प्रयत्नांपुढील आव्हानांचे विश्लेषण करा.
- उळउच्या कार्यक्षमतेच्या मूल्यमापनावर भर देणे आवश्यक आहे. त्यामुळे उपाययोजना थोडक्यात सुचवून उत्तराचा समारोप करा.

**उत्तर:**

दहशतवाद म्हणजे राजकीय किंवा सामाजिक उद्दिष्टांसाठी हिंसा व भीतीचा वापर. आज तो जागतिक शांतता, आर्थिक स्थैर्य व सामाजिक सलोखा यांना गंभीर धोका निर्माण करतो. उदा. २००८ मुंबई हल्ल्यांमुळे भारताला सुमारे २ अब्ज डॉलर्सचे आर्थिक नुकसान झाले. ISIS च्या उदयामुळे मध्यपूर्वेत लाखो लोक विस्थापित झाले. तसेच, क्राइस्टचर्च (२०१९) घटनेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर धार्मिक तणाव वाढवला.



अमेरिकेतील २००१ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर, आंतरराष्ट्रीय दहशतवाद रोखण्यासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने दहशतवादविरोधी समितीची ( CTC ) स्थापना केली.

**CTC ची भूमिका व परिणामकारकता:**

- **सदस्य राष्ट्रांना कायदेशीर चौकट मजबूत करण्यासाठी मार्गदर्शन:** दहशतवादाला निधीपुरवठा हा गुन्हा ठरविणे, मालमत्ता गोठविणे यासाठी सदस्य राष्ट्रांना कायदे करण्यात मार्गदर्शन.
- **आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे:** गुप्त माहितीची देवाणघेवाण व संयुक्त कारवाया सुलभ करण्यासाठी सदस्य राष्ट्रांमध्ये समन्वय साधणे
- **प्रशिक्षण आणि क्षमता विकास:** सदस्य राष्ट्रांच्या अंमलबजावणी यंत्रणेसणप्रशिक्षण व तांत्रिक मदत करणे.
- **प्रतिबंधात्मक निर्बंधांची अंमलबजावणी:** आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांवर प्रवासबंदी, शस्त्रबंदी लागू करणे.
- **वित्तीय कारवाई कृती दल ( FATF) आणि इंटरपोलबरोबर समन्वय:** दहशतवादी वित्तपुरवठ्यावर नियंत्रण साधणे.

**मर्यादा व आव्हाने:**

- **राजकीय मतभेद:** स्थायी सदस्यांच्या नकाराधिकारामुळे ठोस कारवाईत अडथळे. उदा. सिरीयाबाबत रशिया व चीनचा नकाराधिकार
- **सार्वभौमत्वाचा प्रश्न:** सदस्य राष्ट्रांचा अंतर्गत कायदा निर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत बाह्य हस्तक्षेपास विरोध.
- **संसाधनांची कमतरता:** विकसनशील देशांत अंमलबजावणीत अडचणी.
- **तंत्रज्ञानाचा दुरुपयोग:** एनक्रिप्टेड प्लॅटफॉर्मचा वापर केल्यने दहशतवादी कारवायांवर नियंत्रण आणण्यात अडचणी.
- **मानवाधिकार संतुलन:** कठोर कायद्यांमुळे नागरिकांच्या अधिकारांवर मर्यादा. उदा. वAPA किंवा AFSPA कायदे
- **दहशतवादाचे बदलते स्वरूप:**

पारंपरिक संघटित गटांऐवजी स्थानिक पातळीवरील लोन-वुल्फ हल्ले - तपासात अडचणी

एकूणच, CTC ने आंतरराष्ट्रीय चौकट उभी केली असली तरी प्रभावी अंमलबजावणी व राजकीय एकमत यांवर तिचे यश अवलंबून आहे. यासाठी बहुपक्षीय सहकार्य, समन्वय, तंत्रज्ञानाच्या आधारे देखरेख, जनजागृती आणि मानवाधिकारांचा सन्मान राखणारी धोरणे आवश्यक आहेत.

**स्पष्टीकरण**

पूर्ण वाक्य आणि फक्त मुद्दे अशा दोन्ही वाक्यरचनांचा वापर केल्याने कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त मुद्दे मांडणे शक्य झाले आहे.

वेगवेगळ्या दहशतवादी कारवायांमुळे जागतिक शांतता सुरक्षितता यांना निर्माण झालेले धोके उदाहरणे दिल्यामुळे थोडक्यात पण स्पष्टपणे मांडता आले आहेत.

दहशतवाद विरोधी समितीचे मूल्यमापन करताना सकारात्मक मुद्दे आणि मर्यादा या दोन्हीबाबत मुद्दे मांडणे आवश्यक होते. अतिरिक्त शब्द वापरावे लागू नयेत यासाठी हे लक्षात घेऊन सर्व महत्त्वाचे मुद्दे क्रियापदांचा वापर न करता मांडले आहेत.

शक्य तेथे उदाहरणे दिल्यामुळे उत्तराची परिणामकारकता वाढली आहे.

समारोप करताना मूल्यमापनाचा निष्कर्ष मांडून परिणामकारकता वाढविण्यासाठीचे उपाय थोडक्यात मांडले आहेत. यामुळे उत्तराचा भर मूल्यमापनावरच ठेवता आल्याचे लक्षात येते.

steelframe.india@gmail.com

# कर्मचाऱ्यांची वार्षिक परीक्षा!

**कामगिरीचे वार्षिक अवलोकन ही कर्मचाऱ्यांसाठी स्वत:कडे मागे वळून बघण्याची उत्तम संधी असते. मानसशास्त्रानुसार कामगिरीचे विश्लेषण आणि सुधारणा करण्यासाठी केलेल्या विचारपूर्वक योजना प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतात.**

**कौशल्य तंत्र**
सलील चिंचोरे

**मार्च महिना** येऊ घातला की कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्यातील वेतन वाढ व प्रमोशनचे वेध लागतात. मार्च महिना हा वित्तीय वर्षातील अखेरचा महिना. मार्च महिन्याअखेरीस कंपनीच्या वित्तीय कामगिरीचा आढावा तर घेतला जातोच; तसेच कर्मचाऱ्यांच्या वार्षिक कामगिरीचेही अवलोकन केले जाते. या पद्धतशीर मार्गाला परफॉर्मन्स अप्रेजल म्हणतात. कर्मचाऱ्यांच्या वार्षिक अवलोकनाचे खास महत्त्व असते. कर्मचाऱ्यांच्या कामगिरीनुसार त्यांना परफॉर्मन्स रेटिंग दिले जाते. यानुसार कर्मचाऱ्यांसंबंधीचे वेतनवाढ, प्रमोशन, बदली, बोनस असे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जातात.

म्हणून प्रत्येक कर्मचारी वर्षाअखेरीस आपल्या कामाला रंगरंगोटी करून तिला आकर्षक स्वरूपात बॉससमोर सादर करतो. परफॉर्मन्स अप्रेजल मीटिंगमध्ये आपल्या कामगिरीची बॉसवर छाप पाडून चांगले रेटिंग मिळवण्याचा हा प्रयत्न असतो. काही वेळेला हा प्रयत्न फलद्रूप होतो तर काहीदा तो चक्क फसतो. कारण बॉसने कर्मचाऱ्यांबरोबर वर्षभर खांद्याला खांदा लावून काम केलेले असते. कर्मचाऱ्यांच्या कामातील खाचाकोचा, उणीवा, कर्मचाऱ्यांचा स्वभाव बॉसला चांगला ठाऊक असतो. बॉसपुढे कितीही अतिशयोक्तीपूर्ण सादरीकरण केले तरी प्रत्येक कर्मचाऱ्याला स्वतःच्या कामगिरीची यथार्थ जाणीव असते. पण त्याला रंगरंगोटी करण्याच्या नादात आपण त्यातील सत्व हरवून बसतो.

आज आपण याच गोष्टीकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून बघू. कामगिरीचे वार्षिक अवलोकन ही कर्मचाऱ्यांसाठी स्वतःकडे मागे वळून बघण्याची उत्तम संधी असते. मानसशास्त्रानुसार कामगिरीचे विश्लेषण आणि सुधारणा करण्यासाठी केलेल्या विचारपूर्वक योजना प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतात. प्रत्येक कसलेला खेळाडू मॅच संपल्यावर आपल्या कोचबरोबर बसून मॅचचे व स्वतःच्या कामगिरीचे सखोल विश्लेषण करतो. त्यातून हाती येणाऱ्या त्रुटींवर भर देऊन सराव करतो. त्यामुळे त्या खेळाडूला पुढच्या मॅचसाठी अधिक चांगले तयार होण्यासाठी मदत होते. बऱ्याचदा आपली कामगिरी फुगवून सांगण्याच्या नादात आपण स्वतःला आरशात बघण्याचे विसरतो. यावेळेस परफॉर्मन्स रिव्ह्यूसाठी नेहमीचे पवित्रे सोडून तुम्ही स्वतःचे कठोर मूल्यमापन करा. त्यासाठी मदत म्हणून तुम्हाला मी काही प्रश्न देतो आहे. त्या प्रश्नांची उत्तरे तुम्ही स्वतःच स्वतःसाठी शोधू शकता -

- गेल्या वर्षात वर्षभरात कोणती टार्गेट्स मी पार केली? ते कशामुळे साध्य झाले?
- कोणती टार्गेट्स पार करण्यात मला अपयश आले? त्याची कारणे काय?
- गेल्या वर्षभरात मला कोणत्या अडचणी आल्या? त्यांचा सामना मी कसा केला?
- माझा बॉस व इतर वरिष्ठांनी मला कोणता फीडबॅक दिला? त्याला मी कसा प्रतिसाद दिला?
- माझ्या कामगिरीवर मी पूर्णतः समाधानी आहे का? नसल्यास त्यात कुठे कमतरता जाणवते आहे?
- गेल्या वर्षभरात इतर सहकाऱ्यांबरोबरचे संबंध कसे होते? ते सुधारण्यासाठी मी कोणते प्रयत्न केले?
- गेल्या वर्षात मी काय नवीन शिकलो? त्याचा वापर मला पुढे कसा करता येईल?
- येत्या एक-दोन वर्षातील माझी करिअरची उद्दिष्टे कोणती?
- त्यासाठी येत्या वर्षात मला कोणत्या नवीन गोष्टी अनुभवायच्या अथवा शिकायच्या आहेत?



- सर्व गोष्टींचा सारासार विचार करता पुढच्या वित्तीय वर्षात माझ्या कामाविषयी व करिअरविषयी मी (अ) कोणत्या गोष्टी नव्याने चालू करणार? (ब) कोणत्या गोष्टी अधिक सातत्याने करत राहणार? व (क) कोणत्या गोष्टी कटाक्षाने टाळणार?

या प्रश्नांवर विचार करून त्याची तुमच्या बॉसबरोबर मोकळेपणाने चर्चा करा. सहेतुक केलेली चर्चा निश्चितच पुढील मार्ग दर्शवेल. स्वतःच्या कामगिरीची तुलना तुमच्या सहकाऱ्यांच्या कामगिरीशी करण्याचे टाळा.

बहुतांशी कर्मचाऱ्यांना वाटत असते की आपल्या करिअरची सगळी जबाबदारी कंपनीची आहे. माझ्या भवितव्याचा विचार माझ्या बॉसने आणि कंपनीने करावा. मी पुढे काय करावे, कसे काम करावे हे त्यांनीच ठरवावे. ही धारणा संपूर्णपणे चुकीची आहे. आपल्या कामगिरीची व करिअरची जबाबदारी आपली आहे. विचार-विश्लेषण करून पुढील मार्गही आपल्यालाच आखायचा असतो. त्यासाठी कंपनी व कंपनीतील वरिष्ठांचे मार्गदर्शन घ्यायचे असते.

कंपनी तुमच्या करिअरच्या रथाचे सारथ्य करत असेल तरी तुमचे युद्ध तुम्हीच लढायचे व जिंकायचे असते.

chinchoresalil@gmail.com
(लेखक मनुष्यबळ क्षेत्रातील तज्ज्ञ असून या क्षेत्रात २५ वर्षे कार्यरत आहेत)

**चौकटी-पल्याड**
आशुतोष शिर्के
रश्मी पटवर्धन

# ॲनिमेशन : मानवी सर्जनशीलतेचा शोध

**गेल्या दोन** दशकांत ॲनिमेशन ही केवळ मनोरंजनाची शाखा राहिलेली नाही. ॲनिमेशन हे जगाच्या सांस्कृतिक, शैक्षणिक आणि तांत्रिक परिवर्तनाच्या केंद्रस्थानी जाऊन बसले आहे. चित्रपट, वेबसीरिज, गेमिंग, इंजिनीअरिंग, आर्किटेक्चर, वैद्यकीय सिम्युलेशन, व्हर्च्युअल रिॲलिटी या सर्व क्षेत्रामध्ये ॲनिमेशनचा वापर वाढतो आहे. त्यामुळे जगभरातील विद्यापीठे ॲनिमेशन क्षेत्राकडे गंभीरपणे पहात आहेत. ॲनिमेशन शिक्षणाचा अर्थ आपण बऱ्याच वेळेला केवळ 'सॉफ्टवेअर किंवा तंत्र शिकणे' असा घेतो. परंतु खरे तर ॲनिमेशन म्हणजे जगाकडे नव्या नजरेने पाहायला शिकणे.

बहुतेक भारतीय विद्यार्थ्यांच्या मनात ॲनिमेशन शिक्षण म्हटलं की अमेरिका किंवा युरोप हेच पर्याय येतात. कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स, न्यूयॉर्क फिल्म अकॅडमी, शेरिडन कॉलेज (कॅनडा), गोबलिन्स (फ्रान्स) आणि रॉयल कॉलेज ऑफ आर्ट (यूके) या संस्था जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहेत यात शंकाच नाही. या ठिकाणी विद्यार्थ्यांना ॲनिमेशन उद्योग जगतात काम करणारे नामांकित कलाकार आणि दिग्दर्शक शिकवतात. ते विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक कौशल्य देत नाहीत, तर 'दृश्य विचार' करण्याची क्षमता विकसित करतात - कथा, प्रकाश, रंग आणि भावना यांचा परस्परसंबंध समजावतात.

**ॲनिमेशन म्हणजे जगाकडे नव्या नजरेने पाहायला शिकणे. ॲनिमेशन ही कला आहे, ती मानवी निरीक्षणातून जन्माला येते. एखाद्या चेहऱ्यावरचा क्षणिक भाव, संध्याकाळच्या प्रकाशाचा रंग किंवा शांततेतही घडणारी कथा – हे सगळं पाहण्याची आणि समजण्याची क्षमता सॉफ्टवेअर देऊ शकत नाही.**



## गायत्रीचा प्रकाश, सावल्या आणि स्वप्नांचा प्रवास

गायत्री अंकम आज कॅनडात आहे. ॲनिमेशनच्या जगात तिने स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. पण हे स्थान तिला सहज मिळालेलं नाही. एआयच्या वेगवान लाटेमुळे तिच्या क्षेत्रात निर्माण झालेली अस्थिरता, बदलणाऱ्या कौशल्यांची मागणी आणि परदेशात स्वतःला सतत सिद्ध करण्याची गरज - या सगळ्यांशी सामना करत ती अजूनही तिच्या सर्जनशीलतेला धरून उभी आहे. तिच्यासाठी ही केवळ नोकरी नाही, तर तिच्या वेडासाठी तिने मोजलेली किंमत आहे.

ही कथा सुरू होते मुंबईतल्या सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट्सच्या वर्गात. रंग, प्रकाश



आणि सावल्यांच्या सूक्ष्म नात्याने तिला तेव्हाच भुरळ घातली होती. पडद्यावर दिसणाऱ्या जगामागचं गूढ तिला खुणावत होतं. त्या खुणेचा पाठलाग करत ती न्यूयॉर्क फिल्म अकॅडमीपर्यंत पोहोचली आणि तिथे तिच्यासाठी एक नवं विश्व उघडलं.

इथे तिला शिकवणारे शिक्षक केवळ प्राध्यापक नव्हते; तेच ते लोक होते ज्यांनी तिच्या लहानपणी तिला भुरळ घालणाऱ्या चित्रपटांच्या जगाची निर्मिती केली होती. ज्यांची नावे तिने पडद्यावर वाचली होती, तेच आता तिचे मार्गदर्शक होते. त्यांनी तिला केवळ सॉफ्टवेअर शिकवलं नाही, तर 'प्रकाश हा कथा सांगतो' हे शिकवलं. तांत्रिक कौशल्य आणि कलात्मक दृष्टी यांचा संगम म्हणजेच खऱ्या अर्थाने ॲनिमेशन, हे तिला तिथे उमगलं.

अमेरिकेत शिकताना आणि नंतर टीचिंग असिस्टंट म्हणून काम करताना तिची ओळख केवळ विद्यार्थिनी म्हणून राहिली नाही; ती त्या विद्यापीठाच्या सर्जनशील परंपरेचा एक भाग बनली. पुढे कॅनडात बार्डेल एंटरटेनमेंटमध्ये तिचं काम होतं नेटफ्लिक्स, डिस्ने आणि अमेझॉन प्राइममधील विविध ॲनिमेटेड दृश्यांना प्रकाश आणि कॉम्पोझिटिंगच्या माध्यमातून जिवंत करणं.

आज ती पुन्हा नव्या तंत्रज्ञानाकडे वळते आहे. परदेशी विद्यापीठातील शिक्षण आणि अनुभवातून ती एक महत्त्वाची गोष्ट शिकली - ॲनिमेशन ही केवळ करिअरची वाट नाही, तर सतत स्वतःला नव्याने घडवत राहण्याची एक जिवंत प्रक्रिया आहे.

पण ॲनिमेशनचं विश्व केवळ पाश्चिमात्य देशांपुरतं मर्यादित नाही. ॲनिमेशन क्षेत्रामध्ये जपान अग्रेसर मानला जातो. टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ द आर्ट्स आणि क्योटो सेइका युनिव्हर्सिटीसारख्या संस्थांनी 'ॲनिमे' या विशिष्ट शैलीला जागतिक प्रतिष्ठा मिळवून दिली. जपानी शिक्षणपद्धतीत निरीक्षण, संयम आणि सूक्ष्म भावनांचं चित्रण यावर भर दिला जातो. चीनमध्येही बीजिंग फिल्म अकॅडमी आणि चायना ॲकॅडमी ऑफ आर्टसारख्या संस्थांनी ॲनिमेशनमध्ये मोठी प्रगती केली आहे. तिथे पारंपरिक चीनी कलेचा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम घडवण्यावर भर दिला जातो. दक्षिण कोरिया आणि सिंगापूर हे देशही या क्षेत्रात झपाट्याने पुढे येत आहेत.

आज एआयमुळे या क्षेत्रात मोठा बदल होत आहे. काही वर्षांपूर्वी ज्यासाठी तासन्तास मेहनत लागायची, ती कामं आता काही मिनिटांत होतात. त्यामुळे अनेकांना वाटतं की ॲनिमेशनमध्ये माणसाची गरज कमी होईल. काही प्रमाणात हे खरे आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये जगभर ॲनिमेशन क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. परंतु ॲनिमेशन तयार करण्याच्या प्रक्रियेतील माणसाचे स्थान गेले आहे असे यामुळे आपण म्हणू शकतो का? एआय दृश्य तयार करू शकतो, पण तो अनुभव तयार करू शकत नाही. भावना, सूक्ष्मता आणि कथेला दिशा देण्याची क्षमता ही माणसाकडेच असते. एआय हे एक साधन आहे; कलाकार हा त्याचा सर्जक आहे. म्हणूनच जगातील सर्वोत्तम विद्यापीठांमध्ये आजही सॉफ्टवेअरला जितकं महत्त्व दिलं जातं तितकंच महत्त्व ड्रॉइंग, स्केचिंग, फोटोग्राफी, सिनेमाचा अभ्यास, मानसशास्त्र आणि कथाकथन यांना दिलं जातं.

ॲनिमेशनमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतःला केवळ 'तंत्रज्ञ' म्हणून नव्हे, तर 'कलाकार' म्हणून घडवणं आवश्यक आहे. सॉफ्टवेअर बदलतील, एआय विकसित होईल, पण मानवी कल्पनाशक्ती आणि संवेदनशीलता हीच या क्षेत्राची खरी ताकद राहील. ॲनिमेशनचं शिक्षण म्हणजे एका साधनाचं प्रशिक्षण नव्हे; ते म्हणजे स्वतःची वेगळी दृष्टी शोधण्याचा आणि जगाला नव्या पद्धतीने व्यक्त करण्याचा प्रवास आहे.

mentorashutosh@gmail.com
(लेखक करिअर समुपदेशक आहेत.)

## शब्दकोडे- ३५०

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | | ५ | ६ | ■ |
| ७ | | ■ | ८ | | | ■ | ९ | | १० |
| ११ | | १२ | | ■ | १३ | १४ | ■ | १५ | |
| | ■ | | ■ | १६ | | | १७ | | ■ |
| ■ | १८ | | | | ■ | १९ | | ■ | २० |
| २१ | | | ■ | २२ | २३ | ■ | २४ | २५ | |
| २६ | | ■ | २७ | | | २८ | ■ | | ■ |
| | ■ | २९ | | | ■ | ३० | ३१ | | ३२ |
| ३३ | ३४ | ■ | | ■ | ३५ | | | ■ | |
| ३६ | | | ■ | ३७ | | | ■ | ३८ | |

**आडवी विधाने :** (१) ज्याची कल्पना येणार नाही असे (४) पुष्कळ, खूप
(७) XX गबाले - हे मराठी चित्रपट दिग्दर्शक व निर्माते होते
(८) गडबड, गोंधळ
(९) त्रास, श्रम
(११) कोळिष्टक (१३) आड लपून बसणे
(१५) हात, सरकारी देणे
(१६) पळसाचा डिंक
(१८) दागदागिने, अलंकार
(१९) वटवृक्ष
(२१) दहावी तिथी, दुधात पीठ भिजवून केलेली पोळी (२२) प्रवृत्ती, झोक
(२४) गोधडी (२६) दुर्लक्ष, क्षमा
(२७) बोभाटा, गाजावाजा
(२९) छाया, प्रतिबिंब
(३०) मालक, नवरा (३३) कुसुम, पुष्प
(३५) संपूर्ण, फलद्रूप
(३६) चिन्ह, गुणधर्म
(३७) एक कीटक
(३८) सत्कृत्य, सत्कर्माचे फळ

**उभी विधाने :** (१) शासन नसलेली स्थिती (२) पंकज, सरोज
(३) पिकांचा अंदाज
(४) मजुरांवर देखरेख करणारा अधिकारी
(५) दुर्गुण, वाईट सवय
(६) तापाची पूर्वचिन्हे
(१०) नवऱ्याचा भाऊ
(१२) वालुकामय प्रदेश
(१४) पायऱ्या असलेली विहीर
(१६) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एक प्रमुख प्रशासकीय तालुका (१७) कठोर, कडक
(१८) सारांश, उद्देश (२०) पंक्ती, रांग
(२१) गरम मसाल्यातला एक पदार्थ
(२३) खांबावर आडवी टाकलेली तुळई
(२५) मुसलमानी धर्मसूत्र
(२७) दुधाचा व्यवसाय करणारा
(२८) निरर्थक, फोल (३१) पाणी, नीर
(३२) लक्षात न घेण्यासारखा
(३४) शंभर हजार, चित्त
(३५) पावसाची झड, ओवलेल्या फुलांचा हार

– चारू नानल

## सुडोकू - ३५०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | ८ |
| | ६ | ४ | १ | | ३ | २ | ९ | |
| | ७ | | ४ | | ८ | | १ | |
| | ८ | २ | ५ | | ७ | १ | ३ | |
| | | | | १ | | | | |
| | १ | ३ | २ | | ६ | ५ | ४ | |
| | २ | | ७ | | ५ | | ८ | |
| | ४ | ७ | ८ | | ९ | ६ | ५ | |
| ५ | | | | | | | | ३ |

## सुडोकू - ३४९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ९ | ३ | १ | ८ | २ | ४ | ५ | ७ |
| १ | ८ | ४ | ३ | ७ | ५ | ९ | ६ | २ |
| ५ | २ | ७ | ६ | ४ | ९ | १ | ३ | ८ |
| ३ | ५ | २ | ४ | १ | ७ | ८ | ९ | ६ |
| ७ | १ | ६ | २ | ९ | ८ | ५ | ४ | ३ |
| ८ | ४ | ९ | ५ | ६ | ३ | ७ | २ | १ |
| ४ | ७ | ८ | ९ | ३ | ६ | २ | १ | ५ |
| ९ | ६ | ५ | ७ | २ | १ | ३ | ८ | ४ |
| २ | ३ | १ | ८ | ५ | ४ | ६ | ७ | ९ |

## शब्दकोडे - ३४९ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | ल्हा | द | के | श | व | अ | त्रे | ■ | ट |
| स्ता | ■ | वा | दा | ■ | र | ■ | धा | म | ण |
| व | सा | ■ | र | स | दा | र | ■ | हा | क |
| ना | र | ळ | ■ | क | न | का | च | ल | ■ |
| ■ | थी | ■ | व | र्म | ■ | ना | ल | ■ | यं |
| कुं | ■ | पा | ■ | क | था | ■ | न | म | दा |
| भ | र | व | सा | ■ | ट | क | ■ | त्स्य | ■ |
| ■ | ता | स | का | टा | ■ | ट | च | ■ | क |
| का | ळे | ■ | र | ■ | प | रा | व | लं | बी |
| थ्या | ■ | ठा | णे | दा | र | ■ | ळी | ■ | र |

## संक्षिप्त

### विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात

**वसई:** शेषवंशी क्षत्रिय शिक्षणोत्तेजक संघ, वसई या संस्थेचा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ आणि २०२४-२५ चा वार्षिक बक्षीस वितरण समारंभ वसईतील नुकताच अनंतराव ठाकूर नाट्यगृहात पार पडला. प्राथमिक ते पदव्युत्तर परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद अजय सिताराम राऊत यांनी भूषवले, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विजय शिरीशकर आणि सेंट गोन्सालो गार्सिया इंग्लिश शाळेच्या माजी मुख्याध्यापिका स्वप्ना कमलेश पाटील उपस्थित होत्या. पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थी आणि पालकांना भविष्यातील संधींबाबत मार्गदर्शन केले.

### आरोग्य तपासणी शिबिराला प्रतिसाद

वसई : लोकसेवा मंडळ व कार्डिनल ग्रेशस मेमोरियल हॉस्पिटल ट्रस्ट, वैद्यकीय मार्गदर्शन समिती यांच्या वतीने आयोजित आरोग्य तपासणी शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. वसईतील बंगलीनाका येथील स्व. फ्रान्सिस डिसोजा सभागृहात सकाळी ७ ते १० वाजताच्या दरम्यान हे शिबीर पार पडले. या शिबिरात एकूण १०५ जणांनी उस्फूर्त सहभाग घेत रक्तदान केले. तसेच इसीजी चाचणी करून घेतली.

### धवलारिणींची गाणी, कवितांचा जागर

**पालघर :** जिल्ह्यातील संस्कृती आणि परंपरेचा वारसा जपणारा आगरी समाज होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतो. यंदा मायखोप गावात होळीचा सण केवळ गुलाल आणि विधीपुरता मर्यादित न राहता, एका नव्या सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमाने साजरा होणार आहे. गावातील समाजसेवक रामदास पाटील यांनी यावर्षी होळीच्या निमित्ताने 'साहित्य कवीकट्टा' व 'धवलारिणींच्या सन्माना'चा उपक्रम हाती घेतला. आगरी समाजात लग्नाकार्यात ज्याप्रमाणे ह्यधवलारिणीह्न गीते गायली जातात, त्याच धर्तीवर होळीच्या रात्री 'होळी गीते' आणि 'कविता सादरीकरणा'चा कवीकट्टा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या प्रत्येक धवलारिणीचा (पारंपारिक गाणी गाणाऱ्या महिला) विशेष गौरव करण्यात येणार आहे.

### 'सालवड महोत्सव'

**बोईसर :** बोईसरजवळील सालवड येथे दोन दिवसीय सालवड महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच पर्यटन वृद्धीसाठी शिवकन्या फाऊंडेशनमार्फत आयोजित या महोत्सवात विविध कार्यक्रम सादर होतील. २७-२८ फेब्रुवारी अशा दोन दिवस रंगणाऱ्या सालवड महोत्सवाचे हे तिसरे वर्ष असून यावर्षी विविध स्पर्धांची रेलचल असेल. महोत्सवात जास्तीत- जास्त नागरिकांनी सहभागी होण्याची आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

### नावझे गावात पर्यावरणपूरक उपक्रम

**बोईसर :** पालघर तालुक्यातील नावझे गावामध्ये उद्योगांच्या सामाजिक दायित्व कार्यक्रमांतर्गत पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्यात येत असून या शिवजयंतीचे औचित्य साधून या उपक्रमांचे लोकार्पण करण्यात आले. तारापूर औद्योगिक क्षेत्रातील गॅलेक्सी या कंपनीने 'समृद्ध गाव व्हिजन' या योजनेअंतर्गत नावझे गावात जलसंधारण, सौर ऊर्जा प्रकल्प, प्लास्टिक संकलन केंद्र व मधुमक्षिका पालन पर्यावरणपूरक उपक्रमांची सुरुवात केली. १९ फेब्रुवारी रोजी या विविध उपक्रमाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच उपस्थित होते.

# मोकाट जनावरांचा अडथळा

## वसई-विरारकर त्रस्त, उपाययोजना करण्याची मागणी

लोकसत्ता वार्ताहर

**वसई:** वसई - विरार महापालिका क्षेत्रात मागील काही महिन्यांपासून मोकाट जनावरांचा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरात पुरेसे कोंडवाडे नसल्यामुळे मोकाट जनावरे आता वर्दळीचे रस्ते, बाजारपेठा आणि महामार्गावर ठाण मांडत आहेत. त्यामुळे नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असून पालिकेने यावर ठोस कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

वसई- विरारमध्ये विविध ठिकाणी तबेले आहेत. या तबेल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनावरे आहेत. पण गेल्या काही काळात तबेलेवाल्यांच्या निष्काळजीमुळे विरारचा अर्नाळा रोड, नालासोपारा पश्चिमेकडील चक्रेश्वर तलाव परिसर, वसई पूर्वेचा सातिवली रस्ता आणि वसई पश्चिमेतील पापडी, स्टेला,



माणिकपूर अशा विविध भागात ही जनावरे रस्त्यावर मुक्त संचार करताना दिसून येतात. तसेच जनावरांचा मोठा कळप अनेकदा महामार्गाच्या मधोमध बसलेला अनेकदा दिसतो. शहरातील वाहतुकीच्या मुख्य मार्गांवरील तसेच महामार्गावरील भागात पथदिवे बंद अवस्थेत आहेत. त्यामुळे रस्त्याच्या मधोमध बसलेली जनावरे वाहनचालकांच्या नजरेस पडत नाहीत आणि वाहनचालकांचे अपघात होतात. तसेच रस्त्यावर पडलेल्या शेणावरून घसरून दुचाकी चालकांचे अपघात झाल्याच्या घटनाही यापूर्वी घडल्या आहेत. या अपघातांमध्ये वाहनचालक तर जखमी होतोच. पण, रस्त्यावर फिरणाऱ्या जनावरांना देखील दुखापत होते.

### वाहतूक कोंडीत भर

सकाळ-सायंकाळच्यावेळी रस्त्यावरून फिरणाऱ्या मोकाट जनावरांमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्नही निर्माण झाला आहे. तर या जनावरांच्या मलमूत्रामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे.

### कोंडवाड्यांची संख्या कमी

पूर्वी महापालिकेकडून रस्त्यावर जनावरे मोकाट सोडणाऱ्या मालकांवर कारवाई केली जात होती. आता कोंडवाड्यांसाठी पालिकेकडे पुरेशी जागा नसल्यामुळे फक्त दंड आकारून पकडलेली जनावरे पुन्हा मालकांच्या ताब्यात दिली जातात. त्यामुळे काहीवेळातच जनावरे रस्त्यावर फिरताना दिसतात.

# भोयदापाडा स्मशानभूमीला कचऱ्याचा विळखा

## दुर्गंधीत अंत्यसंस्कार करण्याची नागरिकांवर वेळ

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** वसई - विरार महापालिकेच्या कचरा भूमीवरील ढिगारे दिवसेंदिवस वाढत आहेत. या ढिगाऱ्यांचा विळखा आता भोयदापाडा स्मशानभूमीला पडला आहे. त्यामुळे नागरिकांना कचऱ्याच्या दुर्गंधीत मृतांवर अंत्यसंस्कार करावे लागत आहे.

वसई पूर्वेच्या भागात भोयदापाडा परिसर आहे. या भागातील कचराभूमीच्या जवळच महापालिकेने स्मशानभूमी तयार केली आहे. या स्मशानभूमीत आजूबाजूच्या भागातील नागरिक अंत्यसंस्कार करण्यासाठी येतात. पण गेल्या काही काळात महापालिका प्रशासनाकडून झालेल्या दुर्लक्षामुळे या



कचरा स्मशानभूमीजवळ साचला असेल तर शहानिशा करून संबंधित ठेकेदारावर कारवाई केली जाईल. तसेच स्मशानभूमीची स्वच्छताही करण्याची सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात येईल.

– **मनोजकुमार सूर्यवंशी,** आयुक्त, वसई – विरार महापालिका

स्मशानभूमीची अवस्था दयनीय झाली आहे. तसेच कचरा भूमीवरील कचरा विल्हेवाट प्रक्रिया ठप्प झाली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे तयार झाले आहे. आता या कचऱ्याचा विळखा भोयदापाडा येथील स्मशानभूमीला बसला असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे या स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना अडचणी निर्माण होत आहेत.

# नवी टाटा पंच.ईव्ही







**टाटा ईव्हीने** पंच. ईव्हीचे नवे रूप नुकतेच सादर केले. परवडणारी किंमत, चार्जिंगची सोय व बॅटरीची खात्री देताना ९.६९ लाख रुपयांच्या मूळ किमतीत ती मुंबईत उपलब्ध असेल. पंच.ईव्ही ही छोट्या कारच्या श्रेणीत किफायतशीर ठरेल, असा दावा कंपनीने केला आहे.

नवीन पंच. ईव्हीचे लॉन्च करताना टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल लिमिटेड आणि टाटा पॅसेंजर इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक शैलेश चंद्रा म्हणाले, की नवी पंच.ईव्ही, इलेक्ट्रिक मोबिलिटीला प्रत्येक घरासाठी खरोखरच सोपे, व्यवहार्य व निश्चिंत ठरते. ३५५ किमीची रिअल-वर्ल्ड रेंज, फास्ट चार्जिंग क्षमता, लाइफटाइम एचव्ही बॅटरी वॉरंटी हे त्यातील फायदे आहेत. प्रगत ॲक्टि.ईव्ही अभियांत्रिकीवर आधारित नवी पंच.ईव्ही शुद्धतेचा नवा पायंडा पाडते. सबकॉम्पॅक्ट अर्थात छोट्या आकाराच्या एसयूव्ही श्रेणीत पंचचे ईव्ही रूप तितकेच आकर्षक आहे.

### २६ मिनिटांत ८० टक्क्यांपर्यंत जलद चार्ज

- मोठ्या ४० केडब्ल्यूएच एलएफपी प्रिझ्मॅटिक सेल बॅटरी संचासह नवी पंच.ईव्ही एका चार्जमध्ये ३७५ किलोमीटरचा टप्पा पूर्ण करते. नवी पंच.ईव्ही रोजच्या शहरी वापरासाठी आणि छोट्या इंटरसिटी प्रवासासाठी उत्तम पर्याय मानता येईल. वारंवार चार्जिंग थांब्यांची गरज त्यामुळे कमी होते.
- नवी पंच.ईव्ही ३० केडब्ल्यूएच बॅटरी पॅक पर्यायासहही उपलब्ध असेल. या दोन पर्यायांच्या संयोगाने, नवीन पंच.ईव्ही ग्राहकांना पारंपरिक इंधनावर धावणाऱ्या वाहनांसाठी इलेक्ट्रिक हा सहज पर्याय उपलब्ध होतो. ड्रायव्हिंगचा उत्कृष्ट दर्जा व कमी रनिंग व मेंटेनन्स खर्च येतो.
- जलदगती चार्जिंग पर्यायांमुळे बॅटरी फक्त २६ मिनिटांत २० ते ८० टक्क्यांपर्यंत जलद चार्ज होऊ शकते. याशिवाय, १५ मिनिटांत बॅटरीला सहजपणे १३५ किमी रिअल-वर्ल्ड रेंज मिळते.

# मिरा रोडमध्ये हॉटेलला आग

**भाईंदर :** मिरा रोड येथील एका हॉटेलला सोमवारी मध्यरात्री अचानक भीषण आग लागली. यात संपूर्ण हॉटेल जळून खाक झाले आहे. मात्र, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मिरा रोड येथील शांती विहार परिसरात मुख्य रस्त्यालगत उडपी हॉटेल आहे. परिसरातील हे जुने हॉटेल असल्यामुळे येथे येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असते. दरम्यान, सोमवारी रात्री हॉटेल बंद झाल्यानंतर साधारणपणे एकच्या सुमारास आग लागली. सुरुवातीला धूर दिसत असताना आगीने अचानक रौद्ररूप धारण केले. या घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशमन विभागाने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य हाती घेतले. काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. मात्र, नागरी वस्तीत इतकी भीषण आग लागल्यामुळे आसपासच्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे, अशी माहिती स्थानिक नगरसेवक मनोज दुबे यांनी दिली.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

मार्केटिंग प्रतिनिधी पाहिजे

'लोकसत्ता'समवेत काम करण्याची संधी

**लोकसत्तातर्फे मीरा रोड ते विरार** या परिसरात राबविण्यात येणाऱ्या विशेष उपक्रमाच्या प्रचारासाठी जनसंपर्काची आवड असणारे विद्यार्थी युवक-युवती, नोकरदार आणि गृहिणी तात्काळ हवे आहेत.

**किमान आवश्यकता :** मराठीत उत्तम संभाषण करण्याची क्षमता

**वय मर्यादा :** कमीत कमी १८ वर्षे

फक्त शनिवार, रविवार तसेच सुट्टीच्या दिवशीदेखील काम करण्याची मुभा.

कृपया मुलाखतीसाठी येताना आपला बायो-डेटा बरोबर घेऊन येणे.

इच्छुक उमेदवाराने खालील क्रमांकावर संपर्क साधावा:
आशिष राशीनकर - ९५११६३९४१५, रुपेश गोळे : ९०२९५२०५०८

*वर्गणीदार योजनेबाबत घरोघरी लोकांना भेटणे अपेक्षित आहे.

## नाटक सिनेमा वाद्यवृंद














